श्रीगुरुदेवदत्त.

# आपटे घराण्याचा इतिहास.

लेखक व प्रकाशक

**गोविंद विनायक आपटे**

मुक्काम वाई धर्मपुरी.

**घ. नं ६६२ येथें प्रसिद्ध केलें**


वाई येथें मधलेआळींत घरनंबर ४१० येथें **दामोदर लक्ष्मण लेले**

**यांनीं आपल्या मोदवृत्त** छापखान्यांत छापिलें.



ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क लेखकानें आपले

स्वाधीन ठेविले आहेत.


आश्विन शु० १२ शाके १८३६.

**किंमत २। रु०**



श्रीमंत महाराज क्षत्रीय कुलावतंस सप्तसहस्र सेनापती प्रतिनिधी सर तुकोजीराव पवार बापूसाहेब महाराज के. सी. एस्. आय.

राज्य—देवास ( सीनियर )

The Bombay Art Printing Works, Fort.

व. ४४८
६/८

# अर्पण पत्रिका.

**आर्या** ( गीति. )

श्रीवर–वरदा ! सुखदा ! पदनतजन कामदा ! त्वदीय पदा ।
महदाषट्नलजलदा ! विबुधा ! सविनय असो प्रणाम मुदा ॥ १ ॥
न्यायें विनयें सुदयें भूपा ! त्वन्नाम धन्यता लाहे ।
महदानंदें तुजला गौरविती जन पिटोनि ताला हे ॥ २ ॥
विक्रमवंशोद्भव तूं मार्मिक सवस्क भूपराजीत ।
सुगुणग्राहकतेनें केलें सकलांस त्या पराजीत ॥ ३ ॥
प्रेमें मद्वंशींया आश्रय देवोनि आपुल्या पदरीं ।
राया ! तया चढविलें स्वकरें वैभवसुकीर्तिगिरि शिखरीं ॥ ४ ॥
बहुविध अनुपम ऐसा बघुनि तुझा मी अमोघ गुणराशि ।
झालों लुब्ध किती तरि शब्द फिके ते तुला कथायासी ॥ ५ ॥
मम पूर्वजेतिहास ग्रंथ तुला हा समर्पितों ह्मणुनी ।
होवो तोषद तो तुज हेतु न मीं नान्य वागवी स्वमनीं ॥ ६ ॥
स्वीकारोनि नृपाळा ! घ्यावी ही करूनि मान्य लघु सेवा ।
आहे लोभ जसा तव मत्कुलजीं तो तसा असो यावा ॥ ७ ॥

सो. ग. प. ...
दाखल नं. ......
भोर

# प्रस्तावना.

स्वाभिमान— घराण्याचा अभिमान— कुलाचा अभिमान— गोत्राचा अभिमान— ज्ञातीचा अभिमान— राष्ट्राचा अभिमान— या पायऱ्या क्रमाक्रमानें आदरणीय असावयाच्याच व त्या कार्यकारण संबंधानें निगडित असल्यामुळें परस्परांस चढत्या प्रमाणानें हितकर व पोषक असावयाच्या. या दृष्टीनें पहातां रा. गोविंदराव आपटे यांची प्रस्तुत कृति निःसंशय कौतुक करण्यासारखी व अनुकरणीय आहे. या दिशेनें इष्ट असलेले प्रयत्न करणाऱ्यांस त्यांनीं एक नवीनच स्वतंत्र उदाहरण घालून दाखविलें आहे. व या प्रयत्याचा प्रथम मान त्यांना आहे. ही सामग्री मिळवण्यांत त्यांना कष्ट व झीज बरीच लागली आहे. त्या संबंधानें निदान **आपटे** मंडळी तरी त्यांची उतराई होईल अशी आशा करणें वावगें नाहीं. या पुस्तकाचें साह्यानें आपटे मंडळींत परस्परांबद्दल एकी भावनेचें प्रेम वाढलें ह्मणजे त्यांनीं केलेल्या श्रमाचें व त्याबरोबर त्यांस सामग्री मिळविण्यास लागलेल्या श्रमाचे चीज होईल.

सोबत जोडलेल्या वंशवृक्षावरून मशारनिल्हे ग्रंथकाराची तेरावी पिढी दिसत आहे. म्हणजे शोध लागलेल्या मूळ पुरुषास आज सुमारें १३×२५=३२५ वर्षे होऊन गेलीं असावींत. त्यावेळीं आडनांवें अगर उपनांवें प्रचारांत होतीं कीं नाहीं; तसेंच चित्पावन हें उपपद **कोकणस्थांस** लावलें जात होतें कीं नाहीं, वगैरे बाबींवर प्रकाश पडण्यासारखे उल्लेख या माहितींत नाहींत हें केवळ दुर्भाग्यच होय; परंतु या उदाहरणानें प्रोत्साहित होऊन इतर चित्पावन साक्षेपी मंडळी आपापले संग्रहांतील जुने कागद वंशावळी, कुलदैवतें व इतर माहिती उजेडांत आणतील तर सत्य इतिहासाचे रचनेस अत्यंत महत्वाचा फायदा होईल. परमेश्वर त्यांस ही सद्बुद्धि देवो ! आजची बहुतेक सर्व आपटे मंडळी विश्वनाथभटाचे दोघे मुलांचाच केवळ वंशविस्तार आहे या एवढया शोधाचीच किंमत कांहीं थोडी नाहीं.

रा. आपटे यांनीं उपोद्घातांत व इतर दोन तीन ठिकाणीं कांहीं वादग्रस्त बाबींचा उपन्यास केला आहे व त्यांचें जें उपपादन केलें आहे तें जरी वादग्रस्त असलें तरी त्यांनीं निर्भिडपणानें त्या प्रसिद्धीस आणल्यानें विचारी गृहस्थांस त्या त्या बाबींबद्दल साधार शोध करून निर्विकार मनानें आपलीं

मतें ठरविण्याची संधि आणून दिली हें फार चांगलें झालें. कूपमंडुक वृत्तीस व दांडगाइचे हेकटपणास यामुळें कांहीं आळा बसण्याचा संभव आहे.

प्रसिद्ध परशुरामांची आई कोंकणा इचे वरून कोंकणप्रांतास कोकण हें नांव पडलें अगर महाभारतांत उल्लेखित असलेल्या **कुकुण**नामक **नाग**लोकांच्या कुलाचे नांवावरून तें नांव पडलें याचा शोध आणखी झाला पाहिजे. ( इतिहाससंग्रह पु. २ अंक ४ पृ. २०–२१ रा. राजवाडे यांचा लेख ) कदाचित् रेणुका ऊर्फ **कोंकणा** ही कुकुणकुलांतील असावी. असो.

" कार्मा स्वतां पश्यति " या कालिदासोक्त न्यायानें **भारत–इतिहास संशोधक–मंडळाचें** लक्ष या पुस्तकाकडे वेधलें जाणें हें युक्तच आहे. थोरले माधवराव पेशवे, नारो विष्णु आपटे, बाबासाहेब आपटे व श्री. मा. बयाबाई साहेब आपटे यांच्या तसबिरी व लक्ष्मण बल्लाळ ( माधवराव पेशव्यांचे खासगीकडील कामगार ) बाबूराव कृष्ण, कृष्णाजी वामन, चिंतो रामचंद्र व जिवाजी रामचंद्र अजरेकर वगैरे ऐतिहासिक पुरुषांचे कामगिरीची साधारण माहिती हे लाभ मंडळास अपेक्षित व इष्ट खाद्यच आहेत. हें पुस्तक प्रसिद्ध करण्यांत रा. गोविंदराव आपटे यांनीं मंडळाचे सभासद या नात्यानें साधन—संशोधनाचे कामांत आपला भाग आपले परीनें बराच उचलला याबद्दल आमचें मंडळ त्यांस वाखाणील अशी खात्री आहे.

पुणें भाद्रपद व० १० } खं. चिं. मेहेंदळे चिटणीस.<br>
श. १८३६ } भा. इ. सं. मंडळ.

भा. इ. सं मंडळाचे चिटणीस सरदार खंडेराव चिंतामण मेहदळे यांनीं वरील प्रस्तावना लेख लिहून या पुस्तकास सुशोभित केलें याबद्दल लेखक त्यांचा आभारी आहे.

प्रस्तावना लेखकांनीं उपनाम व चित्पावन ह्यासंबंधाचा खुलासा पुस्तकांत केला नाहीं. असें ध्वनित केलें आहे. ते बरोबर आहे. पुस्तकांत ज्या काला-पासूनची माहिती दिली आहे त्यापूर्वीं बऱ्याच वर्षांपासून उपनाम चालत आलें आहे. आतां उपनाम कोणत्या शतकापासून चालू झालें तें मात्र लेखक तूर्त निश्चित सांगू शकत नाहीं. आतां चित्पावनसंबंधीं माहिती देणें जरूर होतें. परंतु, माहिती देण्यासारखी महत्त्वाची बाब नसल्यामुळें ती दिली नाहीं. याचें कारण, चित्पावन हा शब्द कोणत्याही मान्य ग्रंथांत कोठें उपलब्ध नाहीं. फक्त " संह्याद्री खंडांत " मात्र चित्पावन ब्राह्मण असें ह्मटलें आहे. संह्याद्रिखंडातील माहिती सृष्टीनियमाविरुद्ध असल्यामुळें सदरहु खंड ऊर्फ पुस्तक निंद्य आहे इतकेंच नव्हें तर हा कल्पित खंड प्रसिद्ध करणार हिंदू जातीचा खास नव्हता एवढेंच येथें ध्वनीत करून आणखी यासंबंधीं विशेष खुलासा केव्हांतरी करण्यांत येईल.

मध्य–हिंदुस्थान व दक्षिण–महाराष्ट्र या प्रांतात " **आपटे घराण्याचा इतिहास** ज्या पद्धतीनें तयार करून प्रसिद्ध केला आहे, त्या पद्धतीचें पुस्तक आजपर्यंत एकही प्रसिद्ध झालें नाहीं. असें या लेखकास वाटत आहे. अशा तऱ्हेचें हें पहिलेंच पुस्तक असल्यामुळें त्यांत बऱ्याच चुका होण्याचाही संभव आहे. वंशवृक्षांत व पुस्तकांत एकादें नांव चुकून राहिलें असल्यास अगर जास्त पडलें असल्यास मेहेरबानी करून कळवावें. म्हणजे दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा सुयोग आल्यास त्यांत दुरस्त करण्यांत येईल. आमच्या एका सन्मान-नीय मित्रानें इंग्रजीचें भाषांतर व १।२ चरित्रें तपासून देण्याचे श्रम घेतल्या-मुळें लेखक त्याचा आभारी आहे.

" उज्जैन नजीक भैरवगड येथील आपटे मूळचे गोठणें–देवाचें येथील शेवडे पैकीं होत. गोविंद पांडुरंग आपटे देशावर आले. गोविंदराव याचे हात उभे राहिले असतां सहज गुडघ्यास लागत ह्मणून यांस आजानुबाहू असें ह्मणूं लागलें. हल्लीं भैरवगडचे अजानुबाहु आपटे असेच प्रसिद्ध आहे. गोविंदराव आजानुबाहू आपटे यांचे पुत्र रामचंद्र व केशव हल्लीं असून नोकर आहेत. रामचंद्र यास पुत्र विनायक व परशुराम. केशव यांस पुत्र रामकृष्ण हे विद्यार्थी आहेत. पुस्तक

छापून झाल्यावर ही माहिती मिळाली ह्मणून प्रस्तावनेंत उल्लेख केला आहे. "

पान ११३ मध्यें शेवटचें प्यारिग्राफांत ( हॅमिल्टन साहेबानीं बाराशें रुपये किंमतीचे घड्याळ सरदार बाबासाहेब आपटे यांना स्मरणार्थ दिलें. तें घड्याळ हल्लीं जमखंडीचे बापूराव आपटे यांचे जवळ आहे. ) असें चुकून लिहिलें गेलें. सदरहु घड्याळ सरदार श्रीधर गोपाळ ऊर्फ दाजीसाहेब आपटे लष्कर—ग्वालेर यांचेच जवळ आहे.

रा० केशव काशिनाथ आपटे फर्स्टक्लास मेक्यानिकल इंजिनीअर, रा. नारायणराव केशव आपटे, रा. रामचंद्र गोपाळ आपटे व रा. दत्तात्रय गोविंद कार्लेकर या चैघांनीं प्रसंगीं उसनवार रक्कम दिल्यामुळें या सर्वांचा लेखक फार आभारी आहे. विशेषतः मित्रवर्य रा. दत्तोपंत कार्लेकर हे लेखकाचे घराण्यांतील नसतांना, आपटेघराण्याचा अभिमान त्यांनीं अशा रीतीनें व्यक्त केला याबद्दल लेखकावर त्यांचे फार उपकार झाले आहेत.

श्रीमंत महाराज क्षत्रिय कुलावतंस सप्तसहस्र सेनापती प्रतिनिधी सर तुकोजीराव पवार बापूसाहेब महाराज के. सी. एस्. आय. राज्य देवास ( सीनियर ) यांनीं लेखकास पुस्तक अर्पण करण्याची समक्ष भेटींत परवानगी देऊन योग्य मदत करण्यांत येईल असें आश्वासन दिल्याबद्दल लेखक महाराजसरकार यांचा फार आभारी आहे.

श्रीमंत सरदार श्रीधर गोपाळ ऊर्फ दाजीसाहेब आपटे लष्कर—ग्वालेर, रा. रा. येशवंत गोविंद आपटे अकौंटंट जनरललष्कर— ग्वालेर; रा. रा. महादेव कृष्ण आपटे वकील धुळें; रा. रा. हरी नारायण आपटे कादंबरीकार पुणें व रा. रा. शंकर रावजी आपटे वकील हुबळी यांनीं लेखकास योग्य मदत करण्याचें अश्वासन दिलें आहे.

श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर येथील श्रीमंत माधवराव नारायण जोगळेकर कारभारी संस्थान त्रिंबकेश्वर यांनीं या लेखकास योग्य सहाय्य केल्याबद्दल लेखक त्यांचा फार आभारी आहे. तसेंच सर्व क्षेत्रोपाध्ये यांनीं मदत केल्याबद्दल त्यांचे फार उपकार आहेत.

ई. मेकानकी ऍक्टिंग कमिशनर सी. डी. हे धारवाड मुक्कामीं कलेक्टर असतांना यांनीं या पुस्तकांतील नकाशे, फोटो व महत्वाचे कागद पाहून आनंद व्यक्त करून एक पुस्तक आपणाकडे पाठवून द्यावें असें सांगितलें याबद्दल साहेबबहादुरांचा लेखक फार आभारी आहे.

लेखक—गो. वि. आपटे.

# उपोद्घात.

## कोंकण व कोंकणस्थ.

**कोंकण** हा शब्द **कोंकणा** या शब्दावरून झालेला आहे. दश अवतारांतील सहावा अवतार श्री परशुराम याची मातोश्री **रेणुका** इचे मूळनांव कोंकणा होय. सह्याद्रीचे पश्चिम पायथ्यापासून समुद्रकिनाऱ्यापर्यंतच्या भूमीला कोंकणप्रांत हें नांव पडण्याचें कारण येणेप्रमाणें:—

परशुराम हा भृगुपुत्र जमदग्नी यांचा मुलगा. परशुरामाचे आईचें नांव रेणुका हें असून तिला जमदग्नीपासून पांच पुत्र झाले; व परशुराम हा त्या पैकीं कनिष्ठ पुत्र होय ! एके वेळीं रेणुका नदीवर स्नानाला गेली होती. त्या ठिकाणीं गंधर्वाचें एक जोडपें जलक्रीडा करीत असलेलें तिच्या दृष्टीस पडलें. त्या देखाव्यानें तिच्या मनांत कामवासना प्रबल झाली. पुढें घरीं आल्यानंतर तिनें आपली इच्छा पतीजवळ प्रदर्शित केली. जमदग्नी हा नांवाप्रमाणें अग्नितुल्य प्रखर किंवा जहाल असल्यामुळें पत्नीच्या विषयवासनेमुळें त्याला अत्यंत कोप आला व अत्यंत निंद्य शब्दांनीं तिची निर्भर्त्सना करून तिचें शीर उडविण्याविषयीं आपल्या पुत्राला त्यानें आज्ञा केली. परंतु बापाची आज्ञा झाली असतांही, आपल्या मातेचा वध करण्याला चौघां पुत्रापैकीं एकही तयार होईना. पुढें पांचवा पुत्र परशुराम हा आल्यानंतर जमदग्नीनें तीच आज्ञा परशुरामाला केली व त्या पितृभक्त परशुरामानें बापाची आज्ञा शिरसा वंद्य मानून आपल्या हातांतील परशूनें मातोश्रीरेणुकेचें शीर उडविलें. पुत्राच्या या कृत्यानें जमदग्नीचा क्रोध शांत झाला. व त्याच्यावर खूष होऊन पाहिजे तो वर माग असें तो परशुरामाला म्हणाला. यावर पितृभक्त परंतु दयार्द्र अंत:करणाच्या परशुरामानें आपली मातोश्री सजीव व्हावी असा वर मागितला व जमदग्नीनें ती गोष्ट मान्य करून रेणुकेला पुन्हां जिवंत केलें. या गोष्टीवरून पितृभक्तीप्रमाणें परशुरामाचे अंतःकरणांत मातृभक्ति किती जाज्वल्य होती ही गोष्ट उघड होत आहे.

वरील गोष्ट घडून आल्यानंतर कांहीं दिवसांनीं कार्तवीर्य नांवाच्या महापराक्रमी राजानें जमदग्नीच्या आश्रमांत प्रवेश करून त्याची कामधेनू हरण केली. कार्तवीर्य हा माहिष्मती नांवानें प्राचीनकाळीं प्रसिद्ध असलेल्या प्रांताचा राजा कृतवीर्य याचा मुलगा. कार्तवीर्यानें तीव्र तपश्चर्या करून दत्तात्रयाला प्रसन्न करून घेऊन त्याच्यापासून अनेक वर मिळविले होते. एका वरानें त्याला सहस-

कात उत्पन्न झाले म्हणून त्याला सहस्रार्जुन असें नांव प्राप्त झालें. दुसऱ्या एका वरानें त्याला एक सुवर्ण रथ मिळाला. याच्या योगानें त्याला पाहिजे तिकडे संचार करितां येत असे! तिसऱ्या वरानें तो शत्रूला अजिंक्य होऊन बसला. दत्तात्रयापासून मिळालेल्यां वरांमुळें त्याच्या ठिकाणीं अद्भुत सामर्थ्य उत्पन्न झालें व त्याला स्वर्ग दोन बोटें उरला. या अभिमानामुळेंच त्याला जमदग्नीचे आश्रमांतून कामधेनू हरण करण्याचें धाष्टर्य करतां आलें. कामधेनू हरण केली त्यावेळीं परशुराम आश्रमांत नव्हता. आश्रमांत परत आल्यावर ही हकीकत त्याला समजली व क्रोधानें संतप्त होऊन त्यानें सहस्रार्जुनाशीं युद्ध करून त्याला ठार मारिलें. सहस्रार्जुनाचें मुलांना पित्याचे वधाची बातमी समजतांच क्रोधायमान होऊन ते जमदग्नीचे आश्रमांत आले व जमदग्नी आश्रमांत एकटा आहे असें पाहून त्याचा एमदम वध केला. परशुराम आश्रमांत परत आल्यावर पित्याचा वध झाल्याचे पाहून त्याचा क्रोधाग्नी खवळला व त्याक्षणीं सर्व क्षत्रियकुलाचा संहार करण्याची त्यानें घोर प्रतिज्ञा केली व त्याप्रमाणें त्यानें एकवीस वेळां निःक्षात्रिय प्रथ्वी केली. वास्तविक खऱ्या क्षत्रियानें गोब्राह्मणांचा प्रतिपाल करावा हेंच त्याचें आद्यकर्तव्य होय. परंतु तें विसरून आणि वरप्रसादानें प्राप्त झालेल्या सामर्थ्याचे योगानें उन्मत्त होऊन सहस्रार्जुनानें तपोबलानें प्राप्त करून घेतलेल्या जमदग्नीच्या कामधेनूला हरण करून नेली हा पहिला अन्याय ! व पुढें सहस्रार्जुनाच्या पुत्रांनीं तपोनिष्ठ जमदग्नीचा वध केला हा दुसरा अन्याय ! ! अशा दुहेरी अन्यायानें चिडून जाऊन परशुरामानें क्षत्रिय संहाराची प्रतिज्ञा केली. अर्थात् क्षत्रिय संहाराच्या अनर्थाचें खापर एका क्षत्रियाच्या अन्यायी उन्मत्तपणाच्या माथींच मारलें पाहिजे. परशुरामाचें क्षात्रतेज इतकें असह्य होतें कीं, प्रत्यक्ष रघुकुलोत्पन्न दशरथालाही स्त्रीवेष धारण करून ब्राह्मणाच्या आश्रमांत लपून बसावें लागलें. पुढें परशुराम. अवतार—कृत्याची समाप्ति होण्याचे वेळीं त्याचें व श्रीरामचंद्र याचें तुमुल युद्ध होऊन परशुरामाचें शरीरांतून दिव्य—जोत निघोन ती श्रीरामचंद्राचे शरीरांत प्रवेशली. अशा रीतीनें ह्या अवताराची समाप्ति झाली. परशुराम हे चिरंजीव असून सप्तचिरंजिवांमध्यें त्यांची गणना आहे. ते सप्तचिरंजीव येणे प्रमाणें—
अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः। कृपःपरशुरामश्च सप्तेते चिरंजीविनः ॥
श्रीपरशुराम हे अद्याप महेंद्र पर्वतावर तपश्चर्या करींत आहेत असा समज आहे. पित्याच्या वधावरून क्षत्रियाबद्दल श्रीपरशुरामाला इतका वीट आला होता कीं,

श्रीमंत प्रो. ग. वं. वाचनालय, औंध

क्षत्रियांनीं ज्या भूमींमध्यें वास्तव्य केलें त्या अपवित्र भूमींत राहणें पापकारक आहे असें वाटून सह्याद्रीच्या तटावरून त्यानें समुद्रावर बाण फेंकला व त्याच्या योगानें समुद्र द्वादश योजनें म्हणजे ( अठ्ठेचाळीस कोस ) मागें हटविला आणि ह्या नव्या पुण्यभूमीला आपल्या मातोश्रीचें स्मारक म्हणून तिच्या नांवावरून **कोंकणाप्रांत** असें नांव दिलें व या **कोंकणा** प्रांतांत परंपरा राहणारे जे ब्राह्मण ते कोंकणस्थ ब्राह्मण होत.

## कौशिकाचा वृत्तांत.

आपटे हें घराणें कोंकणस्थ असल्यामुळें कोंकणस्थ या शब्दाची उपपत्ती वर लिहिली आहे. आतां आपटे हे कौशिक गोत्रोत्पन्न असल्यामुळें कौशिका-संबंधीं त्रोटक हकीकत देत आहे— परशुराम आणि विश्वामित्र यांच्या संबंधाची एक मौजेची गोष्ट अशी आहे कीं, परशुराम हा ब्रह्मकुलोत्पन्न असून त्यानें आपल्या अंगांतील क्षात्रतेज प्रगट केलें; परंतु विश्वामित्रासंबंधाची गोष्ट याच्या उलट आहे. तो जात्या राजर्षि असून तो आपल्या तपः प्रभावानें ब्रह्मर्षि झाला. या दोघांमध्यें क्षात्रतेज आणि ब्रह्मतेज यांचें अपूर्व मिश्रण झालें होतें. विश्वामित्र हा कुशिकराजाचा नातू आणि गाधीचा पुत्र असून, कौशिक हें त्याचें दुसरें नांव होय. हा कान्यकुब्ज देशाचा राजा होता. कौशिक हा एके दिवशीं मृगयेनिमित्य अरण्यांत हिंडत असतांना वसिष्ठाचे आश्रमांत आला. वसिष्ठाची कामधेनू अवलोकन केल्यानंतर, तिच्या संबंधाचा मोह पडून ती आपल्याला देण्याबद्दल त्यानें वसिष्ठाला विनंति केली. परंतु महत्तपोबलानें प्राप्त करून घेतलेली ती कामधेनू विश्वामित्राच्या ताब्यांत देण्याला वसिष्ठ कबूल होईना. कामधेनू न मागतां तिच्या ऐवजीं कुबेराचीही संपत्ती आपण मागितली तरी ती देण्याला मी तयार आहें. परंतु कामधेनूसंबंधाचा आपला आग्रह आपण सोडून द्यावा अशी वसिष्ठानें विश्वामित्राची प्रार्थना केली. परंतु, विश्वामित्र आपला आग्रह सोडीना. विनंती करून कामधेनू मिळत नाहीं असें पाहून, ती कामधेनू हरण करण्याचा त्यानें प्रयत्न केला. परंतु या ठिकाणीं नुसत्या क्षात्रतेजाला ब्रह्मतेजापुढें हार खावी लागली. आपल्या तेजोभंगामुळें विश्वामित्राला अत्यंत वाईट वाटलें. व वसिष्ठासारखें ब्रह्मतेज प्राप्त करून घेण्याचा त्यानें निश्चय केला. आपला निश्चय शेवटास नेण्यासाठीं त्यानें घोर तपःश्चर्या आरंभिली व लोहपिष्ठ भक्षण करून विश्वामित्रानें राजर्षि पद प्राप्त करून घेतलें. याचा अर्थ इतकाच कीं, खडतर तपःश्चर्या करून ही

स्थिति त्यानें संपादन केली. ' घणे खावे लोखंडाचे तेव्हां ब्रह्मपदी नाचे ' या तुकाराम महाराजांच्या उक्तीवरूनही, ब्रह्मपद प्राप्त करून घेणें ही गोष्ट अत्यंत कठीण आहे हीच गोष्ट ध्वनित झालेली आहे.

बहुतकालपर्यंत तपःश्चर्या करून विश्वामित्रानें राजर्षि, ऋषि, महर्षि आणि ब्रह्मर्षि या एकाहून एक उच्च पदव्या प्राप्त करून घेतल्या. येवढेंच नव्हे तर प्रत्यक्ष वसिष्ठानें आपल्याला ब्रह्मर्षि ह्मणावें असा त्याचा हट्ट होता; व तोही अखेरीस सिद्धीस गेला. प्रत्यक्ष शत्रू वसिष्ठ यांनींही ज्याला ब्रह्मर्षि ह्मटलें अशा त्या मानी आणि निश्चयी विश्वामित्राचें तेज इतकें अद्भुत होतें कीं, ब्रह्मदेवाचा गर्व हरण करणारी प्रती सृष्टि तो निर्माण करूं शकला. विश्वामित्र हा कुशिकाचा नातू असल्यामुळें त्याला कौशिक म्हणतात; व विश्वाचा मित्र असल्यामुळें विश्वामित्र हें अन्वर्थक नांव त्याला प्राप्त झालें आहे. हरिश्चंद्रासारख्या सत्वशील राजाला नाना तऱ्हेनें छळणारा विश्वामित्र याला विश्वाचा मित्र कसें ह्मणतां येईल ! असा एक प्रश्न उद्भवतो; परंतु याचें उत्तर हेंच कीं, लोकोत्तर विभूतींचें सर्व कांहीं लोकोत्तरच असतें. सामान्य सत्पुरुषही दीनवत्सल असल्यामुळें आशिर्वादानेंही दुसऱ्याचें कल्याण करूं शकतात; परंतु विश्वामित्रासारखे लोकोत्तर ज्ञानी बाह्यतः दुसऱ्यांचा छळ करून सत्वाच्या पूर्ण कसोटीला मनुष्य उतरला असें पहातांच त्याचें आत्यंतिक कल्याण करतात इतकेंच नव्हे तर आपलें सर्वस्व देतात. या दोन नांवापैकीं कौशिक हेंच नांव सार्वत्रिक होऊन राहिलें आहे. व या गोत्रांत उत्पन्न झालेल्या ब्राह्मणांना कौशिकगोत्रोत्पन्न असें म्हणतात.

## अभिन्नत्व.

गोत्रासंबंधानें विचार करीत असतांना एक महत्वाची बाब लक्षांत ठेवण्यासारखी आहे. ती ही कीं, कौशिक गोत्रामध्यें ज्या ब्राह्मणांचा अंतर्भाव होतो ते फक्त कोंकणस्थतच आहेत असें नाहीं; तर देशस्थांत आहेत; सारस्वतांत आहेत इतकेंच नव्हे तर; कानडी, बंगाली व द्राविडी वगैरे ब्राम्हणांतही आहेत. कौशिक गोत्राप्रमाणेंच इतर गोत्रांचीही स्थिति आहे. अशी स्थिति कां असावी आणि निरनिराळ्या ऋषींच्या वंशजामध्यें आचार–विचारासंबंधानें आणि खाण्यापिण्यासंबंधानें इतकी भिन्नता कां उत्पन्न व्हावी असा प्रश्न ओघानें उत्पन्न होतो. यासंबंधाची उपपत्ती येणेंप्रमाणें असावी असें दिसतें– भिन्न भिन्न ऋषींचे वंशज भिन्नभिन्नकाळीं तीर्थयात्रा वगैरे करीत असतां निरनिराळीं

क ११५
का-क्र-३६



रमणीयस्थानें पाहून त्या त्या ठिकाणीं जाऊन राहिले असावेत व त्या ठिकाणच्या भिन्न गोत्रीय ऋषींच्या वंशजांशीं शरीरसंबंध करीत असावेत व अशा रीतीनें त्या त्या प्रांतांत त्यांचा वंशविस्तार झाला असावा असें वाटतें. पुढें भिन्न भिन्न प्रांतांतील परिस्थिति-भेदामुळें ऋषींच्या या वंशजांमध्यें कालमानानें खाणेंपिणें, आचारविचार आणि चालीरीति वगैरे बाबतींत भिन्नता उत्पन्न व्हावी हें स्वाभाविक आहे. परंतु हे भेद सध्याच्याकाळीं कितीही वाढलेले असले तरी या भिन्नतेच्या मागें **सगोत्रतेचें अभिन्नत्व** आजही दिसून येतें, ही विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. आतां, कोंकणस्थ ब्राह्मण, देशस्थ-ब्राम्हण, गौडसारस्वत ब्राह्मण, द्राविडी ब्राम्हण, बंगाली ब्राम्हण व कर्नाटकी ब्राम्हण; अशी विशेषणें ब्राम्हणांना हल्लीं जीं चालू आहेत; त्याचें मुख्यतः कारण हेंच कीं, ज्या ज्या देशांत आमच्या पूर्वजांनीं वास्तव्य केलें, त्या त्या देशाचें विशेषण आम्हाला प्राप्त झालें. प्रायः ब्राह्मण सर्व एक हेंच सत्य आहे.

---

# गोत्रमालिका.

**गोत्रमालिका** या नांवाचें एक लहानसें पुस्तक वीस पेजाचें वामन कृष्ण जोशी गद्रे व सदाशीव बजाबा शास्त्री अमरापूरकर यांनीं लोकहितार्थ बहुत परिश्रमानें रचिलें; तें मुंबई येथें **ज्ञानदर्पण** छापखान्यांत शिला यंत्रावर शके १७७७ त छापिलें त्याचा उतारा विशेष स्पष्ट रीतीनें देत आहे.

## १४ गोत्रें व ६० उपनामें यांची याद.

| गोत्रें | उपनामें. |
|---|---|
| **काश्यप १** | १ लेले. २ गानू. ३ जोग. ४ लवाटे. ५ गोखले. |
| **शांडिल्य २** | १ सोमण. २ गांगल ३ भाटे. ४ गणपुले ५ दामले. ६ जोशी. ७ परचुरे. |
| **वासिष्ठ ३** | १ साठे. २ बोडस. ३ वोक. ४ बापट. ५ बागुल ६ धारू. ७ गोगटे. ८ भाभे ९ पोंगशे १० विंझे ११ साठये १२ गोंवडचे |
| **विष्णुवर्धन ४** | १ किडमिडे. २ नेने. ३ परांजपे. ४ मेहदळे. |

| | |
|---|---|
| कौंडिण्य ५ | १ पटवर्धन. २ फणशे. |
| नित्युंदन ६ | १ वैशंपायन. २ भाडभोके. |
| भारद्वाज ७ | १ आचवल. २ टेणे. ३ दर्वे ४ गांधारे. ५ घांघुरडे ६रानडे. |
| गार्ग्य ८ | १ कर्वे. २ गाडगीळ. ३ लोंढे. ४ माटे. ५ दाबके. |
| कपि ९ | १ लिमये. २ खांबेटे ३ जाईल ४ माईल. |
| जामदग्न्य १० | १ पेंडसे. २ कुंटे. |
| वत्स ११ | १ मालशे. |
| बाभ्रव्य १२ | १ बाळ. २ बेहरे. |
| कौशिक १३ | १ गद्रे. २ बाम. ३ भाव्ये. ४ वाड. ५ आपटे. |
| अत्रि १४ | १ चितळे २ आठवेले. ३ भाडभोळे. |
| एकूण गोत्रें १४ | एकूण उपनामें ६० |

## ज्या गोत्रांचा परस्पर शरीरसंबंध होत नाहीं त्यांची साखळी.

भारद्वाजाश्च गार्ग्याः कपिकुल मिलिता जामदग्न्याश्च वत्सा । बाभ्रव्या कौशिकाः स्युः प्रवरसमयुता विष्णुवृद्धा नितुंदाः ॥ वासिष्ठाः कौंडिणेयाः पुनरपि मिलिताः काश्यपाः शांडिलेया । ज्ञेया विद्वद्भिरेते परिणय समये वर्जनीयाः प्रयत्नात् ॥ १ ॥

## जे समान प्रवर वर्ज त्यांचें कोष्टक.

| | | |
|---|---|---|
| १ भारद्वाज.<br>२ गार्ग्य.<br>३ कपि. | १ जामदग्न्य.<br>२ वत्स | १ बाभ्रव्य<br>२ कौशिक. |
| १ विष्णुवर्धन<br>२ नित्युंदन | १ वासिष्ठ.<br>२ कौंडिण्य. | १ काश्यप.<br>२ शांडिल्य. |

या समान प्रवरांचा परस्पर शरीरसंबंध होत नाहीं. जर कदाचित् चुकून झाला तर त्यास **सप्रवर** असें ह्मणतात. “ अत्रि आणि सर्वांशीं मैत्री ” ह्मणजे इतर गोत्रांबरोबर या गोत्राचा विवाह होतो.

श्रीमंत सौ. मं. दुं. वाचनालय, औं

# मूळ उपनामांचे-पोटभेद व पोट-उपभेद यांची याद.

## १ काश्यप गोत्र. ( आश्वलायन. )

**१ लवाटे** भेद- करमरकर, कान्हेरे, किणकिणे, दातार, सुंकले, जोशी, मेंढकर, ठोसर, व्यास, छत्रे, खाडिलकर, ओगले, बिवलकर, वेलणकर, लेले, भेंडे, भानू, भट व दांतीर. ( १९ ) भटभेद-फाळके, दामोदर व द्वारसेतकर. ( ३ ) दातीरभेद- शिंत्रे व सुकाडकर. ( २ ) एकूण ( २५ )

## तैतीर्य.

**२ लेले** भेद- पागे ( १ ). ३ **गानू** ४ **जोगभेद**- कापशे ( १ ) **५ गोखले** भेद- कातरणे, शिवणेकर, रास्ते, जामदार, पणदेव, बढिये, माखलकर, पाळकर व वेहळेकर. ( ९ ) एकूण ( १५ )

## शांडिल्य गोत्र. ( आश्वलायन )

**६ सोमण** भेद- नरवणे ( १ ) **७ भाटे ८ गणपुले** भेद- आंबडेकर, सहस्रबुद्धे व शिधये ( ३ ) ९ **दामले** १० **परचुरे** भेद- दुगुल, दातार व काळे ( ३ ) ११ **जोशी** भेद- पावशे, तुळपुळे, काणे, टकले, घनवटकर, शेरकर, देशमुख, शेंडये, घुले, धामणकर, पाटणकर, केळकर, थत्ते, विध्वंस. माईल, कर्वे, व्यास, भोगले, कानडे, गोडसे, टिळक, रिसबूड, बेहेरे, उपाध्ये, पांगूळ, लावेकर, करवीर, शिंत्रे व मर्ये, धामणकराचे भेद - गानू व राजवाडे. पाटणकराचे भेद- माटे. केळकराचे भेद-कोंजरेकर, ताम्हनकर, नित्सुरे, तिव्रेकर व पये. थत्ते- कुटुंबळे. एकूण ५०

## तैतीर्य.

**१२ गांगल** भेद-शिदोरे व डोंगरे. **डोंगरेचे** भेद पावगी. पळनिटकर.एकूण ५.

## ३ वासिष्ठ गोत्र ( आश्वलायन. )

**१३ बागुल भेद**-कोपरकर; **१४ पोंगशे, १५ विंझे, १६ साठये, १७ गोवंडचे** भेद-गोडशे, भातखंडे, कुटुंबे, गोंधलेकर, वैद्य व दातार. ( ६ ) दाताराचे भेद-दांडेकर, वर्तक, आघरकर, मधुमत्य, महाबळ, कोकणे, राणे व पर्वते. ( ८ ) एकूण २०.

## तैतीर्य.

**१८ साठे. १९ वोक** भेद-ओंकारे. २० **बापट** भेद-घारे, आरपुरे व

सावरकर. २१ धारु. २२ बोडस. २३ गोगटे. २४ भाभे. भाभेचे भेद–दातार, दात्ये, पेठे, दोणकर, अभ्यंकर व मोडक अभ्यंकराचे भेद–नातू, कारलेकर व तिरडे. मोडकाचे भेद–विनोदे, भस्मे, बेलवंडकर, रेशमेकर, शेवडे, भट, लंगोटे, भवान्ये व हारबुडे; एकूण २९

## ४ कौंडिण्य गोत्र ( आश्वलायन )

**२५ पटवर्धन** भेद–आचारी व कटके. **२६ फणशे.** एकूण ४

## ५ विष्णुवर्धन गोत्र ( आश्वलायन )

**२७ परांजपे** भेद–देव, मंडलिक, ओळकर, वाकळकर व किणकिणे एकूण ६

## तैतीर्य.

**२८ नेने. २९ मेहेंदळे. ३०. किडमिडे** एकूण ३.

## ६ नित्युंदन

## तैतीर्य.

**३१ वैशंपायन** भेद–सहस्रबुद्धे, पिंपळखरे व साडमानी; **३२ माडभोके** भेद–भिडे व आगलावे एकूण ७.

## ७ भारद्वाज गोत्र ( आश्वलायन )

**३३ दर्वे भेद**–गोळे, वैद्य, वैसास, लागू, सोहनी, नेकणे, कण्याचे व गांगल. **३४ आचवल भेद**–रहाळकर. **३५ गांधारे** एकूण १२

## तैतीर्य.

**३६ टेणे ३७ घांगुरडे ३८ रानड्ये** भेद–आखवे, चोळकर व मनोहर. एकून ६

## ८ गार्ग्य गोत्र ( आश्वलायन )

**३९ कर्वे. ४० लोंढे. ४१ माटे. ४२ दाबके** भेद–जोशी, भुसकुटे, मायदेव, गोरे व भागवत. **४३ गाडगीळ** भेद–सुतार, झसकर, केतकर, वैद्य, मरुगकर, आधिटकर, खजणे, टोळे, भट, थोरात, घाणेकर, वझे, बेडेकर, खंगले, पीटकर व पाउसबुद्धे; भट ऊर्फ ( पेशवे ) भेद– पोतदार. एकूण २७.

## ९ कपि गोत्र ( आश्वलायन. )

४४ **खांबटे** भेद– साने व काळे; ४५ **माईल** भेद– रटाटे व भागवत. ४६ **जाईल** भेद– दलाल, मायदेव व मराठे; मराठेचे भेद–राणे, चकदेव व विध्वंस; एकूण १३.

## तैतीर्य.

४७ **लिमये** भेद– करंदीकर, खासगीवाले, कामाटी, भाटे, धारप, शेवडे, बाठे व जोगदेवभट. एकूण ९.

## १० जामदग्निगोत्र.

### आश्वलायन.

४८ **पेंडसे** भेद– भागवत; ४९ **कुंटे**– भेद अग्निहोत्री. एकूण ४.

## ११ वत्सगोत्र.

### आश्वलायन.

५० **मालसे** भेद– उकिडवे, घांगरेकर, गोरे, काळे, जोशी, हिरे, दाभोळकर, काकतकर, गांगल, मायले, हेर, गार्गेकर व सोहोनी. सोहोनीचे भेद– नेवरे, भैरव, शेवडे व होळे. एकूण १८.

## १२ बाभ्रव्यगोत्र.

### आश्वलायन.

५१ **बाळ** भेद– सांपळे; ५२ **बेहेरे** भेद–वेंदरे. एकूण ४

## १३ कौशिकगोत्र. ( आश्वलायन )

५३ **बाम** भेद–गोरे, देवल, फफे, पेठकर, भागवत. ५४ भाव्ये भेद–सटकर, आगाशे व फाटक. सटकराचे भेद–कानिटकर. आगाशाचे भेद–खुळें, वर्तक व शेवडे. फाटकाचे भेद–रास्ते. ५५ वाड भेद– बापये, बर्वे व कोलटकर. एकूण १९

## तैतीर्य.

५६ **गद्रे** भेद– गडबोले, खरे, स्वयंपाकी, देवधर, पाळंदे व शौचे. खरे भेद– शारंगपाणी व तिरुके. देवधराचे भेद– ढमढेरे. ५७ **आपटे** भेद— शेवडे, फणसुकर, शेंडे व हुंबे. एकूण १५.

## १४ अत्रिगोत्र.

### आश्वलायन.

५८ **चितळे** भेद– जोगळेकर, मौने व चोळकर. ५९ **आठवले** भेद– फडके. फडकेचे भेद–हशमनीस. ६० **भाडभोळे** भेद– चांफकर, वाडदेकर व चिपळूणकर. एकूण ११.

18 JAN 1994 18 APR 1990

# एकंदर उपनामांची तेरीज.

| | प्राचीन. | | नूतन. | | एकंदर. |
|---|---|---|---|---|---|
| गोत्रें | आश्वला. | तैतीर्य | आश्वला. | तैतीर्य. | |
| १ काश्यप | १ | ४ | २४ | ११ | ४० |
| २ शांडिल्य | ६ | १ | ४५ | ४ | ५६ |
| ३ वासिष्ठ | ५ | ७ | १५ | २२ | ४९ |
| ४ कौंडिण्य | २ | ० | २ | ० | ४ |
| ५ विष्णुवर्धन | १ | ३ | ५ | ० | ९ |
| ६ नित्युंदन | ० | २ | ० | ५ | ७ |
| ७ भारद्वाज | ३ | ३ | १० | ३ | १९ |
| ८ गार्ग्य | ५ | ० | २२ | ० | २७ |
| ९ कपि | ३ | १ | १० | ८ | २२ |
| १० जामदाग्नि | २ | ० | २ | ० | ४ |
| ११ वत्स | १ | ० | १७ | ० | १८ |
| १२ बाभ्रव्य | २ | ० | २ | ० | ४ |
| १३ कौशिक | ३ | २ | १६ | १३ | ३४ |
| १४ अत्रि | ३ | ० | ८ | ० | ११ |
| १४ | ३७ | २३ | १७८ | ६६ | ३०४ |
| | ६० | | २४४ | | |

गोत्रमालिका या पुस्तकांत छापण्याचें मुख्य कारण सर्वांना आपलें **उपनाम** साठांपैकीं आहे किंवा साठांचे पोट भेदांपैकीं आहे किंवा उपभेदांपैकीं आहे तें समजावें हें होय.

## पूर्वजांचीं उदात्त तत्वें व ऐक्यता.

वरील गोत्रमालिकेवरून असें सिद्ध होत आहे कीं, कोणत्याही गोत्रजानें, कोणत्याही शाखेचें अध्ययन केल्यास कांहींच हरकत नाहीं. इतकेंच नव्हे तर दोन्हीं ( आश्वलायन व तैतीर्य ) शाखेचें अध्यायन करून ज्यानें प्राविण्य संपादिलें अशा वैदिकास पूर्वीं मोठा विद्वान् समजून त्याची मान-मान्यता चोहोंकडे होत असे.

एकंदर गोत्रें १४ यांत– कौंडिण्य, गार्ग्य, जामदग्नी, वत्स, बाभ्रव्य व अत्रि; यांचे गोत्रज सर्व आश्वलायन आहेत. नित्युंदन गोत्रज सर्व तैतीर्य आहेत. बाकी राहिले सात; या सात गोत्रजांत आश्वलायन व तैतीर्य जवळ जवळ बरोबरीनें आहेत. **उदाहरणार्थ— वासिष्ठ** गोत्रज एकंदर १२ आहेत; यांत साठे, बोडस, वोक, बापट, धारू, भाभे व गोगटे हे तैतीर्य शाखीय असून बाकीचे बागुल, पोंमशे, विंझे, साठये व गोंवइचे हे आश्वलायन शाखीय आहेत. **विष्णुवर्धन** गोत्रज एकंदर ४ आहेत. यांत किडमिडे, नेने व मेहेंदळे हे तैतीर्य शाखीय असून फक्त परांजप्ये आश्वलायन शाखीय आहेत. यांवरून सर्वांना सहज समजलेंच पाहिजे कीं, कोणत्याही गोत्रजानें कोणत्याही शाखेचें अगर दोन्ही किंवा चारी शाखेचें अध्ययन केल्यास त्यांस कांहींच हरकत नाहीं. व ज्यांमध्यें साक्षात् परमेश्वराची स्तुति केलेली आहे असे जे वेद ते **वेद** कोणत्याही शाखेचे असले तरी ते **वेद्** ह्मणजेच प्रत्यक्ष आदिनारायणाचें रूप होय ! ह्मणून अशा रूपाची स्तुति करण्यास ह्मणजे कोणत्याही वैदिक ब्राह्मणानें कोणताही वेद प्रथम अगर मागाहून म्हटला तरी पुण्यकारकच होय.

**कौशिक** ऋषीला एकंदर पुत्र पांच होते. त्यांपैकीं दोन तैतीर्य शाखीय व तीन आश्वलायन शाखीय. या पांचही बंधूंत पूर्वीं मंत्रघोष वगैरे ( जाग्रण ) होत असलाच पाहिजे हे निर्विवाद होय ! परंतु या पांचही बंधूंत आम्ही आश्वलायन शाखीय आधीं ह्मणणार ! तुम्ही नंतर म्हणा ! किंवा आम्ही तैतीर्य शाखीय आधीं म्हणणार ! तुम्ही नंतर म्हणा ! अशा तऱ्हेचा मूर्खपणाचा वाद पूर्वीं झाल्याचे कोठें आढळत नाहीं ! कोणत्याही शाखीय यांनीं

प्रथम म्हणणें म्हटलें तरीही चालत असे. यावरून आम्हां पूर्वजांचे विचार अतिशय **उदात्त** व **ऐक्यताप्रिय** होते हे वरील माहितीवरून स्पष्ट दिसत आहे.

अलीकडील वैदिक ब्राम्हणांनीं **वेदाची** पायमल्ली उडविली ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण ज्या आश्वलायन वैदिक ब्राह्मणांना **वेद** व **उपग्रंथ** यांत वेद श्रेष्ठ कीं उपग्रंथ श्रेष्ठ हें समजत नाहीं; अशांना वैदिक ब्राह्मण ह्मणण्याचें धाष्टर्य न करितां ब्रह्मकुलोत्पन्न असल्यामुळें त्यांना ब्राह्मण म्हणणें जरूर आहे. या ४ वर्षांतच कांहीं आश्वलायन ब्राह्मणांनीं बराच अदूरदर्शीपणाचा व विचारशून्यतेचा अगदीं कळस केला ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. पूर्वींपासून चालत आल्याप्रमाणें वागणें हें सुद्धां आश्वलायन ब्राह्मणास धोक्याचें वाटत आहे. म्हणजे अलीकडे बरींच वर्षें आश्वलायन शाखेचें ह्मणणें प्रथम ज्या जागेवर होत असें, त्याच जागेवर तैतीर्य शाखीय ह्मणत असत; व हल्लींही आश्वलायन शाखीय यांनीं ज्या बैठकीवर ह्मणणें म्हणजे वेदघोष केला असेल त्या बैठकीवर तैतीर्य शाखीय वैदिक ब्राह्मण म्हणणें म्हणण्यास तयार आहेत. परंतु, आश्वलायन ब्राम्हणांनीं वेदघोष केल्याबरोबर जर **उपग्रंथ** ह्मटले तर मात्र त्या ठिकाणीं वेदघोष कधींही कोणी करूं नये. **उपग्रंथ** ज्या जागेवर म्हटला गेला त्या जागेवर जर कोणी वेदघोष करील तर तो वेदाचाच नव्हे तर प्रत्यक्ष परमेश्वराच्या अवकृपेला पात्र होऊन, अंतीं दुर्गती भोगेल. कारण **वेद** उपग्रंथापेक्षां किती तरी पटीनें श्रेष्ठ आहेत. सर्व शाखीय वैदिक ब्राम्हणांचें एकाच बैठकीवर जर **म्हणणें** ( मंत्रजागर ) असेल तर सर्व शाखीय यांचा वेदघोष झाल्यावर मग उपग्रंथ कोणी म्हटल्यास कांहींच हरकत नाहीं.

आश्वलायन शाखीय ब्राम्हणांनीं वेदघोष करून जेथें उपग्रंथ म्हटले त्याठिकाणीं जर कोणत्याही शाखेचा ब्राम्हण वेदघोष करण्यास प्रवृत्त झाला तर तो म्हणणारा व ऐकणारा व त्यास उत्तेजन देणारा हे सर्व महापापी होत.

महामुनी व्यासोनारायण यांनीं केलेलें भविष्य कधींही चुकणार नाहीं हेंच खास ! कलियुगांत ब्राम्हण वर्णाश्रम सोडतील, उन्मत्त होऊन वेदांची निंदा करतील, मत्सरी, द्वेषी व कामांध होऊन आपसांत कलह करतील ! या भविष्याप्रमाणें हे दोष विशेषतः ब्राम्हणवर्गांतच जास्त आहेत असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं. कारण सद्यःस्थितीला आपल्या ब्रह्मकुलांत “ वेदशास्त्र संपन्न असून आचारविचार व ब्रह्मचर्यसंपन्न तपोनिधी ” असा हजारांत एखादा कदाचित् असल्यास न जाणो ! म्हणून हा लेखक सर्व ब्रह्मवृंदास सविनय विनंति करितो

कीं, आपल्या पूर्वजांचे उदात्त विचार, धर्मजागृति, समताबुद्धि व ऐक्यता या अद्वितीय गुणांचें सारखें स्मरण करा. तसें केल्यास खात्रीनें वरील दोषापासून अलिप्त रहाल. असो; विशेषतः आश्वलायनशाखीय वैदिक ब्राम्हणांपैकीं जे ब्राम्हण दुराग्रही असतील त्यांनीं सत्शील अंतःकरणानें विचार केल्यास चांगला प्रकाश पडल्याखेरीज रहाणार नाहीं; करितां पूर्वजांच्या उदात्त तत्वाचा नीट विचार करून वागा ! अशी या लेखकाची आग्रहाची विनंति आहे.

R.S. Pant Sachiv
No 344 III

श्रीकुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न.

श्रीगुरुदेव दत्तप्रसन्न.

# आपटे घराण्याचा इतिहास.

## वंशवृक्ष नंबर १ यामधील माहिती.

### आजगांववर्णन.

पुण्यभूमी श्रीपरशुराम क्षेत्र या नांवानें प्रसिद्ध असलेला सह्याद्रीचा पश्चिमभाग, ज्या भागास हल्लीं रत्नागिरी जिल्हा ही संज्ञा प्राप्त झाली आहे; त्या जिल्ह्यांतील वेंगुर्लें तालुक्याजवळ अदमासें ९ मैलावर ' आजगांव ' या नांवाचें एक खेडेगांव आहे. ह्या गांवच्या मुख्य ग्रामदेवता श्रीवेताळ व श्रीरवाळनाथ. शिवाय श्रीसर्वेश्वर, श्रीभार्गवराम, श्रीआदित्यनाथ, श्रीदेवनारायण, श्रीशांतादुर्गा व श्रीरामेश्वर हीं देवालयें निरनिराळे लोकांकडून बांधलीं गेलीं. श्रीवेताळ व श्रीरवाळनाथ, हीं देवस्थानें फार जुनीं आहेत. श्रीसर्वेश्वराचें देवालय, लष्कर—ग्वाल्हेर येथें गेलेले कै. श्री. सरदार नारो विष्णु आपटे यांनीं बांधिलें.

आजगांव येथें अदमासें दोनशें वर्षांपूर्वी जेवढीं कोंकणस्थांचीं घरें होतीं, त्यांत त्यावेळीं, व हल्लींही आह्मां आपट्यांचींच घरें जास्त आहेत. आतां पूर्व-

कालीन या घराण्यांतील आजगांव येथील पूर्वज, तेजस्वी, बुद्धिमान्, स्वदेश-विद्यापारंगत व शूर होते हें पुढील माहितीवरून सर्वांचे लक्षांत येईलच.

आजगांव येथील श्रीवेताळ महाराजांचा नवरात्रांतील उत्साह फार चांगला होतो. हें देवस्थान फार जाज्वल्य असून देवाची मूर्ती फारच उंच असून भव्य आहे. पूजा करण्यास पायाखालीं वडवंची घ्यावी लागते. श्रीवेताळाचे उग्र स्वरूप, हातांत सदैव असलेली ती नग्न तरवार व भव्य डोळे पाहिल्याबरोबर भीतीच वाटते !

गोमांतकांतील सावर्डें स्टेशनापासून आदमासें दीड कोसावर काकवडें या गांवीं साठेबुवा पुणेकर रहात असत. हल्लीं त्यांचे वंशज तेथें आहेत. पुणेकर साठे हे हरिदास होते. त्यांना पोटदुखीची व्यथा फारच होती. साठेबुवांनीं आजगांवचे वेताळास नवस मागून घेतला कीं, जर माझी पोटदुखी राहील तर मी दरवर्षीं नवरात्रांत तुझ्यापुढें कीर्तन करीन. नवस मागितल्यावरोन पोटदुखी औषधाशिवाय राहिली. त्याप्रमाणें दरवर्षीं आजगांवीं नवरात्रास जात होतें. परंतु एकेवेळीं बुवांनीं नवरात्राचा उत्साह देशावरचा पत्करला आणि पहिले दिवशीं कीर्तनास जों उभे राहतात तों एकदम पोटशूळ सुरू झाला. तावडतोब साठेबुवांनीं श्रीवेताळाची प्रार्थना केली कीं, मी आतां येथें कीर्तन करीत नाहीं. उद्यां निघोन आपले पुढें कीर्तन करण्यास हजर होतों. त्याबरोबर पोटशूळ बंद झाला. पुढें बुवांचे पश्चात् त्यांचे चिरंजीव दादासाठे यांनाही श्री-वेताळानें चाकरी करण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें दादाबुवाही प्रतिवर्षीं आज-गांवास जात असत. सदरहु हकीकत कै० दादाबुवा साठे यांनींच या लेखकाला सांगितली. कै. दादाबुवांचे चिरंजीव हल्लीं काकवडे येथेंच आहेत. ते कीर्तन-व्यवसाय करितात किंवा नाहीं तें माहित नाहीं.

श्री वेताळ रात्रीचे संचार करितात, तेव्हां त्यांचे पायांत वहाणा असतात. ह्या वहाणा करणारा पिढीजाद चांभार आहे. तो वर्षांतून दोन जोड करून देवालयांत बाहेरचे बाजूस टांगून ठेवितो. प्रत्येक जोड सहा महिन्यांनीं नवा तयार करून सदरहू ठिकाणीं ठेवण्यांत येतो. ह्या वहाणा पाऊण हात लांब असून बऱ्याच रुंद असतात. वहाणा झिजलेल्या लेखकानें प्रत्यक्ष पाहिल्या आहेत. चांभारास वहाणा करणेबद्दल देवाकडून जमीन आहे.

बऱ्याचवर्षांपूर्वीं श्री वेताळ महाराजांनीं एका खुनाचा पत्ता लाविला. सदरहु खून ग्रामाधिकारी व सांवतवाडीकर यांच्यांत झाला. म्हणजे “ आजगांवपैकींच एकाचा, सांवतवाडीकरांनीं खून करविला. ” सदरहू खून, ‘ म्हणजे मारलेल्या

इसमाचें प्रेत ' जंगलांत असलेलें श्रीवेताळांनीं भक्तास सांगितलें; त्याप्रमाणें प्रेत सांपडलें. श्रीवेताळदेवानें आपलें विरुद्ध वर्तन केलें ह्मणून त्यावेळपासून सांवत-वाडीकरांपैकीं कोणी आजगांव येथें आल्यास श्रीवेताळाच्या देवळाचेंही दर्शन होऊं नये ह्मणून त्याबाजूस पडदे लावितात.

वरील माहिती सर्व ऐकीव आहे ह्मणून तिच्या सत्यासत्यतेचा निर्णय करण्याचें काम वाचकांवरच सोंपविणें इष्ट आहे.

सर्व आपट्यांचा मूळपुरुष आजगांव येथील विश्वनाथभट हे होत. यांस पुत्र दोन, महादेवभट आणि कृष्णंभट. महादेवभटाचा वंश आजगांव येथें हल्लीं आहे आणि कृष्णंभटाचा वंश मालवण—नजीक—त्रिंबक येथें आहे.

आजगांव येथील महादेवभटास—विश्वनाथभट व विश्वनाथभटास—महादेवभट यांस पुत्र चार, भास्करभट, पद्मनाभभट, कृष्णंभट व गणेशभट. भास्करभटास पुत्र दोन, सुकभट व बापूभट. सुकभटाचा निपणतू विठोबा, पुढें निर्वंश.

बापूभटाचे पुत्र दोन, कृष्ण व नारायण; कृष्णाचा निर्वंश. नारायणास पुत्र दोन, लक्ष्मणभट व भास्करभट; लक्ष्मणभटाचा निर्वंश; भास्करभटास पुत्र तीन, विष्णुभट, लक्ष्मणभट व बापूभट. विष्णुभटाचे पुत्र दोन, बाळकृष्ण व नारायण. बाळकृष्णाचे कांहीं नाहीं. नारायण ऊर्फ नारो विष्णु आपटे हेच मोठे प्रसिद्ध होऊन गेले.

## सरदार नारो विष्णु आपटे यांचें अजब कर्तृत्व !

वे. विष्णुभट आपटे हे आजगांवाहून आदमासें शके १७०० त मिरज येथें आले. यांस दोन पुत्र, बाळकृष्णा व नारायण. बाळकृष्ण यांस वेदशाळेंत व नारायण यांस धुळाक्षराचे शिक्षणशाळेंत घालण्यांत आलें. नारायण ऊर्फ नारो हे १५।१६ वर्षांचे सुमारास श्री० सरदार सांगलीकर यांचेजवळ शागिर्दीचें कामावर राहिले.

अशी एक म्हण आहे कीं, " नर करणी करील तर त्याला नारायण होता येईल, " त्याप्रमाणें नारो विष्णु हे धूर्त, चाणाक्ष व शूर होते ह्मणून स्वतःचे हिमतीवर पुढें आले.

आपल्या बरोबरीची कांहीं हुषार मंडळी जमवून मोठ्या सावधगिरीनें व युक्तीनें इतर पुंड मंडळी हातांशीं घेऊन, रात्रौ कर्नाटकांत लूट—मार करावी आणि दिवसा पहावें तों नोकरीवर हजर ! याप्रमाणें कांहीं दिवस जसे गेले तसे हें प्रस्त वाढतच चाललें.

एके दिवशीं रात्रौ सुमारें दोन हजार सशस्त्र लोकांनिशीं बेळगांव नजीक तळ देऊन, नारोपंत आपणाबरोबर ३–४ लोक हुशार घेऊन वेशांतर करून बेळगांवचे किल्यांत शिरले आणि बुरुंजावरील गोलंदाज ठार करून, तोफेला पागोटें बांधून किल्ल्याबाहेर खंदकांत उतरले. खंदकांतील पाण्यांतून पोहून आपल्या तळ दिलेल्या ठिकाणीं गेले व सर्व सैन्यास बरोबर घेऊन रात्रौ किल्ल्यावर हल्ला करून किल्ला सर केला. मग काय विचारतां! किल्याच्या आश्रयानें नारो विष्णु आपटे यांचें प्रस्त जास्तच वाढत चाललें. श्रीमंत शेवटचे बाजीराव पेशवे यांनीं नारो विष्णु यांना पुणेंमुक्कामीं येऊन भेटण्याबद्दल पत्रें गेलीं. तेव्हां नारो विष्णु यांनीं श्रीमंतांना अशी विनंति केली कीं, आह्मांस कोणत्याहीप्रकारें दगा–फटका होणार नाहीं, अशाबद्दल खात्री झाल्यास श्रीमंतांचे दर्शनास जरूर येईन! तेव्हां श्रीमंतांनीं,–तुम्हांस कोणतेही तऱ्हेचा त्रास होणार नाहीं. याबद्दल पुणें येथील रा. नारो आवटी हे खातरजमा करतील. नंतर रा. नारो आवटी यांचे मध्यस्थीनें, नारो विष्णु आपल्या सर्व लोकांस सावध राहणेचा इशारा देऊन पुण्यास आले. आणि श्रीमंतांचे भेटीकरितां 'शनवारवाड्यांत' गेले. रा. नारो विष्णु आपटे हे शरीरानें मजबूत, देखणे, गोरे व तेजःपुंज होते. श्रीमंत बाजीरावांनीं, नारो विष्णु यांना पाहतांच, या आपटे! बसा!! असें म्हणून, तुह्मी कर्नाटकांत कोणाचे मुलखांत काय चालविलें आहे? तुम्ही अशी पुंडाई न करितां आमचे पदरीं रहावें, अशी आमची फार इच्छा आहे. हे शब्द ऐकतांच, नारो विष्णु म्हणाले, श्रीमंतांनीं आश्रय दिल्यास मी राहण्यास तयार आहें. श्रीमंतांनीं ताबड-तोब बाराशें स्वारांची सरदारी देऊन, खास हुजुरांत असावें, असें फर्माविलें.

नारो विष्णु यानीं आपल्या सर्व साथिदारांस श्रीमंताचे पदरीं सैन्यांत ठेवून आपण सरदार झाले. नारो विष्णु यांचे ताब्यांत इ. स. १८१७ त पंधरा हजार फौज होती. याच सालीं कोरेगांवची लढाई झाली. त्यावेळीं सेनापती बापू गोखले व सरदार नारो विष्णु हेच मुख्य होते. पुण्याचे बंदोबस्ताकरितां नारो विष्णु पंधरा हजार फौजेसह निघाले; तेव्हां वावोली येथें यांचा मुक्काम झाला होता.

पेशवाई बुडण्याचे शेवटचे धामधुमींत, श्रीमंत बाजीराव राज्य सोडून जे पळत सुटले ते ब्रम्हवर्तास जाऊन राहिले. त्यावेळीं त्यांचे बरोबर जाणेविषयीं सेनापती गोखले यांनीं नारो विष्णूस सुचविलें कीं, तुह्मीच श्रीमंतांबरोबर संरक्षणार्थ जावें. त्याप्रमाणें नारो विष्णु हे श्रीमंताजवळ ब्रम्हवर्त येथेंच होते. श्रीमंतांनीं आपणास आतां फौजफाट्याची कांहीएक गरज नसल्यामुळें सर्व कमी

करण्यास सांगून तुमचीही व्यवस्था तुमच्या इतमामाप्रमाणें लवकरच करितो, असें ते म्हणाले. त्याप्रमाणें लवकरच श्रीमंतांनीं रा. दौलतराव शिंदे यांस पत्र लिहिलें कीं, " आम्हीं सर्व राज्यऐश्वर्य सोडून ब्रम्हवर्ती राहिलो; हें तुह्मास माहित आहेच. आमचे जवळ सरदार नारो विष्णु आपटे आहेत. त्यांची व्यवस्था त्यांच्या इतमामाप्रमाणें तुम्ही आपले जवळ ठेवाल असें वाटल्या वरोन तुम्हास लिहीत आहो कीं, आमचे मनांतून नारो विष्णु यांना तुम्ही आपले पदरीं ठेवावें. काय तें उत्तरी कळविणें. " अशा अर्थाचें पत्र लिहिलें. जरी श्रीमंतांनीं राज्य सोडून दिलें, तरी त्यांचा शब्द त्यावेळींही कोणी मोडला नाहीं.

वरील अर्थाचें पत्र सरदार दौलतराव शिंदे यांनीं वाचलें आणि तात्ब्डतोब उत्तर लिहिलें तें असें, " श्रीमंतांचे हुकुमाप्रमाणें, सरदार नारो विष्णु यांची व्यवस्था, त्यांचे इभ्रतीस साजेल अशीच माझ्याकडून राहील ! " याप्रमाणें सरदार शिंद यांचें उत्तर आलेलें पाहून, श्रीमंतांनीं सरदार नारो विष्णु यांना, सरदार दौलतराव शिंदे यांचे पदरीं राहणेस सांगितलें. त्याप्रमाणें नारो विष्णु लष्करास जाणेकरितां निघाले. सरदार नारो विष्णु हे लष्करांत आल्याचें समजतांच, डंका, नौबद व निशाण सामोरें पाठवून त्यांचे स्वागत केलें. दोघांच्या भेटी झाल्या.

शके १७३९ त नारो विष्णु यांना पेशवाईतील हुद्यासह बावन पागेवरचे मुख्य अधिकारी नेमण्यांत आलें. आणि " सरदार नारो विष्णु आपटे " याप्रमाणें दरबारी नांव बहाल झालें. पुढें शके १७४८ त सरदार दौलतराव शिंदे वारले; मग काय विचारतां ! बायजाबाई शिंदे व जनकोजीराव शिंदे या दोघांमध्यें गादीचे मालकीसंबंधीं लढा सुरूं झाला. त्यावेळीं जनकोजीराव शिंदे यांच्या पक्षाचे सरदार नारो विष्णु आपटे होते. म्हणून विरुद्धपक्षानें नारोपंतास पकडून नरवरचे किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. ही खबर इंग्रज सरकारास कळली. तेव्हां बायजाबाईकडून नारो विष्णूस सोडून देवविलें. मग ते कांहीं दिवस इंदोर येथें राहून पुढें ब्रह्मवर्तास गेले.

इकडे लवकरच महाराज जनकोजीराव शिंदे यांना गादी मिळाली. आपल्याकरितां सरदार नारो विष्णु यांना फार त्रास झाला होता ही गोष्ट न विसरतां, गादी मिळतांच, रा. रामजीपंत केळकर यांचे बरोबर शंभर स्वार व डंका-निशाण देऊन, सरदार आपटे यांना घेऊन येण्याचा हुकूम झाला. हुकुमाप्रमाणें रा० रामजीपंत केळकर, हे ब्रह्मवर्तास जाऊन सरदार नारो विष्णु यांना बरोबर

घेऊन लष्कर—ग्वालेर येथें आले. महाराजांची भेट झाली आणि महाराजांनीं त्यांना पूर्वीच्या हुद्यावरच कायम केलें.

शके १७३९ त दौलतराव शिंदे यांनींच नारो विष्णूस बावन पागेचे मुख्य अधिकारी नेमिलें तेव्हांच चिटणीसगोटांत राहण्यास जागा दिली. याच जागेवर नारो विष्णु यांनीं विस्तीर्ण वाडा बांधिला तो अद्यापीहि कायम आहे. यांना घोडे बांधण्याकरितां म्हणून जी जागा देण्यांत आली होती त्या जागेवर हल्लीं उत्तम बगीचा आहे. महाराज दौलतराव शिंदे यांनीं शके १७३९ तच सरदार नारो विष्णु यांस तैनातजाप्ता करून दिला त्याचा तपशील—जासूद दोन, उंट चार, भालदार एक, घोडे रास तीन, शिपाई अकरा आणि पेशवाईपासून चालत आलेला सुरजमुखी हलकारा, पालखी व अबदागिरीमय छत्री चालू केली.

महाराज जनकोजीराव शिंदे यांचे कारकीर्दींत सरदार नारो विष्णु हे माळवा प्रांतांचे सुभायतीवर होते. सुभायतीवर असतां, सोंदे नांवाच्या अडदांड लोकांचा चांगला बंदोबस्त केल्याबद्दल खातरजमा होऊन महाराज जनकोजीराव शिंदे यांनीं, सरदार नारो विष्णु यांना दिवाणगिरीचे कामावर नेमिलें. शके १७५५ त **"राव राजे समशेर बहादर"** हा किताब देऊन **दरबारांत उजवे बाजूचा मान व पुरी ताजीम, पांच पार्च्यांचीं वस्त्रें व कंठी शिरपेंच** येणेप्रमाणें बहुमान केला. पुढें शके १७६३ त प्रांत जिल्हे अहमदनगर पैकीं मौजे लिंपणगांव व देडगांव हे दोन गांव जहागीर देऊन वंशपरंपरेची सनद करून दिली. पुढें कांहीं दिवस इंदोर दरबारतर्फे नारो विष्णु हे वकील होते. हे शूर असून मोठे मुत्सद्दी होते. शिंदे सरकारचे दरबारीं इमानें इतबारें उत्तम कामगिरी करून त्यांनीं जहागीर व किताब मिळविला. शके १७६५ त सरदार नारो विष्णु आपटे राव राजे समशेर बहाद्दर हे इंदोर येथें कैलासवासी झाले. याच सालीं महाराज जनकोजीराव शिंदेही स्वर्गवासी झाले.

सरदार नारो विष्णु यांस दोन पुत्र होते. पहिले हरीपंत ऊर्फ बाबासाहेब व दुसरे विठ्ठलपंत ऊर्फ भाऊसाहेब. बाबासाहेब आपटे यांना शके १७४२ त महाराज दौलतराव शिंदे यांनीं एकंदर पागा रास शंभर, डंकानिशाण व दरमहा रुपये दोनहजार, पैकीं रास पंधरा खास बसण्याकरितां व पंचाऐशीं नोकरीवर, येणेप्रमाणें नांव दाखल झालें. पुढें शके १७६७ त बाबासाहेब आपटे यांचें नांव वडिलार्जित सरदारीवर दाखल होऊन सरदारीबद्दल दरमहा रुपये बाराशें पंचवीस व जहागीर, कंठी शिरपेंच वगैरे देऊन नांव बहाल झालें.


८६
स



कै० सरदार नारो विष्णु आपटे, रावराजे समशेरबहाद्दर लष्कर-ग्वालेर.
(पांढरे पागोटें घातलेले 'नारो विष्णु' होय.)

दाखल नं.......
भोर

The Bombay Art Printing Works, Fort.



कै० सरदार हरी नारायण उर्फ बाबासाहेब आपटे रावराजे समशेरबहाद्दर लष्कर-ग्वालेर.

श्रीमंत सौ. नं. पं. वाचनालय, मोर्
ब ८८७



शके १७८३ मध्यें महाराज जयाजीराव शिंदे यांनीं प्रांत माळवा, जिल्हा निमच, परगणे जावत पैकीं मौजे लासूर व खेताखेडी हे दोन गांव जहागीर देऊन वंशपरंपरेची सनद करून दिली. ( पूर्वीं अहमदनगर पैकीं जे दोन गांव जहागीर दिले होते त्याचे मोबदला वरील दोन गांव जहागीर करून दिले. ) सरदार बाबासाहेब आपटे यांच्या मातुश्रीं लक्ष्मीबाई यांनीं श्रीक्षेत्र काशी येथें दुर्गाघाटावर श्री नारायणेश्वराचें मंदिर बांधिलें आहे. त्याचे पूजानैवेद्याकारितां शके १७७४ मध्यें जिल्हा गिर्द ता० बहादरपूर पैकीं मौजे गुठिणा हा गांव मातोश्री लक्ष्मीबाईसाहेब आपटे यांचे नांवें देऊन त्यांचे नांवची वंशपरंपरेची सनद करून दिली.

शके १७९७ मध्यें घोडे रास कमी झाली. तेव्हां दरमहा दोन हजारही कमी झाला. बाबासाहेब यांचे बंधू भाऊसाहेब यांना दरमहा तीनशें रुपये तनखा मिळत असे व ते नेहमीं महाराज जयाजीराव शिंदे यांचेजवळ असत. पुढें शके १८०४ मध्यें सरदार बाबासाहेब आपटे कैलासवासी झाल्यानंतर त्यांचे चिरंजीव गणेश हरी ऊर्फ रावसाहेब आपटे यांचे नांवें पूर्वींप्रमाणें जहागिरी-जाबता वगैरे सर्व दाखल करण्यांत आलें. परंतु, शके १८०५ मध्यें सरदार रावसाहेबही कैलासवासी झाले.

सरदार रावसाहेब आपटे हे शेवटचे श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांचे जांवई होत. यांचें कुटुंब श्रीमंत बयाबाईसाहेब या हल्लीं आहेत. यांनीं शके १८१० त काशिनाथ आपटे यांस दत्तक घेऊन दत्तक नांव हरी ठेविलें. हे पूर्वीं रेल्वेंत नोकर होते. दत्तक झाल्यापासून हरी गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे हे वडिला-र्जित जुन्या वाड्यांतच रहात आहेत. गोपाळ ऊर्फ भय्यासाहेब आपटे हे रावसाहेब आपटे यांचे सख्खे चुलतबंधु होत. रावसाहेबांचे पश्चात् भय्यासाहेब यांचें नांव सरदारीवर दाखल झालें. यांनीं जयेंद्रगंजांत नवा वाडा बांधिला आहे. भय्यासाहेब हे शके १८२५ त कैलासवासी झाले. यांचे पश्चात् वास्त-विक रीतीनें कैलास० रावसाहेब आपटे यांचे दत्तकपुत्र हल्लीं हयात असलेले नानासाहेब आपटे यांचे नांवें जहागीर होऊन सरदारींत नांव दाखल व्हावयास पाहिजे होतें. परंतु तसें न होतां हल्लींचे महाराज माधवराव शिंदे यांनीं देवास येथील त्र्यंबक गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे यांचे द्वितीय चिरंजीव श्रीधर ऊर्फ दाजीसाहेब आपटे यांना भय्यासाहेब आपटे यांस दत्तक देऊन सर्व पिढीजाद जहागिरीजाबता व सरदारी दाजीसाहेब यांचे नांवें दाखल केली

आहे. सरदार श्रीमंत दाजीसाहेब आपटे हे बी. ए. असून सरकारी ऑफिसर आहेत. यांचा स्वभाव फार दयाळु आहे. जनकपित्याचे आशीर्वादानें व यांच्या पूर्व पुण्याईनें यांना सरदारी मिळाली हें जरी खरें तरी आपण सरदार आहों या भावनेनें उत्पन्न होणारी आढ्यता किंवा श्रीमंतीचा डौल त्यांच्या ठिकाणीं बिलकुल नाहीं. एवढेंच नव्हे तर ते सर्वांशीं समदृष्टीनें वागतात. पार्थिवपूजा करण्याचा त्यांचा नेहमींचा क्रम आहे. यांना अपत्यें चार आहेत. पैकीं तीन मुलगे व एक मुलगी त्यांची नांवें माधव, परशराम व निळकंठ. माधवराव ऊर्फ अण्णासाहेब यांचें वय अजमासें अठरा वर्षांचें असून ते लष्करी कॉलेजांत आहेत. ते घोड्यावर बसण्यांत चांगलेच निष्णात आहेत. हे सुस्वरूप असून सशक्त, गोरे, व स्वभावाचे पिळदार व मोठे मानी आहेत. कैलसवासी भय्यासाहेब यांनीं बांधलेल्या वाड्यांतच सरदार दाजीसाहेब राहतात.

आपटे घराण्याची माहिती मिळविण्याकरितां फिरत असतां शके १८३४ च्या फाल्गुन महिन्यांत मी लष्करांत गेलों होतों. मी जुन्या वाड्यांत ह्मणजे नानासाहेब आपटे ह्यांचेच वाड्यांत उतरलों होतों. मुक्काम सरासरी १५।२० दिवसच होता. वाड्यांत राहून तीनचार दिवस झाल्यावर सरदार बयाबाईसाहेब आपटे श्रीक्षेत्र काशीहून घरीं आल्या. महाराज बयाबाईसाहेब आपटे यांना पाहिल्याबरोबर मला अतिशय आनंद झाला. त्यांचें वय हल्लीं ६८ वर्षांचें आहे. चैत्र शु. प्रतिपदा या वर्षारंभाचे दिवशीं वाड्यांत गोंधळ होता. रात्रौ गोंधळ ऐकण्यास नानासाहेब यांचे बरोबर मीहीं बसलों होतों. गोंधळ झाल्यावर मी नानासाहेबांस विचारिलें, " आपणा कोंकणस्थांत गोंधळाची चाल नाहीं. देशस्थ लोकांत गोंधळ करतात. मग आपल्याकडे गोंधळाची चाल आली कशी ? " यावर नानासाहेब म्हणाले, " नारो विष्णु हे आमचे पणजे बेळगांवचा किल्ला सर करण्यांत प्रथम प्रसिद्धीस आले. हा किल्ला घेण्याच्या वेळीं किल्ल्यांतील श्रीदेवीला त्यांनीं नवस केला कीं, जर आजच्या रात्रीं किल्ला सर झाला तर तुझ्या नांवें आह्मीं वंशपरंपरा गोंधळ करीत जाऊं. आमच्या घराण्यांत गोंधळ सुरू होण्यासंबंधाची हकीगत जी आहे ती अशी. "

सदरहू गोंधळ सरदार आपटे यांच्या दोन्ही वाड्यांत होत असतो. नानासाहेब यांस हल्लीं फक्त दोन मुलीच आहेत. श्री. बयाबाईसाहेब यांनीं उज्जयिन येथें क्षिप्रा नदीच्या कांठीं एक शिवालय बांधलें आहे. या शिवालयांत स्थापिलेला स्फटिकाचा बाण वीतभर उंचीचा असून तो त्यांनीं नेपाळहून आणिला

होता. बाण पाहण्याकरितां लांबलांबचे लोक येत असत. या बाणाचे मस्तकावर ज्या रंगाचें फूल ठेवावें त्या रंगाचा तो बाण दिसत असे. परंतु, अलीकडे बाण चोरीस गेल्यामुळें श्री० बयाबाईसाहेब यांनाच दुःख झालें नसून क्षेत्रस्थांना व यात्रेकरूंनाहि फार दुःख होत आहे. सदरहू बाणाऐवजीं त्या ठिकाणीं नर्मदेश्वर स्थापण्यांत आला आहे.

शके १७७७ त बयाबाईसाहेब यांचें लग्न ब्रह्मवर्तास झालें. त्यावेळीं त्यांचें वय ९ वर्षांचें होतें. हें लग्न बायजाबाईसाहेब शिंदे यांनींच केलें असें ह्मटलें तरी चालेल. कारण लग्नासंबंधानें गोष्ट बाबासाहेब आपटे यांजपाशीं निघाली असतां त्यांनीं बायजाबाईस निक्षून सांगितलें कीं, श्रीमंतांनीं जरी राज्य सोडिलें तरी त्यांच्या बरोबर आमच्यासारख्या गरीबांनीं संबंध करणें हें बरें नाहीं. कारण मुलीच्या आंगावर घालण्याकरितां त्यांच्या इतमामाला शोभतील अशा तऱ्हेचे दागिने आणावयाचे कोठून ? बाबासाहेबांचे हे शब्द ऐकतांच बायजाबाईसाहेब उत्तरादाखल ह्मणाल्या, "तुह्माला काय कमी आहे ? आज चार हत्ती तुमच्या दाराशीं आहेत ! तुमचें घराणें कुलीन असून रावसाहेबही चांगले देखणे व हुषार असून कर्तृत्ववान आहेत. तुमच्या मातोश्रींचेंहि ह्मणणें माझ्याचप्रमाणें असून रावसाहेबांचा विवाह जुळून यावा अशी त्यांची इच्छा आहे. आमचें ह्मणणें तुम्ही मोडणार नाहीं हें जाणूनच मीं श्रीमंत नानासाहेब पेशवे यांना कायमचा रुकार पूर्वींच दिला आहे. आतां दागिन्यासंबंधानें तुह्मी म्हणत असाल तर त्यासंबंधानें काळजी करण्याचें तुह्माला काय कारण आहे ! " अशा आशयाचें भाषण करून आजमासें तीन लाखांच्या ऐवजांनीं भरलेलीं दोन ताटें आणवून बायजाबाईसाहेबांनीं त्यांचे पुढें ठेविलीं. तेव्हां बाबासाहेबांना लग्न करणें भाग पडलें. पुढें ग्वाल्हेराहून वऱ्हाडी मंडळी गाड्या तीनशें, डंका, निशाण, स्वार, शिपाई व हत्ती अशा सरंजामानिशी थाटानें निघाली. प्रत्येक मुक्कामावर श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं वऱ्हाडी मंडळीची बरदास्त उत्तम प्रकारें ठेविली होती. सीमांतपूजनाचे वेळीं वरपक्षाकडील मंडळींनीं दागिन्यांचीं ताटें आणून ठेविलीं. खुद्द श्रीमंतांनीं तीं ताटें पाहिलीं आणि ते ह्मणाले, " आपलीं हीं ताटें कशाला पाहिजेत ? " असें ह्मणून जवळ जवळ ७।८ लाखांच्या दागिन्यांनीं भरलेलीं पांच ताटें त्यांनीं आणून ठेविलीं. लग्नसमारंभ एक महिनाभर चालला होता. इतक्या मुदतींत गांवांत कोणी चूल पेटवूं नये अशी सक्त ताकीद फिरली होती. यावेळीं अन्नदान फार करण्यांत आलें. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं एक लाख रुपये येण्याजाण्याच्या



18 JAN 1994

खर्चास दिले व लग्नप्रीत्यर्थ एकंदर खर्च अजमासें दहा लक्षपर्यंत झाला.

सरदार बाबासाहेब आपटे यांचा अद्भुत पराक्रम, अतुल कीर्ति आणि अलौकिक दातृत्व यांसंबंधाच्या कांहीं गोष्टी पुढें दिल्या आहेत.

## बाबासाहेबांची अलौकिक कीर्ति.

एकदां महाराज जनकोजीराव शिंदे यांच्या मनांत बाबासाहेब व भाऊसाहेब आपटे ह्या बंधुद्वयाची बोथाटी पहाण्याचें आलें व त्याप्रमाणें महाराजांनीं आपली इच्छा दर्शविली. तेव्हां महाराजांची इच्छा पूर्ण करणें आमचें कर्तव्य आहे असें ह्मणून बंधुद्वयानें तयारी केली. महाराजांच्या वाड्यांत बोथाटीच्या सामन्याची सर्व तयारी करण्यांत आली होती. बाबासाहेब व भाऊसाहेब आपआपल्या घोड्यावर स्वार होऊन बोथाटी खेळण्यास सिद्ध झाले व महाराजांची आज्ञा होतांच हे वीर मंडळावर येऊन एकमेकांवर तुटून पडले. शत्रू ज्याप्रमाणें एकमेकांशीं निकरानें लढतात त्याप्रमाणें या बंधुद्वयानें एकमेकांवर सरशी करण्याचा डाव चालविला. परंतु किती तरी वेळ डाव चालला तरी कोणी कोणास हार जाईना. सरदार आपटे यांचें हें बोथाटीचें अपूर्व कौशल्य पाहून महाराज सरकार फार खुष झाले.

सरदार बाबासाहेब आपटे सर्व लष्करचे मुख्य अधिकारी असतां सर्व सैन्याचा तळ ग्वालेरीहून १८ कोसावर असे. लष्करांतील निरनिराळ्या तुकड्यांवरील अधिकाऱ्यांची सलामी घेण्याकरितां व त्यांस हुकूम देण्याकरितां बाबासाहेब यांस दररोज जावें लागे. पहाटेस चार वाजतां उठून प्रातर्विधि उरकून थंड पाण्याचें स्नान व पूजा करून बरोबर सहा वाजतां ते घोड्यावर स्वार होत व बरोबर दोन तासांत लष्करांत जाऊन पोहोंचत. त्याठिकाणीं सर्व सैन्याची सलामी घेतल्यानंतर आपल्या खास तंबूंत येऊन एक तासपर्यंत विश्रांति घेत असत. तेवढ्या वेळांत त्यांचा शागिर्द भुईमुगाच्या दाण्यांनीं भरलेला चांदीचा कटोरा, पाण्यानें भरलेला चांदीचा गडवा व पक्का अर्धाशेर गूळ घेऊन येई. भुईमुगाचे दाणे आजमासें मापटभर असत. व ते आदल्या दिवशीं भिजत घालून दुसऱ्या दिवशीं ते सोलून बदामासारखे तयार करून ठेवलेले असत. हे दाणे व गूळ खाऊन वर पाणी पिऊन पुन्हां बाबासाहेब घोड्यावर स्वार होत व ११ वाजतां आपल्या नेहमींच्या लष्करांतील वाड्यांत परत येत. हा त्यांचा नेहमींचा क्रम असे. बाबासाहेबांचा पोषाखही नेहमीं ठरलेला असे. आंगावर नुसता आंगरखा, डोक्याला पागोटें, कमरेला शेला व हातांत भाला असा त्यांचा नेहमींचा थाट असे. शरीरानें हे सडपातळ असून अतीशय सशक्त व निरोगी

होते. अश्वविद्येंतील त्यांचें कौशल्य तर अलौकिक असे. सर्व हिंदुस्थानांत घोड्यावर बसण्यांत व घोड्याची परीक्षा करण्यांत ह्यांच्यासारखा पुरुष आजपर्यंत कोणीही झाला नाहीं. अश्वहोलिका ह्या नांवाचा अश्वविद्येवरील एक ग्रंथ त्यांनीं लिहिला आहे. परंतु प्रयत्न करूनहि मला तो ग्रंथ मिळूं शकला नाहीं हें दुर्दैव होय. आपल्या इकडे सरकशींत नांवारूपास आलेले कै. विष्णुपंत छत्रे हे कै. बाबासाहेब आपटे यांचे एक साधारण शिष्य होते. ( कै० विष्णुपंत छत्रे यांचें चरित्र सन १९०६ मध्यें मीं प्रसिद्ध केलें आहे. )

एकदां उत्तर हिंदुस्थानांतील कोणी एक नामांकित घोड्यावर बसणारा गृहस्थ लष्करमध्यें आला व त्यानें महाराज शिंदेसरकार यांजकडे अर्ज केला कीं, "घोड्यावर बसण्यांत मी पटाईत असून मी जे प्रयोग करून दाखवितों ते आपल्या राज्यांतील दुसऱ्या कोणाहि मनुष्यानें करून दाखवावे नाहीं तर मला अजिंक्यपत्र द्यावें." सदरहू अर्ज पहातांच महाराजांनीं बाबासाहेबांना तो अर्ज दाखविला. तेव्हां बाबासाहेब ह्मणाले, "सरकार, माझ्यासारखे नोकर आपल्या पदरीं असतां या मनुष्याला अजिंक्य पत्र देण्याच्या बाबतींत आपल्याला काळजी करण्याचें कांहींच कारण नाहीं. सदरहू इसम घोड्याचें कोणतें कौशल्य दाखवितो तें पाहण्याची माझी फार इच्छा आहे. सबब सदरहू संबंधाची योजना सरकारांनीं करावी. पुढें काय होतें तें पाहूं !" बाबासाहेबांचे हे उमेदीचे शब्द ऐकून महाराजसरकारांना फार आनंद झाला व त्या घोडेस्वाराला बोलावून आणून तुझें घोड्याचें कसब उद्या करून दाखीव, असें महाराजांनीं त्यास सांगितलें. दुसऱ्या दिवशीं एका मोठ्या विहिरीजवळ लष्करांतील सरदार, दरकदार मानकरी व अधिकारी या सर्वांचा जमाव जमला व ठरल्यावेळीं महाराजही तेथें आले. एका विस्तीर्ण विहिरीवर १॥ वीत रुंदीचा व १५ हात लांबीचा एक जाड लाकडाचा तक्ता मधोमध टाकण्यांत आला होता. त्या तक्त्यावरून भरधांव घोडा फेंकणें हा प्रयोग त्याठिकाणीं व्हावयाचा होता. सांकेतिक खूण होतांच सदरहू घोडेस्वार बराच लांब गेला आणि तेथून त्यानें आपला घोडा भरधांव सोडिला. तो स्वार त्या तक्त्यावर मधोमध येत आहे तोंच दुसरीकडून बाबासाहेब आपटे यांनीं आपला घोडा त्या तक्त्यावर नेऊन अचानक उभा केला. बाबासाहेबांचा घोडा समोर दिसतांच अजिंक्यपत्र मिळवूं इच्छिणाऱ्या त्या स्वाराची मोठी गडबड उडून गेली व बाबासाहेबांना उद्देशून तो ह्मणाला, "ये क्या हाये, हमारा घोडा तक्तेपर

से बाहेर जानेके पहिले तुम आपका घोडा तक्तेपर बीचमें कैसा लाया! आपसोस! बावर्डीमें गिर जायेंगे!" तेव्हां बाबासाहेब ह्मणाले, "तुम आपका घोडा पीछे लेके चले जाव!" तो स्वार म्हणाला, "तोबा! तोबा! आप घोडा पीछे जाना नहि सकता!" त्या स्वाराच्या तोंडचे हे शब्द ऐकतांच बाबासाहेबांनीं आपल्या घोड्याला मागिल दोन पायांवर उभें करून मागें फिरविलें आणि घोड्याला टांच मारून डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवधींत ते आपल्या जाग्यावर येऊन उभे राहिले. इकडे तो स्वार विहिरींत न पडतां कसा-बसा पार पडला. अजिंक्यपत्रासंबंधाचा त्याचा बाणा आपोआप जिरला आणि तो मनांतल्या मनांत खजील होऊन बाबासाहेबांचे पाय घट्ट धरून ह्मणाला, "आप गुरु हो, माफ करना सरदारसाहेब; आपके माफक सब हिंदुस्थानमें घोडेपर बैठनेवाला कोइबी नहीं!" अशारीतीनें अजिंक्यपत्र मिळवूं इच्छिणाऱ्या त्या घोडेस्वारानें बाबासाहेबांनाच उलट अजिंक्यपत्र दिलें. बाबासाहेबांचें हें अलौकिक कौशल्य पाहून महाराजांनीं आपल्या गळ्यांतील अमूल्य कंठा काढून तो बाबासाहेबांच्या गळ्यांत घातला.

संस्थान इंदूर येथील माजी महाराज तुकोजीराव होळकर यांच्या मातोश्रींचा बाबासाहेबांवर विशेष लोभ होता. त्यांनीं एकदां बाबासाहेबांना भेटण्यास बोलाविलें होतें व त्यावेळीं आपण तांबडें पागोटें घालून भेटीस यावें व तसें न केल्यास आपली भेट घेणार नाहीं असा निरोप पाठविला. हा निरोप ऐकतांच बाबासाहेबांनीं भेटीकरितां मुद्दाम तांबडें पागोटें बांधविलें. पागोटें रंगविण्यास १५रु. खर्च आला. बाबासाहेब तांबडें पागोटें घालून भेटीस आलेले पाहतांच महा-राजांच्या मातुश्रीस फारच आनंद झाला. परंतु बाबासाहेबांनीं वाड्याच्या बाहेर येतांच पुन्हा पांढरें पागोटें घातलें. एकंदरींत बाबासाहेबांना पांढरा पोषाख मना-पासून आवडत असे. मागें सांगितलेंच आहे कीं, त्यांचा पोषाख नेहमीं ठराविक व पांढरा स्वच्छ असे. राजकारणाकरितां नाइलाजास्तव माजी महाराज तुकोजीराव होळकर यांच्या मातोश्रींना भेटण्याचे वेळींच फक्त तांबडें पागोटें ते घालीत असत.

## दातृत्व.

सरदार बाबासाहेब आपटे यांची दातृत्वाबद्दल अतीशय ख्याती असे. त्यांच्या-सारखा दाता आपटे घराण्यांतच नव्हे तर सर्व ब्रह्मवृंदांत क्वचितच झाला असेल असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. बाबासाहेब निस्पृह, दयाळू, शूर, अश्वपरीक्षक व अश्वारोहण विद्येंत अत्यंत निष्णात होते. शिवाय ते स्नानसंध्याशीलहि होते.

त्यांच्या दातृत्वासंबंधाच्या अनेक आख्यायिका आहेत त्यापैकीं एकदोन खालीं दिल्या आहेत.

उज्जयिनी येथें थंडीच्या दिवसांत यात्रेकरू ब्राह्मण व बैरागी लोकांस थंडीचें निवारण होण्याकरितां प्रत्येकीं दोनदोन वार बनांत बाबासाहेबांनीं दिली. या धर्मकृत्यास पांचहजार रुपये खर्च लागला. तसेंच एकेवेळीं श्रीक्षेत्र काशी येथें बाबासाहेबांच्या मातोश्री लक्ष्मीबाईसाहब त्यांना ह्मणाल्या, “ बाबा, काशींतील वैदिक, शास्त्री, ज्योतिषि व अग्निहोत्री अशा सर्वांना त्यांना आवडतील त्या रंगाच्या शालजोड्या देण्याचें माझ्या मनांत आहे ! ” मातोश्रींची आज्ञा होतांच बाबासाहेबांनीं आपल्याजवळील कारकुनाकडून निरनिराळ्या रंगाच्या शालजोड्या खरेदी केल्या आणि ठरविल्याप्रमाणें क्षेत्रस्थ ब्राह्मणांना आमंत्रण करविलें. प्रत्येक ब्राह्मणाला एकएक शालजोडी व पांच रुपये दक्षिणा याप्रमाणें वाटून दिले. या धर्मकृत्यास एकंदर ३०००० तीस हजार रुपये खर्च आला. या धर्मकृत्यांत बाबासाहेबांचें अवर्णनीय चातुर्य दृष्टीस पडलें. तें असें कीं,—शालजोड्या वाटण्यापूर्वीं निरनिराळ्या ब्राम्हणांची रंगाच्या बाबतींत आवड काय आहे हें मोठ्या खुबीनें त्यांनीं काढून घेतलें होतें. यामुळें ज्याला जो रंग आवडतो त्याला त्याच रंगाची शालजोडी नेमकी मिळाली.

बाबासाहेबांच्या संबंधाच्या आख्यायिकांत एक अत्तरासंबंधाची आख्यायिका मोठी मजेदार आहे. एकदां एक गृहस्थ हाफुसच्या आंब्यांचें अत्तर घेऊन ग्वालेरीस आला. अत्तर फार उंची आणि किंमतीचें असल्यामुळें त्याला कोणी गिऱ्हाईक मिळेना. शेवटीं निराश होऊन तो जाण्याच्या बेतांत होता इतक्यांत सरदार बाबासाहेब यांची अलौकिक कीर्ति ऐकून तो त्यांच्या वाड्यांत आला व त्यानें आपलें अत्तर बाबासाहेबांना दाखविलें. तें अत्तर बाबासाहेबांनीं ठेऊन घेतलें. आणि त्याची किंमत रु. ५०० त्यास देऊन परत पाठविलें. त्यावेळचे शिंदेसरकार यांचा बाबासाहेबांवर इतका लोभ असे कीं, महिन्यांतून एकदोन वेळ आपल्याकरितां जेवण तयार करवून पाठविण्यास ते बाबासाहेबांस सांगत असत. सदरहू हाफूसच्या आंब्यांचें अत्तर घेतल्यानंतर थोड्या दिवसांनीं महाराज सरकारांकडून कांहीं जिन्नस तयार करून पाठविण्यासंबंधानें निरोप आला असतां, बाबासाहेबांनीं उत्तम श्रीखंड तयार करविलें आणि त्यांत थोडेसें अत्तर टाकून दिलें. तें श्रीखंड महाराज सरकारांकडे गेल्यानंतर महाराजांस तें फारच आवडलें! तें श्रीखंड नसून तो कलमी आंब्यांचा रस आहे असेंच त्यांना

वाटलें. गांवांत कोठें कलमी आंबे आलेले आहेत कीं काय ? या संबंधाचा त्यांनीं शोध करविला. परंतु आंबे कोठेंच आढळून आले नाहींत. कलमी आंब्याचे ते दिवस नसल्यामुळें बाबासाहेबांनीं आंब्यांचा रस पाठविला कसा यांबद्दल महाराजांस मोठा अचंबा वाटला. दुसऱ्यादिवशीं पूर्वींप्रमाणें आंब्यांचा रस पाठविण्यास महाराजांनीं बाबासाहेबांस निरोप पाठविला व त्याप्रमाणें दुसऱ्या दिवशीं रस पाठविण्यांत आला. असाच क्रम आणखी एक दोन दिवस चालला होता. पुढें बाबासाहेब महाराजांच्या भेटीस गेले असतां महाराजांनीं आंब्याच्या रसाची गोष्ट काढिली तेव्हां बाबासाहेब म्हणाले, " महाराज, यांत अचंबा वाटण्याजोगें कांहीं नाहीं. थोडे दिवसांपूर्वीं कलमी आंब्यांचें अत्तर घेऊन एक गृहस्थ आपल्या राजधानींत आला होता. अत्तर अतीशय महाग ह्मणून त्याला कोणी गिऱ्हाईक मिळेना. शेवटीं तो गृहस्थ माझ्याकडे आला व आपल्या राजधानीची अब्रू जाऊं नये यासाठीं हें अत्तर मीं ठेऊन घेतलें व त्यांतील थोडें अत्तर श्रीखंडांत टाकून महाराजांकडे पाठविलें जाई. यामुळें स्वाभाविकपणें तो कलमी आंब्याचा रस आहे अशी आपली समजूत झाली. वास्तविक एवढें ५०० रु० मोलाचें अत्तर आमच्यासारख्या गरिबांना काय करावयाचें आहे ? तें महाराज सरकारानांच शोभतें व त्यासाठींच तें खरेदी केलें आहे. " अशा आशयाचें भाषण करून सदरहू अत्तराची बाटली बाबासाहेबांनीं महाराजांस अर्पण केली. या गोष्टीवरून बाबासाहेबांचें औदार्य आणि महाराज सरकारांवरील त्यांचें प्रेम चांगलें व्यक्त होतें.

शके १७८३ मध्यें महाराज जनकोजीराव शिंदे यांनीं सरदार बाबासाहेब यांना लाटसाहेबांचें स्वागत करून आणण्याकरितां चमलघावेतों जाण्यास सांगितलें होतें. बाबासाहेब जयाजीरावमहाराजांचे पलंगपहाऱ्यावर असत. उज्जयिनी प्रांताचे सुभायतीवर असतांना त्यांचें घोड्याचें कौशल्य पाहण्याकरितां माजी महाराज तुकोजीराव होळकर, देवासचे महाराज, जावऱ्याचे नबाबसाहेब व रतलामचे महाराज हरहमेश उज्जयिनी येथें जाऊन रहात असत. बादशहा सप्तम एडवर्ड जेव्हां ग्वालेरीस गेले होते तेव्हां बाबासाहेब हे वृद्ध असून फार अशक्त झालेले होते. त्यांची मुद्दाम भेट घेण्यासाठीं त्यांना मेण्यांत बसवून राजवाड्यांत आणण्यांत आलें होतें.

सरदार बाबासाहेब यांच्यावर एका विक्षिप्त अधमानें भयंकर आरोप करून सरकारांत त्यांची नालस्ती केली होती. यामुळें भोपाळच्या रेसिडेंटाचे नजरेखालीं त्यांना कांहीं दिवस रहावें लागलें. परंतु, अखेर सत्याचा विजय होऊन

खुद्द राणीसरकारकडून लिहून आल्यावरून रेसिडेंटानें बाबासाहेबांची माफी मागितली आणि त्यांचा बहुमान केला. भोपाळाहून लष्करास परत येतांना भोपाळच्या बेगमनें बाबासाहेबांस एक नामांकित घोडा नजर केला. या पुस्तकांत बाबासाहेबांचा जो फोटो दिला आहे त्यांत बाबासाहेब ज्या घोड्यावर बसले आहेत तोच हा घोडा होय. बाबासाहेबांवरील आरोपासंबंधाची हकीकत बरीच मोठी आणि मनोरंजक आहे. ती सर्व दिली तर त्याचें एक निराळेंच पुस्तक होईल. बाबासाहेब माळवा प्रांताचे सुभेदार असतां १८५७ च्या धामधुमींत इंग्रज सरकारच्या गव्हर्नर जनरलांनीं त्यांजपाशीं वेळोवेळीं मदत मागितली व बाबासाहेबांनीं त्यावेळीं मदत कशी केली वगैरे हकीकत त्या वेळच्या अस्सल महत्वाचीं इंग्रजी पत्रें व त्या पत्रांची जीं भाषांतरें खालीं दिलीं आहेत त्यावरून सर्वांच्या लक्षांत येईल.

( १८५७।५८ सालीं पर्शिअन भाषेंत झालेला पत्रव्यवहार. )

# TRANSLATION OF A PERSIAN CORRESPONDENCE OF 1857-58

No. 200.

To,

BABA SAHEB APATE.

SIR,

Anna Saheb the Vakil of the Gwalier Durbar, just came to me and told me that the army at Neemuch had broken into mutiny, murdered all the European officers, and had been doing violence to the property and person of the people. He said it was verylikely that those rebels might enter the Gwalior territory and spread havoc there too. To prevent this the authorities at Mandasur have been through the same Vakil instructed to collect troops and put down the rebels in a summary way. As it is absolutly necessary to punish such seditious persons, and to leave them alone would certainly lead to the ruin of the country and the people. I request you to go

personally with the army which has been collected, and with other forces which may be available to Neemuch there, and restore due order, none of the rebels should be allowed to escape. I am very glad to announce to you that on account of the endeavours of the Durbar, order was maintained in Gwalior itself, and the rebels in the city and surrounding country entirely put down. I am sure you will spare no pains in collecting an army and allowing none of the rebels to escape. I hereby give you and your servants full power to capture the rebels and to chastise them. I am sure you will acquit yourself creditably in a way which will enable me to represent your conduct to the favourable consideration of the Supreme Government.

*7th June* 1857.

( Sd. ) H M. DURAND, COLONEL,
*A. Governor General C. I.*

---

No. 1426.

To,

BABA SAHEB APATE.

SIR,

I received your letter dated the 8th of Shauwal 1273 Hijri, with reference to the letter of Sursubha Saheb about the arrival of the army of the Durbar at Neemuch, its joining the Vakeel, the departure of the rebels from there, the arrival of the superintendent and the other gentlemen of that station, and about writing a Parvana to the Vakeel, that arrangements should be made to station the army of the Darbar outside the city and to restore order. The letter refers to the public rumour of the army of the Durbar having gone to occupy the district, and says the report

is false and the Subha Saheb is anxious that some trouble may arise from this false report of the common people. There being nothing of the sort on the part of the Durbar, except a willingness to do any thing to the satisfaction of the Government. The letter is professedly written in order to remove any suspicion that may arise by this false report of the people I have not received any report from the Suprintendent I think some mistake may have occurred on the part of the Durbar or its servants, but rest assured that the Government servants pay no attention to the fabricated reports, but a distinction is made between truth and falsehood. You need have no anxiety at all on that score.

*13th June* 1857.

( Sd. ) H. M. DURAND, COLONEL,

---

No. 230.

To,

BABA SAHEB APATE.

DEAR SIR,

I received your letter dated the 22nd of zihijjah, stating that the territory of the Durbar in Malwa, though no army had been stationed there, had perfect order preserved in it and the rebels desisted from their outrages for the fear of the British forces. Now as the said army ( British ) having mutinied, has made its way towards Hindustan, Swars of Soundhe castes, Affghans, and Makranis have been engaged for the suppression of the rebels and the preservation of order among the people, and thus order is maintained I hope you will inform me of the true state of affairs at Mandsur and also let me know what is the strength of the army with you and to what extent

18 APR 1990

you can suppress the mutiny. The Court of Indore has been permitted to give you every possible assistance. As I intend rendering you more assistance, it is necessary that I should be informed of all the particulars, above mentioned and it would be better for you to give me thorough information of the same.

*2nd September* 1857.

( Sd. ) H. M. DURAND,

---

No. 1479.

To,

*Mr.* BABA SAHEB APATE.

Sir,

I have the honor to inform you that your Munshee arrived here with two Sergeants, at an interview, the said Munshee gave me the details of the proper arrangement which you made for the protection of Mr. Smith who is at Augar. He also related all the endeavours and exertions which were made for the protection of the two Sergeants, and I was extremely pleased with his account. It is hoped that you will be on your guard and make every sort of arrangement and provision as occasion may require. I hope you have made such arrangements as would lead to the total destruction of the mutineers, swars, and rebels, in case they pass into the territory of the Gwalior Durbar, your servants have full powers to arrest the rebels or to put them to the sword in case of resistance. I shall be extremely glad if the assassins of Captain Brody, and Mr. Hunt, will be arrested and the person arresting them will be entitled to a great reward.

*16th June* 1857.

( Sd. ) H. M. DURAND.

---

DEAR BABA SAHEB APATE.

The letter, dated 23rd instant, bearing the official signature, states, that you are allowed to provide money to Mr. Carter, who is encamped at Augur, for payment to the sepoys. This money will be refunded when the accounts will be adjusted; but be good enough to take receipts from him; it seems from the letter, dated 22nd instant, that there is a necessity of huts for sepoys to rest in, for which money is wanted. In accordance with the order, you are requested to give money to the above-mentioned officer, and to take a receipt of the same from him; and this money will be refunded, when the accounts are settled.

*Dated 25th June* 1858.

( Sd. ) H. M. DURAND.

---

No. 398.

To,

Mr. BABA SAHEB APATE.

Dear Sir,

I want you to give me a detailed account of the affairs at Mandsur. I hear that the mirjha tribe at Mandsour, have had some correspondence with you. I hope you will write to me if it is a fact, and If so what sort of correspondence it is and what it deals about, let me know the strength of real army assembled at Mandsur, and also the strength of the forces which you have despatched there. Do you think that you will be able to quell the insurrection ? Do the rebels intend to spread themselves in all directions, or in what direction do they intend to move ? Let me know whether the Mauaties, and Volliaties are united, or as it is reported, is there any dissension among

them ? I hope you will inform me of these things soon. This letter will be delivered to you by Lieutenant Dewart, who is going to Mandsur, and you will cause the Sawars of the Vakeel of Gwalior to be relieved and send your men with him so that he may arrive safely at Mandsur.

16*th September* 1857.

( Sd. ) H. M. DURAND.

---

No. 597.

To,

MR. BABA SAHEB APATE.

DEAR SIR,

I have the honour to inform you that I duly received your letter dated the 21st of Safar 1274 Hijri, requesting the despatch of a force of 500 cavalry, two guns, two battalions of regular infantry, for suppressing the rebels at Mandsur; and suggesting that a despatch be sent to Partapgud, Sita Mhow &c. that they should keep forces on their frontiers and be careful to allow none to join the rebels; and requesting that information should be given as regards the halting places of the army, together with a list of necessary supplies, in order that the necessary arrangements may be made. In the first place a delay was caused owing to the attempt to make a breach in wall and to storm the fort of Dhar; and consequently owing to the arrangements which were to be made for the removal of the guns and the treasury from that place. I hope the force will march from here to Mandsur tomorrow. A list of the halting place has been furnished to the Vakeel of Gwalior, and instructions have been given to him that the supplies should

be immediately collected and held in readiness, and that when the roads were difficult and hard to pass by facilities for an unimpeded march should be at once ordered to be effected.

*6th November* 1857.

18th *Rabealanwal* 1274 *Hijri*.

( Sd ) H M. DURAND,

---

No. 602.

To,

Mr. BABA SAHEB APATE.

DEAR SIR,

I hope to arrive at Barnagar on the 11th instant or on the 12th. I shall move from here to Kharuand. The Vakeel of the Darbar who accompanied the forces will from time to time, give you information of his marches and halts. I wish you would go to Unhal from Ojein on the same day when I leve Barnagar for Kharuand, and when I proceed from Khurnud to Khachrud you will move along the left bank of the Chumble, parallel to the British army; and when I move towards the north, you will also proceed along the Eastern bank of the Chambal river by the road of Tal, and cross the Chumbal at Asawad or some other place near it.

*Dhar, 7th November* 1857.

( Sd. ) H. M. DURAND.

---

## पत्र नंबर १००

**बाबासाहेब आपटे यांस**— ग्वालेर दरबारचे वकील अण्णासाहेब नुकतेच माझ्याकडे आले आणि मला ह्मणाले कीं, निमच येथील सैन्यानें बंड उभारलें असून तेथील सर्व युरोपिअन अधिकाऱ्यांचे त्यानें खून केले आणि

लोकांचीं शरीरें आणि मालमत्ता यांची खराबी आरंभिली आहे. हे बंडखोर ग्वालेरच्या हद्दींत शिरतील आणि तेथेंहि असाच भडका उडवितील असा संभव असल्याचें त्यांच्या बोलण्यावरून दिसतें. हें न व्हावें व बंडखोरांना शासन केलें जावें ह्यासाठीं सदई वकिलांच्या मार्फत मंदोसर येथील अधिकाऱ्यांनीं सैन्याची जुळवाजुळव करावी असें त्यांस सांगण्यांत आलें आहे. असल्या राजद्रोही लोकांना शासन होणें अत्यंत आवश्यक आहे व त्यांची उपेक्षा करणें म्हणजे देश आणि त्यांतील लोक यांच्या नाशाला निःसंशय मदत करण्यासारखें आहे. हें जें सैन्य गोळा होत आहे त्यांत आपल्याला शक्य असेल तितक्या सैन्याची भर घालून आपण निमच येथें जावें आणि शांतता स्थापित करावी. आणि कोणत्याहि बंडखोराला मोकळा सोडूं नये अशी मी आपणांस विनंति करतों. दरबारच्या प्रयत्नामुळें ग्वालेर येथें शांतता राहिली आणि शहरांतील व आसपासच्या प्रदेशांतील बंडखोरांचा बीमोड केला गेला ही गोष्ट आपणांस कळविण्यास मला फार आनंद वाटतो. सैन्य गोळा करून बंडखोरांना शासन करण्याच्या बाबतींत आपण शक्य ते प्रयत्न केल्याशिवाय राहाणार नाहीं ही माझी खात्री आहे. या पत्राच्या द्वारें आपणांस आणि आपल्या हाताखालच्या लोकांस बंडखोरांना पकडून त्यांना योग्य शासन करण्याला मी आपणास पूर्ण मुखत्यारी देत आहें व मला अशी खात्री आहे कीं, वरिष्ठ सरकाराजवळ आपल्या कामाची उत्तम शिफारस करतां येईल अशा पद्धतीनें आपण हें काम उत्तमरीतीनें पार पाडाल. ६ जून १८५७

( सही ) एच्. एम् डुरंड, .

कर्नल अॅ. गव्हरनर

जनरल सी. आय्.

---

## पत्र नंबर १४३६

बाबासाहेब आपटे यांस—ता. ८ शॉवल हिज्री सन १२७३ चें आपलें पत्र मिळालें. त्यांत दरबारचें सैन्य सरसुभासाहेब यांच्या पत्राप्रमाणें निमच येथें गेलें व तेथील वकिलास जाऊन मिळालें तसेंच बंडखोर निमच येथून निघून गेल्याचें सुपरिंटेंडंट व त्यांतील इतर दुसरे गृहस्थ येऊन पोहोंचल्याचें आणि दरबारचें सैन्य शहराबाहेर ठेऊन शांतता राखण्याबद्दल व्यवस्था ठेवण्याविषयीं वकीलास परवाना लिहिण्यासंबंधाचा मजकुर आहे.

श्रीमंत बा. सं. द. वाचनालय,



दरबारचें सैन्य बाहेरच्या जिल्ह्यांत गेल्याबद्दल लोकांत जी अफवा आहे ती खोटी असून लोकांमध्यें पसरलेल्या खोट्या बातमीमुळें कांहीं भानगड उपस्थित होण्याची सुभासाहेबांस भीति आहे असा पत्रांत उल्लेख आहे. सरकारला समाधान वाटेल अशाच तऱ्हेचें वर्तन ठेवण्याचा दरबारचा विचार आहे. यामुळें लोकांत पसरलेल्या बातमीमुळें जो संशय उत्पन्न होण्याचा संभव आहे तो नाहींसा करण्याच्या हेतूनें हें पत्र लिहिलें आहे. सुपरिंटेंडेंटकडून मला कांहीं हकीकत कळली नाहीं. व मला वाटतें दरबार किंवा त्याचे नोकर यांचेकडून कांहीं चूक झालेली असावी. परंतु खात्री असूं द्या कीं, सरकारचे नोकर मुद्दाम उठवलेल्या अफवांकडे बिलकूल लक्ष देत नाहींत, व खरें आणि खोटें यांतील तारतम्य ते जाणतात. त्या बाबतींत आपल्याला चिंता करण्याचें कारण नाहीं.
१२ जून १८५७

( सही. ) एच्. एम्. डुरंड कर्नल.

---

## पत्र नंबर २३०

**बाबासाहेब आपटे यांस**– जीहीज्जाच्या २२ तारखेचें आपलें पत्र पोहोंचलें. माळव्यामधील दरबारच्या हद्दींत सैन्य ठेवण्यांत आलें नसतांही पूर्ण शांतता राहिली आणि ब्रिटिश सैन्याच्या धास्तीनें बंडखोरांनीं अत्याचार केले नाहींत ही पत्रांतील हकीकत समजली. ब्रिटिश सैन्यानें बंडखोरी आरंभिली असून ज्याअर्थीं ते हिंदुस्थानकडे मोर्चा वळवीत आहेत त्याअर्थीं सौंधे जातीचे स्वार, अफगाण आणि माकराणी यांना बंड मोडण्यासाठीं आणि लोकांमधील शांतता कायम राखण्यासाठीं योजण्यांत आलें आहे व यामुळें शांतता राहिली आहे. मंदोसर येथील खरी स्थिति काय आहे तसेंच आपल्यापाशीं किती सैन्य आहे आणि बंड मोडण्याचें काम आपणांस कितपत करतां येईल, या संबंधाची हकीकत आपण मला कळवाल अशी आशा आहे. आपणांस शक्य ती मदत करण्याबद्दल इंदोर दरबारला परवानगी देण्यांत आली आहे. आपल्याला जास्त मदत देण्याचा माझा विचार आहे. व त्यासाठीं वर नमुद केलेली सर्व कच्ची हकीकत आपण मला कळविणें अगदीं आवश्यक आहे व तशी ती आपण कळवाल तर फार चांगलें होईल. २ सपटंबर १८५७

( सही ) एच्. एम् डुरंड.

---

## पत्रनंबर १४७०.

**रा० बाबासाहेब आपटे यांस—** आपला मुनशी दोन सार्जंटांना घेऊन मुलाखतीसाठीं येथें आला. आगर येथें असलेले मि. स्मिथ यांच्या संरक्षणासाठीं आपण जी योग्य व्यवस्था केली आहे त्या संबंधाची सर्व कच्ची हकीकत मुनशीनें सांगितली. तसेंच दोन सार्जंटांच्या रक्षणासाठीं आपण जे प्रयत्न केलेत व जी मेहनत घेतलीत त्या संबंधाचीही हकीकत त्यानें सांगितली. व त्या हकीकतीनें मला अत्यंत संतोष झाला. सध्यां सावध राहून प्रसंगाला योग्य अशी सर्व प्रकारची योजना आणि तरतूद आपण कराल अशी आशा आहे. तसेंच बंडखोरांचा पूर्णपणें बीमोड होईल अशा तऱ्हेची सर्व योजना आपण करालच. ग्वाल्हेर दरबारच्या हद्दींत असले बंडखोर आणि स्वार शिरले असतां त्यांना कैद करण्याचा अथवा ते विरोध करूं लागतील तर त्यांची कत्तल करण्याचा आपल्या नोकरांना पूर्ण अखत्यार आहे. क्यापटन ब्रॉडी आणि मि. हंट यांचे खून करणाऱ्या मनुष्यांना कैद करण्यांत आल्यास मला मोठा आनंद होईल. आणि त्यांना पकडणाऱ्या मनुष्यास मोठें बक्षीस देण्यांत येईल.

१६ जून १८५७

( सही ) एच् . एम् . डुरंड.

———

**बाबासाहेब आपटे यांस**—२३ तारखेच्या शिक्कामोर्तबाच्या पत्रांत असा मजकूर आहे कीं, आगरच्या छावणींत असलेले मि. कार्टर यांना शिपायांचा पगार चुकता करण्यासाठीं पैसे पुरविण्यासाठीं आपणांस परवनगी देण्यांत आली आहे. पुढें हिशेब केले जातील तेव्हां ही रक्कम परत करण्यांत येईल, परंतु मेहरबानी करून पैसे दिल्याच्या पावत्या घेऊन ठेवाव्या. २२ तारखेच्या पत्रावरून असें दिसतें कीं, शिपायांना राहाण्याकरितां झोंपड्या बांधण्याची जरूरी आहे व त्यासाठीं पैसा पाहिजे आहे. त्या हुकुमाप्रमाणें वर लिहिलेल्या अधिकाऱ्याला रक्कम देण्याविषयीं आपणांस विनंति करण्यांत येत आहे. रकमेची पोंच झाल्याबद्दल त्याच्यापासून पावत्या घेऊन ठेवाव्या. म्हणजे हिशेब केले जातील त्यावेळीं रक्कम परत करण्यांत येईल. २५ जून १८५८

( सही ) एच्. एम्. डुरंड.

———

## पत्र नंबर ३९८

**रा. बाबासाहेब आपटे यांसः**--मंदोसर येथील स्थितिसंबंधाची कच्ची हकीगत मला आपणांकडून कळावयास पाहिजे आहे. मला असें समजतें कीं, मंदोसर येथील मिर्झा टोळीचा आपल्याशीं कांहीं पत्रव्यवहार झालेला आहे. ही गोष्ट खरी आहे कीं काय ? तसेंच खरी असल्यास तो पत्रव्यवहार काय आहे ? तें मला समजावयास पाहिजे. मंदोसर येथें खरोखर किती सैन्य जमलें आहे. तसेंच तुम्हीं तेथें किती सैन्य पाठविलें आहे तें कळवावें. बंड मोडण्याची आपणांस उमेद आहे काय ? बंडवाले सर्वत्र बंड उभारणार आहेत किंवा कोणत्या-ठिकाणीं बंड उभारण्याचा त्यांचा विचार आहे. मायती आणि वलायती लोक एकत्र झाले आहेत किंवा मला बातमी आहे त्याप्रमाणें त्यांच्यांत फूट आहे, या गोष्टी संबंधाची हकीकत आपण मला कळवाल अशी आशा आहे. लेफ्टेनंट डूआट मंदोसर येथें जात आहे तो हें पत्र आपणांस देईल. ग्वालेरच्या वाकि-लाच्या स्वारांना रजा देऊन त्यांच्याऐवजीं आपलीं माणसें त्यांच्याबरोबर देऊन मंदोसर येथें त्याला सुरक्षित जाऊं देण्याची व्यवस्था कराल अशी आशा आहे.

१६ सपटेंबर १८५७

(सही ) एच्. एम्. डुरंड.

---

## पत्र नंबर ५९७

**रा. बाबासाहेब आपटे यांस**— १२७४ हिजरी सफरच्या २१ तार-खेचें अपलें पत्र पोहोंचलें. त्यांत ५०० घोडेस्वार, दोन तोफा व पायदळाच्या दोन तुकड्या मंडोसर येथील बंडखोरांचा पराभव करण्याकरितां पाठविण्या-विषयीं विनंति आहे. तसेंच प्रतापगड, सीतामहू, वगैरे प्रांताच्या सरहद्दीवर सैन्य ठवण्याबद्दल आणि बंडखोरांना कोणीहि मिळूं न देण्याची व्यवस्था करण्याबद्दल त्या ठिकाणीं लिहिण्याबद्दल सुचविण्यांत आलें आहे. शिवाय सैन्याचे तळ कोठें कोठें होतात, त्यांना पुरवठा काय काय पाहिजे या संबंधाची माहिती कळविण्याबद्दल विनंति आहे. कारण असें झाल्यानें योग्य ती सर्व व्यवस्था करण्यास ठीक पडेल. असें पत्रांत लिहिलें आहे. परंतु, धारचा किल्ला उडवून टाकण्याचा आणि तटांत प्रवेश करून घेण्याचा प्रयत्न होत अस-ल्यामुळें ती माहिती कळविण्यास उशीर लागला. तसेंच तोफा आणि तिजोरी

त्या ठिकाणाहून हालविण्याची व्यवस्था करावयाची होती यामुळेंहि विलंब लागला. उद्यां येथून सैन्य मंदोसरकडे कूच करील अशी आशा आहे. सैन्याच्या तळां-च्या जागा ग्वालेरच्या वकीलाकडे कळविल्या आहेत. तसेंच धान्याचा वगैरे पुरवठा करण्याबद्दल आणि रस्त्यांची डागडुजी वगैरे करून सैन्याला कूच करण्याला सुलभ करून ठेवण्याबद्दल त्यास लिहिण्यांत आलें आहे.

६ नवंबर १८५७

( सही ) एच्. एम्. डुरंड.

---

## पत्र नंबर ६०२

**रा. बाबासाहेब आपटे यांस**—बारानगर येथें ११ किंवा १२ तारखेला मी येऊन पोहोंचेन अशी आशा आहे. मी येथून खरंडकडे जाईन. सैन्याबरोबर अस-लेला दरबारचा वकील सैन्य कूच होण्याची आणि त्यांचे तळ पडण्याची माहिती आपणांस देत जाईल. मी बारानगर येथून खरंडकडे जाण्यास निघेन त्या दिवशीं आपण उज्जयिन येथून उन्हळ येथें जावें व मी खरंड येथून खाचरोदकडे जाण्यास निघालों ह्मणजे चंबळच्या उजव्या तीरानें ब्रिटिश सैन्याच्या समरेषेंत आपण कूच करावें. मी उत्तर दिशेकडे जाऊं लागलों ह्मणजे आपण चंबळच्या पूर्वे-कडील बाजूनें तळच्या रस्त्यानें निघावें व आस्वड किंवा त्याच्या जवळच्या दुसऱ्या एखाद्या गांवीं चंबळ नदी ओलांडून जावें.

धार ७ नवंबर १८५७

( सही ) एच्. एम्. डुरंड.

आजगांव वर्णन पुढें चालूं.

## सरदार रावसाहेब आपटे यांचा पराक्रम.

**सरदार रावसाहेब आपटे**— सरदार गणेश हरी ऊर्फ रावसाहेब आपटे हे बाबासाहेबांचे एकुलते एक चिरंजीव होत. बाबासाहेबांच्या कारकीर्दीतच चिरंजिवांनीं अद्वितीय पराक्रमाच्या गोष्टी करून दाखविल्या. बाबासाहेबांच्या कारकीर्दीत असें ह्मणण्याचें कारण हें कीं, त्यांच्या पश्चात् रावसाहेबानीं एकच वर्ष सरदारी भोगली. वडिलांप्रमाणें रावसाहेब हेहि महाराजांच्या पलंग पहाऱ्यावर असत व महाराज जयाजीराव शिंदे यांचें बापलेकांवर फारच प्रेम असे. रावसाहेब हे फार शूर असून तापट स्वभावाचे होते. वडिलांप्रमाणें घोड्यावर बसण्यांतही ते निपुण होते. व हत्तींवर त्यांची विशेष हुकमत असे. हत्ती कितीही मस्त असला तरी रावसाहेबांनीं त्याच्यापुढें जाऊन बोल ह्मटल्याबरोबर त्यानें उलट जबाब दिलाच पाहिजे अशी त्यांची जरब असे. हत्तीच्या पागेंत जेव्हां रावसाहेब जात तेव्हां लष्करी लोक आपल्या सेनापतीला एकदम सलामी देतात त्याप्रमाणें सर्व हत्ती आपले शुंडादंड वर करून आवाज देत असत. त्यांच्या पदरीं खास बसण्याचे चार हत्ती होते.

लष्कर ग्वालेरहून आग्रा छत्तीस कोस व आग्र्याहून पुढें मथुरा अठरा कोस पण एवढी चोपन कोसांची मजल त्यांनीं एकाच घोड्यावर बसून केली होती व आश्चर्याची गोष्ट कीं, हा सारा प्रवास अवघ्या ६ तासांत झाला. ज्या घोड्यावरून हा प्रवास रावसाहेबांनीं केला तो घोडा अस्सल अरब असून त्याचें नांव सारंगा होतें. लॉर्ड लिटन्चे वेळीं आग्रा येथें दरबार झाला त्यावेळीं करोलीवाले राजे यांच्या पदरचा एक घोडेस्वार त्याठिकाणीं हजर होता तो भर दरबारांत ह्मणाला, " माझ्याबरोबर फेर करण्याचे कामांत कोणीहि स्वार टिकणार नाहीं. " तावडतोब रावसाहेब पुढें झाले आणि त्या स्वाराबरोबर सामना देऊन त्यांनीं त्याला फजित केलें.

एकेवेळीं लष्करांत मोठी मिरवणूक निघाली असतां वाटेंत एक कमान करण्यांत आली होती. सदहू कमान अजमासें १५ हात उंच होती. त्या कमानीला मधोमध हात लावण्याचा प्रयत्न कित्येक स्वार सरदार लोकांचा चालला होता. हा सर्व प्रकार महाराज जयाजीराव अंबारींतून पहात होते. त्यावेळीं मिरवणूकींत महाराजांचे उजवे बाजूला सरदार

बाबासाहेब व डावे बाजूला सरदार रावसाहेब होते. कमानीला हात लावण्याचा समोर चाललेला प्रकार पाहून रावसाहेबांना कांहीं केल्या रहावेना व त्यांची चलबिचल सुरू झाली. ही गोष्ट महाराजांच्या लक्षांत येतांच ते ह्मणाले, " कां रावसाहेब ! पाहतां काय ? फेका आपला घोडा. " महाराजांची आज्ञा होतांच रावसाहेबांनीं आपल्या सारंगा घोड्याला टांच मारिली. कमानीखालीं जाण्या-पूर्वीं सारंगा एकदम उडाला व रावसाहेबांनीं आपला पंजा त्या कमानीच्या मध्यावर सहज मारला. त्याबरोबर शाबास ! सरदार साहेब शाबास ! ! असा एकच ध्वनी शेंकडों लोकांच्या तोंडून निघाला. रावसाहेबांचा स्वभाव तापट होता हें मागें सांगितलेंच आहे. ते एकदां एका अधिकाऱ्याच्या तोंडांवर थुंकले होते. क्षुल्लक कारणावरून बोलाचाली झाल्यामुळें सदरहू प्रकार झाला. त्यावेळीं सदर गृहस्थांनीं हातरुमालानें तोंड पुसलें व घरीं गेल्यावर साबणानें सर्व तोंड साफ धुवून टाकिलें. परंतु एक प्रकारचा जो सुंदर वास येत होता तो कांहीं कमी झाला नाहीं. हा वास कशाचा हें त्यांना समजेना. पुढें त्यांनीं चवकशी केली तेव्हां त्यांना असें समजलें कीं, आपल्या तोंडावर थुंकलेले गृहस्थ सरदार रावसाहेब आपटे हे होत. रावसाहेब हे कस्तुरीमिश्र तंबाखू खात असल्यामुळें आपल्या कपड्यांना कस्तुरीचा सुवास येत होता. कस्तुरीचा वास उत्तम येत होता तरी आपण मोठे अधि-कारी व रावसाहेब आपटे आपल्या अंगावर थुंकले हा आपला अपमान झाला असें वाटून ही गोष्ट त्यांनीं महाराजांस कळविली. तेव्हां महाराजांच्या आज्ञेवरून रावसाहेब आग्र्यास जाऊन राहिले. पुढें कांहीं दिवसांनीं आग्र्यास एक मोठी शर्यत झाली. महाराज जयाजीराव शिंदे त्यावेळीं तेथें हजर होते. मोठमोठे युरोपीयन अधिकारी आपआपल्या घोड्यावर स्वार होऊन शर्यतीच्या मैदानावर आले. शर्यतीचें काम थोडा वेळ झाल्यावर महाराज रावसाहेबांकडे वळून ह्मणाले, " कां रावसाहेब ! घोड्यांचीं कामें कशीं काय चाललीं आहेत ? " त्यावर रावसाहेब म्हणाले, " महाराज, हे लोक घोड्यांवर बसून हीं असलीं कामें करीत आहेत ते आपल्या अकले-बरोबर घोड्यांचीहि इज्जत गमावीत आहेत ! तें कसें ह्मणाल तर म्हैस किंवा बैल ज्याप्रमाणें उड्या मारतो त्याप्रमाणें हे उड्या मारीत आहेत. यांत घोड्यांचें कसब तें कसलें ? महाराज, घोडा हें जनावर फार धूर्त व शहाणें आहे. त्याला शिक्षण देणारा जसा असेल त्या मानानें घोडाहि शिकून तयार होतो. "




कै० सरदार गणेश हरी उर्फ रावसाहेब आपटे, रावराजे समशेरबहाद्दर लष्कर-ग्वालेर.

The Bombay Art Printing Works, Fort.

भोर



श्रीमंत सरदार बयाबाईसाहेब आपटे, लष्कर–ग्वालेर.
(श्री० शेवटचे बाजीराव यांची कन्या)



सरदार हरि गणेश उर्फ नानासाहेब आपटे, लष्कर—ग्वालेर.

The Bombay Art Printing Works, Fort.



सरदार श्रीधर गोपाळ उर्फ दाजीसाहेब आपटे, B. A.
रावराजे समशेरबहाद्दर लष्कर-ग्वालेर.



कै० सरदार गोपाळ विठ्ठल उर्फ भय्यासाहेब आपटे,
रावराजे समशेरबहाद्दर लष्कर-ग्वालेर.

ब ३४७
६२



महाराज म्हणाले, " तें तर अगदीं बरोबर आहे; पण तुह्मीं एखादा चमत्कारिक प्रयोग करून दाखवितां कां ? " रावसाहेब म्हणाले, " आज्ञेप्रमाणें करण्यास तयार आहे. "

महाराजांची आज्ञा होतांच आपल्या अद्वितीय अश्वावर आरूढ होऊन रावसाहेब मैदानांत आले आणि घोडेस्वारांना उडी मारून जाण्याकरितां जे चवथरे तयार केले होते त्यांपैकीं एका चवथऱ्यावर त्यांनीं एका स्वाराचा भाला घेऊन उभा केला व सर्वांना उद्देशून ते मोठ्यानें म्हणाले, " ह्या भाल्यावरून पलीकडे जो उडी मारून जाईल तोच खरा घोड्यावर बसणारा. " मैदानांत त्यावेळीं असलेले मोठमोठे लष्करी घोडेस्वार, अधिकारी व इतर युरोपीअन ह्मणाले, " या भाल्यावरून उडून जाणें सर्वथा अशक्य आहे. " महाराजांची खूण होतांच रावसाहेबांनीं घोड्याला टांच मारल्यावर तो चवथऱ्यावरील भाल्यावरून जो उडाला तो चेंडूसारखा पलीकडे गेला व पुन्हां भाल्यावरून अलीकडे आला. हा चमत्कार पाहून सर्व युरोपीअन अधिकारी थक्क होऊन गेले. व त्यांपैकीं एकजण पुढें आला आणि त्यानें रावसाहेबांची आणि त्यांच्या घोड्याची फार तारीफ केली. ज्या अधिकाऱ्यानें रावसाहेबांस शाबासकी दिली त्यानें महाराजांस सांगितलें, " असले गुणी लोक महाराजांनीं आपले पदरीं जरूर ठेवावेत. " यावर महाराज म्हणाले, " ठेवायचे काय ? आहेतच ! आमच्या पदरचे सरदार रावसाहेब आपटे ह्मणतात तेच हे ! " हे गुणग्राहक अधिकारी म्हणाले, " कांहीं हरकत नाहीं. ग्वालेरीस जातांना यांना आपण बरोबरच घेऊन जाऊं. "

रावसाहेबांचा जन्म झाला त्यावेळीं त्यांचे ग्रह उच्चस्थानीं असावेत असें वाटतें. कारण त्यांच्या बारशाच्या दिवशीं बलरामपूरवाले यांनीं रावसाहेबांस खेळण्याकरितां एक हत्ती पाठवून दिला. रावसाहेब हे मोठे मानी, हौशी व शूर होते. गळ्यांत कंठा कपाळाला आडवें गंध, श्रीमंती आंगरखा व पागोटें असा त्यांचा पोषाख असे. त्यांना फक्त तंबाखू खाण्याचें व्यसन असून ते गाण्याचे फार शोकी असत. रावसाहेबांचे पश्चात् त्यांचें कुटुंब ( शेवटचे श्रीमंत बाजीराव रावसाहेब यांची कन्या ) बयाबाईसाहेब यांनीं दत्तक घेतला. परंतु रावसाहेब यांचे सख्खे चुलतबंधु गोपाळराव भय्या यांचेंच नांव सरदारीवर दाखल झालें. भय्यासाहेब वारले तेव्हां हल्लींचे महाराज माधवराव शिंदे यांनीं क्रियेकरितां ४००० चार हजार रुपये दिले. हल्लीं सरदारी कोणाचे नांवावर आहे तें मागें सांगितलेंच आहे.

सरदार नारो विष्णु आपटे व त्यांच्या घराण्यांतील पुरुष ह्यांच्यावर महाराज

18 APR 1990

दौलतराव शिंदे यांनीं जसें कृपाछत्र धरिलें होतें तीच परंपरा हल्लींचे महाराज अलिजाबहादूर माधवराव शिंदे सरकार यांनीं कायम ठेविली असून ह्या घराण्यावर त्यांचें पूर्वीप्रमाणें अपूर्व प्रेम आहे.

सरदार नारो विष्णु यांचे चुलते बापूभट; यांस दोन पुत्र; गोपाळभट व महादेवभट. गोपाळभटाचे पुत्र दोन; पैकीं हयात रामचंद्रपंत आहेत. हे रामचंद्रपंत हल्लीं मु० कारवार येथें असतात. यांचे चिरंजीव विष्णुपंत हें जनरल एजंट आहेत. यांना एक मुलगा आहे. त्यांचें नांव विनायक हा लहान आहे. विष्णुपंताचे सख्खे चुलत बंधू गोपाळराव व जनार्दन, हे दोघेही आजगांव येथेंच असतात. गोपाळरावास पुत्र दोन; गणेश व भास्कर हे लहान आहेत. महादेवभटास दत्तात्रय व अनंत असे दोन पुत्र. हे दोघेही आजगांव येथें असतात. दत्तात्रयास पुत्र चार पैकीं तीन हयात आहेत. गोविंदराव हे गांधर्वविद्यालयांत मुंबई येथें असतात. महेश्वर व वासुदेव हे लहान आहेत. अनंतभट हे भिक्षुक आहेत. यांना नारायण नांवाचा एकच मुलगा आहे. हे आजगांव येथेंच आहेत. भास्करभटाचे वंशाची माहिती संपली.

द्वितीय पुत्र पद्मनाभभट यांस पुत्र केशव दीक्षित व विठ्ठल दीक्षित; केशव दीक्षितांना पुत्र तीन; पहिले विनायक दी. यांना पुत्र चार; पहिले महादेव दीक्षित. यांचे पुत्र गंगाधर व यांचे रामदीक्षित. ह्या रामदीक्षितांचे पणजे विनायक दीक्षित पुण्यास येऊन राहिले. रामदीक्षित हे मोठे विद्वान् ब्राह्मण होऊन गेले. ह्यांचें थोडक्यांत वर्णन ह्मणजे, जगमान्य केसरी वर्तमानपत्रांतील उतारा येथें देतों त्यावरून सर्व समजेलच; ता. १० माहे सप्टेंबर सन १९१२ केसरींतील उतारा— "संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन ह्या लेखांत ज्यांचा उल्लेख येण्याचा चुकून राहिला, त्यांपैकीं पुण्यांतील महामहोपाध्याय रामचंद्र गंगाधर ऊर्फ रामदीक्षित आपटे व कृष्णशास्त्री राजवाडे हे मुख्य होत. रामदीक्षित हे न्याय व धर्मशास्त्रांत प्रवीण असून, तत्कालीन विद्वान् नारायणशास्त्री गोडबोले, सदाशिवशास्त्री थत्ते व न्या. महादेव गोविंद रानडे आदिकरून मंडळी ह्यांना फार मान देत असत. पुण्यांत संमतिवयाचे कायद्याचे वेळेस जी सभा क्रीडाभुवनांत भरली होती तींत ह्यांचे अंग प्रमुखत्वानें होतें. दयानंदसरस्वती आर्यसमाजाची स्थापना करावयास पुण्यास आले. त्यावेळेस तेथें तीन दिवस दोन पक्षांच्या दोन सभा भरत असत. दयानंद सरस्वतीबरोबर वाग्युद्धांत दोन हात करून शेवटीं रामदीक्षितांनीं जय मिळविला. व ह्या जयाप्रीत्यर्थ रामदीक्षितांची पालखींतून मिरवणूक



मेजर जनरल श्रीमंत महाराज सर माधवराव शिंदे
अलिजा बहादर जी. सी. एस्. आय. जी. सी. व्ही. ओ; ए. डि. सी; एल्. एल्. डी.
ग्वालेर–संस्थानाधिपती.

The Bombay Art Printing Works, Fort.

काढून पुणेंकरांनीं ह्यांचा सन्मान केला. पुण्याच्या सार्वजनिक सभेचें सरकारांत जेव्हां चांगलें वजन होतें, त्या वेळेस रामदीक्षित सार्वजनिक सभेचे कांहीं दिवस उपाध्यक्ष होते. राणीच्या ज्युबलीच्या वेळीं ह्मणजे १८८७ सालीं सरकारानें रामदीक्षितांना ' महामहोपाध्याय ' हा बहुमानाचा किताब देऊन ह्यांचा गौरव केला. "

रामदीक्षित महामहोपाध्याय यांचे नातू गंगाधर व श्रीधर हल्लीं आहेत. हे दोघेही मुंबईस नोकर आहेत. यांपैकीं गंगाधरपंतांचे चिरंजीव रामचंद्र व दामोदर असे आहेत. यांचें वडिलार्जित घर पुणें येथें आहे. विनायक दीक्षिताचे त्रितीय पुत्र रघुनाथ दी० यांना पुत्र तीन; गणेश, बाळकृष्ण व विष्णु. पहिले गणेशपंत आपटे यांचा वंश हल्लीं संस्थान देवास येथें आहे. कै० गणेशपंत व यांचे पुत्र रा. रा. त्रिंबक उर्फ नानासाहेब आपटे या पिता-पुत्रांचें संक्षिप्त चरित्र पुढें देत आहे.

---

## कै० गणेशपंत आपटे यांचें कर्तृत्व.

संस्थान देवास येथील नानासाहेब आपटे यांचे निपणजे केशव दीक्षित, पणजे विनायक दीक्षित, आजे रघुनाथ दी. व वडील गणेशपंत. केशव दी. यांचे बंधू विठ्ठल दी. या बंधुद्वयानें श्री० थोरले बाजीराव साहेब पेशवे मुख्य प्रधान यांचे कारकीर्दींत पुणें मु० सोमयाग केला. म्हणून यांचे वंशजांना दी. हें उपपद पुढें प्राप्त झालें. केशव दी. हे कुटुंब धानाबाई व चि. विनायक यांसह पुणेंशहरीं श्री० बाजीरावसाहेब पेशवे यांचे कारकीर्दींत आले. हे दशग्रंथी वैदिक होते. यांचे पश्चात् चि. विनायक दी. यांनींही अग्निहोत्र घेतलें. यांनींही सोमयाग केला. विनायक दीक्षितांनीं पुणें येथें घर बांधिलें. तें घर हल्लीं यांचे वंशजाकडे आहे. अलीकडे त्या घरासमोरच याच दीक्षितांपैकीं एकानें दुसरें घर बांधिलें. विनायक दी. यांचे कुटुंब भागिरथीबाई सती गेल्या त्यावेळीं पुणें शहरांत मोठा समारंभ झाला. या साध्वी स्त्रीचें अस्तित्व देवालयरूपानें आहे. हें देवालय काळेवावरांत आहे असें समजतें. श्री० सवाई माधवराव यांचे कारकीर्दींत विनायक दी. समाधिस्थ झाले. या दीक्षितांना श्रीमंतांनीं गुरु केलें होतें. श्रीमंतांकडून पालखी व अब्दागीर होती. विनायक दीक्षितांनीं सर्व तीर्थयात्रा केल्या व नंतर वडील मुलास चाळीस हजारांचा विषय देऊन, बाकीच्या तिघांस प्रत्येकीं दहा

हजारांचा ऐवज दिला. यांचे पहिले चि० महादेव दी. उत्तमपैकीं वैदिक असून, नामांकित शास्त्री होते. श्रीमंत शेवटचे बाजीराव हे एकसारखे दत्तक मुलें घेत सुटले. या दत्तक प्रकरणावरून वे. महादेव शास्त्री आपटे यांचा व श्री० बाजीराव यांचा बेबनाव झाला. शास्त्रीबोवांनीं या बाबतींत निक्षून सांगितलें कीं, "आजपासून यापुढें तुमचें तोंड पहाणार नाहीं." पुढें कांहीं दिवसांनंतर एके दिवशीं तुळशीबागेंत कांहीं ग्रामण्यासंबंधीं सभा भरली होती. त्या सभेचे अध्यक्ष महादेवशास्त्री आहेत असें श्रीमंतांस समजलें. तेव्हां श्रीमंतांची स्वारी सहीच कोणास न कळवितां तुळशीबागेंत गेली. परंतु शास्त्रीबोवाचे एका शिष्यानें श्रीमंतांची स्वारी देवळांत येत असल्याची हकीकत, त्यानें शास्त्रीबोवांस सांगितली. त्याबरोबर शास्त्रीबोवा तोंड फिरवून श्रीरामाकडे पाठ करून बसले. ही हकीकत देण्याचें विशेष कारण हें कीं, शास्त्रीबोवा कडकडीत कर्ममार्गी असून सच्छील व सदाचारसंपन्न होते. परंतु जरा तापट असून विलक्षण निस्पृही होते.

अव्वल इंग्रजींत रॉबिनसन् साहेब हे पुण्याचे अधिकारी होते. त्यांचे शिरस्तेदार बाळकोबा भाऊ पटवर्धन हे महादेवशास्त्री यांचे शेजारींच रहात होते. सदाशीव दी. शास्त्रीबोवांचे बंधू आहेत, यांचें हस्ताक्षर फार चांगलें असून हे चांगले सुशिक्षित आहेत वगैरे शिफारस पटवर्धन शिरस्तेदार यांनीं केल्यावरून साहेबांनीं सदाशीव दीक्षितांना एकदम भडोच जिल्ह्यांत मामलतदारीची जागा देवविली. सदाशीव दी. यांनीं घरांतील हिश्शापैकीं अर्धा हिस्सा महादेवशास्त्री यांस व अर्धा हिस्सा रघुनाथ दी० यांना देऊन, सदाशिव पेठेंत निराळेंच घर बांधिलें. यांचे सख्खे चुलतबंधू मोर दि. हे श्रीमंत सवाई माधवराव यांचे वेळीं प्रसिद्ध ज्योतिषी होते.

रॉबिन्सन्साहेबांचे वडील बंधू खानदेशांत कलेक्टर होते. रा. पटवर्धन शिरस्तेदार यांनीं, रघुनाथ दीक्षितांना नोकरी देण्याबद्दल साहेबांकडून एक शिफारस पत्र घेऊन ते दीक्षितांना दिलें. रघुनाथ दी. तें शिफारस पत्र घेऊन अदमासें शके १७४५ त धुळें येथें गेले. तेथें मे. कलेक्टर साहेबांनीं त शिफारसपत्र पाहून, निराळेच शिफारस पत्र दीक्षितांना देऊन ते ह्मणाले—हें आह्मीं दिलेलें शिफारस पत्र मे. मॉरिटसाहेब जज्ज, जि० नगर व खानदेश यांना नेऊन द्या. त्याप्रमाणें त्यांनीं मे. जज्जसाहेबांस भेटून पत्र दिलें. मे. जज्जसाहेबांनीं रघुनाथ दीक्षितास मुनसफीची जागा दिली. धुळें व मालेगांवचे दरम्यान झोडग्यास कायम झालें. पुढें मालेगांव येथें कायम झाले. मालेगांव येथेंच शके १७५० त रघुनाथ

दीक्षितांनीं संन्यास घेतला. नंतर थोड्याच दिवसांनीं याच शकांत हे समाधिस्थ झाले. यांची समाधी नदीपलीकडे श्रीदेवीचे मंदिराजवळच बांधिली होती. यांना तीन मुलगे; गणेश, बाळकृष्ण व विष्णु. गणेशपंत यांचा जन्म आजोळी बापट यांचेकडे मुक्काम अंजर्ले येथें शके १७२६ रक्ताक्षीनाम संवत्सरें माघ कृष्ण चतुर्दशी बुधवार रोजीं झाला. यांचे लग्न शके १७३९ त झालें. यांनीं वडिलांचे मागें पांच वर्षांनीं ह्मणजे शके १७५५ त जि० खानदेश ता० सुलतानपूर ऊर्फ शहादें येथें शेकदारीची असामी पत-करली. हे पुढें जामनगरास होते. तेथून शके १७६१त हे धुळ्यास वेंडर झाले. शके १७६२ त राजीनामा देऊन त्या जागेवर धाकटे बंधूस कायम करून दिलें. त्याच सुमारास धुळें येथें ग्रँटसाहेब, शामराव गरूड व गोविंद अय्या हेड अकौंटंट यांनीं कपाशीचा व्यापार चालविला होता. त्या मंडळींनीं गणेशपंत आपटे यांना कापूस खरेदी करण्याचे कामावर पगारी नेमिलें.

उज्जेन, रतलाम व मंदोसर वगैरे ठिकाणीं कापूस खरेदी करितां गणेशपंत गेले. या सुमारास माळव्याचे सुभे सरदार नारो विष्णु आपटे हे होते. गणेश-पंतानीं भाव तेजी असल्यामुळं खरेदी न करितां मंडळींना कळविलें कीं, बरेंच दिवस तिकडे माझें येणें होणार नाहीं. गणेशपंतांना माहित होतेंच कीं, सरदार आपटे व आपण कोंकणांतील एकागांवचे असून दशांतील आहों. (गणेशपंतांचे निपणजे पद्मनाभ व नारोपंतांचे खापरपणजे—भास्कर हे सख्खे भाऊ होत.) म्हणून गणेशपंतांनीं मुद्दाम सरदार नारोपंतांची भेट घेतली. कोंकणांतील! त्यांतून आपटे!! आणि अगदीं जवळचे; त्यामुळेंच, सरदार आपटे यांना फारच आनंद झाला व त्यांनीं गणेशपंतांचें फारच अगत्य करून कांहीं दिवस जवळच राहून घेऊन त्यांची सर्व माहिती करून घेतली. अदमासें शके १७६३त खाचरोद महालावर गणेशपंतास कमाविसदार नेमिलें. दोन वर्षे कमाविसदाराचें काम करून ते परत कांहीं कामारितां धुळ्यास आले.

बायजाबाई साहेब शिंदे यांचा हुजऱ्या जयसिंग हा इंग्रजींत (खानदेशांत) मयत झाला. त्याची मालमत्ता दीड लाखांची सरकारांत जप्त झाली. सदरहु मालमत्ता आपणांस मिळावी ह्मणून बायजाबाईसाहेब शिंदे यांनीं धुळ्याचे अदा-लतींत दावा केला होता. त्या हुजऱ्याच्या भावजईनेंही सरकारांत अर्ज केला होता. या दाव्याचा अपसांत निकाल करण्याकरितां वामनराव गरूड हे गणेश-पंत आपटे यांना बरोबर घेऊन उज्जनीस गेले. गणेशपंतांनीं मोठ्या युक्तीनें

बायजाबाईची समजूत करून तेवीस हजार रुपये देऊन आपसांत निकाल करून टाकिला आणि धुळ्यास परत आले.


मे. कमिशनर बुलकसाहेब यांनीं गरूड यांच्या शिफारशीवरून गणेशपंतांना ' गांव-शिवेचे तंटे ' फैसल करण्याचे कामावर मोहोतमीन नेमिलें. पगार शंभर रुपये होता. यांनीं इलिचपूर, शिंगोली व अकोला वगैरे महालाचे तंट्याचे निकाल केले. पुढें राजाचे देऊळ गांवास मामलेदार नेमिलें. कांहीं दिवसानंतर राजीनामा देऊन ते नेरास येऊन उज्जनीस गेले. हे शके १७८०।८१ दोनच वर्षे टोंक महालाचे कमाविस-दार होते. त्याच सुमारास बंडाच्या बंदोबस्ताकरितां फौजा जात येत होत्या. त्यांचा चांगला बंदोबस्त ठेविला ह्मणून यांना इंदोर येथील रेसिडेंट हॅमिल्टन साहेब यांनीं शिफारस करून सर्टिफिकीटही दिलें होतें.

शके १७८२ त देवास संस्थानच्या श्रीमंत यमुनाबाई साहेब पवार, अज्ञान राजे कृष्णराव पवार यांचे कारकीर्दींत हरी गणेश सहस्रबुद्धे यांनीं गणेशपंत यांना बोलावून शहर अदालतीचें काम सांगितलें. नंतर ' आगर एजंट ' येथें संस्थानचे वकि-लीचे कामावर हे मुकरर झाले. पुढें अलोट महालाचे हे कमाविसदार होते. शके १७९० त देवास येथें शहरकमाविसदार होते. शिवाय शहर-हद्दीचे तंट्याचे वेळीं यांना पुष्कळ वेळां मोतमीन नेमिलें होतें. शके १७९१ त आषाढ व॥ प्रतिपदेस गणेशपंतांनीं चतुर्थाश्रम घेतला आणि लगेच आषाढ व॥ चतुर्थीस मंगळवारीं रात्रौ समाधिस्थ झालें.

गणेशपंतांनीं लग्न झाल्यावर श्रीक्षेत्र वाई येथें दातार यांचे घरीं राहून, संहिता, ब्राह्मण व क्रम वगैरे अध्यायन करून, मग नोकरी, व्यापार व मोठ्या हुद्यांचीं कामें निस्पृहपणानें करून उत्तम लौकिक संपादिला व राजाश्रय मिळ-विला. गणेशपंतांची प्रकृती अस्वस्थ झाल्याचें समजल्याबरोबर, श्रीमंत राजे कृष्णराव पवार समाचारास आले. तेव्हां समक्ष भेटींत गणेशपंत श्रीमंत सरकार राजे कृष्णराव पवार यांना ह्मणाले. " कोणतीही इच्छा राहिली नाहीं. फक्त माझे समाधीकरितां, श्रीसोमेश्वराजवळ जागा द्यावी. याशिवाय कांहीं नको. " त्याप्रमाणें सरकारांनीं ती जागा दिली. त्याच जागेंत श्रीसोमे-श्वराजवळ समाधी बांधिली आहे.

गणेशपंतांना एकंदर आपत्यें बावीस झालीं. पैकीं फक्त एकच हल्लीं रा. त्रिंबकराव ऊर्फ नानासाहेब आहेत. यांनींच चारशें रुपये खर्च करून ' समाधी ' बांधिली. हा पूर्व वृत्तांत संपला. आतां आरंभीं ज्यांचें नांव नमूद केलें आहे; त्यांमधील नानासाहेबांचें संक्षिप्त चरित्र देतो.

दाखल नं ......
भोर



सरदार त्रिंबक गणेश उर्फ नानासाहेब आपटे, देवास.

The Bombay Art Printing Works, Fort.

श्रीमंत प्रो. द. वं. पायगावकर, भोर

# सरदार त्रिंबक गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे देवास.

60

सरदार त्रिंबक गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे हल्लीं मुक्काम देवास, यांचा जन्म शके १७५२ त धुळ्यें येथें झाला. यांची मुंज नववें वर्षीं श्रीत्रिंबकेश्वर येथें झाली. यांचें पहिलें लग्न पुणें शहरापासून पांच कोसांवर किवळें गांवीं बारावें वर्षीं झालें. हे अठरावें वर्षीं धुळें येथें मुलकी परीक्षेंत पास झाले. शके १७७६ त इंजिनीयर खात्यांत यांनीं नोकरी धरली. हे शके १७७७ त पैमाश खात्याचे परीक्षेंत पास झाले. हे पुढें धुळ्या-नजीक बागलाण पैकीं नेर येथें शेती पहात होते. हे शके १७७८ त उज्जैन येथें आले व सरदार बाबासाहेब आपटे यांचेजवळ मंदोसर येथें जाऊन राहिले. तेथें ते तीन वर्षें होते. त्यानंतर यांनीं उज्जैन येथें तहशील कचेरींत शिरस्तेदाराची नोकरी धरली. त्यावेळीं तेथें बायजाबाई शिंदे यांचा अम्मल होता. प्रांत—माळव्यांत परगणे—नेवरी हा गांव लष्कर येथील आंग्रे जहागीरदार यांचेकडे जहागीर आहे. नानासाहेब आपटे यांनीं शिरस्तेदाराची नोकरी सोडून शके १७८४ त परगणे नेवरी येथें आंग्रे जहागीरदार यांचेकडे नोकर राहिले. ते तेथें सहा सात वर्षें होते. यांचे वडिल गणेशपंत देवास येथें शहरकमाविसदार होते; हे आजारी पडल्यामुळें, नानासाहेब घरीं आले. त्या अजारीपणांतच गणेशपंत समाधिस्थ झाले. तेव्हां त्यांचे जागेवर त्रिंबक गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे यांना, श्रीमंत सरकार राजे कृष्णराव बाबासाहेब पवार यांनीं अदमासें शके १७९१ त कायम केलें.

नानासाहेब यांनीं जरी वडिलांची नोकरी पत्करली तरी परगणे नेवरी येथील नोकरी वरील आपला हक अद्यापि कायम ठेविला असून, हल्लीं आपले तर्फें तेथें एक कारकून ठेविला आहे. शके १७९२ त नानासाहेबांचे पहिले कुटुंब वारलें. याचवर्षीं नानासाहेबांनीं द्वितीय कुटुंब केलें. पहिल्या कुटुंबाचे दोन पुत्र हल्लीं आहेत. वडील चिरंजीव सदाशिवराव उर्फ बाबासाहेब व धाकटे चिरंजीव श्रीधर उर्फ दाजीसाहेब हे होत. नानासाहेबांनीं तीस वर्षांपेक्षां जास्त नोकरी केली. यांचे चिरंजीव सदाशिवराव उर्फ बाबासाहेब हे जज्जाचे जागेवर होते परंतु, हल्लीं वडिलार्जीत नोकरीवरच ह्मणजे शहरकमाविसदार आहेत. बाबासाहेबास गणेश, पुरुषोत्तम व चिंतामण असे तीन पुत्र आहेत. गणेश हे कॉलेजांत आहेत; पुरुषोत्तम व चिंतामणी हायस्कुलांत आहेत.

नानासाहेबांचे धाकटे चिरंजीव श्रीधर उर्फ दाजीसाहेब हे लष्कर—ग्वाल्हेर



भोर

येथील कै. सरदार भय्यासाहेब आपटे यांचे दत्तक पुत्र झाले आहेत. तेव्हां सरदार श्रीधर गोपाळ ऊर्फ दाजीसाहेब यांची माहिती सरदार आपटे घराण्याचे वर्णनांत मागें दिली आहे.

नानासाहेबांनीं क्षेत्रयात्रा करून व नऊ जोतिर्लींगांचें दर्शन करून एक द्वारकाधामही केलें आहे. यांनीं शके १७९८ त देवास येथें घर बांधिलें व घरास अगदीं लागून पूर्व बाजूस लहानसें शिवालय बांधून त्यांत शके १७९९त फाल्गुन शु० ७मीस श्रीत्रिंबकेश्वराची स्थापना केली. त्यानंतर बरेंच वर्षांनीं उज्जैन येथें श्रीपरशुराममंदिर बांधण्यास सुरवात करून, मंदिरांत शके १८३०त वैशाख शु० ७ मीस काल, काम व परशुराम अशा तीन मूर्तींची स्थापना केली. देवासचे महाराज राजे कृष्णराव ऊर्फ बाबासाहेब पवार यांनीं श्रीत्रिंबकेश्वराचे पूजा अर्च्या वगैरे करितां पंचवीस बिघे जमीन इनाम देऊन नानासाहेबांचे नांवें वंशपरंपरेची सनद करून दिली आहे. उज्जैन येथील श्रीपरशुरामाचे पूजा आर्चा वगैर करितां हल्लींचे संस्थानाधिपती महाराज राजे तुकोजीराव ऊर्फ बापूसाहेब पवार सरकारांनीं दरमाहा वीस रुपयांची नेमणूक करून देऊन नानासाहेबांचे नांवची वंशपरंपरेची सनद करून दिली आहे. शिवाय शके १८३४ त नानासाहेब आपटे यांना सरदारीचा हुद्दा देऊन, दरमहा पंधरा रुपयांची नेमणूक करून दिली आहे. या आपटे घराण्यावर कै. थोरले महाराजांचे पूर्ववत् चालत आलेलें पुत्रवत् प्रेम हल्लींचे महाराज राजे तुकोजीराव ऊर्फ बापूसाहेब सरकारांनीं कायम ठेवलें आहे हे वरील देणगीवरून व्यक्त होत आहे.

लष्कर येथील सरदार बाबूराव आंग्रे यांनीं नानासाहेबांच्या वडिलांचे समाधीचे पूजेकरितां दरसाल साठ रुपयांची नेमणूक करून देऊन नानासाहेबांचे नांवची वंशपरपरेची सनद करून दिली आहे.

नानासाहेबांचें वय ८३ वर्षांचे असून ते निरोगी व सतेज आहेत. हे स्वतः पार्थीवपूजा करितातच परंतु, यांचे मुलगे व नातवंडेंही ती पूजा करितात. नानासाहेब हे पूर्वजन्मींचे महात्मेच असून हल्लींही आहेत यांत बिलकूल शंका नाहीं. सर्व आपटे घराण्यांत यांच्या इतके वयोवृद्ध कोणीच नाहींत. "प्रपंच साधुनी परमार्थ साधावा" या म्हणींप्रमाणें नानासाहेब ज्ञानी असून भगवद्भक्त आहेत. यांनीं आपले घराजवळ जें शिवालय बांधिलें आहे; त्या देवास श्रीत्रिंबकेश्वर हें नांव दिलें आहे. याचें कारण दूरवर विचार केला असतां लक्षांत येईल कीं, "पश्चात् आपण केलेल्या महत्वांच्या गोष्टींचें व गुणांचें चिरकाल स्मरण रहावें" हें होय.

अपूर्व योग— गेल्यावर्षी मी स्वतःच आपटे घराण्याची माहिती मिळविण्या-करितां फिरत फिरत इंदुराहून देवासला गेलों. ज्या दिवशीं मी घरीं गेलों त्याचे दुसरे दिवशीं नानासाहेबांचे नातू गणेश याचें लग्न होतें. इंदुराहून मी अमुक दिवशीं येतों, असें पूर्वी पत्र लिहिलें होतें. लग्नामुळें आप्त, इष्टमित्र यांची गर्दी जमली होती. मी गेल्याबरोबर जों पहातों तों दारासमोर मंडप ! मी टांग्यांतून खालीं उतरलों, तेथील एका गड्यानें आमचें सामान घेतलें व कोणा एकानें मला एका खोलींत नेलें; मी बसतों इतक्यांत एका १६।१७ वर्षांचे वयाच्या मुलानें मला "चला जेवणाची तयारी आहे," असें ह्मटलें. मी ह्मणालों तूर्त जेवणाची जरूर नाहीं. नानासाहेबांस मला भेटणेचें आहे. त्यांना असें सांगावें कीं, " आपटे घरा-ण्याची माहिती मिळविणारे ' आपटेच ' आले आहेत. " तेव्हां त्या सतेज व तेजस्वी मुलानें गालांतले गालांत थोडें हास्य करून आतां येतों, आपण जरा बसा, असें म्हणून तो गेला. लगेच सुमारें दहा मिनिटांत परत आला व ह्मणाला, चला ! आपली व नानासाहेबांची भेट करून देतों. मीं त्या मुलाबरोबर गेलों. तों सोप्यांत एका लहानशा गादीवर बसलेले नानासाहेबच होते. त्यांनीं मला पाहतांच या! आपटे या ! ! धन्य आहे. वा: माझे मनांतील फार दिवसांची इच्छा श्रीत्रिंबकेश्वर महाराज तुमचेकडून सिद्धीस नेणार ! ! ! असें ह्मणून बसा, कसेंकाय ! आधीं फराळ करून जरा आराम घ्या. मी ह्मणालों, मी ज्या कामाक-रितां आलों आहे तें काम लवकर व्हावें, अशी माझी विनंती आहे. ते ह्मणाले हे लग्नाचे ३।४ दिवस झाल्यावर मग तुमचें काम ! तोंपर्यंत तुह्मी विश्रांती घ्या. लग्ननिमित्य व कामानिमित्य ८।१० दिवस तेथें राहणें झालें. तेवढ्या अव-धींत घरांतील सर्व साधारण माहिती मिळविली. हल्लीं नानासाहेबांचें दुसरें कुटुंब आहे. यांना बरींच मुलें झालीं, परंतु हल्लीं फक्त एकच मुलगी आहे. या लग्नकार्यांत नानासाहेब माडीवरून खालीं व खालून वर दिवसांतून निदान १०।१२ वेळ तरी जाऊन—येत होते. शिवाय बाहेर येऊन अमूक करा वगैरे सर्व कार्यांतील कामें पहात; ते रात्रौ एकवाजेपर्यंत जागत असत. मला खरोखरच फारच आश्चर्य वाटलें ! कारण, इतके वयापर्यंत आमचें जगणेंच कठीण ! ! सायंकाळीं रोज वडिलांचे समाधीचे दर्शनास जाणें. व परत आल्यावर संध्या, श्रीत्रिंबकेश्वराची पूजा आर्ती वगैरे करून नंतर फराळ; आणि मग कोणी आल्यास त्याचेबरोबर बोलणें, नाहींतर कांहीं तरी वाचन चालतें. त्यांचेपासून दहा-हताचे अंतरांत ' आळसाला ' येण्याची सक्त मनाई आहे ! ! असो अशा

सत्पुरुषाचें दर्शनानें व कृपेनेंच हें काम पूर्ण होईल अशी मनाला उमेद आली. आह्मा पामरांना यांच्या चरणदर्शनाचा लाभ पुष्कळ वर्षें घडो अशी माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. नानासाहेबांचे चिरंजीव सदाशिवराव ऊर्फ बाबासाहेब पितृभक्त असून स्नानसंध्येशील आहेत. यांचा नेहमींचा पेहराव वडिलाप्रमाणेंच पेशवाई पद्धतीचा ह्मणजे पागोटें, आंगरखा व उपरणें. नानासाहेबांचा पोशाख पागोटयासह सर्व पांढरा असतो. परंतु फक्त पागोटें मात्र केव्हां केव्हां केशरी अगर गुलाबी रंगाचे बाबासाहेब घालतात. हल्लींच्या यांच्या सौ. सावत्र मातुश्री आहेत खऱ्या ! परंतु मी जेव्हां मुद्दाम चौकशी केली तेव्हांच समजलें. धन्य त्या माउलीची ! हे सर्व भगवद्भक्त नानासाहेबांच्या पुण्याईचें द्योतक होय!

नानासाहेबांचे चुलते बाळकृष्ण ऊर्फ तात्या ह्मणून होते. हे धुळें येथील नोकरी सोडून सरदार आपटे यांचेकडे गेले. त्यांचेवर सरदार नारो विष्णु आपटे यांची फार मर्जी असे; बाळकृष्णपंततात्यांना बायजाबाई शिंदे यांचें नायबदिवाण नेमिलें होतें. पुढें ते बरेच वर्षांनीं सरदार आपटे यांचेजवळ येऊन राहिले. यांचेच वाडयांत ते शके १७८२ त कैलासवासी झालें. फोटोंत सरदार नारो विष्णु आपटे यांचे जवळच जे लागून बसलेले तेच बाळकृष्णपंततात्या आपटे होत.

रा. रा. नानासाहेब आपटे यांचे चुलते विष्णुपंत यांचे पुत्र महादेवराव हे पेन्शनर असून ह्यानीं श्रीक्षेत्र गया येथेंच खास घर केलें आहे. यांचे दोन पुत्र रामचंद्र व पुरुषोत्तम हे दोघेही नोकर आहेत. चवथे पुत्र चिंतामण दी० यांना पुत्र तीन; पैकीं विनायकास पुत्र चार; पहिले गंगाधर हे मयत; यांस पुत्र तीन; कृष्ण, वामन आणि गणेश; कृष्णराव इंदोर येथें नोकर आहेत; वामनराव हे इंदोर येथेंच रेव्हीन्यू आफिसात नोकर आहेत. गणपतराव हे ग्रॅज्युएट असून पुढें शिकत आहेत. गणपतरावांचे शिक्षणास वामनरावांनींच मदत केली. यांचे पणजे चिंतामण दी० हे स्नानसंधेशील होते. यांना संस्थान जमखेडींचे अधिपतींनीं व संस्थान सांगलीचे अधिपतींनीं थोडेसें इनाम दिलें होतें. तें इनाम हल्लीं कृष्णराव यांचे नावें चालूं आहे. कृष्णरावास महादेव या नांवाचा एक मुलगा आहे. यांचे चुलते सदाशिव हे पुण्यास असतात. यांना परशराम व रामचंद्र असे दोनच पुत्र आहेत. परशरामपंत हे इंग्रजी शाळेंत नगर येथें नोकर आहेत. यांचे चुलते वासुदेवराव हे आहेत; यांस पुत्र विष्णु हे गोसावी होऊन गेले. वासुदेवराव यांचे बंधू काशीनाथ यांना ग्वाल्हेर येथील श्री. बयाबाई साहेब

आपटे यांनीं दत्तक घेतलें. दत्तक नांव हरी असून टोपण नांव नानासाहेब असें आहे. काशीनाथपंतांचे सख्खे चुलते जनार्दन; यांचे पुत्र लक्ष्मण हे इ. स. १८९७ त बी. ए. झाले; व १९०४ त एल्. एल्. बी. झाले; लक्ष्मणराव आपटे पुणें येथेंच वकिली करीत आहेत. यांचे खास घर सदाशिवपेठेंत आहे.

केशव दी. यांचे द्वितीय पुत्र येसंभट यांना पुत्र तीन; कृष्णाजी, बाळाजी; व मोर दी.; मोर दीक्षितांचे नारायण; यांचे निळकंठ; यांचे काशीनाथ ऊर्फ बळवंत; यांना पुत्र दोन– नारायण व सदाशीव. नारायण काशीनाथ हे एम्. ए. बी. एस्. सी नुकतेच झाले आहेत. हे फर्ग्यूसन कॉलेजांत होते. यांचे बंधू सदाशीव फर्ग्युसन कॉलेजांत इंटरमिजिएट मध्यें आहेत. बुद्गांव स्टेटपैकीं राजापूर ह्मणून एक खेडें आहे; तेथें यांची इनाम जमीन होती. रा. नारायणराव यांचे आजे निळकंठ यांनीं संस्थानांत नोकरीबद्दल तैनात पतकरली. पुढें यांचे वडील नोकरीवर गेले नाहींत. सबब तैनातही बंद झाली. हल्लीं त्यांचें खास घर संस्थान मिरज येथें आहे. नाराणराव यांचा जन्म शके १८१० त असावा. हे आठ वर्षांचे असतांना वडील वारले; नंतर बारावें वर्षीं मातोश्री वारली. अशा अल्प वयांत हे दोघे बंधू असतांना, यांची मावशी सांगली येथील रा. विश्वनाथराव गोखले यांचें कुटुंब होय. आपल्या बहिणीची मुलें अशी उघडी पडलेली पाहून रा. विश्वनाथराव गोखले यांनीं नारायणराव व सदाशिव यांचे आपल्या मुलांप्रमाणें संगोपन करीत आहेत. नारायणराव यांनीं थोडीशी जी इनाम जमीन होती ती विकली. मायेचें आईबाप नसतांना दोन्हीं मुलें उत्तम निघाली. या दोन्हीं मुलांचें पूर्व सुकृत चांगलें असलेंच पाहिजे. रा. नारायणराव यांचें लग्न झालें आहे. हे दोघे बंधू इतक्या चांगल्या स्थितीला येण्यास रा. विश्वनाथराव गोखले यांचे पुत्रवत् असलेले प्रेम होय. नारायण काशीनाथ हे हल्लीं बडोदा कालेजांत प्रोफेसरचे जागीं आहेत.

केशव दी. यांचे त्रितीय पुत्र पद्मनाभ दी. यांना पुत्र तीन; पैकीं नरसिंह दी. यांस चिंतामण; यांस पुत्र चार; पैकीं गोपाळ यांस पुत्र तीन; रामचंद्र, मोरेश्वर व अनंत. रामचंद्रास दत्तात्रय हा लहान आहे. मोरेश्वरास– गोपाळ व कृष्ण. गोपाळ हे तूर्त जमखंडीस आहेत. यांना जरा गाण्याचा नाद आहे असें समजतें. कृष्ण हे ठाणें येथें शाळेंत तालीममास्तर असून भिक्षुक आहेत. यांना कृष्णंभट असें म्हटलें असतां फार आवडतें. मोरेश्वराचे बंधू अनंत हे चुलते शंकरराव यांना दत्तक गेले आहेत. हे अनंत शंकर सांगली येथें

स्टँपवेंडर आहेत; यांना पुत्र दोन. नारायण व बापू हे लहान आहेत.

केशव दी. यांचे बंधू विठ्ठल दी. यांस पुत्र चार. पहिले शिव दी. यांचे श्रीधर दी.; यांचे केशव दी.; यांस पुत्र चार. पैकीं कृष्ण दी. यांस शिवराम दी.; यांना पुत्र चार. पैकीं रामचंद्राचे नारायणभट हें हल्लीं असोलीस आहेत. दुसरे बाळकृष्ण. यांना पुत्र पांच. महादेव, विष्णु, सिताराम वासुदेव व आत्माराम; महादेवभट हे वैदिक आहेत. यांना सखाराम व येशवंत असे दोनच लहान मुलगे आहेत. विष्णुपंत हे वेंगुर्ले येथें शाळामास्तर आहेत, यांना पुत्र दोन दत्तात्रय व राजाराम हे दोघेही लहान आहेत. सितारामपंत हेही शाळामास्तर असून आजगांव येथें रहात आहेत. यांना विठ्ठल या नांवाचा एकच मुलगा आहे. वासुदेव स्वामी झाले. आत्मारामपंत हे वऱ्हाडांत तेल्हारा येथें रेजिस्ट्रेशन खात्यांत नोकर आहेत. यांना एक लहान मुलगा आहे. विठ्ठल दी० यांचे द्वितीय पुत्र वासुदेव दी०; यांस गदाधर दी०; यांस नारायण दी०; यांना पुत्र तीन; कृष्ण, गणेश व दिनकर; कृष्ण दी. यांना पुत्र दोन. त्रिंबक दी० व वैजनाथ दी०; त्रिंबक दी० यांचे पुत्र दोन; सच्चितानंद व दत्तात्रय हे दोघे देवास येथें आहेत. पैकीं दत्तात्रय लहान; असून सच्चितानंद हे सज्ञान आहेत. वैजनाथ दी. वैदिक असून स्नानसंध्येशील आहेत. यांचें खास घर उज्जैन येथें आहे. यांना मोरेश्वर नांवाचा एक मुलगा आहे. गणेश दी. यांस वासुदेव दी. हे एकटेच असून हेही उज्जैन येथेंच असतात. हे याज्ञीकामध्यें चांगले आहेत. विठ्ठल दी. यांचे त्रितीय पुत्र जीव दी. यांना पुत्र दोन; विठ्ठल दी. व श्रीधर दी०; विठ्ठल दी. यांस पुत्र दोन; केशव व सखाराम. सखाराम यांस वासुदेव; यांस चिंतामण; यांस पुत्र दोन; बळवंत व लक्ष्मण पैकीं लक्ष्मण चिंतामण हे पुण्यास वकील आहेत. यांचें संस्थान भोर येथें खास घर आहे. रा. लक्ष्मणराव वकील यांना दत्तात्रय नांवाचा लहान मुलगा आहे. श्रीधर दी. यांना केशव दी. यांना पुत्र तीन; रामचंद्र, कृष्ण व श्रीधर. रामचंद्रास गोविंद यांस पुत्र दोन; वामन व शंकर. वामनराव व शंकरराव हे इंदोर येथें आहेत. यांचें खास घर तेथें आहे. वामनराव यांचे आजे राम दी० हेच उज्जैन येथें गेले होते. कृष्ण दी. यांना पुत्र चार; विष्णु दी. विनायक, मोरेश्वर व नारायण. कृष्ण दी. यांचे हे चारी पुत्र वैदिक आहेत. विष्णु दी. हे अग्निहोत्री असून हल्लीं पुण्यांस असतात. पुण्यास सदाशिवपेठेंत यांनीं खास घर केलें आहे. वे. विष्णु दी. प्रथम सातारा जिल्ह्यांतील गोवें येथें रहात होते. यांच्यापैकीं कोणीना कोणी तरी गोवें येथें असतातच. विष्णु दी.

यांना पुत्र दोन; महादेव व गजानन. हे दोघेही सज्ञान असून थोरले भिक्षुक व धाकटे नोकर आहेत. विनायकभट यास पुत्र दोन; दत्तात्रय व हरी हे लहान आहेत; मोरेश्वरभट यास पुत्र दोन. वासुदेव व कृष्ण हे लहान आहेत. नारायणभट यास पुत्र तीन; केशव, विनायक व विश्वनाथ हे लहान आहेत. विष्णु दी. विनायकभट, मोरेश्वरभट व नारायणभट हे चौघेही आपल्या मुलांबाळांसह पुण्यास असतात. या कुटुंबास वैदिकधर्माचे उत्पादक म्हणण्यास हरकत नाहीं. कारण आपलीं सर्व मुलें वेदोनारायण असलींच पाहिजेत ह्या हेतूनें घरांत वेदशाळा असून याज्ञिक शिक्षणही देतात. वे. विष्णु दीं. यांना अग्निहोत्र घेऊन बरींच वर्षें झालीं. यांची मी प्रत्यक्ष भेट घेतली होती. हे सत्वशील असून तपोनिधी आहेत. यांचे पणजे श्रीधर दी. हे कोंकणांतून गोवें येथें आले. यांनींच गोवें येथें घर केलें. तें अद्याप आहे. श्रीधर दीक्षितांनीं गोपीनाथभट्टी संस्काररत्नमाला शके १७२३ त स्वहस्तें लिहिली. " सदरहू हस्तलिखित प्रत या लेखकानें पाहिली आहे. " वे. विष्णु दी. यांचे सख्खे चुलत बंधू गणपतराव, गोपाळराव व वासुदेव. पैकीं गणपतराव व गोपाळराव बडोदें येथें नोकर आहेत. गणपतराव यांस केशव व दिगंबर असे दोन पुत्र आहेत. वासुदेव याचा मुलगा रामचंद्र यास गोपाळरावांनीं आपलेजवळ ठेविला आहे; गणपतराव व गोपाळराव यांनीं बडोदें येथें निरनिराळीं खास घरें केलीं आहेत. या गणपतरावांचे आजे केशव दी० हे श्रीमंत बाजीरावसाहेब पेशवे यांचेजवळ ब्रह्मवर्त येथें होते. श्री० बाजीरावसाहेब कैलासवासी जाहल्यावर त्यांचे आश्रयावर असलेलीं पन्नास साठ कुटुंबें पोरकीं झालीं. ही शोचनीय स्थिति लक्षांत आणून सरदार शिंदे सरकार यांनीं त्या सर्व कुटुंबांस राहण्यास व मेहनत करून पोटभर खाण्यास मुबलक जमीन दिली. सदरहू जमीन माळव्यांत श्रीक्षेत्र ॐकारपासून नऊ कोसावर पुनासा या गांवची होय. सदरहू पन्नास साठ कुटुंबें या गांवीं येऊन राहिलीं. याच गांवीं श्रीधर दी० यांना पहिले पुत्र गणपतराव हे झाले.

विठ्ठल दी० यांचे चवथे पुत्र रघुनाथ दी० यांना पुत्र तीन. पहिले दिनकर दी० यांस पुत्र पांच; पैकीं बापू यांस पुत्र गणेश व काशीनाथ यांस पुत्र महादेव ऊर्फ आबा. गणेश दी० यास गदाधर दी०; या गदाधर दी० यास पुत्र दोन; बापू व रामचंद्र. महादेव ऊर्फ आबा यांस भिकंभट व भलंभट. पैकीं भिकंभटास पुत्र दोन; विठ्ठल व कृष्ण. विठ्ठलराव हे संस्थान इचलकरंजी येथें नोकर आहेत. यांनीं आपलेजवळ बंधूचा मुलगा महादेव यांस ठेविलें आहे. गदाधर दी० यांचे पुत्र बापूराव व रामचंद्र हे कोंकणांत असतात.

तृतीय पुत्र कृष्णंभट यांस पुत्र तीन. पहिले अनंतभट यांस पुत्र दोन. पैकीं महादेवभट यांस पुत्र पांच. पैकीं विठ्ठलभट, लक्ष्मणभट व विनायकभट या तिघांचा वंश चालू आहे. विठ्ठलभट यांस पुत्र गोपाळभट; यांस पुत्र अकरा. पैकीं अल्प वयांत पांच वारले; बाकींचे विनायकभट, नारायण, वामन, श्रीधर, रामचंद्र व कृष्ण. गोपाळभट आजगांवाहून देशावर संस्थान मिरज येथें आले. कुटुंब-विस्तार जास्त झाल्यामुळें आजगांव येथील उत्पन्नांत खर्च भागेना. शिवाय त्यांच्या विद्वत्तेच्या मानानें तेथें योग्य प्राप्ती होईना ह्मणून देशावर आले. वे. गोपाळभट हे अतिशय नामांकित वैदिक असून याज्ञिकांत निष्णात होते. गोपाळभट हे मंत्र-जागरचे वेळीं ऋग्वेदी वैदिकांचे बरोबर म्हणण्यास बसत असत, यावरून हे दोन्ही शाखेचे पट्टीचे म्हणणारे असून याज्ञिकांतही तरबेज होते. मिरज येथील तत्कालीन श्रीमान् फडके यांचे हे उपाध्याय होते. यांना मिरज येथील श्रीमंत दाजीसाहेब पटवर्धन यांचे वरासमोरील गोखले यांनीं आपली मुलगी देऊन मुलीच्या चोळी बांगडीस थोडीशी इनाम जमीन दिली. त्या गोखल्यांचे वंशज हल्लीं मिरज येथें आहेत. गोपाळभट यांचे पहिले पुत्र विनायकभट हे पट्टीचे वैदिक असून सतार वाजविण्यांत फार नामांकित होऊन गेले. यांचे कांहीं शिष्य हल्लीं आहेत. हे पागोटें अप्रतिम बांधीत असत. यांना पुत्र दोन; विष्णु व गोविंद; पैकीं विष्णुपंत हे नाट्यकलेंत निपूण असून मृदंग वाज-विण्यांत प्रवीण आहेत. दुसरे गोविंद हेच या पुस्तकाचे लेखक होत. नारायण हे हरदास होते. वामन हे मास्तर होते. श्रीधर हे सोलापूर जिल्ह्यांत भागकारकून होते. हे सशक्त असून बाणीदार होते. श्रीधरपंतांनीं या लेखकास पुत्रवत् मानिलें होतें. श्रीधरकाका हे ता० माढें येथें इ. स. १८८४।८५ त काॅलऱ्यानें वारले. याच वेळीं माढें येथें शहाणे आडनावाचे मामलेदार होते. या मामलेदारांचें व श्रीधरकाका यांचें सख्यत्व अगदीं घरोब्याचें होतें. श्रीधर-काकांच्या अकालिक मरणानें या लेखकावर वयाचे १४ वें वर्षींच शिक्षण व उपजीविका या दोहींची जोखीम पडली. रामचंद्र गोपाळ हे सरकारी नोकर आहेत. हे स्नानसंध्येशील आहेत. यांनीं लहानपणीं तालमीचा व्यासंग केल्यामुळें यांची शरीरसंपदा मजबूत आहे. यांना पुत्र दोन मल्हारी ऊर्फ बापू व नरहरी हे लहान आहेत. कृष्णाजी गोपाळ हे अल्प वयांत वारले. ह्यांनीं इंदोर येथील प्रसिद्ध पखवाज वाजविणारे नानासाहेब पानशे यांचे जवळ दोन वर्षें अध्ययन केलें होतें. कृष्ण काका हे पखवाज वाजविण्यांत फारच नामांकित होऊन गेले.

श्री सौ गंगुताई साहित्य प्रतिष्ठान वाचनालय



रा. रा. रामचंद्र गोपाळ आपटे.




रा. रा. गोविंद विनायक आपटे.
श्री क्षेत्र वाई.

The Bombay Art Printing Works, Fort.




रा. रा. नारायण केशव आपटें,
ट्रेझरर धारवाड.



प्रो. नारायण काशिनाथ आपटे,
एम्. ए. बी. एस्. सी.

ठाणें येथील डि. जज्जाचे शिरस्तेदार चौबळ म्हणून होते. या चौबळांनीं यांचें वाजवणें ऐकून ठाण्याचे कोर्टांत यांस नोकरी देवविली. यांना मिरज येथेंही शाळामास्तराची जागा मिरजकरांनीं पखवाज वाजवणें ऐकूनच दिली होती. ' यालेखकानेंही यांचें वाजवणें ऐकिलें आहे. ' ठाण्यास असतानांच क्षयानें फार आजारी झाल्यामुळें हे त्याच दुखण्यांत कैलासवासी झाले. यांचे आजे विठ्ठलभट यांचे बंधू लक्ष्मणभट यांस पुत्र दोन; रामचंद्रभट व वासुदेवभट. रामचंद्रभटास केशवभट. यांना पुत्र चार; पहिले विष्णुपंत हे हल्लीं गुडगेरी येथें वकिली करितात. यांना पुत्र दोन; विनायक व दत्तात्रय. विनायक हे हुबळीं येथें शाळामास्तर आहेत. यांच्या मुलाचें नांव वामन. दत्तात्रय हायस्कुलांत आहे. दुसरे नारायणराव हे हल्लीं धारवाड येथें ट्रेझरर आहेत. हें अल्पवयांत वडील वारल्यामुळें धारवाड येथें आत्तेच्या घरीं राहिले. परंतु त्यांच्यावर बोजा न ठेवतां मोठ्या हुषारीनें अभ्यास करून धारवाड येथेंच १२ रु० कारकुनापासून निरनिराळीं हुद्यांचीं कामें करून आज शंभर रुपये पगारावर ट्रेझरर आहेत. यांनीं हायर लोअरची व अकौंटंटचीही परिक्षा दिली आहे. आमच कुंटुबांत यांच्यासारखीं कर्ममार्गी, धार्मिक, विद्यादान करणारीं व दयार्द्र अंतःकरणाचीं अशीं माणसें थोडींच झालीं असतील ! यांचे धाकटे बंधू कृष्ण. हे कृष्णराव हल्लीं सोलापुरास खाजगी कंपाउंडर आहेत. वासुदेवभटाचे पुत्र महादेवभट यांस पुत्र पांच; पहिले नारायण हे मयत. यांचे पुत्र दोन; महादेव व श्रीपाद हे दोघे विद्यार्थी आहेत. दुसरें वासुदेव, रामचंद्र, कृष्ण व गोविंद हे चौघेही आहेत. हे कोंकणांतील आजगांव येथेंच असतात; यांचें बेळगांव येथें फराळाचें दुकान आहे. वरील चौघांपैकीं विशेषतः रामचंद्र व कृष्ण हे बेळगांव येथेंच असतात. रामचंद्रपंत यांना पुत्र दोन; विष्णु व गणपती हे विद्यार्थी आहेत. लक्ष्मणभटाचे बंधू विनायकभट; यांस पुत्र गंगाधर. यांस पुत्र दोन; कृष्ण व रामचंद्र हे दोघेही आजगांव येथेंच आहेत.

कृष्णंभटाचे दुसरे पुत्र बाळंभट यांस एकंदर पुत्र तेरा; पैकीं पांच पुत्रांचा वंश चालू. पहिले जनार्दनभट यांस पुत्र बारा; पैकीं दोघांचा वंश चालू आहे. रघुनाथ यांस जनार्दन; यांस लक्ष्मण. लक्ष्मण यांस पुत्र चार; पैकीं गणेशाचा पुत्र जनार्दन हल्लीं आहे. हे जनार्दन हल्लीं उगार येथें असावेत. या जनार्दनाचे चुलते सदाशिव हे दत्तक गेले. रघुनाथाचे बंधू गणेश; यांस बाबूभट व बाबूभटास रामचंद्र. या रामचंद्राचे आजे गणेश हे इचलकरंजी येथें आले. यांचे पुत्र बाबूभट हे अग्निहोत्री होते. यांचे चिरंजीव रामचंद्र हे वकील होते. यांनीं सार्वजनिक

लायब्ररी स्वतः जागा खरेदी घेऊन तेथें सुरू केली होती. ती लायब्ररी श्रीमंत सरकार इचलकरंजीकर यांचे वाड्यासमोर असून रामचंद्रपंत ऊर्फ रामभाऊ वकील यांनीं ती सरकारचे स्वाधीन केल्याचें समजतें. रामभाऊ कांग्रेसभक्त होते. हे सार्वजनिक कामाचे कट्टे अभिमानी होते. यांनीं वकिलीवर शेती केली होती. यांनीं अदमासें चारशें रुपयांचें उत्पन्न केलें. यांनीं सदाशिव नांवाचा मुलगा दत्तक घेतला, होता. या दत्तक मुलाची एक मुलगी आहे. घर व उत्पन्न, रामभाऊंचे नातजांवई जे होतील त्यांस जाणार ! रामभाऊंचें कुटंब हल्लीं आहे. पुढें निर्वंश !

जनार्दनाचे बंधू भास्करभट यांस पुत्र चार; पैकीं दादंभटास पुत्र तीन. भिकंभट व बाळाजी. भिकंभटास पुत्र चार; पैकीं पांडुरंगभट व जगंभट. पांडुरंगाचे पुत्र दत्तंभट हे हल्लीं कुंदगोळ येथें असतात. यांना पुत्र चार; वासुदेवभट हे सज्ञान आहेत. नारायण, गोविंद व पांडुरंग हे विद्यार्थी आहेत. जगंभटाचे अनंतभट यांस विष्णु. विष्णु हा विद्यार्थी आहे. भिकंभट हे देशावर आले. यांचे बंधू बाळाजी यांना परशराम ऊर्फ रावजी; रावजीस पुत्र कृष्ण व रामभाऊ. कृष्णाचा पुत्र पिल्या हा लहान आहे. रामभाऊचा गोविंद; यास पुत्र दोन; शंकर लहान आहे व दुसऱ्याचें नांव माहित नाहीं. बाळाजीपंत हे मामलेदार होते. हल्लीं कुंदगोळ येथें दत्तंभट भिक्षुकी करीत आहेत, यांचे स्वतःचें घर आहे.

भास्करभटाचे बंधू अनंतभट; यांना पुत्र तीन; गणेश, भास्कर व विश्वनाथ. गणेशाचा जनार्दन; यांस लक्ष्मण. लक्ष्मणास पुत्र दोन; शंकर व गणेश. शंकरराव हे सज्ञान असून हे आपल्या वडिलार्जित घरांतच रहात आहेत. यांना सदाशिव एकच मुलगा आहे. यांचे पणजे गणेश हे देशावर येऊन राहिले. प्रांत माळवा, जिल्हा उज्जैन पैकीं बडनगर येथें घर असून जमीन इनाम आहे. शंकररावांचे बंधू गणेश हे मयत असून, यांचे चिरंजीव मोरेश्वर हे सज्ञान आहेत. भास्कर यांस गणेश व गणेश यांस लक्ष्मण; लक्ष्मणांस पुत्र दोन; कृष्णंभट व वामन. कृष्णंभट हे आजगांव येथेंच असतात. वामनराव हे इचलकरंजी संस्थानांत शाळामास्तर आहेत. भास्करभटाचे बंधू विश्वनाथ; यांस पुत्र दोन; पैकीं बल्लाळ यांस वासुदेव यांना विश्वनाथ; यांस नारायण. हे नारायणराव सज्ञान आहेत.

कृष्णंभटाचे तिसरे पुत्र बापदेवभट; यांस गंगाधर; गंगाधरास पुत्र दोन; बाबूभट व मोरेश्वरभट. बाबूभटास रामकृष्णभट; रामकृष्णभटास पुत्र तीन; अनंत,

गोविंद व विष्णु. अनंत यास शिवराम. हे शिवराम सज्ञान असून पुणें येथें असतात. गोविंद यांस श्रीधर श्रीधरभटास पुत्र चार; भास्कर, महादेव, पद्माकर व सखाराम हीं चारीं मुलें अज्ञान आहेत. श्रीधरभट हे गोमांतकांतील झापसें येथें भिक्षुकी करीत आहेत. यांचें आजगांव येथें घर आहे. विष्णुभटाचे पुत्र दोन; गणेश व हरी हे दोघेही सज्ञान आहेत. मोरेश्वरभटास शामभट हे दत्तक पुत्र. शामभटाचे जनक पिते बाबूभट. शामभटास पुत्र दोन; केशवभट ऊर्फ केसूकाका व नारायणभट. केसूकाका हल्लीं आहेत. यांचें वय साठापेक्षां जास्त आहे. हल्लीं आजगांव येथें यांचे इतपत आपटेमंडळींत सुखवस्तु कोणी नाहींत, केसूकाका याज्ञिकींत नामांकीत आहेत. यांचे पुतणे वामन नारायण. वामनभटास पुत्र दोन; सदाशिव व मोरेश्वर. हे दोघे विद्यार्थी आहेत. केशवभट व वामनभट यांचीं खास घरें निरनिराळीं आहेत.

चौथे पुत्र गणेशभट. यांस महादेवभट. यांना पुत्र तीन; बाळंभट, गणेशभट व रामभट. बाळंभटाचे पुत्र तीन; पैकीं पुरुषोत्तम ऊर्फ गागाभट व विष्णुभट या दोघांचा वंश चालूं आहे. गागाभटास पुत्र दोन; पैकीं गणेशभटास पुत्र दोन; रावजी व तात्या. रावजीस पुत्र पांच; पैकीं सितारामभट हे नामांकित वैद्य होऊन गेले. सितारामभट वैद्यराज हे स्नानसंध्येशील होते. यांनीं मिरज येथें श्रीदत्तमंदिर बांधिलें आहे. मिरज येथें टाऊनहॉलजवळ यांचें खास घर व श्रीदत्तमंदिरही आहे. सितारामभटाचे बंधू वामनभट हेही वैद्यकी करीत होते. यांचे हल्लीं कृष्णा व दत्तात्रय असे दोन पुत्र आहेत. हे बंधुद्वय मुके आहेत. सितारामभटांचे चुलते तात्या यांचे नातू गोपाळ विष्णु हे हल्लीं आहेत. यांस पुत्र दोन. केशव व चिंतू हे विद्यार्थी आहेत. गोपाळराव वडिलार्जित नोकरीवर आहेत; ह्मणजे "श्रीमंत मिरजकर यांचे पदरचे पिढिजाद वैद्य होत." हल्लीं गोपाळराव मिरज येथें सरकारवाड्यांत पगारी नोकर (वैद्यकीवर) आहेत. गागाभट हे आजगांवाहून देशावरील श्रीकृष्णाकाठीं, हरीपूर येथें आले. पुढें बाबूभट व गणेशभट हे मिरजेस येऊन राहिले. हरिपूर येथेंही एक घर हल्लीं आहे. सरदार गंगाधरराव गोविंदराव पटवर्धन मिरजसंस्थानाधिपति यांनीं शके १७२८ त क्षयनाम संवत्सरेंत बारा बिघे जमीन इनाम देऊन, बाबूभट यांचे नावची वंशपरंपरेची सनद करून दिली. पुरुषोत्तमभट उर्फ गागाभट हे वैदिक, शास्त्री व याज्ञिकांतही उत्तम होते; ह्मणून यांना गागाभट असें ह्मणत असत.

गागाभटाचे बंधू विष्णुभट; यांस बाळंभट; यांना हरभट. हरभटाचे पुत्र तीन;

पैकीं महादेवास बाळंभट; यांना हरभट. या हरभटास पुत्र दोन; महादेव व वासुदेव. महादेवास पुरुषोत्तम व पुरुषोत्तमास हरी; महादेवभटांनीं पुरुषोत्तमास दत्तक घेतले. माहादेवभट, पुरुषोत्तमभट व हरी हे आजगांव येथेंच आपले खास घरांत आहेत. महादेवभटाचे बंधू वासुदेव हे दत्तक गेले.

माहादेवभटाचे द्वितीयपुत्र गणेशभट यांस पुत्र दोन; त्रिविक्रमभट व शंभूभट. त्रिविक्रमभटास पुत्र तीन; गणेशभट, रामभट व कृष्णंभट. पैकीं रामभटास महादेव. यांनीं वासुदेवास दत्तक घेतलें. वासुदेवभटांस पुत्र चार; नारायणभट, गोविंदभट, पुरुषोत्तमभट व रामचंद्रभट. पैकीं पुरुषोत्तम हे महादेव हरी यांना दत्तक गेले आहेत. नारायणभटाचा कृष्ण हा लहान आहे. वासुदेवभट यांचे चारी मुलगे व नातवंड कृष्ण हे सर्व आजगांवीं आपले खास घरांत असतात. शंभूभटाचे पुत्र तीन; पैकीं बाबजीचे रामभट व रामभटास पुत्र चार; पैकीं बाबूभटास पुत्र दोन; रामचंद्र व नारायण. हे आहेत किंवा नाहींत हें कांहीं समजत नाहीं.

महादेवाचे त्रितीय पुत्र शंभूभट. यांना पुत्र दोन; नारायण व गोविंद. नारायणास पुत्र तीन; गणेश, कृष्ण व अनंत. गणेश यांस पुत्र दोन; पैकीं भिकाजी ऊर्फ शंभूचे पुत्र तीन; गणेश, कृष्ण व दत्तात्रय. शंभूभट यांचीं तिन्हीं मुलें विद्यार्थी आहेत. शंभूभटाचे चुलते कृष्ण; यांना पुत्र दोन; पैकीं विठ्ठल हे अनंतभटास दत्तक गेले. दुसरे पुरुषोत्तमभट हल्लीं आहेत. यांना लक्ष्मण मुलगा आहे. हे आपले खास घरांत आजगांवींच असतात. शंभूभटाचे बंधू गोविंद यांस पुत्र दोन; पैकीं शंकरभट यांना धोंडू व धोंडूस महादेव व नारायण असे पुत्र असून हे लहान आहेत. शंकरभट हे वयोवृद्ध असून धोंडो हे सज्ञान आहेत. हे आजगांव येथेंच आपलें खास घरांत असतात.

हल्लीं देवास संस्थान येथें सरदार नानासाहेब आपटे आहेत. हे आजगांवपैकीं जेवढे आपटे हल्लीं हयात आहेत; त्या सर्वांत वयोवृद्ध असून सत्पुरुष आहेत. यांचें वय ८३ वर्षांचें आहे. इतर कोणत्याही गांवचे आपट्यांत यांच्या इतकें वयस्क कोणीही नाहीं. सरदार नानासाहेब यांनीं फक्त 'आजगांवचे आपटे' यांचा वंशवृक्ष थोडक्यांत माहिती देऊन छापावा म्हणून खटपटही केली होती परंतु, प्रापंचिक अडचणीमुळें तसें झालें नाहीं. तरी त्यांनीं केलेल्या श्रमाचे चीज झालें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. सरदार नानासाहेब यांनींही श्रीत्रिंबकेश्वर येथील क्षेत्रोपाध्ये यांचेकडून बरीच माहिती घेऊन 'वृक्ष' तयार केला होता तो या लेखकास देऊन त्यांनीं बरीच उपयुक्त माहितीही दिली.

( जिल्हा रत्नागिरी, ता. मालवण नजीक )

# त्रिंबक येथील आपटे यांची माहिती.

जिल्हा रत्नागिरी, ता. वेंगुर्लें पासून नऊ मैलांवर असलेले आजगांव येथील महादेवभट व त्रिंबक गांवचे कृष्णंभट हे सख्खेभाऊ होत. आतां, मुळगांव त्रिंबक किंवा आजगांव असा प्रश्न सहज उत्पन्न होईल. परंतु, ज्याअर्थी त्रिंबक गांवचे आपटे कांहीं वर्षांपूर्वी श्रीवेताळास नैवेद्य घालत होते असें समजतें; तेव्हां आजगांव येथील मुख्य ग्रामदेवता श्रीवेताळमहाराज असल्यामुळें कोंकणांतील आपटे यांचे मूळगांव आजगांव हेंच होय.

आजगांवचे मूळपुरुष विश्वनाथभट हे होत. यांना पुत्र महादेवभट व कृष्णंभट. महादेवभटाचा वंश हल्लीं देशावर जास्त असून, आजगांवींही आहे. कृष्णंभट हे त्रिंबक येथें गेले. त्रिंबक हें गांव संस्थान बावडा पैकीं आहे. कृष्णंभट यांना महाजन पोतदार हा हुद्दा होता. तो हुद्दा हल्लीं यांचे वंशासही चालूं आहे. कृष्णंभटास पुत्र चार; सांडभट, महादेवभट, दादंभट व पिलंभट; पैकीं तिसरे पुत्र दादंभट यांचा वंश मात्र हल्लीं त्रिंबक येथें असून, कांहीं देशावरही आहे. दादंभटास पुत्र चार; कृष्णंभट, मानदेव, रामभट व वीरभट. कृष्णंभटास दादंभट; आणि दादंभटास कृष्णंभट उर्फ बाबदेव; यांस पुत्र पांच; दत्तात्रय, बाळंभट, अनंतभट, रामचंद्र व लक्ष्मण. बाळंभटास पुत्र सहा; दत्तोपंत, गोपाळ, गोविंद, केसो, सदाशिव व राघो. दत्तोपंतास भास्कर व बाळकृष्ण, पुढें निर्वंश. गोपाळ यांस कुशाबा दत्तक. कुशाबाचा नारोबा व नारोबास दत्तकपुत्र विनायक ऊर्फ शंकरराव. हे हल्लीं उत्तूरास आहेत. गोविंद यास गंगाधर; यांस पुत्र पांडुरंग व हरी. पांडुरंगास रामचंद्र; यांस पुत्र नारायण व पांडुरंग हे दोघेही विद्यार्थी आहेत. नारायण व पांडुरंग हे सांगलीनजीक डिग्रज येथें असतात. यांचे वडील रामचंद्र मोठे खटपटी व हुशार होते. यांनीं सांगली येथें कापडाचें दुकान घातलें होतें. यांचे आजे गंगाधर हे देशावर आले. केसो यांस पुत्र तीन; रामा, कुशाबा व नारायण. रामास पुत्र तीन; जनू, बाळंभट व गोंदू; पैकीं बाळंभटास विठू व दिनकर. विठू हे मयत. यांचे मुलगे रामचंद्र व लक्ष्मण हे सज्ञान असून मुंबईंत नोकर आहेत. दिनकर हे सज्ञान आहेत. कुशाबा दत्तक गेले. नारायणास विनायक; यांस विष्णु व विष्णूस मुलगे चार; केशव, विनायक, बाळ-

कृष्ण व सिताराम. केशव मयत असून त्यांचे मुलगे गणेश व नारायण आहेत. गणेश पोष्टांत नोकर व नारायण रेल्वेंत नोकर आहेत. यांचे वडील केशवराव हे हैद्राबादेस मास्तर होते. आजे विष्णु हे कुडाळ येथें वकील होते. यांचे चुलते विनायक व सिताराम हे कुडाळ येथेंच आहेत. सितारामपंत बी.ए.एल्. एल्. बी असून वकिली करीत आहेत. यांना वासुदेव हा लहान मुलगा आहे. बाळकृष्ण हे कलबुर्गी येथें मास्तर आहेत. सदाशिव यांस पुत्र विनायक व कृष्ण. विनायकास गोपाळ व कृष्ण; पैकीं कृष्णाचे पुत्र विनायकराव हे एका व्यापाऱ्याकडे सांगलीस नोकर आहेत. बाळंभटाचे सहावे पुत्र राघोपंत यांस पुत्र तीन; महादेव, गोपाळ व वामन; पैकीं वामन यांस पुत्र तीन; गंगाधर, कृष्ण व विष्णु. गंगाधर हे मयत. यांचे पुत्र तीन; गोविंद महादेव व विनायक. गोविंदराव यांस पुत्र वासुदेव व वामन हे लहान आहेत; महादेवराव यांस पुत्र गंगाधर व सदाशिव हे लहान आहेत; गोविंदराव व महादेवराव हे डिग्रज येथें शेती करून असतात; विनायक हे उत्तूर येथें आपटे यांस दत्तक गेले आहेत. कृष्णराव यांस पुत्र तीन; रघुनाथ, गणेश व गोपाळ हे विद्यार्थी आहेत. विष्णुपंत यांस पुत्र मोरेश्वर व बळवंत हे विद्यार्थी आहेत; कृष्णराव व विष्णुपंत हे शेती व व्यापार करितात. हे डिग्रज येथेंच असतात.

बाबदेवाचे पुत्र अनंतभट यास पुत्र दोन; पैकीं वासुदेव यांस पुत्र सहा; महादेव, लक्ष्मण, सखाराम, बाबजी, गणेश व बाळाजी. महादेव यांस पुत्र तीन; वासुदेव, विश्वनाथ व केशव. वासुदेवास पुत्र चार; कृष्ण, वामन, महादेव व गंगाधर. कृष्णाचे पुत्र अनंत व दत्तात्रय हे विद्यार्थी आहेत. कृष्णराव, वामनराव व महादेवराव हे सर्व त्रिंबक येथें आहेत. विश्वनाथ यांचे पुत्र तात्या व केशव यांचे गणपतराव हेही त्रिंबक येथेंच असतात. लक्ष्मणास पुत्र विष्णु व रघुनाथ. विष्णु हे मयत. यांस पुत्र सिताराम व गोविंद. सिताराम मयत. यांचे पुत्र विष्णु व रामकृष्ण हे विद्यार्थी आहेत. गोविंदराव हे हल्लीं मालवण येथें वकिली करीत आहेत. यांचे पुत्र विश्वनाथ व गोपीनाथ हे विद्यार्थी आहेत. रघुनाथराव हे मालवण येथें वकील होते. त्रिंबक येथील आपटे पैकीं हे एक मोठे निस्पृह व करारी होते; यांची थोडक्यांत माहिती देतों– रघुनाथराव यांचा जन्म सांवतवाडी संस्थानांतील कुडाळ पेट्यांत सह्याद्रीचे पायथ्याशीं पांगरड येथें आजोळी झाला. हे सोळावें वर्षापर्यंत त्रिंबक येथें होते. केळवें–माहिम येथ याचे वडील खासगी नोकर होते. तेथें हे शिक्षणा-

करितां जाऊन राहिले. वयाचें विसावें वर्षी हे कल्याण येथें शाळामास्तर झाले त्यावेळीं यांना पगार सहा रुपये होता. कांहीं महिन्यांनीं हे वसई—आगाशी येथें असिस्टंट हेडमास्तरचे जागीं गेले. याठिकाणीं यांना पगार दहा रुपये होता. हे येथें चार वर्षें होते. पुढें बारा रुपये पगारावर सोलापूर येथें हेडमास्तर झाले. भिवंडी तालुक्यांतील अनगांव—कवाड येथें पंधरा रुपयांवर गेले. भिवंडी येथील मुलींचे शाळेवर दीडवर्ष होते. पनवेल तालुक्यांतील पळस्पे गांवीं हेडमास्तर तीन वर्षें होतें. इ. स. १८७० मध्यें हे वकिलीचे परिक्षेंत पास झाले. याच सालांत ता. ९ जून मध्यें हे मालवण येथील कोर्टांत वकिली करूं लागले. तेव्हांपासून चव्वेचाळीस वर्षें यांनीं वकिली केली. मालवण व वेंगुर्लें या दोन्हीं कोर्टांत हे वकिली करीत होते. हे लोकल—बोर्डाचे व्हॉईसप्रेसिडेंट बहुमतानें निवडून आले होते. हे पहिली तीन वर्षें संपतांच, दुसऱ्या इलेक्शनचे वेळीं पुन्हां तीन वर्षें सरकारतर्फे हे व्हॉइस प्रेसिडेंट होते. पुढें यांनीं होऊनच काम सोडलें. हे व्हॉइस प्रेसिडेंट असतांना कांहीं बाबतींत अधिकाऱ्यांचें व यांचें जमत नसे. कारण हे आपल्या कामांत चोख, निस्पृह व मानी स्वभावाचे असल्यामुळें कधींही अधिकाऱ्यांच्या बंगल्यावर उगीच हेलपाटे मारणें वगैरे यांना बिलकूल आवडत नसे. फारच झाले तर कांहीं काम असल्यास ऑफिसांत जात असत. एके वेळीं कलेक्टर साहेबांनीं यांना बोलाविलें ह्मणून हे गेले; त्यावेळीं साहेब यांना या बसा, वगैरे कांहींच बोलले नाहींत. अशा तऱ्हेनें केलेला अपमान यांना सहन झाला नाहीं. तेथें एका खुर्चीवर हे बसले. कांहीं वेळानें साहेबबहादुर यांनीं हा कागद वाचा पाहूं! असें ह्मणून, रा. रघुनाथराव आपटे वकील व्हॉइस प्रेसिडेंट यांचे पुढें केला. तो कागद व्हॉ. प्रेसिडेंट साहेबांनीं घेऊन, आपल्या कारकुनास वाचण्यास सांगितलें. तें कलेक्टर साहेबांस न खपून ते एकदम ह्मणाले! " तो कागद तुह्मी वाचा. " तेव्हां, तें काम कारकुनाचेंच आहे, असें रघुनाथराव यांनीं सांगितलें. मग काय विचारतां! साहेब बहादुर यांनीं हात, पाय आपटून ते रागानें म्हणाले, " चला, तुम्ही आपलें दप्तर मामलेदाराचे स्वाधीन करा; " ठीक आहे असें ह्मणून रा. रघुनाथराव यांनीं दप्तर मामलेदारांचे स्वाधीन करून घरीं आले. दप्तर मामलेदाराचे स्वाधीन केल्याचें साहेबांना समजतांच, तावडतोब साहेबांनीं मामलेदारांस दप्तरासह लौकर यावें असें फर्माविलें व व्हॉइस प्रेसिडेंट यांना भेटण्याविषयीं चिठ्ठी लिहिली. पुन्हां साहे-

यांचें बोलावणें पहातांच त्यांना जरा आश्चर्य वाटलें ! परंतु, विशेष विचार न करितां ते निघाले व साहेबबहाद्दूर बसले होते तेथें गेले, तों साहेबांनीं उठून शेक•ड केला, व खुर्चीवर बसा असें म्हणालें आणि दप्तर त्यांचे स्वाधीन करून म्हणाले, " जरा आपणांस तसदी झाली या बद्दल राग नसावा ! "

वास्तविक पहातां जे कोणी प्रेसिडेंट, व्हॉइसप्रेसिडेंट, मेंबर्स व ऑनररी म्यॅजिस्ट्रेट वगैरे बिनपगारी असतील, त्यांची योग्यता केव्हांही पगारी नोकरापेक्षां जास्तच आहे. ॥ मोले–घातलें रडाया । तया असूं ना माया ॥ या उक्ति प्रमाणें मोलानें काम करणाऱ्या पेक्षां मोल घेतल्याशिवाय काम करणाऱ्याचीच योग्यता केव्हांही जास्त आहे.

रा. रघुनाथराव आपटे वकील यांना मरणसमयीं सत्तरावें वर्ष होतें. सत्तर वर्षांची उमर असून त्या मानानें यांची प्रकती चांगली होती. यांनींच या लेखकास कृष्णंभट महाजनी पोतदार पर्यंतचा वंशवृक्ष दिला. हे नुकतेच स्वर्गवासी झाले. यांचे पुतणे गोविंदराव हे मालवण येथेंच वकिली करीत आहेत. यांचें खास घर त्रिंबक येथें आहे. यांना पुत्र दोन; गणेश व लक्ष्मण. हे विद्यार्थी आहेत. बाबजीभट यांस पुत्र तीन; येशवंत, भलू व सदाशिव. येशवंत दत्तक गेला. भलू मयत. सदाशिवाचे वासू व गोपाळ हे विद्यार्थी असून त्रिंबक येथेंच असावेत. गणेश यांस नारायण. हे नारायणराव शहापुरास मास्तर आहेत. यांचे पुत्र पुरुषोत्तम व विष्णु विद्यार्थी आहेत. बाळाजी यांचा दत्तक पुत्र येशवंत. येशवंताचे पुत्र दत्तात्रय. हे दत्तोपंत सज्ञान असून त्रिंबक येथेंच असतात.

बाबदेवाचे चवथे पुत्र रामचंद्र हे देशावर आले. यांस पुत्र पांच; गणेश, जिवाजी, विष्णु, चिंतो व हरि. गणेश याचा दत्तक पुत्र जगन्नाथ. याचा पुत्र जिवबा. जिवबा यांस पुत्र श्रीरंग हे हल्लीं अजरें येथें आपले वडिलार्जित घरांत आहेत. यांना पुत्र दोन; जिवाजी व वासुदेव हे विद्यार्थी आहेत. जिवाजी यांस दत्तक पुत्र विठोबा. यांस पुत्र विष्णु; यांस पुत्र गोपाळ. हे गोपाळराव सज्ञान आहेत. यांना विष्णु नांवाचा एक लहान मुलगा आहे. विष्णु यांस पुत्र तीन; धोंडो, भास्कर व महादेव. भास्कर व महादेव दत्तक गेले. चिंतो यांस पुत्र तीन; रामचंद्र, जगन्नाथ व विठोबा. रामचंद्र यांस भास्कर दत्तक. व भास्करास चिंतोबा. जगन्नाथ व विठोबा दोघेही दत्तक गेले. हरी याचा दत्तकपुत्र महादेव यांस पुत्र तीन; पैकीं तिसरे बळवंत; यांस पुत्र रघुनाथ. रघुनाथराव हे मिलटरी ऑफिसांत नोकर आहेत.

18 JAN 1994



# आजरें येथील आपटे यांची ऐतिहासिक माहिती.

रामचंद्र कृष्ण आपटे हे कोंकणांतील मालवण नजीक त्रिंबक गांवचे राहणार होत. रामचंद्रपंत यांनीं देशावर येऊन फडणीशी संपादिली. यांचे पुत्रांपैकीं चिंतो व जिवाजी हे लढवय्ये होते. आजरें हा गांव मूळचा घोरपड्यांचा होता. अठराव्या शतकाच्या अखेरीस जी धामधूम चालली होती; त्यावेळीं सरहद्दीवरील लढायांचे आजरें मुख्य ठिकाण होतें. इचलकरंजीकरांचा मूळ पुरुष जो नारो महादेव त्यांची सून अनूबाई इला बाळाजी बाजीराव पेशव्यांच्या वशिल्यानें शाहूमहाराजांकडून सन १७४८ सालीं आजरें गांव व तालुका असें मिळालें. सन १७९२ सालीं आजरें गांव व तालुका आजऱ्याच्या ( आपटे ) घराण्यांतील फडणीस एका पुरुषास मक्त्यानें दिला होता. फडणीसांच्या कारकीर्दींत आजरेंकरांच्या नेवरीकरांशीं, भुदरगडकरांशीं आणि कोल्हापूरकरांशीं नेहमीं लढाया चालत. आजऱ्याच्या बंदोबस्ताकरितां एक हजार फौज दरसाल ३२००० रुपये खर्चानें ठेविली होती. सन १८०० सालीं चिंतो रामचंद्र आपटे फडणीस हरपावड व बैलवाडी यांजवर फौज घेऊन गेले होते; व हिब्राहिमपुरावर यांनींच हल्ला केला होता. चिंतोबाचा भाऊ जिवाजीपंत आपटे भुदरगडकराबरोबर लढत असतां मरण पावला. फडणीसाच्या शौर्यामुळें अजरें तालुका शेजारच्या सरदारांच्या हातीं गेला नाहीं. पेशवाई बुडाल्यावर सन १८२० सालीं आजऱ्याची शिबंदी कमी झाली. हल्लीं आजरें येथें जिवाजीचे पणतू गोपाळ विष्णु व जिवाजीचे वडील बंधू गणेश यांचे पणतू श्रीरंग जिवाजी आणि जिवाजीचे कनिष्ठ बंधू हरी यांचे पणतू रघुनाथ बळवंत हे सर्व वडिलार्जित इनामाचा उपभोग घेत आहेत.

आजरेंकर आपट्यांपैकीं रा. रघुनाथराव बळवंत आपटे यांची ज्यावेळीं या लेखकानें पुणें मुक्कामीं भेट घेतली, त्यावेळीं त्यांनीं " आमचें वार्षिक उत्पन्न हल्लीं किती आहे, कोणी संपादिलें, कोणाच्या नांवची सनद असून ती कोणी दिली वगैरे सर्व माहिती देतो. " असें आश्वासन लेखकास दिल्यामुळें हा लेखक आजऱ्यास गेला नाहीं. अखेर रा. रघुनाथराव यांचेकडून वेळींच माहिती मिळणें अशक्य झाल्यामुळें रा. रा. श्रीरंगराव जिवाजी व गोपाळराव विष्णु मु० आजरें यांच्याशीं पत्रव्यवहार केला व त्यांनीं जी माहिती दिली ती वर नमूद केलीच

आहे. जशी माहिती मिळावयास पाहिजे होती तशी आजरेकरांनीं दिली नाहीं. असो. रा. श्रीरंग जिवाजी यांनीं आपली ऐतिहासिक माहिती कळविण्याची तसदी घेतली याबद्दल लेखक फार आभारी आहे.

बाबदेवाचा पांचवा पुत्र लक्ष्मण. लक्ष्मणास पुत्र दोन; श्रीधर व विसाजी. विसाजीस भिकोबा; यांस पुत्र तीन; रामचंद्र, रावजी व हरी; रामचंद्र व रावजी हे त्रिंबक येथेंच असतात. हरी हे बी. ए. असून, हल्लीं राजापूर येथील हायस्कुलांत मास्तर आहेत.

कृष्णंभटाचे बंधू वीरभट; यांस पुत्र अनंतभट व महादेवभट. महादेवभटास—मामदेव व नारो. मामदेवास—बापूभट व धोंडो. बाबूभटास—गोपाळ, लक्ष्मण व राम. राम दत्तक गेले. धोंडोचे दत्तकपुत्र राम. नारोस—जनार्दन; यांस पुत्र तीन; आबा, नारो व कुशाबा; आबास—गणू व जनार्दन. गणूस पुत्र पांच; चिंतो, गोविंद, रामा, विष्णु व केशव. चिंतो यांस पुत्र महादेव. यांस पुत्र जनार्दन हा लहान आहे. महादेवराव व केशवराव हे त्रिंबक येथेंच असतात.

श्रीकुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न.

श्रीगुरुदेव दत्तप्रसन्न.



# आपटे घराण्याचा इतिहास.

## वंशवृक्ष नंबर २ यांमधील माहिती.

### गोटणें-देवाचें येथील आपटे.

आजगांव येथील मूळ पुरुष विश्वनाथभट यांचे दोन पुत्र महादेवभट व कृष्णंभट; महादेवभट आजगांव येथेंच राहिले. हल्लीं महादेवभटाचे वंशज आजगांव येथें व बाहेर गांवीं चोहोंकडे आहेतच. दुसरे कृष्णंभट हे मालवण नजीक त्रिंबक या गांवीं गेले. हा गांव संस्थान गगनबावडा पैकीं आहे. या त्रिंबक गांवीं कृष्णंभटानीं वास्तव्य करून ( महाजन-पोतदार )हा हुद्दा मिळविला. कृष्णंभटास चार पुत्र झाले. पहिले शंकरभट ऊर्फ सांडभट कासारवेल-शिरगांवकडे गेले; दुसरे माहादेवभट व पिलंभट हे द्वयबंधू गोटणें येथें गेले. चवथे पुत्र दादंभट हे त्रिंबक येथेंच राहिल्यामुळें, दादंभटाचे वंशज हल्लीं त्रिंबक येथें असून, बाहेरगांवींही आहेत.

त्रिंबकचे पुरुष कृष्णंभट महाजनी-पोतदार यांचे पुत्र चार; पैकीं दोन, महादेवभट व पिलंभट हे गोटण्यास एका मागून एक असे गेले; नंबर दोनचे वंशवृक्षांत-महादेवभट व पिलंभट यांचा वंश आहे. महादेवभटाचे पुत्र कृष्णंभटमानीं, त्यांना पुत्र तीन; गोविंदभटमानी, जनार्दन उर्फ जानमानी व बाळंभट

उर्फ बाबुलमानी; गोविंद्भटास पुत्र तीन; बाबदेव, कृष्ण व विसाजी; बाबदेवास पुत्र अनंत हे अनंत गोटण्याहून निघोन राजापुरापासून दोन कोसांवर दोनिवडे ह्मणून एक खेडेगांव आहे, तेथें गेले; दोनिवडे येथें श्रीब्रह्मदेवाचें देऊळ आहे; या देवाचे पूजेकरितां तेथील देसाई यांनीं अनंतभटास घर बांधण्यास जागा व २५।२० रुपयांचे उत्पन्न दिले; हल्लीं, अनंतभटांनीं बांधलेल्या घराचा फक्त चौथरा तेवढाच शिल्लक आहे; अनंतभटास पांच पुत्र झाले; गोविंद, बाबूराव, गोपाळ, पांडुरंग व कृष्ण; या पांचही मुलांनीं आपल्या कारकीर्दींत राजापूर येथें पांच वाडे बांधिले; पहिले गोविंद; यास पुत्र भास्कर व दिनकर; भास्कराचे पुत्र सदाशिव व वासुदेव; सदाशिवास—निळकंठ दत्तक व शिवराम; निळकंटास पुत्र तीन; पैकीं जगन्नाथ व वासुदेव; जगन्नाथपंत हल्लीं आहेत; वासुदेवाचे पुत्र विष्णुपंत व जगन्नाथपंत हे राजापूरास आपले खास घरांत व्यापार करून असतात. भास्कराचा दुसरा पुत्र वासुदेव; यांसी पुत्र तीन झाले; पैकीं भास्करचे पुत्र नारायणराव हे फार वृद्ध आहेत, यांचे पुत्र गणपतराव व यांस अनंत हा लहान आहे; गणपतराव हे नोकर असून मुंबईस असतात; निळकंठ हे दत्तक गेले; व रामकृष्ण मयत; गोविंद्भटाचे दुसरे पुत्र दिनकर यांस पुत्र तीन; विष्णु, रामचंद्र व जयराम; विष्णुचे भिकाजी व भिकाजीचे पुत्र नरहरी हे हल्लीं आहेत; नरहरपंत हे राजापुरासच असतात; रामचंद्र यांचे दत्तकपुत्र मोरोपंत, यांना पुत्र चार; पैकीं शंकर, श्रीपाद व जयराम हे विद्यार्थी आहेत; मोरोपंत राजापुरासच असतात; जयराम यांस गोविंद व मोरो; गोविंदास माहादेव मयत; मोरो हे दत्तक गेले.

बाबदेवांचे दुसरें पुत्र बाबूराव; यांना वामन; व वामन यांस पुत्र तीन; विठ्ठल रघुनाथ व बाळाजी; विठ्ठलाचे—दामोदर; दामोदरास—नारायण, मोरो व कृष्ण; नारायणरावाचे पुत्र शांताराम हे सज्ञान असून दोघेही राजापुरासच असतात; मोरोपंत हे आपले हरी व रामकृष्ण या लहान मुलांसह राजापूरास असतात; कृष्ण हे दत्तक गेले; रघुनाथपुत्र महादेव, यांचे दत्तकपुत्र कृष्ण ऊर्फ वामन; हे वामनराव राजापुरास आहेत; बाळाजींचे पुत्र गणपतराव हे राजापुरास असतात.

तिसरे पुत्र गोपाळ यांस बापूजी; बापूजीस पुत्र चार; विनायक, जनार्दन, बाबजी व नारायण; विनायकास पांडुरंग पुरुषोत्तम; पांडुरंगास विश्वनाथ; यांना अनंत; विश्वनाथ हे वडील व पुत्र अनंतसह राजापुरास असतात; पुरुषोत्तमास भिकाजी; यांना वामन; वामन हा लहान असून एकटाच आहे; जनार्दनास

गोपाळराव; गोपाळराव व यांचे लहान चिरंजीव विष्णु हे राजापूर येथें असतात; बाबजी यांना पुत्र तीन; वामन, कृष्ण व काशिनाथ; वामन यास पुत्र चार; पैकीं सखाराम व बाबूराव हे राजापूर येथें असतात; सखाराम यांस गणपती व शिवराम; बाबूराव यांस— राजाराम, सिताराम व आत्माराम; हीं मुलें विद्यार्थी आहेत; कृष्ण यास केशवराव, केशवराव आपले पुत्र रामकृष्ण यासह राजापूर येथें असतात; काशिनाथ यांचे पुत्र माधवराव हे राजापूर येथें असतात; बापूजीचे चवथे पुत्र नारायण यांस गणेश, गणेश यांस बाळाजी. यांचे पुत्र चार; नारायण, दामोदर, विनायक व श्रीपाद, नारायण व दामोदर हे सज्ञान आहेत; विनायक व श्रीपाद हे विद्यार्थी आहेत; हे राजापूर येथें असतात. अनंत याचे चवथे पुत्र पांडुरंग यांना पुत्र तीन; गणेश, बाळाजी व परशराम. गणेशाचे कृष्णाजी यांना पुरुषोत्तम, यांचे दत्तकपुत्र गोपाळराव यांना श्रीपाद व नारायण; गोपाळराव हे दोन्हीं मुलांसह राजापूर येथें असतात; बाळाजी यांस पुत्र तीन; मोरो, पांडुरंग व लक्ष्मण पैकीं लक्ष्मणास— श्रीधर व भालचंद्र; श्रीधर यांचे पुत्र चार; गोविंद गणेश, बाळकृष्ण व वामन; गोविंदराव फार हुशार व चाणाक्ष होते, यांचा मराठी व इंग्रजी अभ्यास मुंबई येथें झाल्यावर, एल्फिन्स्टन कॉलेजांत ते गेले; इ. स. १८८१ त बी. ए. झाले; या वेळीं गोविंदराव यांचे वय बावीस वर्षांचे होतें; याच सालीं मुंबई येथें यांनीं कस्टमखात्यांत नोकरी धरली; पुढें संस्थान बडोदे पैकीं नवसरी येथें, प्रायव्हेट स्कूलचे हेड मास्तराचे जागेवर गेले; नंतर इ. स. १८८६ त संस्थान बडोदे राज्यांतील रेव्हिन्यू खात्यांत शिरले; कांहीं वर्षांनीं नायब-सुभे ( असिस्टंट कलेक्टर ) झाले. यांना सव्वा तीनशें रुपये पगार होता. हे याच हुद्यावर असतां इ. स. १९०३ जुलई ता. ४ रोजीं रविवारीं कैलासवासी झाले; यांचा फोटो पुस्तकांत दिलाच आहे; गोविंदरावांनीं, आपले कारकीर्दींतच, गणेश, बाळकृष्ण व वामन या तिघांचें विद्यार्चन पूर्ण केलें. आपल्या वडील बंधूचे कीर्तीस शोभेल अशाच हुद्यावर वरील तिघेही बंधू हल्लीं आहेत. गणपतराव व बाळकृष्णपंत यांनीं बडोदा कॉलेजांत अभ्यास करून, गणपतराव इ. स. १८९१ त व बाळकृष्णपंत इ. स. १८९४ त, बी. ए. झाले; गणपतरावांनीं बी, ए. झाल्यावर बडोदा हायस्कूलांत शिक्षकाची नोकरी पतकरली; बाळकृष्णपंतानीं पुढें अभ्यास करून इ. स. १९०१ मध्यें एल्, एल्, बी; झाले; बाळकृष्णपंतही संस्थान बडोदे राज्यांतच मुनसफचे जागीं लागले; बाळकृष्णपंत हल्लीं खुद्द बडोद्यासच सब्जज्य असून पगार २२०

रु. आहे; गणपतराव कांहीं वर्षे असिस्टंट हेड्मास्तरही होते; नंतर कांहीं महिने धैर्यशिल महाराजांचे ट्यूटर होते; गेल्यावर्षी हायस्कूलचे हेडमास्तर होऊन पगार २०० रुपये झाला आहे; गणपतराव व बाळकृष्णपंत हे जसें पाश्चात्य शिक्षणांत पद्वीधर होऊन ऑफिसर झाले; तसेंच वामनरावही व्यापारांत प्रोफेसर आहेत असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं; वामनराव हे मुंबई येथें गांवठी कापडाचे "होलसेल मर्चंट" असून, न्यूइस्लाम मील व कोईनूर मीलचे क्लॉथ सेलींग एजंट आहेत; गणपतरावाचे पुत्र केशव. बाळकृष्णपंतांचे—महादेव व रघुनाथ; आणि वामनरावाचे पुत्र लक्ष्मण हे सर्व विद्यार्थी आहेत; भालचंद्र यांस—चिंतामणी व गोपाळ; चिंतामणी मयत; व गोपाळ हे दत्तक गेले; पांडुरंगाचें तिसरे पुत्र परशराम; यांस सखाराम व गोपाळ; सखाराम यांस गोविंद, विष्णु व लक्ष्मण; गोविंद्राव व लक्ष्मणराव हे सज्ञान आहेत; पैकीं गोविंद्रावांस माहादेव हा विद्यार्थी आहे; विष्णु हे दत्तक गेले; गोपाळ याचे दत्तक पुत्र विष्णु हे सज्ञान आहेत, यांना, बाळा व गणू असे लहान मुलगे आहेत.

अनंताचे पांचवे पुत्र कृष्ण; यांस पुत्र तीन; जनार्द्न, हरी व माहादेव; जनार्द्नास— रामचंद्र, यांस— दामोद्र; यांस विष्णु; विष्णुपंतांनीं, परगोत्रांतला कृष्ण हा दत्तक घेतला आहे; हरी यांस अनंत; यांस पुत्र जनार्द्न, व्यंकोजी व गणेश; जनार्द्नास— रामचंद्र; यांस— श्रीधर, वामन व शंकर; श्रीधर व वामन हे सज्ञान आहेत; शंकर हा लहान आहे; गणेश यांस विठलराव; हे सज्ञान आहेत; माहादेव पुत्र दोन; पैकीं येशवंत यांस— गोविंद; यांना—लक्ष्मण व विठल; लक्ष्मणाचे पुत्र वासुदेवराव हे सज्ञान आहेत; विठलचे—माहादेव; यांस पुत्र गजानन हे विद्यार्थी आहेत.

गोटण्याहून अनंत निघून कोठें गेले वगैरे मागें सांगितलेंच आहे; गोटण्यास गांवाचे शेवटीं अनंताचे आजे गोविंद्भटमानी यांचें घर होतें म्हणून यांना शेवटचे आपटे म्हणतां म्हणतां 'शेवटे आपटे' असें म्हणूं लागले; त्याचा अपभ्रंश होऊन, 'शेवडे आपटे' असें ह्मणूं लागले; वरील अनंत यांचे वंशज हल्लीं 'शेवडे' हें आडनांव लावितात; परंतु, कांहीं मूळ आडनांव आपटे हेच लावितात; राजापूरचे 'शेवडे आपटे' असें पुष्कळ वर्षांपासून चालत आले आहे; हे शेवडे आपटे पूर्वी गलबताचे प्रसिद्ध व्यापारी होते; कराची, मलबार, कोची व द्वारका वगैरे ठिकाणीं मोठमोठ्या पेढ्या होत्या; एके वेळीं या

शेवडे आपटे यांचेकडे अपार संपत्ती होती; राजापूर येथें यांचे मोठमोठे वाडे आहेत; अलीकडे सुमारें ४०-४५ वर्षांपूर्वी सुद्धां यांचे घरांत, पाहुणे किती येत व किती जात याचा कांहीं पत्ताच नसे; जेवणाचे वेळीं पंक्तिला पांच पन्नास पाहुणे असावयाचेच ! हे कोणाकडे आले आहेत वगैरे दादही नसे ! असो, हल्लीं सुद्धां या पांच वाड्यांतील वंशजांत व्यापार करणारेच जास्त आहेत; नोकर फार कमी आहेत.

गोविंदभटमानीचे पुत्र कृष्ण; यांस नारायण; व नारायणास पुत्र रामचंद्रभट, माहादेवभट व कृष्णंभट. रामचंद्रभटास पुत्र चार; गणेश, दिनकर, महादेवभट व बाळंभट उर्फ बचंभट; रामचंद्रभटाचे वडील नारायण हे गोटण्याहून आडिव-च्यास गेले व नारायणभटाचे पुत्र रामचंद्रभट हे मिरजेस गेले; व माहादेवभट आडिवऱ्यासच राहिले; रामचंद्रभटांनीं देशावर मिरज येथें येऊन त्यावेळचे संस्थानाधिकारी पटवर्धन, यांचेकडून जमीन इनाम मिळविली; सदरहु जमीन मालगांवपैकीं असून हल्लींही रामचंद्राचे वंशजाकडे ती इनाम जमीन आहे; रामचंद्रभटांनीं मिरज येथें किल्ल्यांत वास्तव्य केलें होतें; यांचे वंशजांचीं वडिलार्जित घरांत निरनिराळीं घरें झालीं आहेत; गणेश व दिनकर निर्वंश; दिनकरचे पणतू गणेश हे ग्वालेर—लष्कर येथेंच रहात असत, हे नामांकित गवई होऊन गेले; यांचें घर ग्वालेर येथेंही आहे; मुलगी आहे असें समजतें; या गणपतरावाचे गाणें या लेखकानें पुष्कळ वेळा ऐकलें होतें; यांना पार्थिवपूजा होती; यांचा स्वभाव मोठा आनंदी असे; महादेवभटास पुत्र चार; भास्कर, गोपाळ, विठ्ठल व पुरुषोत्तम; भास्कराचे—हरीभाऊ हे हल्लीं आहेत, हे हरीभाऊ, ललितकलादर्श-संगीत मंडळीबरोबर असतात; गोपाळ यास—रावजी; यांस गणेश; हे गणपतराव मिरज येथेंच असतात. विठ्ठल यांस पुत्र दोन; पैकीं अनंतभट हल्लीं आहेत; अनंत-भटास विनायक व नरहरी; अनंतभट, विनायकराव व नरहरी मिरज येथें किल्ल्यांतच वडिलार्जित घरांत असतात; पुरुषोत्तम यांस—नारायण; हे नारायण-राव शहापूर—बेळगांव नजीक वडगांव येथें असतात; बाळभंट उर्फ बचंभट यांस धोंडभट व विनायक शास्त्री; धोंडभटाचे—मोरभट; यांस—विठ्ठलभट व बाळकृष्णभट; विठ्ठल भटाचे—वामनराव व केशवराव; वामनराव संस्थान जत येथें शाळामास्तर आहेत; केशवराव महांकाळ—कवठे येथें वकील आहेत; बाळ-कृष्ण यास—नारायण; हे नारायणराव ढफळ्ळापूरचे कारभारी होत; यांचा मुलगा वासुदेव हा फर्ग्यूसन कॉलेजांत आहे; विनायकशास्त्री हे साक्षात् वेदोनारायण

होते; हे विनायकशास्त्री आपटे मोठे कडकडीत स्नानसंध्येशील होते; ते वेद पूर्ण झाल्यावर शास्त्राध्ययन करून श्रीकृष्णाकाठीं सांगली येथेंच रहात असत; यांची विद्वत्ता, अनुष्ठान, वेळच्या वेळीं नित्यकर्म करणें वगैरे पाहून व यांचा लौकिक ऐकून त्यांच्या कुटुंबाचे योगक्षेमार्थ त्या वेळीं सरदार गणपतराव परशराम पटवर्धन यांनीं शके १७३९ त ईश्वरनाम संवत्सरेंत पंचवीस रुपये उत्पन्नाची अकलखोपगांवची जमीन इनाम दिली; ती हल्लीं यांचे वंशजाकडे चालू आहे; तसेंच श्रीमंत चिंतामणराव पांडुरंग दिमंत राजेश्री पंतप्रधान यांनीं शके १७३८ धातानाम संवत्सरेंत साठ रुपये उत्पन्नाची सांगली पैकीं जमीन इनाम दिली आहे. ती हल्लीं चालू आहे. " ही वंशपरंपरेची अस्सल सनद आम्हीं पाहिली आहे. " कोल्हापूरचे गुरुमहाराज यांचेकडून चिंचवडची जमीन इनाम आहे. जमखिंडीकर सरकारकडूनही इनाम हल्लीं चालू आहे.

विनायकशास्त्री यांचे पुत्र चिंतामणभट; यांस रामचंद्र व श्रीधर; रामचंद्र-भटास— गोविंदभट व गणेशभट हे दोघेही भिक्षुक आहेत; यांनीं आपल्या सहीनें छापून प्रसिद्ध केलेल्या विनंतिपत्राचा उतारा—

**श्रीगजानन प्रसन्न.**

## विनंतिपत्र.

**वैदिक लोकांचें चालू शिक्षण** व्हावें तसें होत नसल्यामुळें या लोकांना यथाशास्त्र म्हणजे [ धार्मिक शिक्षण ] बिलकुल मिळेनासें झालें आहे. ही उणीव भरून निघावी या हेतूनें या लोकांपैकीं होतकरू व बुद्धिमान् लोकांना द्रव्याची मदत करून स्मृति व सूत्रें आणि इतर धर्मग्रंथांतील उपयुक्त विषयांचें शिक्षण देण्याचा मंडळींचा विचार आहे; तरी या संस्थेस उत्तम स्वरूप येणें हें केवळ लोकाश्रयावर अवलंबून आहे. सांप्रत लोकाश्रयावर चालत असलेल्या इतर अनेक संस्थांप्रमाणें या सर्वोत्तम व श्रेष्ठ अशा संस्थेस चांगला लोकाश्रय मिळून ही भर-भराटीस येईल अशी आम्हास उमेद आहे. तरी धार्मिक लोकांनीं यथाशक्ति मदत करावी अशी विनंती आहे.

मिति कार्तिक शु. ५
शके १८३४.
} **गोविंद रामचंद्र आपटे.**

सांगली चिंतामणी प्रेस ता. २७-१२-१९१२ इ.

सदरहुप्रमाणें वे. गोविंद्भट हे वैदिक धर्माचें उत्तेजनार्थ नेहमीं खटपट करि-तात खरे ! परंतु " कालगतीच विचित्र आहे. " गोविंद्भटास– विश्वनाथ हे सज्ञान आहेत. हे आपल्या वडिलार्जित घरांतच सांगली येथें असतात. श्रीधर ऊर्फ भाऊ यांचे पुत्र पांच; पैकीं बाळकृष्ण, मोरभट व हरभट. बाळकृष्णाचे पुत्र नारायण व वासुदेव हे लहान आहेत; मोरभटाचे– पांडुरंग, हे सज्ञान आहेत; हरभटाचे– श्रीधर हा लहान आहे. गोविंद्भटमानी याचे दुसरे पणतू महादेवभट, यांना पुत्र सदाशिव व परशराम; पैकीं सदाशिवाचा वंश हल्लीं देशावर श्रीकृष्णाकाठीं धाकटें उगार येथें आहे; सदाशिवाचा पांडुरंग; यांस कृष्ण. यांस गोपाळ; व गोपाळाचे पुत्र शंकर व विष्णु. शंकरराव हे सज्ञान असून विष्णू हा लहान आहे; शंकरराव यांना उगार येथें थोडेंसें जमिनीचें उत्पन्न आहे. परशरामभट यांचा वंश हल्लीं कोंकणांत आहे; परशराम यांस– चिमणभट; चिमणभटास सदाशिवभट, बाळंभट व रामचंद्रभट. सदाशिवभटास गोविंद्भट व गोपाळ; गोविंद्राव हे व्यापारी खात्यांत हल्लीं राजापूर येथें आहेत; गोपाळराव व बाळंभटाचे पुत्र विनायकराव हे खुद्द आडिवऱ्यास आहेत; विनायकराव हे पेन्शनर आहेत; यांना पुत्र चार; महादेव, वासुदेव, परशराम व नारायण; महादेवराव हे रत्नागिरी येथें हॉयस्कुलांत ड्राइंगमास्तर आहेत; यांना रघुनाथ, नर-हरी व काशीनाथ असे तीन पुत्र आहेत; हे विद्यार्थी आहेत; वासुदेवराव हे नोकर आहेत; यांना-हरी; हा विद्यार्थी आहे; परशरामपंत हे नोकर आहेत; यांना बाळकृष्ण; हा विद्यार्थी आहे; नारायण हा विद्यार्थीच आहे; गोपाळराव यांचा मुलगा मोरेश्वर विद्यार्थी आहे. गोविंद्भटमानी यांचे तिसरे पणतू कृष्णंभट हे गोटणें येथें श्रीभार्गवरामापुढें पुराण सांगण्याचें पतकरून राहिले; पुराण सांगणे-बद्दल यांचे वंशजास श्रीभार्गवराम संस्थानांतून वर्षासन आहे; कृष्णंभटाचे पणतू नारायण परशराम हे हल्लीं पुराण सांगतात; नारायणभट यांस पुत्र पांच; गणेश, वामन, महादेव, रामचंद्र व विनायक; पहिले गणेश हे सज्ञान असून बाकीचे विद्यार्थी आहेत; यांना ' पुराणिक आपटे ' असें ह्मणतात.

गोविंद्भटमानीचे पुत्र विसाजी; यांस गोविंद; यांस विसाजी; व विसाजीस पुत्र तीन; बाळाजी, परशराम व कृष्ण; बाळाजीस– सदाशिव, गोपाळ व माहादेव; ( गोपाळराव हे हल्लीं श्रीक्षेत्रकाशी येथें, बिंदूमाधवाचें पुजारी आहेत ) परशरामास– राघो, नारायण व दिनकर; पैकीं नारायणास– बळवंत, बाबू व केशव; बळवंतराव हल्लीं पेन्शनर असून उज्जयिन येथेंच असतात; यांना पुत्र

रामचंद्र, लक्ष्मण व भास्कर; रामचंद्र व लक्ष्मण हे नोकर आहेत; व भास्कर हा विद्यार्थी आहे; बळवंतराव हे गायनकुशल आहेत; यांचे मधले बंधू बाबूराव; यांचे पुत्र कृष्ण हे विद्यार्थी आहेत; बळवंतराव यांचे कनिष्ट बंधू केशवबुवा; हे केशवबुवा नामांकित धृपद गाणारे तातुभय्या यांचे शिष्य होत; केशवबुवाही गायन विद्येंत विद्वान् आहेत; यांना श्रीमंत होळकर सरकारचे पदरीं चाकरी आहे; यांना पुत्र तीन; गोविंद, शंकर व एकनाथ; गोविंदराव हे नोकर असून शंकर व एकनाथ विद्यार्थी आहेत; केशवबुवांचे आजे परशराम हे देशावर आले होते. विसाजीचे तिसरे पुत्र कृष्णंभट; यांना वामन; यांस हरी; हरीस-नारायण, व नारायणास—विश्वनाथ व भास्कर हे गोटण्याहून शिरढोणास आले. ह्यांच्या विषयीं विशेष— विश्वनाथ हे गोटण्याहून शिरढोणास आले. ह्यांच्या विषयीं विशेष माहिती उपलब्ध नाहीं. तरी हे दोघे गृहस्थी पेशाचे असून कर्नाळा किल्यावर कोणत्या तरी मोठ्या कामावर होते असें समजतें. ह्या दोघां भावांचें परस्पर फार प्रेम असून त्यांचे मुलगे अनुक्रमें नारायणराव ऊर्फ बापूनाना आणि गोविंदराव हेही सख्या भावाप्रमाणेंच शेवटपर्यंत वागत होते. बापूनाना हे वडिलांच्या मार्गे कर्नाळ्यावर काम करीत होते, व गोविंदराव हे घरची व्यवस्था पाहात असत. पेशवाईच्या अखेरीनंतर कर्नाळा किल्ला इंग्रजांनीं घेतला तेव्हां हे दोघे बंधू पनवेल एथें वकिली करूं लागले. त्या काळीं बापूनानांसारखे हुषार वकील पेण, पनवेल आणि ठाणें, कल्याण प्रातांत कोणी नव्हते. पनवेलचे नुकते होऊन गेलेले प्रसिद्ध जुने वकील वासुदेवपंत दांडेकर आणि हरीभाऊ जोशी हे बापूनानांचे शिष्य व त्यांच्याच घरीं लहानाचे मोठे झाले होते. बापूनाना व गोविंदराव हे मोठे बुद्धिमान् मुत्सद्दी, तेजस्वी, मानी व करारी होते. शिरढोणाहून रोज पनवेलीस दोन कोस जाऊन सायंकाळीं परत यावयाचें व नंतर स्वतः बागेस पाणी लावावयाचें असा ह्या बंधूंचा क्रम असे. ह्यांची तेजस्विता सहन होत नसल्यामुळें गांवांतल्याच त्यांच्या शत्रूनें त्यांजवर मारेकरी घातले. एके दिवशीं पनवेलीहून परत येत असतां गांवापासून सुमारें अर्ध्या कोसावर मारेकऱ्यांनीं त्यांस गांठिलें. ह्यांच्या हातीं फक्त काठ्या होत्या व मारेकरी सशस्त्र होते. ह्या खटपटींत गोविंदराव ह्यांस तरवारीचा वार लागला व मारेकरी पळाले. नंतर जखम बांधून उभयता बंधू घरीं आले. ह्या जखमेनेंच गोविंदराव ह्यांचा सात आठ दिवसांनीं अंत झाला. त्यांच्या पाठीमागें बापूनाना फार दिवस जगले नाहींत.

बापूनानास पुत्र तीन; विट्ठल, त्रिंबक व विष्णु. त्रिंबकपंतांचे पुत्र दोन, गजाननराव व रामभाऊ. हे पनवेलीस राहतात. गजाननराव शेती व व्यापार करितात. त्यांचा मुलगा दामोदर लहान आहे. रामभाऊ वैद्य आहेत व ह्यांचें स्वदेशी मालाचें दुकानही आहे. विष्णुपंतांचे पुत्र गोपाळराव खर्डी ( स्टेशन ) एथें राहतात. ह्यांचा मुलगा दत्तात्रय लहान आहे.

विठ्ठलपंत सर्वांत मोठे. हे प्रथम मुनसफ कोर्टांत कारकून होते. स्वसंपादित मिळकतीची व्यवस्था राहीना व प्रथम कुटुंब वारल्यामुळें नौकरीवर जाण्याचें जुळेना, ह्मणून ह्यांनीं नौकरी सोडिली. हे अतिशय सात्त्विक वृत्तीचे, मनाचे कोमळ, तेजस्वी, मानी व करारी परंतु कांहींसे भोळे होते. ह्यांच्या भोळेपणामुळें व ममताळूपणानें ह्यांची स्वसंपादित व वडिलार्जित सर्व मिळकत गेली, व वयाच्या उत्तरार्धांतील सुमारें पंचवीस वर्षें ह्यांस निवळ हातावर प्रपंच करावा लागला. हे फार सशक्त, सुदृढ, निरोगी व कांटक होते. ह्यांनीं कधींही कोणाजवळ याचना केली नाहीं, कीं कोणाचें कधीं आर्जव केलें नाहीं. खडतर दरिद्रावस्थेंत ह्यांची सात्त्विक तेजस्विता तिळभरही कमी झाली नाहीं. इ. स. १८८४ सालीं ह्यांजवर गुरुकृपा झाली. ह्यांचे गुरु रावजीबोवा पाठक वांईकर ह्यांनीं त्यांस गाणपत्य दीक्षा देऊन त्यांजवर अनुग्रह केला व मूठभर तांदूळ आणि एक पैसा प्रसाद ह्मणून देऊन ‘ आजपासून तुमची सर्व दद्रात गेली ’ असा आशीर्वाद दिला ! त्याप्रमाणें विठ्ठलपंतांचीं अखेरचीं बारा वर्षें सुस्थितींत गेलीं. उत्तम प्रकारचें संसारसुख अनुभवून व गणेशोपासना करून ह्यांनीं इ. स. १८९५ सालीं वैतरणीच्या कांठीं वाडें एथें पूर्ण शांतता वृत्तीनें बोलत चालत देह ठेविला. शिरढोणच्या ह्या घराण्यांत श्रीगणेशोपासना प्रथमपासूनच चालत आलेली आहे. विठ्ठलपंत हे श्रावणमासांत पार्थिव गणेशमूर्तीचें पूजन करीत असत. ह्यांनीं प्रकृति उत्तम असतांही दहा दिवस अगोदर आपल्या मृत्यूचा दिवस आपल्या समवयस्क शेजाऱ्यास सांगून ठेविला होता.

विठ्ठलपंतांस एकंदर आपत्यें सतरा झालीं; पैकीं हल्लीं तीन पुत्र आहेत; नारायण, अनंत व यशवंत घरची गरिबी व गांवीं शिकविण्याची सोय नव्हती ह्यामुळें नारायणराव ह्यांचा विद्याभ्यास लहानपणीं व्हावा तसा झाला नाहीं. ह्यांचा जन्म इ. स. १८६९ सालीं झाला. शिरढोण गांवीं मराठी अभ्यास चालू होता; पुढें इ. स १८८५ सालीं सुमारें पांच महिने कल्याणच्या शाळेंत जाऊन त्याच सालीं सहावी इयत्ता पास झाले. ह्यांचा ठाणें एथें ह्या परीक्षेंत पहिला नंबर आला होता. ह्याच वर्षीं


त्यांनीं शाळाखात्यांत नोकरी धरिली व पुढच्या वर्षीं ट्रेनिंग कालेजांत शिकावयास गेले. नारायणराव यांचा कालेजांतील सर्व परीक्षांत पहिला नंबर आलेला आहे. कालेजांतून सुटल्यावर ह्यांनीं ठाणें जिल्ह्यांत अनेक ठिकाणीं शिक्षकाचें काम करून लौकिक संपादिला. ह्यांची १८९४ सालीं पुण्याच्या ट्रेनिंग कालेजांत प्राक्टिसिंगस्कूलचे हेडमास्तरच्या जागीं नेमणूक झाली. त्या जागीं सात वर्षें काम केल्यावर पुणें येथील ट्रेनिंग कॉलेजांत इ. स १९११ सालीं भाषा विषयाचे अध्यापकाचे जागीं ह्यांची नेमणूक झाली; याच जागेवर हल्लीं ते आहेत.

ह्यांनीं इंग्रजीचा अभ्यास कोणाच्याही साह्यावांचून स्वतांच केलेला आहे. उत्तम शिक्षक व उत्तम ग्रंथकार ह्मणून ह्यांचा लौकिक आहे. ह्यांनीं सरकारी पुस्तकांचीं कांहीं भाषांतरें केलेलीं असून शिवाय पुढील पुस्तकें स्वतांच प्रसिद्ध केलेलीं आहेत.


१ बालशिक्षण भाग १ ला.
२ बालशिक्षण भाग २ रा.
३ शाळेंतील गाणीं.
४ कवाइतीच्या हुकुमांचे शब्द.
५ शालोपयोगी कवाईत.
६ श्री सखारामबोवांचें चरित्र.
७ पदार्थपाठमाला गुच्छ १ ला.
८ पदार्थपाठमाला गुच्छ २ रा.
९ पदार्थपाठमाला गुच्छ ३ रा.
१० बालोद्यानशिक्षणसार.
११ ठाणें जिल्ह्याचें वर्णन.
१२ शुद्धलेखनदीपिका.
१३ चिमुकल्या प्राण्यांच्या गोष्टी.

ह्यांचे बंधू अनंत व यशवंत. अनंत हा बी. ए. चा व यशवंत हा प्रीव्हि-यसचा अभ्यास करीत आहेत.

नारायणरावांचे चुलत चुलत आजे गोविंदराव; ह्यांस पुत्र दोन. रघुनाथ व सदाशिव. रघुनाथ ह्यास पुत्र तीन. गणेश, चिंतामणि व मोरेश्वर. चिंतामणि हा फर्स्ट बी. ए. होऊन विषमानें वारला. मोरेश्वर हा इंटरमिजिएट झाल्यावर विरक्त झाला. हे दोघे भाऊ बुद्धिमान् व तेजस्वी होते. गणेश ह्यास रामकृष्ण.



कै० गोविंद श्रीधर आपटे, बी. ए.
राजापूर.



नारायण विठ्ठल आपटे.



श्रीयुत वासुदेव गोविंद आपटे, बी. ए.
"आनंद" कर्ते.



श्रीयुत रा. रा. यशवंत गोविंद आपटे,
बी. ए. एल्. एम्, अँड एस्.
अकौंटंट जनरल, लष्कर–ग्वालेर.

The Bombay Art Printing Works, Fort.

हा लहान असून सध्यां नारायणराव ह्यांजकडेसच विद्याभ्यासाकरितां आहे.

कृष्णंभटमानींचे दुसरे पुत्र जनार्दन उर्फ जानमानी; यांस पुत्र तीन, गोविंद बापू व विठ्ठल; गोविंदचे पुत्र बाळंभट व बाबदेव; बाळंभटास–कृष्ण, व कृष्णास अनंत, अनंत यांस पुत्र चार; जनार्दन, राघोबा, बाबूराव व गोपाळ; पैकीं बाबूरावाचा वंश चालूं आहे; बाबूराव यांस पुत्र चार; गंगाधर, रंगो, बळवंत व चिमणाजी; गंगाधराचा पुत्र सदाशिव; यांस रामचंद्र व गणेश; रामचंद्र यांस गोविंद व गोपाळ; गोपाळराव हे पेन्शनर होते; हे नुकतेच अकोला येथें वारल्याचें समजतें. गोविंद यांस दत्तात्रय, वासुदेव व येशवंत; दत्तात्रय हे हल्लीं उमरावती येथें टेक्निकल इंस्टिटच्यूटमध्यें प्रोफेसर सुपरिंटेंडेंट आहेत; यांस, गणेश, वामन, पुरुषोत्तम व भालचंद्र असे चार पुत्र असून ते सर्व विद्यार्थी आहेत; वासुदेवराव हे कलकत्ता युनिव्हर्सिटीचे बी. ए. आहेत. यांचा अभ्यास धुळें हायस्कूल, इंदूर मद्रसा, इंदूर मिशनकॉलेज व नागपूर मारिस कॉलेज इतक्या ठिकाणीं झाला. हे पुणें येथें नूतन मराठी विद्यालयाचे असिस्टंट सुपरिंटेंडेंट होते; यानीं ‘ आनंद ’ नावाचें मासिक पुस्तक चालविलें आहे; यांनीं आपल्या मुलाचे नांवही आनंदच ठेविलें आहे; यांनीं आजपर्यंत अदमासें अठरा पुस्तकें छापून प्रसिद्ध केलीं आहेत; वासुदेवराव हल्लीं इंदोर येथें शाळा खात्यांतच नोकर आहेत; येशवंतराव यांचा जन्म इ. सन १८७५ त झाला; धुळें हायस्कूल व इंदोर मिशन कॉलेज व होळकर कॉलेज याठिकाणीं अभ्यास करून, आपल्या वयाचे एकोणिसावें वर्षीं, इ. स. १८९४ त कलकत्ता युनिव्हर्सिटीत बी. ए. च्या परिक्षेंत फर्स्ट आले. पुढें मुंबई युनिव्हर्सिटीत इ. स. १८९८ त एल्. एम्. अँड एस्च्या परिक्षेंत उत्तीर्ण झाले; यांना चार्लस मोरहेड् प्राईज व सरजेमशेटजी जिजिभाई–गोल्ड मेडल् मिळालें आहे. हे गोल्ड मेडल् “ लेखकानें पाहिलें आहे; ” यांनीं लष्कर–ग्वालेर–येथें, जयाजी मेमोरियल हास्पिटलचे असिस्टंट सर्जन, असिस्टंट मेडिकल ऑफिसर, अँडरसेक्रेटरी व इन्स्पेक्टर जनरल रेकार्ड, येणेप्रमाणें मोठमोठीं हुद्यांचीं कामें करून प्रत्येक खात्यांत उत्तम सुधारणा केली; इल्लीं येशवंतराव अकौंटंट जनरलचे जागीं ८०० रुपये पगारावर आहेत; यांचा स्वभाव मनमिळाऊ असून, गरिबांचे कनवाळू सतेज व मोठे मानी आहेत; यांना विष्णु, श्रीकृष्ण व रामचंद्र असे पुत्र असून हे विद्यार्थी आहेत; “ यशवंतराव यांचे निपणजे गंगाधर अमुकच गांवचे अशी खात्री देतां येत नाहीं; गोटण्याचे आपटे मंडळींत गंगाधर या नांवाचीं दोन किंवा तीन नांवें फार झालें तर

सांपडतील; परंतु, वरील गंगाधराचे वयाचे एकही नाहींत; सदरहु गंगाधर हे राव. नारायणराव चिमणाजी यांचे सख्खे चुलते होत. नारायणराव यांना गंगाधर आपले चुलते होते ह्मणून ठाऊकच नाहीं; आह्मांला नारायणराव यांचे आजे बाबूराव यांनीं, क्षेत्रोपाध्ये यांचे वहींत लिहून दिलेलें सांपडलें; त्या लेखांत बाबूराव यांनीं आपले पुत्र चार; गंगाधर, रंगो, बळवंत व चिमणाजी अशी माहिती दिली आहे; यशवंतराव यांचे पणजे सदाशिव हे यांच गंगाधराचे पुत्र असावेत असें वाटल्यावरून संबंध जमविला आहे. ”

चिमणाजी यांस पुत्र चार; नारायण, महादेव, गोविंद व विष्णु; नारायणराव हे हल्लीं पेन्शनर आहेत; यांनीं लहानपणीं फारच आपत्तींत दिवस काढिले; यांनीं महादेवराव यांना शिक्षणाचें कामीं बरीच मदत केली होती; नारायणराव हे लहान नोकरी पासून चढत चढत पोस्टल सुपरिंटेंडेंट झाले; यांना दीडशें रुपये पेन्शन आहे; यांनीं स्वतः पुणें येथें घर बांधिलें आहे; नारायणराव हे खरे वैदिक धर्माचे आभिमानी आहेत; “ हल्लीं जगांत वेळेवर कशाला ! दिवसांतून एकदांही संध्या सुद्धां न करणारे शेंकडा साडेनव्याण्णव असामी आहेत, परंतु यापैकीं कांहीं ह्मणजे शेंकडा एक किंवा दोन असामी संध्या येत असलेले सांपडतील, यांपैकींच एकादा आह्मीं वैदिक धर्माभिमानी आहोंत असें ह्मणेल तर त्यालाही तसें ह्मणणें शोभणार नाहीं, ” मात्र नारायणराव हे खरे वैदिक धर्माभिमानी आहेत; यांनीं पेन्शन घेतल्यासून हे कोणाच्याही भानगडींत न पडतां ईश्वर चिंतनांत व अग्निनारायणाचे सेवेंत अहोरात्र निमग्न झाले आहेत; हे सर्व पूर्वपुण्याईचें फळ होय; यांचा हल्लींचा आश्रम ऋषीतुल्य आहे, ॥ प्रपंच साधूनीं, परमार्थ साधावा ॥ ह्या सत्पुरुषांच्या वचनाप्रमाणें यांचा आश्रम आहे; दिवसांतील चोवीस तासांपैकीं कमीतकमी बावीस तास तरी यांचें वास्तव्य औदुंबरासान्निध्य असतें; असो, यांना पुत्र पांच; हरी, रामचंद्र, दत्तात्रय, गणेश व केशव; पैकीं, हरीभाऊ व रामचंद्र हे सज्ञान असून, दत्तात्रय, गणेश व केशव हे विद्यार्थी आहेत. हरीभाऊ हें आरडीनरी फेलो इन आर्टस व हे मराठींतील नामांकित कादंबरीकार आहेत. यांनीं ब-याच कादंबऱ्या प्रसिद्ध केल्या असून दोन नाटकें लिहिली आहेत. करमणूक वर्तमानपत्राचें संपादकत्व यांजकडेच आहे. ह्यांचे चुलते माधवराव यांनीं ‘ आनंदाश्रम ’ नांवाची जी सुप्रसिद्ध संस्था पुण्यांत स्थापिली आहे तिच्या व्यवस्थापकाचें हे काम सांप्रत करीत आहेत.

रा. विनायक कोंडदेव ओक यांनीं, आपल्या ‘ बालबोध ’ मासिकपुस्तकांत

महादेव चिमणाजी यांचें चरित्र चांगल्या रीतीनें वर्णन केलें असून फोटोही दिला आहे. त्याच चरित्रांत थोडासा फरक करून देत आहें.

## महादेव चिमणाजी आपटे यांचें चरित्र.

कोणत्याही देशाची उन्नती होण्यास त्या देशांत जसे महात्मे उत्पन्न व्हावे लागतात; तसे आपल्या भरतखंडांतहि उत्पन्न होऊं लागले आहेत; हें एक मोठें सुचिन्ह आहे. अशा महात्म्यांपैकीं महादेव चिमणाजी आपटे हे एक होत. ह्यांचा जन्म शके १७६७ च्या फाल्गुन महिन्यांत झाला म्हणजे इ. स. १८४५त हे लहानपणापासून मोठे बुद्धिमान् व अभ्यासी असत. घरची स्थिति फार गरिबीची असतांहि इ. स. १८६८ त ते बी. ए. झाले आणि इ. स. १८७१ एल्. एल्. बी. झाले. ह्या दोन्ही परिक्षेंत ते पहिले आले होते. ते एल्, एल्, बी झाले तेव्हां मुंबईतल्या नानाशंकरशेटच्या शाळेवर हेडमास्तर होते; हे फार चांगले शिक्षक होते. त्यांना भाषाविषय फार आवडत असे; ह्यांची योग्यता जाणून ह्यांना सरकारनें युनिव्हर्सिटीचे फेलो नेमिलें होतें. हे हायकोर्टांत वकिली करूं लागले, व ह्यांना पैसा चांगला मिळूं लागला. ह्यांचे मनांत आपलेकडून आपल्या देशाचे कांहींतरी हित व्हावें, असें आलें. आपल्या देशांत कलाकौशल्याची वृद्धी व्हावी, म्हणून ह्यांनीं एका गृहस्थास, कलाकौशल्य शिकून येण्याकरितां विलायतेस आणि अमेरिकेस पाठविलें. त्यांत ह्यांचे पुष्कळ रुपये खर्च झाले. तसेंच पुण्यासही चाकूकातऱ्यांचा कारखाना काढण्याचा विचार करून कोणा एका गृहस्थास त्यांनीं हाताशीं धरलें होतें, त्यांतही त्यांचा पुष्कळ पैसा खर्च् झाला. परंतु दोन्ही कृत्यांत पैसा खर्च होऊन उपयोग कांहीच झाला नाहीं. ह्याशिवाय उत्तर हिंदुस्थानांत कानपुरास एका देशी कातड्याच्या कारखान्यांत ह्यांनीं पांच-पन्नास हजार रुपये घातले. ह्या सर्व गोष्टींवरून एवढें स्पष्ट होतें कीं, ह्यांना आपल्या देशाचें मुख्य व्यंग चांगलें कळलें होतें, आणि तें नाहींसें करण्याचा प्रयत्न करण्याची इच्छा प्रबल होती. **हे गुण आमच्या अलिकडील होतकरूं मंडळींनीं अनुकरण करण्यासारखे आहेत.** यत्न करणें हें मनुष्याचें कर्तव्य आहे, त्यांत यश देणें परमेश्वराधीन आहे.

मनुष्याचें अंगीं स्वदेशाभिमान असणें हें जरूर आहे. तसेंच महादेवरावांचें अंगीं स्वदेशाभिमान पूर्ण जागृत होता. महादेवरावांनीं लाख दीड लाख रुपये खर्च करून प्राचीन संस्कृत ग्रंथांच्या जीर्णोद्धारार्थ “ **आनंदाश्रम** ” म्हणून पुणें शहरांत कायमची संस्था करून ठेविली आहे; तीवरून ह्यांची साक्ष

चांगली पटत आहे. ह्या संस्थेमध्यें नुसत्या प्राचीन ग्रंथांचा जीर्णोद्धार व्हावयाचा आहे असें नाहीं; तर प्राचीन संस्कृत विद्येचा अभ्यास करणाऱ्या १०।१२ विद्यार्थ्यांची जेवणाची व रहाण्याची वगैरे सर्व प्रकारची सोय व्हावी, आणि प्रत्यहीं पांच संन्याशांस तरी पुडी मिळेलच अशी व्यवस्था करून ठेविली आहे. हे आपल्या वकिलीच्या कामांत फार प्रवीण होते. कोठेंही एकादा बिकट खटला आला कीं, मोठमोठ्या देणग्या कबूल करून लोक ह्यांना नेत असत. ह्यांच्या मृत्यूचें वर्तमान कळल्यावर मुंबईहायकोर्टांत चीफजस्टिस बेली हे महादेवरावांविषयीं ह्मणाले कीं, " बुद्धीचें विशदत्व, न्यायाचे कामांत जे कायदे लागतात, त्या सर्वांचें मार्मिकज्ञान आणि न्यायाधिशांशीं अत्यंत सभ्यपणाचें वर्तन ह्या गुणांत महादेवराव आपटे वकील ह्यांना दुसऱ्या कोणत्याही वकिलाच्यानें मागें टाकवलें नाहीं. " वकील या नात्यानें आणखी स्तुती ती काय राहिली ! ह्यांना मराठी चांगलें लिहितां येत असे. ' मौजेच्या चार घटिका ' ह्मणून ह्यांनीं शाकुंतल नाटकाचें भाषांतर लिहून बरेच वर्षांपूर्वी छापून प्रसिद्ध केलें आहे. यांना जर जास्त आयुष्यमर्यादा असती तर ह्यांचे हातून कितीएक चांगले ग्रंथ व आणखी एखादी देशहिताची संस्थाही निघाली असती.

आपण शेवटीं संन्यस्त होऊन ह्मणजे नारायण नारायण ह्मणतच समाधिस्त व्हावयाचें, असा निश्चय महादेवरावांनीं कितीएक वर्षांपासून केला होता, आणि आपणाकरितां आनंदाश्रमामध्यें समाधी बांधूनही ठेविली होती. ह्यावरून असें व्यक्त होतें कीं, महादेवराव अंतःकरणाचे पक्के हिंदु धर्माभिमानी होते; आणखी ह्यांच्या इच्छेप्रमाणें संन्यास घेतल्यावर ' आनंद सरस्वती ' हें नाम धारण केल्यावर शांत चित्तानें कांहीं वेळांनीं ते समाधिस्त झाले; इ. स. १८९४ च्या आक्टोंबर महिन्याचे बावीसावे तारखेस मुंबई येथेंच समाधिस्त झाले. शेवट गोड झाला ! वामनपंडितांनीं ह्मटलें आहे—


॥ घडया ज्या वस्त्रांच्या रजकपरिमार्जित तितुक्या ॥
॥ जलस्पर्शे होती वरिल घडिनें शुद्ध तितुक्या ॥
॥ अशा साठीं मध्यें भजन हरिचें ज्या घडि घड ॥
॥ तयांच्या संसर्गे इतर घडियांचा मळ झडे ॥ १ ॥

शेवटीं पवित्र आश्रम घेतल्यानें महादेवरावांच्या जन्माचें सार्थक झालें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. **आनंदसरस्वतींचें** प्रेत पुण्यास नेऊन, त्यांच्या इच्छेनुरूप सिद्ध केलेल्या समाधींत स्थित केलें. माधवरावांना पुत्र नसल्यामुळें



कै० महादेव चिमणाजी उर्फ आण्णासाहेब आपटे, B.A; LL B.

The Bombay Art Printing Works, Fort.



रा. रा. सदाशिव विनायक आपटे, बी. ए. गोटणे.



रा. रा. हरी नारायण आपटे, एडिटर 'करमणूक' पुणें

आणण स्थापन केलेल्या ' **आनंदाश्रम** ' ची सर्व व्यवस्था ट्रस्टी नेमून त्यांचे स्वाधीन केली; सदरहु व्यवस्थापत्रक मुंबई येथें रजिष्टर झालें आहे असें समजतें. माधवरावजी यांनीं आपल्या आपटे घराण्यांतीलच बारापर्यंत मुलें विद्यार्चनाकरितां ठेवावीत असें विशेष ठरवून निदान अमुक—अमुकाची तरी ठेवावीत वगैरे ठरविलें होतें; असें समजतें.

आपल्या स्वतःकरितां किंवा फार तर आपल्या कुटुंबाकरितां जगणारे लोकच फार; समाजाकरितां किंवा राष्ट्राकरितां जगणारा विरळा ! आपल्याकडे धनिक कांहीं थोडे नाहींत, परंतु राष्ट्रोपयोगी संस्था निर्माण करण्याकडे त्या धनाचा उपयोग करणारे आणि त्या योगानें आपलें नांव चिरस्मरणीय करून ठेवणारे महात्मे किती थोडे आहेत ! धनाचा खरा उपयोग त्याचा सद्व्यय करणें हा आहे. नुसता संग्रह करून नातवापणतवांना आयत्या पिठावर रेघोट्या ओढून बेअकली बनण्याला मदत करणें हा खास नव्हे ! आमच्याकडे दानाची पद्धति पूर्वापार आहे. पण कालमानाप्रमाणें तिचा प्रवाह वैयक्तिक हितापेक्षां राष्ट्रहितवर्धनाकडे वळला पाहिजे. व तो तसा वळेल तोच सुदिन होय ! ज्ञानदाना इतकेंच जवळ जवळ पुण्य लोकांना ज्ञानाचीं साधनें सुगम करून देण्यांत आहे. त्यागाचें महत्व फार थोर आहे. त्यागानें मोक्षही प्राप्त होतो व धनत्याग हा तो श्रेष्ठत्याग शिकण्याची पायरी आहे. त्यागाच्याच पायावर आमच्या राष्ट्राची संस्कृति उभारली गेली. पण दुर्दैवाची गोष्ट कीं, आधुनिक कामांत त्यागापेक्षां भोगाकडेच लोकांची प्रवृत्ति होत आहे ! परंतु, सुधारणेच्या या कालांतहि त्यागाचें ध्येय आपल्या उदाहरणानें लोकांच्या डोळ्यांपुढें ठेवणारे जे थोडे थोर गृहस्थ अलीकडच्या काळांत होऊन गेले त्यांत महादेव चिमणाजी यांचें नांव प्रमुखत्वानें गणण्यासारखें आहे. आमच्यांतील श्रीमंत म्हणविणारांनीं असलीं अनुकरणीय उदाहरणें आपल्यापुढें ठेवून देहत्याग करण्यापूर्वी थोडी तरी कीर्ति मागें ठेवून देण्याचा अभ्यास करावा.

चिमणाजीचे तिसरे पुत्र गोविंद; यास पुत्र दोन; विनायकराव व लक्ष्मणराव हे सज्ञान आहेत; विनायकरावास चिंतामणराव व कृष्ण हे विद्यार्थी आहेत; विनायकराव नोकर आहेत; गोविंदचे बंधू विष्णु; यांस पांडुरंग, काशीनाथ व महादेव; पैकीं पांडुरंगराव हे सज्ञान असून, काशीनाथ व महादेव विद्यार्थी आहेत. जनार्दन ऊर्फ जानमानीचे नातू बाबदेव; यांस पुत्र तीन; नारो, बच्याजी व गोविंद; नारो यांस—धोंडो; धोंडोस पुत्र दिनकर व गोविंद; पैकीं

गोविंद यांस पुत्र चार; महादेव, कृष्ण, रामचंद्र व नारायण; रामचंद्र यांस– गोविंद, हरी व कृष्ण; गोविंद मयत; हरीभाऊ हे हल्लीं अव्वल कारकून आहेत; यांना शंकर हा लहान मुलगा आहे; कृष्ण हे हल्लीं गोटण्यास आहेत; हे कुळ-कर्ण्याचें काम करीत आहेत; यांच्या पिढीकडे कुळकर्णीपण असल्यामुळें यांना ' कुळकर्णी आपटे ' असें ह्मणतात; नारायणास दत्तात्रय, पांडु व पुरुषोत्तम असे तीन पुत्र, हे विद्यार्थी आहेत. बाबदेवचे तिसरे पुत्र गोविंद; यांस रामचंद्र व राम-चंद्रास–हरी; यांना पुत्र चार; बाळाजी, विठ्ठल, रघुनाथ व गोविंद; बाळाजीस विश्वनाथ; यांस–नारायण व नारायणास–विनायक, सखाराम व सिताराम; विना-यकाचे पुत्र सितारामपंत व गोपाळ; सितारामपंत सज्ञान असून, गोपाळ मुका आहे. सखारामपंत सज्ञान आहेत. विठ्ठल यांस पुत्र भिकाजी व दामोदर; भिका-जीचे वंशास ( उकिरडे आपटे ) असें ह्मणतात. याचें कारण गांवचा केर टाक-ण्याची जी जागा त्या जागेला उकिरडा असें म्हणतात; भिकाजी यांनीं उकिरड्याचे जागेवर घर बांधिलें म्हणून भिकाजीचे वंशजास ( उकिरडे आपटे ) असें म्हणतात. भिकाजीस पुत्र पांच; पैकीं तिघांचा वंश चालू; गणेश, त्रिंबक व महादेव; गणेश यांस– भास्कर, विश्वनाथ, केशव, चिंतामणी व महादेव; भास्कर यांस–गजाननराव हे सज्ञान असून, आपल्या काशिनाथ मुलासह शिरढोणास असतात; विश्वनाथराव हे सज्ञान असून आपल्या विनायक, रामकृष्ण गणेश व आत्माराम या मुलांसह गांवींच असतात; केशवराव हे आपल्या– भिकाजी, श्रीधर व पांडुरंग या मुलांसह गांवींच असतात; चिंतामणी हे दत्तक गेले; शंकर-राव हे आपल्या दत्तात्रय मुलांसह गांवींच असतात. त्रिंबक याचे बाळकृष्ण व रामचंद्र; बाळकृष्ण हे दामोदर व नीळकंठ यांसह गांवींच असतात. रामचंद्र-रावही गांवींच असतात. महादेव यास दत्तक चिंतामणी, दत्तकनांव गंगाधर यांस मोरेश्वर हा लहान आहे. रघुनाथचे नातू रघुनाथराव मोरेश्वर हे वयोवृद्ध आहेत; गोविंद यांस रामचंद्र; रामचंद्रास पुत्र चार; पैकीं पांडुरंग, यास पुत्र दोन गोपाळ व जनार्दन, जनार्दनपंत हे पोष्टांत नोकर आहेत, यांचे पुत्र विष्णू व वासुदेव आणि गोपाळचे पुत्र गोविंद हे सर्व विद्यार्थी आहेत.

जनार्दन ऊर्फ जानमानीचे दुसरे पुत्र बापू; बापू यांस कृष्ण, गोविंद व गणेश; गोविंदास पुत्र पांच; पैकीं भास्कर व अनंत; यांचा वंश चालू आहे; भास्कर यांस–लक्ष्मण ऊर्फ भाऊ, कृष्ण, बाजी व सदाशिव; लक्ष्मण ऊर्फ भाऊ यास विनायक; विनायकाचे पुत्र तीन; मोरेश्वर, नारायण व पुरुषोत्तम; मोरेश्वर-

पंतास–रामचंद्र व दामोदर; नारायणरावास–विनायक ऊर्फ गोविंद व नरहरी; व पुरुषोत्तमपंतास कृष्ण, विष्णु व महादेव; हीं मुलें सर्व विद्यार्थी असून, वरील तिघे बंधू मु. सिरसाड– बोरवाडी ता. माणगांव येथें शेती करून असतात. कृष्ण यास– रावजी व रावजीस रामचंद्र हा लहान आहे; सदाशिव यांस पुत्र चिंतू, मोरू व गोविंद; चिंतूचे नातू पांडुरंग शिवराम; यांस भास्कर; पांडुरंगपंत हे भास्कर या मुलासह मुंबईस नोकरीवर असतात. पांडुरंगपंताचे चुलत चुलत बंधू लक्ष्मण नागेश हे मुंबई येथेंच यांचेजवळ असतात. भास्करचे बंधू अनंत यांस पुत्र गोविंद, शिवाजी, चिमणाजी व बाळ उर्फ बल्लाळ; शिवाजीस–परशराम, बापू व राम; परशराम यांस–गोविंद व अनंत; गोविंदचा मुलगा विनायक व अनंताचा राम हे लहान आहेत; राम हे दत्तक गेले; बाळ उर्फ–बल्लाळ यास दत्तकपुत्र राम; हे रामचंद्र उर्फ ढवळेबुवा या नांवानें प्रसिद्ध होऊन गेले; रामचंद्र यांचे चुलते शिवाजी हे देवगडास मामलेदार होते. रामचंद्र हे वयाचे १५ वे वर्षी पुण्यास आले. हे रामचंद्र लहानपणापासूनच कडकडीत नियम धर्म करूं लागले. हे पर्वतीवर रोज बाराशें नमस्कार घालीत असत; हे मोठे भगवत्भक्त होते. हे तुळशीबागेंत रोज संध्याकाळीं दोन तास भजन करीत असत; गांवांत कोरडी भिक्षा मागीत असत; त्यावेळीं बरोबर शिष्यमंडळी बरीच असत. गांवांत भिक्षा मागीत फिरतांना, ' शिवहररे शिवहररे सांबसदाशिव शिवहररे ' या मंत्राचा सारखा घोष चालत असे. श्रीमंत रामदुर्गकरीण बाईचे पाय गेले म्हणून कांहीं उपाय करण्याकरितां पुण्यास आल्या; ढवळेबुवांची कीर्ति ऐकून त्या दर्शनास आल्या. तेव्हां ढवळेबुवांनीं त्यांचेवर कृपा केली. श्रीमंत रामदुर्गकरीणबाईचे पाय गेलेले पुनः उत्तम चालूं लागली; हें पाहून पुढें बोवाचें प्रस्त बरेंच वाढलें. मोरोबा दादा ढमढेरे त्यावेळीं पुण्यास मामलेदार होते. मामलेदार ढमढेरे साहेब मोठे शिवभक्त होते, हे मामलेदारसाहेब व बाळाजी नाईक केळकर अशी मंडळी ढवळेबुवांची चहाती होती. रामचंद्र ऊर्फ ढवळेबुवा साठ वर्षांचे होऊन कैलासवासी झाले. यांना पुत्र दोन; शंकर व विश्वनाथ; विश्वनाथाचा पत्ता नाहीं. शंकरराव हे इ. स. १८७३ त सर्वे डिपार्टमेंट मध्यें नोकर होते, पुढें इ. स. १८७५ त राजकोट येथें पोष्टांत नोकरी धरली; माणिकवाडा, गोंडवळसंस्थान या ठिकाणीं असतांना पगार तीस रुपये होता; पुढें पन्नास रुपयावर कल्याण येथें पोस्टमास्तचे जागीं आठ वर्षें होते. नंतर दोन अडीच वर्षें सत्तर रुपयांवर हुबळीस होते; आणि पुण्यानजीक खडकी येथें ऐशीं रुपयांवर असतांनाच यांनीं पेन्शन घेतली. पेन्शन चाळीस

18 APR 1990

रुपये मिळत आहेत. हे शंकरराव पुण्यास अगर श्रीक्षेत्र वाईस असतात; यांचे पुत्र त्रिंबकराव हे सुद्धां पोस्टांत नोकर आहेत. बापूचे तिसरे पुत्र गणेश, यांस पुत्र चार; बच्याजी, विसू, राम व संभाजी; पैकीं विसू व राम या दोघांचा वंश चालू आहे. विसू यांस, हरी, बाळ व चिमणाजी; पैकीं बाळ यांस धोंडदेव; यांस—रामकृष्ण; व रामकृष्णास—गोविंद, गोपाळ व लक्ष्मण ऊर्फ बळवंत; गोविंद याचा—गंगाधर; व गोपाळ याचा—विश्वनाथ हे विद्यार्थी आहेत; बळवंताचे पुत्र हरीभाऊ हे सज्ञान असून नोकर आहेत; यांचे वडिलांनीं इंदोर येथें घर केलें, याच घरांत हल्लीं हरीभाऊ असतात. राम यांस बाळ; बाळ यास शिवराम; यांस-भास्कर व केशव; भास्करास पुत्र विठ्ठल, विनायक व महादेव; विठ्ठलराव हल्लीं बडोदें येथें आहेत; महादेवाचे पुत्र रामचंद्र व काशिनाथ; हे विद्यार्थी आहेत; या मुलांचे आजे भास्कर; भास्कराचे वडील शिवराम हे ब्रह्मावर्तास श्रीमंतांचे आश्रयास होते, श्रीमंत कैलासवासी झाल्यावर श्रीमंतांचे आश्रयानें असलेलीं सर्व कुटुंबें तेथून ज्यांना जिकडे पसंत वाटलें, तिकडे गेलीं, त्याच कुटुंबांतील शिवरामभट हे एक होते, अकस्मित् शिवरामभटांचा अंत झाल्यामुळें शिवरामभटाचें कुटुंब मुलास बरोबर घेऊन बडोद्यास आलें, यावेळीं बडोदें येथें खिचडी मिळत होती. शिवरामभटाचे कुटुंबानें आपल्या मुलास वेदशाळेंत घातलें. आईच्या देखरेखेखालीं खिचडीवर उपजीविका करून भास्करभट हे चांगले वैदिक बनले, या भास्करभटांनींच बडोद्यास घर संपादून केलें; सदरहु घरांतच भास्करभटाचे नातू रामचंद्र व काशिनाथ असतात.

जनार्दन ऊर्फ जानमानी याचे तिसरे पुत्र विठ्ठल; यांना पुत्र चार; नागो, गोविंद, हरी व कृष्ण; गोविंदास मोरू; मोरू यांस—विठ्ठल, बापू व गोविंद; बापू यांस—विष्णु व कृष्ण; पैकीं कृष्ण हे दत्तक गेले; गोविंद यांस—नारायण; नारायणाचे पुत्र शंकर व केसू हे लहान असून विद्यार्थी आहेत; हरी यांस पुत्र सात; पैकीं व्यंकू, बाबूराव, विसू व बाजी; व्यंकू यांस—वामन, रघुनाथ व भाऊ; वामनराव व रघुनाथराव हे रामदुर्ग येथें असतात असें समजतें; बाबूरावचे वामन व राघो; राघोस पुत्र महादेव व घारो; महादेवास पुत्र चार; पैकीं दामोदर हे सज्ञान आहेत; दामोदरपंत हे आपल्या सिताराम, विनायक व बापू या मुलांसह मुंबईस असतात, बाजी यांस—अनंत, यांस पुत्र व गोविंद, शिवरामव व बाळ, गोविंद यांस हरी व हरीस—जनार्दन व वामन; हे जनार्दनपंत व वामनराव गदककडे असतात असें समजतें; शिवरामपंत हे नागोट्यास असतात; यांचे पुत्र पांडुरंगराव

हे तेथेंच असतात. बाळ यांस—गणेश; यांना पुत्र सदू, महादेव व दिनकर; गणपतराव हे तिन्ही मुलांसह मुंबई येथें असतात; विठ्ठलचे चवथे पुत्र कृष्ण; यांस - लक्ष्मण; यांस—भिकाजी व भिकाजीचे दत्तकपुत्र कृष्ण उर्फ दत्तात्रय; हे दत्तात्रय भिकाजी हल्लीं गोटणें येथें पोलिस-पाटिल आहेत; जनार्दन उर्फ आनमानीचे तीन पुत्रांचे वंशज हल्लीं गोटण्यास आहेत; गोविंदचे वंशज कृष्णाजी रामचंद्र कुलकर्णी आपटे हे हल्लीं गोटणें गांवांत सर्वांपेक्षां श्रीमंत आहेत; बापूचे वंशज पांडुरंग शिवराव हे नोकरीकरितां जरी मुंबईला असतात; तरी गोटण्यास घर व उत्पन्न असून नेहमीं जाणें येणें असतें; तसेंच विठ्ठलपैकीं दत्तात्रय भिकाजी हे खास गोटण्यासच असतात; हे सर्व खोत आपटे; यांना खोतीहक्क आहे. म्हणून खोत आपटे असें म्हणतात.

कृष्णंभटमानी यांचे तिसरे पुत्र बाळंभट ऊर्फ बाबुलभट; यांस—बावदेवभट; बावदेवभटास पुत्र चार; गोविंदभट, केशवभट, महादेवभट, व नारायणभट; गोविंदभटाचे दत्तक पुत्र बल्लाळ; यांस—भास्कर, नारो, वासुदेव व लक्ष्मण; पैकीं वासुदेव व लक्ष्मण या दोघांचा वंश चालू आहे. वासुदेवाचा पुत्र गणेश; यांस पुत्र विष्णु, वासुदेव व गोपाळ; वासुदेवाचे पुत्र कृष्णराव हे गोटण्यास आहेत, गोपाळ यांस पुत्र गोविंदराव व रामचंद्रपंत गोविंदराव यांचे पुत्र दत्तात्रय, हे सर्व गोटण्यासच असतात.

## लिंब- गोवें येथील आपटे.

लक्ष्मण बल्लाळ हे देशावर येऊन श्रीमंत रावसाहेब माधवराव बल्लाळ भट पेशवे-मुख्य प्रधान यांचे पदरीं राहिले. इ. स. १७७२ त नोव्हेंबर महिन्याचे १८ वे तारखेस प्रातःकाळीं थेऊर मुक्कामीं श्रीगजाननाजवळ श्रीमंत रावसाहेब पेशवे कैलासवासी झाले. लक्ष्मण बल्लाळ आपटे त्यावेळीं थेऊरास होतेच; श्रीमंतांनीं, या दुखण्यांतून आपण जगणार नाहीं असें जाणूनच, आपले पदरचे विश्वासू नोकरांना देणग्या दिल्या; या देणगींत लक्ष्मण बल्लाळ यांना जी देणगी दिली ती सर्व देणग्यांत मोठी होती. लक्ष्मण बल्लाळ आपटे हे श्रीमंतांचें पदरीं खासगी कार-भारी होते, श्रीमंतांनीं एक लाख रुपये बक्षिस व एक पावती लिहून दिली आहे. सदरहु पावतीचा उतारा—“ अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री लक्ष्मण बल्लाळ गोसावी यांसी—सेवक माधवराव बल्लाळ प्रधान नमस्कार सुमासीन सबैन मया व अलफ तुह्मी व महादाजी बल्लाळ व लक्ष्मण नाईक चाबुकस्वार, या त्रिवर्गांचे निसबतीस खासगीचा ऐवज होता तो हिशोब पाहून त्याप्रमाणें सर-

कारांत भरून पावलों. तुम्हाकडे कागदपत्राचा ऐवजाचा गुंता नाहीं जाणीजे छ. २ साबान बहुत काय लिहिणें मोर्तब. ''

लक्ष्मण बल्लाळचे बंधू भास्कर व नारो हे दोघेही श्रीमंतांचे पदरीं होते. भास्कर बल्लाळ यांस ' सुलतानपूर प्रांत खानदेश येथें तीनशें रुपयांची असामी होती, तसेंच नंदुरबार प्रांत खानदेश येथील फडणिशी नारो बल्लाळचें नांवें होती; शिवाय खाचरोदची फडणिशी नारो बल्लाळकडे होती; यासंबंधीं सांपडलेलीं टिपणें त्याचा उतारा—

" तुकोजी होळकर यांसी—


सकल गुणालंकरण माधवराव नारायण प्रधान यांचा आशिरवाद— नंदुरबार प्रांत खानदेश येथील फडणिशी लक्ष्मण बल्लाळ यांनीं आपले सापत्न बंधू नारो बल्लाळ यांचें नांवें करून घेतली होती; ती रुपये तीनशें. कापड वीस, एकून तीनशेंवीस. ती पुढें लक्ष्मण बल्लाळचे नंतर विसाजी व जनार्दन यांचेकडे आली. छ. ६ साबान सुमासीत समातीन मया व अलफ. ''

" सुलतानपूर प्रांत खानदेश येथील असामी रु. ३०० लक्ष्मण बल्लाळचें सापत्न बंधू भास्कर बल्लाळ यांचे नांवें असलेली, विसाजी व जनार्दन यांचेकडे आली. ''

" रा. महादाजी शिंदे यांस—

माधवराव नारायण प्रधान— तुमचेकडे खाचरोद महाल सरंजामास आहे तेथील फडणिशी नारो बल्लाळ यांचे नांवें रुपये ९१६ ची, त्यांचे वारस विसाजी व जनार्दन यांचेकडे आली. छ. ६ साबान सुमासीत मया व अलफ. ''

लक्ष्मण बल्लाळ आपटे यांनीं दक्षिण प्रांतांतील मिळविलेल्या सनदापैकीं कांहीं येथें देतों—




" रा. रा. लक्ष्मण बल्लाळ आपटे यांसी— आमचे दौलतीवर पेशजी सन समानांत कसाला झाला. ते समयीं दौलतीचे कल्याणाविषयीं, श्रमसाहस बहुतकरून तुम्ही आमचें रक्षण केलें. ते कृतोपकार जाणोन, अमणापूर येथील शंभर बिघे जमीन इनाम दिली आहे '' ही सनद गोपाळ भोसले यांनीं शके १६९२ त दिली. त्यावरून शके १६९९ त मुख्य प्रधान यांनीं वंशपरंपरेची सनद करून दिली; त्याप्रमाणें हल्लीं चालत आहे.




इनाम कमिशन नंबर ६९१२

रा. रा. लक्ष्मण बल्लाळ आपटे यांस—

गंगाबाई निंबाळकर राव रंभाजी जयवंत निंबाळकर यांनीं शके १६९३ त जि० सोलापूर पैकीं सोगांव हा गांव जलतरु, तृणकाष्ट, पाषाण निधि-निक्षेप सहीत इनाम दिला. त्याजबद्दल शके १६९९ त श्रीमंतांनीं वंशपरंपरेची सनद करून दिली. हल्लीं हा गांव लक्ष्मण बल्लाळचे वंशाकडे चालूं आहे. एकंदरींत लक्ष्मण बल्लाळ आपटे यांना श्रीमंतांचे पदरची नोकरी सोडल्यावर अदमासें १८००० हजारांचे उत्पन्न असावें.

लक्ष्मण बल्लाळ यांनीं सातारा प्रांतीं येऊन राहिलेले आयुष्य ईश्वर चरणीं खर्च करण्यास श्रीकृष्णाकाठीं लिंब हे गांव पसंत केलें आणि श्रीमंताकडून सातारा येथील महाराजांचे मार्फत लिंब येथें वाडा बांधण्यास जागा घेतली. हे सद्रहु जागेवर एक मोठा वाडा बांधून राहिले. नंतर आपले वाड्यास लागून श्रीलक्ष्मीनारायणाचें देवालय बांधिलें आणि आपले वाड्यापासून श्रीकृष्णाबाईचें पात्रांत लांबवर मोठा मजबूत घाट बांधिला आहे. शिवाय श्रीलक्ष्मी-नारायणाचें देवळाचे सभों-वार मजबूत तट व देवळाजवळून घाटावर जाण्यास आच्छादित पायऱ्या व अश्व-थ्याचे सुंदर पार हीं कामें सुद्धां फार उत्तम केलीं आहेत. देवालयांतील लांकडी सभामंडप मात्र लक्ष्मण बल्लाळ यांचे दत्तक पुत्र विसाजी यांनीं बांधिला. लक्ष्मण बल्लाळचे नंतर विसाजी यांनीं जुन्या वाड्यास लागूनच एक वाडा बांधण्यास सुरवात केली; सद्रहू वाडा विसाजीचे पुत्र हरी यांनीं पूर्ण केला. हरीभाऊंचे नातू रावसाहेब नरहरराव विश्वासराव आपटे हे हल्लीं त्याच वाड्यांत रहात आहेत.


सातारा शहरापासून लिंब हें गांव ७।७॥ मैलांवर आहे. लिंबासारखें खेडेगांव लक्ष्मण बल्लाळ यांनीं कां पसंत केलें; तें खालील माहितीवरून वाचकांचे सहज लक्षांत येईल; वास्तवीक पहातां श्रीकृष्णाकांठचा प्रदेश सर्व बाजूनीं रम्य आहे; त्यांत लिंब या गांवास लागून, गोवें या गांवचें श्रीकोटेश्वराचे स्वयंभू स्थान फारच मनोहर आहे; लिंब येथील श्रीलक्ष्मीनारायणाचे देवळासभोंवतीं असले-ल्या तटावरून अगर वाड्याच्या गच्चीवरून चोहोंकडे पाहिलें असतां, उत्तरेस जवळच असलेले चंदन— वंदन नांवाचे डोंगरी किल्ले व वाड्याचे पश्चिमेस दीड-मैलावर श्रीकृष्णाकाठीं असलेले मयूरेश्वराचें रम्यस्थान आणि आसमंतांतील

सुंदर देखावा पाहिल्याबरोबर मनाला अतिशय आनंद होणें साहजिक आहे; लक्ष्मण बल्लाळ यांनीं विसाजी यांस दत्तक घेतल्यावर बरेंच वर्षांनीं लक्ष्मण बल्लाळ यांचें कुटुंब गरोदर राहिलें. लक्ष्मण बल्लाळ वारल्यावर कुटुंबास पुत्ररत्न झालें. यांचें नांव जनार्दन असें ठेविलें इ. स. १८१८ त पेशवाई बुडाली तेव्हां इनामाशिवाय सर्व असाम्या बंद झाल्या; परंतु शिंदे यांचे कर्डाल १८०० रुपयांची असामी मात्र चालू होती; पुढें इ. स. १८५७ त शिपायांचे बंडाचे धामधुमींत सद्रहु असामीही बंद झाली. हल्लीं अदमासें ३।४ हजारांचे इनामी उत्पन्न मात्र चालूं आहे.

जनार्दन यांस पुत्र पांच; नारायण, कृष्ण, रघुनाथ केशव व विनायक. विशेषत: विसाजीपंत आपटे यांचे थोरपणाची स्तुति करणें जरूर आहे. कारण सर्व इस्टेट यांचे स्वाधीन असून मनांत अभिलाष न ठेवतां सर्व इस्टेटीचे तीन भाग करून, दोन भाग जनार्दनाचें नावें व एक भाग आपलेकडे याप्रमाणें व्यवस्था केली. आपल्यापेक्षां आपल्या सावत्र भावाचा प्रपंच मोठा हें लक्षांत घेतलें हें नवल नव्हे काय !

विसाजीचे पणतू नरहरराव विश्वासराव हे आपल्या दोन पुत्रांसह लिंब येथेंच आपल्या वाड्यांत असतात. यांनीं इनामी उत्पन्नाशिवाय १२० बिघे रयतावी जमीन खरेदी केली आहे. यांनाच थर्डक्लास सरदारी आहे.

जनार्दनपंत यांचे नातू गणेश नारायण हे अमणापूर येथें असतात. दुसरे श्रीधर विनायक व कृष्णाजी विनायक ऊर्फ काका आपटे; श्रीधर विनायक हे साताऱ्यास कान्हेरे यांचेकडे असतात; कृष्णाजी ऊर्फ काका आपटे यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं नोकऱ्या केल्या. हल्लीं हे सांगली येथील " ऑईल म्यॉनुफ्यॅकचरिंग कंपनीचे " म्यानेजिंग एजंट आहेत. सद्रहु तेलाची गिरणी सांगली येथें स्थापन करण्याकारितां काका आपटे यांनीं फारच परिश्रम केले; सद्रहु गिरणी हल्लीं चालू आहे. यावरून श्रमाचें चीज झालें ह्मणण्यास हरकत नाहीं. श्रीधर यांचे पुत्र बाबूराव सज्ञान असून यांना शंकर नांवाचा मुलगा आहे; काका आपटे यांचे चिरंजीव मनमोहन हे अग्रिकलचर कॉलेजांत असतात. पणतू पैकीं काशीनाथ लक्ष्मण हे मुंबईस नोकरीवर असतात. चिंतामण माहादेव उर्फ मामा आपटे वाई येथें, केशव जनार्दन उर्फ बापूराव आपटे हे असिस्टंट जज्य यांचे कोर्टांत सातारा येथें, सातारा येथें यांनीं खास घर केलें आहे. यांना जनार्दन हा लहान मुलगा आहे; चिंतामण उर्फ मामा आपटे यांस पुत्र



रा. रा. कृष्णाजी विनायक उर्फ काका आपटे,
इनामदार, लिंब–गोवें.



कै० श्रीमंत माधवराव बल्लाळ उर्फ रावसाहेब पेशवे
मुख्य प्रधान.

The Bombay Art Printing Works, Fort.

महादेव, गोविंद व गोपाळ हे विद्यार्थी आहेत. गंगाधर गोविंद हे आजोळी कुळगांव येथें असतात; आतां निपणतू वामनराव नारायण आपटे हे सातारा येथें पी. डब्ल्यू. डी. अकौंटंट आहेत; यांना पुत्र नारायण व केशव; हे विद्यार्थी आहेत; वामनरावांचे चुलते महादेवराव हे कोठें आहेत ते माहित नाहीं; यांचे दोन मुलगे दत्तात्रय व विष्णु हे विद्यार्थी आहेत.

लक्ष्मण बल्लाळचें दत्तक पुत्र विसाजी उर्फ दाजिबा हे श्रीमंत सवाई माधवराव पेशवे यांचे पलंगपट्टाऱ्यावर होते; काव्यइतिहाससंग्रह पान २७८ " लक्ष्मण-बल्लाळ आपटे यांचेकडे सवाई माधवराव यांचे लग्नाचे वेळीं भोजनास व फराळास गृहस्थ सोंवळे होऊन येतील, त्यांना योग्य ठिकाणीं पाटावर बसविण्याचे कामीं नेमिलें होतें. "

लक्ष्मण बल्लाळचे औरस पुत्र जनार्दन यांनीं, इंग्रजसरकारकडे एक अर्ज ' धारवाडचे किल्ल्यासंबंधीं ' केला होता. त्याचे इंग्रजसरकारकडून उत्तर आलें आहे त्याचा उतारा–

No. 1503 of 1843

Political Department.

Bombay Castle
30th June 1843

I am directed by the Hon'ble the Governor in Council, to acknowledge the receipt of your petition-dated the 19th. Instant and to signify to you, that the subject thereof, is under consideration and that an Answer will be returned to you as soon as possible.

By order of the Hon'ble the
Governor in Council.
S. R. Reid.
Chief Secretary to Government.

To,

Janardon Luxaman Aptay Hashabnees of
the Fort of Dharwar.

बाबदेव भटाचे दुसरे पुत्र केशवभट, यांस पुत्र चार; रामाजी, गणेश, संभाजी व बल्लाळ; बल्लाळ हे गोविंदभटास दत्तक गेले; रामाजीस पुत्र गोविंद, केशव व गोपाळ; गोविंद यांस पुत्र चार; वामन, विसाजी, अंताजी व मोरो; वामन यांस पुत्र मोरो, गोविंद, कृष्ण व विष्णु; मोरोचा मुलगा वामन हा लहान आहे; गोविंद व कृष्ण निर्वंश; विष्णुपंत हे पेन्शनर आहेत; यांचे पुत्र दत्तात्रय व विनायक हे विद्यार्थी आहेत; विसाजी दत्तक गेले; अंताजीस–कृष्ण; यांस पुत्र हरी व काशीनाथ; हरी यांस नारायण; नारायणराव यांस पुत्र विश्वनाथ व येशवंत हे लहान आहेत; नारायणराव पुण्यास अगर लिंब–गोव्यास असतात; रामाजीचे दुसरे पुत्र केशव यांस बापू, सखाराम व नारायण; बापूचे दत्तक पुत्र लक्ष्मण ऊर्फ शिवराम; यांचे पुत्र नारायणराव हे सांगली येथें वकील आहेत; यांना त्रिंबक नांवाचा लहान मुलगा आहे. यांनीं सांगली येथेंच घर बांधिलें आहे. सखाराम यांस पुत्र तीन; रामचंद्र, गोविंद व लक्ष्मण; रामचंद्रास–गणेश; गोविंद यांस– केशव, रघुनाथ व विष्णु; लक्ष्मण हा दत्तक गेला. नारायण यांस–विनायक; यांना पुत्र परशराम, पांडुरंग व लक्ष्मण; परशरामचे–रामकृष्णपंत, पांडुरंगचे–केशवराव, व लक्ष्मणराव हे सर्व गोटण्यास आहेत. लक्ष्मणराव यांचा मुलगा भार्गव लहान आहे. रामाजीचे तिसरे पुत्र गोपाळ यांस काशीनाथ व कृष्ण; काशीनाथास पुत्र दामोदर व रघुनाथ; दामोदरास पुत्र गोपाळराव व जनार्दन, गोपाळरावास–रामचंद्र व रामचंद्रपतांस आप्पा; जनार्दनास–काशीनाथपंत; कृष्ण यांस पुत्र विष्णुपंत; विष्णुपंतास पुत्र कृष्णराव व दत्तात्रय; कष्णराव यांचे पुत्र गणपती व दत्तोपंताचे पुत्र नारायण हे विद्यार्थी आहेत.

केशवभटाचे दुसरे पुत्र गणेश; यांचे दत्तक पुत्र त्रिंबक; त्रिंबक यांस पुत्र निळकंठ व आबाजी; निळकंठ यांस आप्पाजी; यांस श्रीधर; व श्रीधर यांस पुत्र पांच. गणेश, सदाशिव, परशराम, वासुदेव व रघुनाथ; गणपतराव यांस पुत्र त्रिंबक, विठ्ठल व महादेव हे विद्यार्थी आहेत; सदाशिवराव यांस पुत्र दत्तात्रय लहान आहे; वासुदेव व रघुनाथ विद्यार्थी आहेत; गणपतराव, सदाशिवराव व परशरामपंत हे सर्व गोटण्यासच असतात; आबाजीचे पुत्र त्रिंबक यांस पुत्र कृष्णराव व गोपाळराव हे गोटण्यासच आहेत; केशवभटाचे तिसरे पुत्र संभाजी; यांस पुत्र विठल व त्रिंबक; विठ्ठल यांस नारायण; यांना विठ्ठल व विठ्ठलास पुत्र सिवरामपंत हे गोटण्यासच आहेत; त्रिंबक हे दत्तक गेले.

# गोटणें-देवाचें येथील वर्णन.

गोटणें हा गांव समुद्रापासून बराच लांब आहे. या गांवास खाडी आहे; परंतु ही खाडी खोत आपटे यांचे घरापर्यंतच आहे. ह्मणजे भरतीचेवेळीं समुद्राचें पाणी खोत आपटे यांचें घराजवळ येतें; भरतीचेंवेळीं खाडींतून होडी खोत आपटे यांचे घराजवळ जातें. या गांवास जाण्यास दुसरा मार्ग डोंगरघाटीचा आहे. हा गांव अगदीं डोंगराचे पायथ्याशीं असून चोहोंबाजूंनीं किल्याप्रमाणें डोंगरी तटबंदी आहे. ह्या गांवचें मधून पूर्व–पश्चिम वाहिनी एक लहानशी नदी वाहते. ह्या नदीचें पाणी इनामदार आपटे यांचीं जेथें घरें आहेत त्यापुढें कांहीं अंतरापर्यंतच गोडें असतें. ह्या गांवचा पूर्वीचा मुख्य देव श्रीगोवर्धनेश्वर होय; हे गोवर्धनेश्वर–शंकराचें स्थान अनादी आहे. श्रीमंत थोरले बाजीराव पेशवे मुख्य प्रधान, यांचे गुरू 'श्री ब्रह्मेंद्रस्वामी' यांनीं श्री भार्गवरामाची मूर्ती, श्रीगोवर्धनेश्वराचें सांनिध्यच स्थापन केली. मात्र देवालय पहिलें अगदीं लहान होतें, तें मात्र मोठें बांधिलें; हें मोठें देवालय बांधिलें तेव्हां 'श्रीब्रह्मेंद्रस्वामीनीं' श्रीभार्गवरामाचे दर्शन मुख्य सभामंडपांतूनही व्हावें अशा योजनेनें बांधिलें, त्या योगानें श्री गोवर्धनेश्वराचें दर्शन घेणें झाल्यास गाभाऱ्याचे दरवाजांतून वांकून उजवे हाताकडे पाहिल्याशिवाय दर्शन होत नाहीं. आरती धुपारती नैवेद्य वगैरे प्रथम श्रीगोवर्धनेश्वरास दाखवून झाल्यावर मग श्रीभार्गवरामास दाखवितात. श्रीभार्गवरामाची गोटणें गांवीं स्थापना झाल्यामुळें, या गांवाचें बरेंच रूपांतर झालें. हा गांव श्रीब्रह्मेंद्रस्वामीनीं श्रीमंत थोरले बाजीराव यांचेकडून श्रीभार्गवरामदेवास देवविला; तेव्हांपासून नुसतें गोटणें असें न म्हणतां, 'गोटणें—देवाचें' असें कागदोपत्रीं दाखल झालें.

गोटणें–देवाचें हा गांव श्री भार्गवरामास मिळाल्यावर, गांवचा वसूल करून, देवाचा उत्साह, पूजा व नैवेद्य वगैरे सर्व व्यवस्था पहाणे करितां, श्रीस्वामीनीं, तेथील आपटे यांना नेमिलें. याजबद्दल प्रथम श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनीं आपटे यांना सनद करून दिली होती, असें पुढील सनदेवरून व्यक्त होत आहे.

दाखल नं ......
भोर

लिंब–गोवेंचे नारायण हरी आपटे यांचे जवळील अस्सल वरून

**नक्कल**

श्री
राजाराम
नरपती हर्ष निधान
मा. ब. मु. प्र.

राजेश्री गणेश केशव उपनाम आपटे गोत्र कौशिक सूत्र हिरण्यकेशी शाखा तैतीर्य गोसावी यांसी-

सेवक माधवराव बल्लाळ प्रधान, नमस्कार सुरुसन सीत सीतैन मया व अल्फ शके १६८७ पार्थीव नाम संवत्सरे. तुह्मी हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती केली कीं, मौजे गोटणें–देवाचें ता० राजापूर सुभे मजकूर येथें श्रीदेव भार्गव आहे त्यास मौजे मजकूर हा गांव श्रीकडे इनाम पेशजीपासून आहे. तेथील श्रींचें तर्फेनें गांवची कमावीस व श्रीकडील खर्चाची देखरेख आपणांस परमहंस भार्गवरामबावा यांणीं सांगोन वेतन सालीना नक्त रुपये शंभर व गल्ला भात कैली चौशेरी बारोली मोद अडीच खंडी येणेप्रमाणें करार करून देऊन पत्र करून दिल्हें. त्याजप्रमाणें श्रीमंत कैलासवासी नानासाहेब यांनीं करार करून सनदा करून दिल्या आहेत. त्याप्रमाणें चालत आहे. त्यास स्वामींनीं कृपाळू होऊन आपणाजवळ परमहंस भार्गवरामबावा यांचे पत्र सरकारच्या सनदा आहेत त्या पाहोन भोगवटी यांस वंशपरंपरेनें पत्रें करून दिलीं पाहिजेत ह्मणून त्याजवरून तुह्मावरी कृपाळू होऊन तुह्माजवळ परमहंस भार्गवरामबावा यांचे पत्र व तीर्थरूप कैलासवासी नानासाहेब यांनीं सनदा करून दिल्या आहेत त्या पाहून श्रीचे तर्फेनें मौजे मजकूरची कमावीस व श्रीकडील खर्चाची देखरेख तुह्मास वंशपरपरेनें करार करून देऊन वेतन सालीना मौजे मजकूरचे ऐवजीं नक्त रुपये १०० शंभर व गल्ला भात कैली चौशेरी बारोली मोद खंडी २॥ अडीच करार करून देऊन हें पत्र करून दिलें असे. तरी श्रीकडील खर्चाची व गांवची कमावीस करून सदरहु प्रमाणें शंभर रुपये व अडीच खंडी भात मौजे मजकुरचे ऐवजीं साल दरसाल घेऊन तुह्मी वडिलाचे पुत्रपौत्रादी. वंशपरंपरेनें श्रीची सेवा करून वेतन अनुभवीत जाणे. जाणीजे

छ. १५ जमादिलावल आज्ञा प्रमाण. [ लेखन सिमा ]

सदरहु सनद गणेश केशव आपटे यांनीं संपादन केली. गणेश केशव आपटे यांचे खापरपणतू रा. कृष्णाजी त्रिंबक हे हल्लीं गोटण्यास असून वरील सनदे-प्रमाणें सर्व गांवची व श्रीची व्यवस्था पहात आहेत.

गणेश केवश यांचे दोन सख्खे बंधू व दोन चुलत बंधू असें पांच इसमांचें नावंची सनद मिळाली आहे. सदरहु अस्सल सनदही रा. नारायण हरी आपटे यांचेजवळ आहे.

## नक्कल.

| |
|---|
| श्री.<br>राजाराम नरपती<br>हर्षनिधान माधव-<br>राव बल्लाळ<br>मुख्य प्रधान |

मा। अजम देशमुख व देशपांडे ता। राजापूर सुभे मजकूर यांसी—माधवराव बल्लाळ प्रधान सु॥ आर्बे सितैन मया व अलफ शके १६८५ सुबाहुनाम संवत्सरे राजश्री रामाजी केशव व बाळाजी गोविंद व गणेश केशव व संभाजी केशव व शंकराजी नारायण उपनाम आपटे गोत्र कौशिक शाखा तैतीर्य सूत्र हिरंण्यकेशी वास्तव्य मौजे गोटणें—देवाचें ता। मजकूर यांणीं हुजूर कसबे पुणें येथील मुक्कामीं येऊन विनंती केली ती मनांत आणितां कीं आपण कुटुंब वत्सल आहों योगक्षेम चालला पाहिजे यास्तव स्वामीनीं कृपाळू होऊन कांहीं बागाईत व जिराईत जमीन नूतन इनाम पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें करून दिली. यास कुटुंबाचा योगक्षेम करून राजश्री स्वामीस व स्वामींचे राज्यांस अभिष्ट चिंतून सुखरूप राहूं म्हणून त्यावरून पंधरा बिघे जमीन तालुके विजयदुर्ग पौ। राजश्री नारो त्रिंबक मामलेदार ता। मजकूर यांस पत्र सादर करून जमिनीची चतु:सीमा करून आण-विली तें मनास आणून हे कुटुंबवत्सल यांचें चालवणें अवश्यक जाणून याजवरी कृपाळू होऊन यास गांवगन्ना ता। राजापूर प्रां मजकूर पौ। जमीन बागाईत व जिरा-ईत चतु:सीमापूर्वक याचे दुमाला करून देऊन यांस व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनें इनाम चालवीत जाणें. प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणें. या पत्राची प्रती लेहून घेऊन हें अस्सल पत्र भोगवटी यांस परतोन देणें जाणीजे छ. २० रबिलावर आज्ञा प्रमाण. [ लेखन सिमा ]

गोटणें—देवाचें येथें आपटे या आडनांवास पूर्वींपासून जीं विशेषणें पडलीं आहेत तीं हल्लींही चालू आहेत तीं येणेप्रमाणें—–इनामदार आपटे, खोत आपटे, देवळे आपटे, पुराणिक आपटे, कुलकर्णी आपटे व शेवटे उर्फ शेवडे आपटे; या सर्वांचे वंशज हल्लीं आहेत. गोटणें या गांवास ज्या डोंगरीवाड्या आहेत त्या

घाटच्यांत कांहीं घाट्या मजबूत पायऱ्याच्या आहेत. या घाटीवरून उतरतांना कांहींच त्रास होत नाहीं; या घाटच्यापैकीं एक दोन घाटीरस्ते व श्रीनवलाईचें देवळाचा जीर्णोद्धार बऱ्हाणपूर येथील सरदार भुस्कुटे पैकीं कोणीं एकानें केला आहे. इनामदार आपटे यांनीं फरशीचा रस्ता, आपले घरापासून तों श्रीभार्गवरामाचे देवळामार्गें नदीपर्यंत बांधिला आहे. श्रीभार्गवरामाचे देवालय नदीचे कांठींच आहे. या देवस्थानाचे योगानें या गांवास विशेष रम्यता आली आहे. एकंदरीत देवस्थानाची व्यवस्था बरी आहे.

पुणें शहरांत शनवार पेठेंत नदीचे कांठीं, गोविंद रामाजी, किंवा अंताजी गोविंद; या दोघांपैकीं एकानें मोठा विस्तीर्ण वाडा बांधून नदीस घाटहीं बांधिला आहे. हल्लीं सदरहु घाट व वाडा मजबूत आहे. वाड्याचा मुख्य पुढील चौक दुसऱ्याकडे गेला असें वाटतें ! मात्र मागील चौक अद्यापी आपटे यांचेकडे आहे. या मागील भागांत लिंबचे सरदार आपटे यांचा कांहीं भाग आहे. रा. विष्णु वामन पेन्शनर यांचाही कांहीं भाग आहे; अंताजी गोविंद आपटे यांना श्रीमंत पेशवे यांचेकडून दरसाल पगार २०० रुपये व कांहीं वर्षासनें होतीं; ज्यावेळीं वाडा बांधिला त्यावेळीं या आपटयांची सावकारी मोठी असावी असें वाटतें. कारण मिरजकर संस्थानिक पटवर्धन यांना आपटे यांनीं कर्जाऊ रक्कम दिली होती.

गोविंद रामाजीचे बंधु गोपाळ रामाजी; विजयदुर्गचे किल्लेदार होते असें समजतें. गोपाळराव यांचे चिरंजीव कृष्णाजी हे देशावर आले. कृष्णाजी गोपाळ हे देशावर येऊन हनगंडीकर देसाई यांचेजवळ नोकर राहिले. कृष्णाजींचे बंधू काशिनाथ यांची बायको सती गेली ! काशिनाथ यांचे पुत्र दामोदर व रघुनाथ; हे देशावर येऊन चुलते कृष्णाजी गोपाळ यांचेजवळ राहिले. हल्लीं दामोदरचे पुत्र गोपाळ व कृष्णाजीचे पुत्र विष्णू हे हनगंडीकर देसाई यांचेकडे नोकर आहेत. गोपाळ यांचे पुत्र रामचंद्र व पुतणे काशिनाथ जनार्दन हे सज्ञान आहेत. गोपाळपंतांचे नातू आपा हा लहान आहे; विष्णुपंतांचे पुत्र कृष्णाजी व दत्तात्रय; विष्णुपंत व कृष्णाजी हनगंडीस आहेत. कृष्णाजीचे पुत्र गणेश लहान आहेत. दत्तात्रय विष्णु हे बी. ए. आहेत. दत्तात्रय विष्णु हे सार्वजनिक कामाचे मोठे अभिमानी आहेत. हे गरीबास विद्यामृत मोफत पाजीत आहेत; यांना पुत्र नारायण हा विद्यार्थी आहे.

बाचदेव भटाचे चवथे पुत्र नारायणभट; यांस पुत्र शंकरभट; हे देशावर आले. शंकरभटाचे पुत्र सदाशिवभट हे मोठे खटपटी असावेत, कारण यांचे वडील

साताराप्रांतीं येऊन, सातान्याजवळ मौजे खंडोबाची पाल ह्मणून एक खेडेगांव आहे. येथें आल्यावर सदाशिवभटांनीं घर वगैरे केलें. या गांवास खंडोबाचें दैवत आहे. ह्या देवाची जत्रा पौष शुद्धांत मोठी भरते; अशा या पाल गांवीं शंकरभटांनीं वास्तव्य केल्यावर पुढें सदाशिवभटांनीं दोन सनदा मिळविल्या; त्यांची नक्कल येणेप्रमाणें—

## श्री.

राजेश्री सदाशिवपंत आपटे गोसावी यांसी स्नेहांकित मोकदम मौजे पाल सुमासीत समानीन मया व अलफ कारणे लिहून दिल्हे कौल ऐसाजे- जावल्याचे शेजारचे पड जमीन परसू बैरण व गुरे बांधण्यास जागा नाहीं ह्मणून आह्मास तुह्मी जागा मागितली त्यावरोन परसू नजीक जावल्याची शेर ताटवा दक्षिणेस श्रीआईचे वाटपर्यंत जागा तुह्मास नेमून दिली असे जाणीजे चंद्र ९ माहे रमजान शके १७०७ विश्वावसू नाम संवत्सरे आषाढ शु० एकादशी, सदरहु प्रमाणें अनभवून सुखरूप राहणें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

| श्री मार्तंड प्रसन्न<br>कुसाजी जाधव<br>शिक्का |
|---|

बी॥ विठ्ठल जनार्दन कुलकर्णी मौजे मजकूर.
नोंदणी नंबर २०२८ दप्तर सातारा.
ता. २४ आकटोंबर सन १८५४ इसवी.

जीमे वासुदेव कारकून दप्तर.

दुसऱ्या सनदेची नक्कल.

श्री अंबा प्रसन्न

राजश्री सदाशिव शंकर आपटे गोसावी यांसी—इनाम पत्र बेशमी मुकदमा मौजे पाल ता. उंबरज प्रांत कऱ्हाड सुमासमान समानीन मया व अलफ कारणे लिहून दिल्हें इनामपत्र ऐसाजे- तुह्मी आह्मास विचारलें कीं, आह्मी तुमचे गांवांत २०।२५ वर्षे वास्तव्य केलें त्यास श्रीडोंगर विंध्यवाशीनीस फुलें—तुळशी करावयासी श्रीचे वाटेवरील एखादे दळें पाहून दिली यास फुलें-तुळशी करूं, त्याजवरून तुह्मास कुसाजी जाधव याजब॥ डाग जमीन बीघे ८३॥ साडेतीन नजीक कावळीचा ओढा करार करून दिली असे. सदरहु तुह्मी फुलें तुळशी करून आपले पुत्रपौत्रादी वंशपरंपरेनें अनुभबून सुखरुप राहणें. मागेंपुढें आह्माकडूनही हरकत होणार नाहीं. हें इनामपत्र लिहून दिल्हें सही शके १७०९ प्लवंगनाम संवत्सरे श्रावण कृ॥ पंचमी ता. ४ जिलकाद

[ शिक्का. ]   निशाणी नांगर.

सदाशिवपंतांचे–निपणतू हरीभाऊ पाल येथें हल्लीं आहेत; खापरपणतू गोविंद सदाशिव हे शके १७९२ त आषाढ कृष्ण १३ रोज मंगळवारीं पाल येथेंच जन्मले. पुढें पुणें येथें अभ्यास करून इ. स. १८९० सालीं म्याट्रीक झाल्यावर फर्ग्यूसनकालेजांत जुनागड स्कालर होते. उजैन येथें कॉलेजांत फुकट शिक्षण होतें ह्मणून उजैन येथें गेले. इ.स. १८९३ त इंटरमिजियेट झाले–अलाहाबादयुनिव्ह-र्सिटीची स्कॉलरशिप मिळाली. इ. स.१८९५ त बी. ए. झाले व उजैन कॉलेजांत सायन्सचे असिस्टंट प्रोफेसर झाले. इ० स० १८९९ त व्हिक्टोरीया कॉलेजांत लष्कर–ग्वालेर येथें बदली झाली. १९०२ सालीं बी. एस्. सी झाले. केमि-स्ट्रींत ऑनर्स मिळाले नंतर १९०५ सालीं केमिस्ट्रींत एम् . ए. झाले. १९१२ पर्यंत वरील कॉलेजांत केमिस्ट्रीचे प्रोफेसर होते. हल्लीं कॉलेजिएट हायस्कूलमध्यें हेडमास्तर आहेत. यांना ज्योतिषविषयाचा नाद १८९३ त लागला. इ. स. १९०३ सालीं मुंबईस पंचागशोधन सभेला उज्जनीच्या पंडिताश्रम सभेकडून हे प्रतिनिधी निवडून गेले होते. ‘ ज्योतिर्गणितवार्तिक ’ ह्मणून संस्कृत पद्यरूपानें यांनी एक ग्रंथ लिहिला आहे; तो अजून पुरता प्रसिद्ध व्हावयाचा आहे. यांनीं आपले पाल गांवीं, **विद्याप्रवर्तक संस्था** ह्मणून एक संस्कृत विद्येकडे व धर्माकडे लोकांची अभिरुची लागण्याकरितां संस्था काढली आहे.

## जमखंडी येथील आपटे.

पिलंभटमानी हे त्रिंबकहून, गोटणें-देवाचें येथें महादेवभटाचे आधीं गेले. पिलंभटाचे पुत्र कृष्णमानी; यांस पुत्र विठ्ठलमानी; यांस पुत्र चार; बाळाजी, अंताजी, महादेव व बाबदेव; बाळाजी हे देशावर कर्नाटकांतील सोंडूर संस्था-नचे पदरीं नोकर राहिले. बाळाजीपंतास पुत्र चार; रामराव, सुब्राव, विसाजी व भिमराव; पैकीं विसाजी हे मोठें धूर्त व पराक्रमी होते; परशरामभाऊ पटवर्धन यांनीं हैदरअलीवर स्वारी केली तेवेळीं एकेप्रसंगीं विसाजीपंत आपटे यांनीं चांगली कुमक केली म्हणून भाऊसाहेब याणीं सोंडूरकराजवळ विसाजीपंत आपटे यांस आपले तैनातीस देण्याविषयीं गोष्ट काढली; त्यावरून सोंडूरकरांनीं मोठ्या सन्मानानें ही गोष्ट कबूल केली व आपटे यांना परवानगी दिली. विसाजीपंत आपटे यांणीं यजमानांचा हुकूम नम्रतेनें स्वीकारला. भाऊनीं, त्यांना बरोबर आणिलें व जमखंडी येथें पन्नास स्वारांची शिलेदारी सांगितली. शिवाय देसगतीचें ह्मणजे सरकारी वसूलाचें काम सांगितलें. हें वसुलाचें काम पुढें पुष्कळ

वर्षेंपर्यंत या पुरुषाचे वंशजाकडे होतें. परंतु तें हल्लीं नाहीं. मात्र विसाजीपंताचे हल्लीं जमखंडी येथें जे वंशज आहेत त्यांचे घरांत ' घोरपडी रंगाची ' आबदागिरी अद्यापि झळकत आहे. ' घोरपडे रंगाची ' आबदागिरी पांढऱ्या व काळ्या रंगाच्या पट्याची आहे. विसाजीपंत सुभेदार उर्फ बिनिवाले असें म्हणत असत. विसाजीपंताचे वंशजास ' बिनिवाले आपटे असें म्हणतात. विसाजीपंतास पुत्र चार, धोंडो, कृष्ण, येशवंत व नारायण. धोंडोस पुत्र विसाजी, गोपाळ व शिवबा. विसाजीस पुत्र नऊ; पैकीं दामोदर, वासुदेव, सखाराम, विठल, विनायक व काशिनाथ; दामोदर हे पुणें येथें मोरोबादादा फडणवीस यांस दत्तक गेले; वासुदेवाचा– दत्तात्रय; दत्तोपंत हे जमखंडी येथें नोकर आहेत; यांना पुत्र विश्वनाथ व कृष्ण हे विद्यार्थी आहेत. सखाराम यांचा दत्तक पुत्र गोविंदराव हे रेलवेंत नोकर आहेत; यांचे बाळकृष्ण, शाबू, राम व लक्ष्मण हे चार पुत्र विद्यार्थी आहेत; विठलाचे पुत्र व्यंकटराव हे जमखंडी येथें नोकर आहेत; यांचे पुत्र श्रीपाद व रामू विद्यार्थी आहेत. विनायकास पुत्र सदाशिव व गोविंद; गोविंद दत्तक गेले; सदाशिवाचे पुत्र तीन; विनायकराव हे जमखंडीस नोकर आहेत; गणपत व नरहरी घरींच आहेत. काशिनाथ हे दत्तक गेले.

धोंडोचे दुसरे पुत्र गोपाळराव हे मामलतीवर होते, यांस पुत्र चार; हरी, धोंडो, चिंतामणी व रामभाऊ; हरीचा निर्वंश; धोंडो ऊर्फ दादा हे हल्लीं पेन्शनर आहेत; यांचे पुत्र गोपाळराव शेती वगैरे करितात; यांचे पुत्र दत्तात्रय व हरी हे विद्यार्थी आहेत. " रा. धोंडोपंतदादा यांनींच पिलंभटमानीपर्यंत वृक्षाची माहिती दिली; " चिंतामणराव शेती व व्यापार करितात. तिसरे पुत्र " शिवबा हे पुण्यास मोरोबादादा फडणवीस यांना दत्तक गेले; यांना पुत्र न झाल्यामुळें, पुतणे दामोदर यांस दत्तक घेतलें; दामोदराचे पुत्र महादेव उर्फ अप्पासाहेब फडणवीस भानू हे हल्लीं पुणें येथें आहेत. "

विसाजीचे दुसरे पुत्र कृष्ण; यांस गोविंद, पांडुरंग व विनायक; पांडुरंगास पुत्र चार; बळवंत, कृष्ण दत्तात्रय व सुब्राव; बळवंतचे पुत्र त्रिंबकराव हे मंगळवेढें येथें नोकर आहेत; कृष्णाजीपंत हे पंढरपूर येथें आहेत, यांचे पुत्र श्रीपादराव आहेत; दत्तात्रय हे पेन्शनर असून जमखंडी येथें असतात; यांचे पुत्र गोविंदराव हे सरकारी डॉक्टर आहेत. यांस मुलगा मधुकर; व बंधु गोपाळ हा विद्यार्थी आहे. विश्वनाथ ऊर्फ सुब्राव हे रेलवेंत लोकोऑफिसांत आहेत; यांना पांडु, विष्णु, व्यंकू, गंगाधर व गणपती; असे पांच पुत्र असून ते विद्यार्थी आहेत. विनायकास पुत्र

तीन; रामचंद्र, भीमराव व विठल; रामचंद्रपंत हे कुन्हळी येथें शेती व सावकारी वगैरे करून असतात; यांचे पुत्र विनायक, नागेश व काशिनाथ हे विद्यार्थी आहेत; भीमराव व विठलराव यांचे जमखंडी येथें निरनिराळे खास वाडे असून शेती व व्यापार करीत आहेत; भीमराव यांचे पुत्र शंकर, विष्णु, विश्वंभर, केशव व लक्ष्मण हे विद्यार्थी आहेत; विठलराव यांचे पुत्र भालचंद्र व विश्वनाथ हे विद्यार्थी आहेत. विसाजीचे तिसरे येशवंत दत्तक गेले व चवथे नारायण यांस पुत्र दोन; बाळाजी व वामन; वामनरावांस आत्माराम व गोविंद; आत्मारामास पुत्र दोन विश्वनाथ व वामन; विश्वनाथराव हे बा. ए. असून हल्लीं पुणें येथें न्यूइंग्लिशस्कूलमध्यें शिक्षक आहेत; वामन हा विद्यार्थी आहे; बाळाजी नारायण आपटे हे मोठे शूर होते. यांना लष्करी खात्यांत नोकरी करण्याची हौस उत्पन्न झाल्यामुळें सरदार जमखंडीकराचे पदरीं एकादी हुद्याची जागा मिळण्याविषयी खटपट केली; परंतु, त्याकामीं यश न मिळाल्यामुळें त्यांनीं इंग्रजी फौजेंत नोकरी धरली. इ. स. १८६१ त जमादाराचे जागीं कायम झाले. इ. स. १८६३ त नायब रिसालदार झाले. इ. स. १८६५ त अक्टिंग वर्दीमेजर होते. इ. स. १८७४ त यांना पेन्शन झाली. इ. स. १८७४ चे आधीं दोन वर्षें हे आजारी असल्यामुळें जमखंडीस आले होते.

हे पेन्शनर झाल्यावर बहुतेक मिरज अगर कुरुंदवाड येथेंच राहिले होते. बाळाजी नारायणासारख्या कर्तृत्ववान पुरुषावर कोण खुष होणार नाहीं. सरदार बाळासाहेब कुरुंदवाडकर यांनीं बाळाजी नारायण आपटे यांना शेतजमीन दिली. ती हल्लीं यांचे वंशजाकडे चालू आहे. बाळाजीपंत निपुत्रिक असल्यामुळें, बंधू वामन, याचे नातू विश्वनाथ व वामन हेच हल्लीं त्यांचे वारस आहेत. बाळाजीपंताचे कुटुंबही हल्लीं आहे. विसाजीचे बंधू भीमराव; यास पुत्र महादेव; महादेवाचे पुत्र तीन; बाबजी दत्तक गेले; जिवाजीचे विठलराव हे कुप्पळ येथें असतात; रामाजीचे पुत्र दत्तात्रय हे रामदुर्ग नजीक संगळ येथें असतात.

विठलमानीचे दुसरे पुत्र अंताजी; यांस पुत्र तीन; कृष्णजी, नारायण व हरी. कृष्णाजीस पुत्र तीन; सखो, बाबजी व नारो; नारायणास पुत्र महादेव. यांस पुत्र तीन; गोविंद, बाळंभट व सदाशिव; गोविंद यांस पुत्र दोन; दामाजी व बाळकृष्ण; नारायणाचे पुत्र महादेवभट महाजणी हेच अंजनवेल येथें गेले, यांचे वंशजांची घरें हल्लीं अंजनवेल येथें आहेत. गोविंदाचे दोन पुत्रांपैकीं बाळकृष्ण याचा दत्तकपुत्र श्रीधर हे श्रीधरपंत आपटे गव्हरमेंट इंजिनीयर खात्यांत प्रथम

नोकर होते पुढें जी. आय. पी. रेलवे इंजिनीअर आफिसांत अकौंटंट होते; यांना १२० रुपये पेन्शन झाली असून हल्लीं नाशिक स्टेशनजवळ चांगल्या हवेवर राहिले आहेत; हे गरीब स्वभावाचे असून यांचा पोषाख अगदीं साधा असतो; यांना पुत्र चार; पहिले शंकरराव मेडिकल कॉलेजांत अभ्यास करून आतां एल्. एम्. च्या परिक्षेस जातील; दुसरे येशवंत हे रेलवेंत नोकर आहेत; तिसरें पांडुरंग व सदाशिव हे कॉलेजांत आहेत.

बाळंभटाचे पुत्र सात; पैकीं गणेश व अंताजी यांचाच वंश चालू आहे. गणेश यांस पुत्र तीन; पैकीं. बळंवत व वासुदेव यांचा वंश चालू आहे. बळवंत यांस पुत्र चार; भास्कर, श्रीधर, गंगाधर व दिनकर; भास्करराव हे हल्लीं जळगांव येथें आहेत. यांना शाळाखात्यांतून ३० तीस रुपये पेन्शन मिळत आहे; यांच्या मुलाचें नांव रघुनाथ; दुसरे श्रीधर हे दत्तक गेले; तिसरे गंगाधरराव हे पेन्शनर असून, यांचे पुत्र पुरुषोत्तम हे सज्ञान आहेत; चवथे दिनकरराव हे रेल्वेपोष्टांत नोकर आहेत. वासुदेवाचे पुत्र त्रिंबकराव हे पब्लिकवर्क डिपार्टमेंटमध्यें हेड्क्लार्क होते; हल्लीं त्यांना पंन्नास रुपये पेन्शन झाली आहे; याचे पुत्र हरी हे कॉलेजांत आहेत, अंताजीचे पुत्र चिंतामण व महादेव; चिंतामणीस पुत्र तीन; केशव, यज्ञेश्वर गणेश; केशवराव यांस पुत्र महादेव व चिंतामण. चिंतामणराव हे स्टीमर कंपनींत नोकर आहेत; महादेवराव यांना पुत्र नरसिंह व भार्गव हे विद्यार्थी आहेत; महादेवराव मुलें व वडील यांसह अंजनवेल येथेंच असतात; यज्ञेश्वरपंत हे आपल्या व्यंकटेश, शंकर व मोरेश्वर या तिन्हीं मुलांसह अंजनवेल येथेंच असतात; गणपतराव बडोद्यास नोकर आहेत.

महादेवभटाचे तिसरे पुत्र सदाशिव यास केशव; यांस काशीनाथ व सखाराम; पैकीं सखारामास पुत्र रामचंद्र व कृष्णाजी. रामचंद्रास पुत्र सितारामपंत हे अंजनवेल येथेंच आहेत; यांना पुत्र तीन; दामोदर, पांडुरंग व अच्युत; दामोदरपंत व्यापार वगैरे करितात आणि पांडुरंग व अच्युत हे विद्यार्थी आहेत. कृष्णाजीपंत हे चिपळूण येथें वकिली करीत होते; यांनीं चिपळूण येथेंच घर केलें आहे. यांना पुत्र तीन; वासुदेव, वामन व सदाशिव; पैकीं वामनराव मुंबईस व्यापार करितात व दोघे घरीं शेती वगैरे करितात; वासुदेवराव यांचे पुत्र दत्तात्रय, व वामनरावांचे पुत्र विनायक व श्रीधर हे लहान आहेत.

अंताजीचे तिसरे पुत्र हरी; यांस चिमणाजी; यांना पुत्र विठ्ठल व अनंत; विठल याचे पुत्र वासुदेवराव हे हल्लीं गोटणें येथें आहेत; अनंताचे पुत्र परशराम;

18 JAN 1994

यांस गणेश हे मुंबईस असातात; यांचे पुत्र शंकर व दिनकर; शंकरराव हे सज्ञान असून दिनकर हा विद्यार्थी आहे.

विठलभटाचे तिसरे पुत्र माहादाजी; यांस गणेश; गणेश यांस मुलगे तीन; बाबजी ऊर्फ भीमराव, गोपाळ व कृष्ण; बाबजी यांस नारायण; गोपाळ यांस पुत्र गणेश व त्रिंबक; गणेश यांस विष्णु; त्रिंबक हा पुरुष ता. देवगड पैकीं दाभोळें येथें गेला; त्रिंबक यांचे वंशज बहुतेक सर्व मुंबईसच आहेत. त्रिंबक यांस पुत्र विनायक व नारायण; पैकीं नारायणास मुलगे पांच; हरी, लक्ष्मण, गोविंद, गोपाळ व गणेश; हरीचे पुत्र केशवराव हल्लीं वऱ्हाडांत शाळामास्तर आहेत; लक्ष्मण यांचे पुत्र चार; कृष्ण, वामन, शंकर व महादेव; कृष्णराव यांस पुत्र गोपाळ, कृष्णराव शिक्षक आहेत; हे मुंबई येथें असतात. वामनराव, शंकराव व महादेवराव मुंबई येथें नोकर आहेत. गोविंद यांचे पुत्र दोन शिवराम व नागेश; शिवरामपंत हे सावकारी नोकरी करीत असून नागेश विद्यार्थी आहे. गणेशपंत हे खानावळीचा उद्योग करीत आहेत. यांना पुत्र, दत्तात्रय व विठल हे सज्ञान आहेत. शिवरामपंत व गणेशपंत हे मुंबईसच असतात.

विठलमानीचे चवथे पुत्र बाबदेवमानी; यांस पुत्र केसो, रघुनाथ, विठल व महादेव; पैकीं विठल यांस पुत्र दोन. हरी व भिकाजी. हरी यांस रामचंद्र; यांस गणेश; यांस दत्तक गोविंद; यांस पुत्र चार; नारायण, वामन, भास्कर व विसाजी; पैकीं विसाजीस पुत्र दोन; चिंतामण उर्फ अप्पा व हरी, हरी हा अल्पवयांतच वारला. चिंतामण उर्फ अप्पा यांस पुत्र रामचंद्र व कृष्ण; हे लहान आहेत. विठलचे पुत्र भिकाजी व हरी; हे बंधुद्वय देशावर मिरज येथें आले; पैकीं हरीचे वंशज अप्पाराव आपटे हे हल्लीं मिरज येथें वडिलार्जित घरांत रहात असून व्यापार करीत आहेत. यांनीं तालमीचा व्यासंग बराच केल्यामुळें, शरीरप्रकृती सशक्त आहे. यांचे वडील विसाजीपंत हे स्नानसंध्येशील होते. यांचीही शरीरसंपदा चांगली होती. भिकाजीचे पुत्र विठल; यांस पुत्र चार; महादेव, हरी, गोविंद व गोपाळ; महादेवास पुत्र लक्ष्मण व केशव; लक्ष्मणाचे—बळवंत; यांस पुत्र बंडू व विष्णू हे दोघे विद्यार्थी आहेत. केशवाचे पुत्र दत्तात्रय; यांस पुत्र शंकर; हे दत्तात्रय संस्थानांत नोकर आहेत, मुलगा लहान आहे; हरी यांस पुत्र रामचंद्र व कृष्ण; रामचंद्रास मुलगे पांच; गणेश, सखाराम, महादेव, विठल ऊर्फ बापू व दत्तोपंत; गणपतराव हे सांगली इलाख्याचे सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस आहेत; यांनीं या

खात्यांत पुष्कळ वर्षे काम केलें; आतां हे पेन्शनला आले आहेत; सखारामपंत हे एक मुलगा अनंत हा झाल्यावर दत्तक गेले; सखाराम हे पाटणकरास दत्तक गेले, यांचा मुलगा मात्र आपटे आहे. महादेवराव हे अपकारी सब इन्स्पेक्टर आहेत; यांना मुलगा भगवान हा लहान आहे. विठ्ठल ऊर्फ बापूराव हे बरींच वर्षे सदर्न-मराठा रेलवेंत फौजदार होते; हल्लीं पुण्याहून बदलून सोलापूर येथें गेले होते. हे नुकतेच पुणें जिल्ह्यांत पोलीस इन्स्पेक्टर झाले आहेत. दत्तोपंत हे वारले, यांचे मुलगे बंडू व रघू हे विद्यार्थी आहेत. कृष्ण यांचे मुलगे श्रीपाद ऊर्फ भाऊराव हे कागल येथें वकील आहेत.

## देवळे आपटे.

बाबदेवाचे चवथे मुलगे महादेव यांचे वंशजास '**देवळे आपटे**' असें ह्मणतात. गोटणें येथें देवळाजवळ यांचें घर आहे. म्हणून '**देवळे आपटे**' असें ह्मणतात. यांचेकडे चवरीचा मान आहे. श्रीभार्गवरामाची पालखी निघाली ह्मणजे 'चवरी' देवावर फिरविण्याचा हक्क या **देवळे** आपट्यांचा आहे. महादेव यांस पुत्र तीन; कृष्णाजी, पिलाजी व रुद्राजी. कृष्णाजीस पुत्र गोविंद; यांस पुत्र रामचंद्र व नारायण; रामचंद्र यांस पुत्र तीन; पैकीं हरीचे पुत्र तीन; अनंत, बाळकृष्ण व रामचंद्र; रामचंद्र हे वसई जवळ आगाशी येथें गेले; रामचंद्र यास मुलगे गंगाधर व लक्ष्मण. गंगाधरास मुलगे दोन नारायण व कृष्ण; कृष्णाचे कांहीं नाहीं; नारायणराव हल्लीं आहेत; यांना मुलगे चार झाले; पैकीं हल्लीं गोविंदराव एकटेच आहेत; लक्ष्मणास मुलगा भिकाजी हा सज्ञान आहे. यांना येशवंत मुलगा आहे; नारायणराव व भिकाजी हे अलीकडे विभक्त झाले आहेत; नारायणराव मोठे खटपटी, व्यापार व शेती वगैरे करून सुखी आहेत; भिकाजीपंत हेही निराळें घर करून शेती व व्यापार करून आहेत. रामचंद्रपंतांचे पुतणे नारायण याचा नातू बाळकृष्ण रामचंद्र आहे; बाळकृष्ण विद्यार्थी आहे; या बाळकृष्णाचे आजे नारायण बाळकृष्ण हे रामचंद्राचे आधीं वसई–आगाशी येथें गेले; नारायण बाळकृष्ण यांचेच घर गंगाधर व लक्ष्मण या बंधूनीं विकत घेतलें असें समजतें.

गोविंदाचे दुसरे मुलगे नारायण; यांस पुत्र सात; मोरो, गणेश, भास्कर, वासुदेव, विनायक, बापू व परशराम उर्फ बचंभट. या सात मुलांपैकीं, हल्लीं परशराम यांचा वंश चालू आहे; परशराम यांस पुत्र तीन; दिनकर, जनार्दन व विठल; पैकीं जनार्दनास पुत्र विष्णु; यांस पुत्र नारायण, कृष्ण व जनार्दन; नारायणराव हे संस्थान तोरगलचे कारभारी आहेत; यांना पुत्र चार; वासुदेव, रामचंद्र, विठल व शंकर हे विद्यार्थी आहेत; कृष्णराव हे गव्हर्मेंट टेलिग्राफमध्यें नोकर आहेत; महादेवाचे दुसरे पिलाजी याचा निर्वंश; तिसरे रुद्राजी; यांस पुत्र माहादाजी, बाळाजी, विसाजी व अप्पाजी; महादाजींचे पुत्र बाबूराव यांस–भिकाजी; भिकाजीचे पुत्र महादेव; यांस पुत्र नारायण व सखाराम; नारायणराव हे हल्लीं रत्नागिरी येथें गरिबींत दिवस कंठीत आहेत; यांना भिकाजी व जगन्नाथ असे पुत्र आहेत. यांच्या शिक्षणाकरितांच नारायणरावांना अतिशय कष्ट करावे लागत आहेत. भिकाजी हा लवकरच कोठें तरी नोकर होईल ! सखाराम यांचे पुत्र भार्गव व विठल हे विद्यार्थी आहेत; रुद्राजीचे तिसरे पुत्र विसाजी; यांस पुत्र दोन मोरो व लक्ष्मण; मोरो यांस दिनकर व रामचंद्र; दिनकर यांस बाळंभट; बाळंभटास मुलगे भास्कर व विष्णुपंत; भास्करराव व यांचे पुत्र दिनकरराव हे धारवाडकडे तावरकट्टी येथें असतात; दिनकरराव हे फॉरेस्ट डेपो-ऑफिसर आहेत; यांना पुत्र गोविंद व कृष्ण हे लहान आहेत; विष्णुपंत हे कोल्हापूर येथें रिसाल्यांत शिरस्तेदार आहेत; यांचे पुत्र मोरेश्वर हे नोकर आहेत; यांना पुत्र श्रीराम व लक्ष्मण हे लहान आहेत.

विष्णु बल्लाळ आपटे यांची विशेष महत्वाची माहिती—रा. विष्णुपंतांचे वडील बळवंत उर्फ बल्लाळ यांनीं गोटणें सोडून मिरज येथें श्रीकृष्णेच्या कांठीं स्नान–संध्यादि करून, जे राहिले ते पुन्हां घरीं गेलेच नाहींत ! श्रीकृष्णेच्या घाटावर श्रीमार्केडेश्वराचें पूजन करून, तिसरे प्रहरीं श्रीज्ञानेश्वरीचें निरूपण उत्तम करीत असत. तीन वर्षांपेक्षां जास्त दिवस झाले, अद्यापी घरीं कां येत नाहींत म्हणून गोटण्याहून यांचें कुटुंब लहान पुत्र विष्णुसह मिरजेस आलें. घाटांवर कुटुंब व लहान मुल अशा परिवारासह ते होते, परंतु यांचें कुटुंबास हवा न मानवल्यामुळें आजारी पडल्या व या आजारांतच त्यांचा अंत झाला. बळवंतरावजीस उलट समाधान वाटलें व ह्मणालें, "परमेश्वर ! माझेवर फारच मोठी कृपा केलीस ! आतां या मुलाची कांहीं तरी योग्य व्यवस्था श्रीमार्केडेश्वर करीलच ! यांत कांहीं संशय नाहीं." बळवंतराव मोठे विरक्त व कर्म–मार्गी असून निस्पृह होते; यांचा

लैाकिक सर्व मिरज प्रांतीं झाला होता. यांच सुमारास मिरजेचे अधिपति सरदार गंगाधर गणेश पटवर्धन यांची चुलती नित्य प्रातःस्नान करणेस घाटावर जात असत. यांना बळवंतरावांची शोचनीय स्थिती समजली. तेव्हां सरदार गंगाधरराव यांस वरील हकीकत सांगून, तुह्मी स्वतः त्यांच्या मुलास घेऊन या, असें चुलतीनें सांगितलें. तेव्हां एकेदिवशीं सरदार गंगाधरराव पटवर्धन स्नानासच घाटावर गेले. व स्नान–संध्यादि आटपून नंतर श्रीमार्कंडेश्वराचें दर्शनास आले तों बळवंतरावजीचा मुलगा उड्या मारीत मारीत सरदारांचे जवळ गेला. तेव्हां त्या सुस्वरूप –सुवर्णकायायुक्त आर्भकास पहातांच, बाळ ! तूं आमच्याबरोबर वाड्यांत येतोस कां ! असें सरदार पटवर्धन म्हणाले मात्र तों ताबडतोब मुलानें उत्तर दिलें हो ! आत्तां येतो. मग काय विचारतां ! सरदारानीं एका हुजऱ्यास मुलाला घेऊन चल म्हणून सांगितलें व बळवंतरावजीस नमस्कार करून आतां आपण कांहीं काळजी करूं नये, तो मुलगा माझा आहे, असें ह्मणतांच बळवंतरावजींचे नेत्र प्रेमाश्रूंनें भरून आले व म्हणाले– श्रीमार्कंडेश्वरानें माझी काळजी दूर केली; ईश्वर तुमचें कल्याण करो ! ! झालें विष्णुपंत हे अल्पवयांत युवराज तर झालेच ! विष्णुपंतांचे अकरावें वर्षीं सरदार गंगाधरराव कैलासवासी झाले. हे विष्णुपंतासच दत्तक घेणार होते, परंतु इतर भाऊबंदांनीं तसें न करण्याबद्दल आग्रह केला तेव्हां दुसरा दत्तक घेतला. दत्तक पुत्र गणेश गंगाधर व विष्णुपंत आपटे हे बेळगांव येथें विद्याभ्यासास होते. पुढें गणेश गंगाधर यांना संस्थानचा अधिकार मिळाला. सरदार गणेश गंगाधर यांनीं रा. विष्णुपंत आपटे यांना सख्या भावाप्रमाणें वागविलें होतें. हे अल्पवयांतच कैलासवासी झाले. तेव्हां रा. विष्णुपंतांनीं मिरज सोडली. सरदार गंगाधर गणेश यांनीं जें मृत्युपत्र केलें त्यांत विष्णुपंत आपटे यांचे संबंधीं $\frac{1}{3}$ नंबरचे यादींतील कलम १८ तील मजकूर– विष्णु बल्लाळ आपटे यांची मातोश्री लहानपणीं वारली, सबब यांस आह्मी किल्ल्यांत आणून पालन– पोषण ( अन्न–वस्त्र देऊन ) केलें आहे. याजकरितां त्यांस चालवणूक वगैरे चालविण्याची ती येणेप्रमाणें.

१ मुलगा हल्लीं अदमासें ११ वर्षें वयाचा आहे. तो प्रौढ होत तावत याजकडून विद्याभ्यास करवावा. आणि वहिवाटीप्रमाणें यांचें पालन-पोषण करावें.

२ सदरहु मुलाचें लग्न होणेचें आहे, त्यांस लग्नखर्चाबद्दल रुपये ३०० व मुलाचें कुटुंबास दागिने घालण्याबद्दल ४०० चारशें रुपये लग्न होतें वेळीं द्यावे.

३ मुलगा प्रौढ झाला ह्मणजे त्यांस एकंदर भोजनखर्च वगैरेबद्दल सालिना रुपये २०० दोनशें सालदरसाल द्यावे.

येणेप्रमाणें तीन कलमाबद्दल आमचे चिरंजीवानें तजवीज करावी. " हे मृत्युपत्र शके १७८३ दुरमतीनाम संवत्सरे मध्यें झालें. " हल्लीं दोनशें रुपये दरसाल मिरजसरकारकडून रा० विष्णुपंत आपटे यांना मिळत आहेत.

श्रीकुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न.

श्रीगुरुदेव दत्तप्रसन्न.

# आपटे घराण्याचा इतिहास.

## वंशवृक्ष नंबर ३ यामधील माहिती.


### कासारवेल व शिरगांव येथील आपटे.

मालवण जवळील त्रिंबक गांवचे कृष्णंभटाचे मुलगे चार; पैकीं दोन गोटणें—देवाचें येथें गेले; एक खुद्द त्रिंबक गांवींच राहिले व चवथे शंकरभट उर्फ सांडभट हे कासारवेल किंवा शिरगांव येथें आले; परंतु विशेषतः प्रथम कासारवेल येथेंच आले असावेत असें वाटतें; नंतर यांचे पणतू जनार्दनभट हे शिरगांव येथें गेले असावेत. शंकरभट उर्फ सांडभट यांस पुत्र कृष्णंभट; यांस पुत्र नारायणभट; नारायणभटास पुत्र पांच; शंकरभट उर्फ सांडभट, जनार्दनभट, गोविंदभट, रघुनाथभट व बाळंभट; नंबर तीनचे वंशवृक्षांत—नंबर २ चे वंशवृक्षांतील थोडा भाग दिला आहे.

शंकरभट ऊर्फ सांडभट यांस पुत्र तीन; बहिरंभट, विश्वनाथभट व महादेवभट; बहिरंभटाचे नातू दादंभट व दादंभटाचे नातू बाळकृष्ण, लक्ष्मण व भास्कर पुढें निर्वंश; विश्वनाथभटास पुत्र दोन; लक्ष्मणभट व धोंडभट; लक्ष्मणभटास पुत्र सखो व

मोरभट; सखो यांस काशीनाथ; काशीनाथास पुत्र पांच; पैकीं, नारो, पद्माकर व भास्कर यांचा वंश चालू आहे. नारोस पुत्र बाळकृष्ण व रघुनाथ; बाळकृष्ण यांचे पुत्र गोविंद व त्रिंबक हे विद्यार्थी आहेत. बाळकृष्ण वारल्यामुळें गोविंद व त्रिंबक हे रघुनाथराव यांचे जवळच असतात. रघुनाथराव हे पद्माकर यांस दत्तक गेले. परंतु, रघुनाथराव जनक पित्याचेंच नांव सहींत लिहितात. रघुनाथराव हे एल्फिन्स्टन् कॉलेजांत होते; इ. स. १८८४ त बी. ए. झाले; पुढें इ. स. १८८८ त एम्. ए. झाले. इ. स. १८८९ त 'झाला वेदांत प्राईज' मिळालें इ. स. १८९१ त एल्. एल्. बी. झाले; याच सालीं विश्वनाथ नारायण मंडलीक गोल्ड मिडल्' मिळालें; रघुनाथराव गणित विषयांत प्रोफेसर असल्यामुळें कोल्हापूर येथें ' राजाराम कॉलेजांत' प्रोफेसरचें काम करून कोर्टांत वकिलीही बरींच वर्षें करीत होते; परंतु, हल्लीं जज्याचे जागेवर आहेत; ' राजाराम कॉलेजांत ' प्रोफेसरचें काम व जज्याचें अशी दोन्हीं कामें करीत आहेत. याबद्दल पगार ४०० शें रुपये असावा असें वाटतें. रघुनाथराव यांनीं लहानपणीं तालमीचा व्यासंग उत्तम पैकीं केला असून, हल्लींही साधारण प्रमाणांत चालू आहे; यांनीं गणित विषयांवर बराच लेखनव्यासंग केला आहे. हे पाश्चात्य शिक्षणांत मोठे पदवीवर असून, यांचा पोषाख अगदीं साधा असतो; हे मुंबई अगर पुणें अशा शहरांत जर असते तर फारच पुढें आले असते. हे गरीब स्वभावाचे असून कोमल अंतःकरणाचे आहेत; यांना गोपाळ या नावांचा एकच मुलगा आहे; गोपाळ हा विद्यार्थी आहे. भास्कर यांस मुलगा मोरेश्वर; मोरेश्वरास मुलगे रामचंद्र व लक्ष्मण; रामचंद्र उर्फ तात्यासाहेब हे बी. ए. एल्. एल्. बी. असून कोल्हापुरांत हे चागल्यापैकीं वकील आहेत. हे कोल्हापूर येथील ने. ज. लायब्ररीचे मुख्य सेक्रेटरी होते. यांची वागणूक अगदीं साधी असून, दयाळु अंतःकरणाचे आहेत; यांना मुलगे चार; गणपती, काशीनाथ, भास्कर व नारायण; हे सर्व विद्यार्थी आहेत. लक्ष्मणराव आपटे हेही बी. ए. एल्. एल्. बी. असून सातारा येथें वकिली करीत आहेत. यांना सार्वजनिक कामाची हौस फार असून फार मेहनती आहेत; " दी वेस्टर्न इंडिया लाइफ् इन्शुअरन्स " कंपनीचे लक्ष्मणराव आपटे हे डायरेक्टर आहेत.

लक्ष्मणभटाचे दुसरे पुत्र मोरभट; यांना पुत्र पांच; रामचंद्र, गोविंद, विनायक, बाबजी व वामन; रामचंद्राचे नातू महादेव चिंतामण हे हल्लीं आहेत. महादेवराव हे पेन्शनर असून हल्लीं कासारवेल येथेंच असतात. विनायक यांस पुत्र रावजी; यांस पुत्र पांच; बळवंत, वासुदेव, शंकर, रामचंद्र, व कृष्ण; बळवंताचे



रा. रा. शंकरराव रावजी आपटे वकील,
हुबळी.



प्रो. रघुनाथ नारायण आपटे,
एम्. ए. एल्एल्. बी.

The Bombay Art Printing Works, Fort.



कै० रावबहादुर नारायण गोविंद उर्फ नानाशास्त्री आपटे,
फर्स्ट क्लास सब्जज्ज, पुणें.



रा. रा. विनायक गणेश आपटे बी. ए.
सुपरिंटेंडेंट, ‘नूतन मराठी विद्यालय’ पुणें.

पुत्र विनायकराव हे भतकुणकी येथें असतात; यांना पुत्र बळवंत आहे; वासुदेव यांस पुत्र पांच; गोविंद, नारायण, भगवान, लक्ष्मण व बापू; हे सर्व सज्ञान आहेत; मात्र भगवानराव हे वकिली करीत आहेत; हे हुबळी येथें आहेत. शंकरराव हे वयोवृद्ध असून मोठे मेहनती आहेत; हे जुन्यापैकीं नामांकित वकील असून धारवाड जिल्ह्यांत हल्लीं यांचे बरोबरीचा वकिलीच्या कामांत प्राविण्य संपादिल्यापैकीं वकील एखादा असल्यास न कळे !! शंकरराव आपटे यांनीं आपलें घर मजल्याचें बांधिलें असून रेलवेस्टेशनच्या जवळ आहे. हे हुबळी म्युनिसिपालिटीचे व्हाईस प्रेसिडेंट आहेत; यांना मुलगे दत्तात्रय व वामन; दत्तोपंत हे कंट्राक्टर आहेत व वामन कॉलेजांत आहे. कृष्ण यांचा मुलगा अनंतराव हे हुबळी येथेंच असतात. वामन यांचे मुलगे दोन; गणेश व पांडुरंग; या दोघांपैकीं कोणाचा तरी वंश हल्लीं गणेशवाडी येथें असावा असें समजतें !

जनार्दनभट यांस मुलगे तीन; नारायणभट, बाळंभट व कृष्णंभट; नारायणभटास मुलगे चार; गोविंदभट, विठ्ठलभट, जनार्दन व बाळाजी; विठ्ठलभटास मुलगे पांच; त्रिंबक, नारायण, जनार्दन, गणेश व चिंतामणी; त्रिंबक यांस मुलगे पांच; केशव, कृष्ण, वासुदेव, वामन व विष्णु; फक्त विष्णूस मुलगे नारायण व भार्गव; जनार्दनास मुलगे रामचंद्र व गोविंद; गणेशाचा मुलगा सखाराम; यांस मुलगा बळवंत व बळवंत यांस मुलगे सिताराम व गोविंद; सखाराम हे मुरुडाहून निघून श्रीवर्धनाजवळील आरावी या खेडेगांवीं राहिले; एक दोन वर्षांतच या गांवीं बरें न वाटल्यामुळें श्रीक्षेत्र हरिहरेश्वर येथें राहिले. हें क्षेत्र जंजिरा संस्थानांतील आहे. श्रीहरिहरेश्वराचें स्थान अगदीं समुद्रकाठीं आहे; हें देवस्थान दर्शन घेण्यास योग्य तर आहेच; शिवाय आसमंतांतील सृष्टीसौंदर्य, समुद्राचा देखावा व श्रीविष्णुपद्माचें दर्शनास जातांना वाटेंतील ती भयंकर दरी वगैरे फार प्रेक्षणीय आहे. लेखकानें श्रीहरिहरेश्वराचें दर्शन एकदांच घेतलें आहे. " अशा या रम्य क्षेत्रीं सखाराम गणेश राहिले. सखारामपंताचे मुलगे बळवंतराव आपल्या मुला-बाळांसह येथेंच असतात; बळवंतरावांचें वय हल्लीं अदमासें ७७ वर्षांचें असावें; यांचे मुलगे सितारामपंत व गोविंदराव हे शेतीवाडी करून असतात. सितारामपंताचे मुलगे हरी, सखाराम व विष्णु व गोविंदरावांचे मुलगे दत्तात्रय व श्रीपाद हे सर्व विद्यार्थी आहेत.

विठलभटाचे बंधू बाळाजी ऊर्फ बल्लाळ यांस मुलगा हरी. यांस मुलगे चार. सदाशिव, केशव, तात्या व आबा. बल्लाळ हे शिरगांवहून मुरुडास गेले ह्मणून यांचे हल्लीं असलेले वंशज मूळगांव शिरगांव न सांगतां हर्णै-मुरुडच सांगतात. सदाशिवास मुलगे तीन;

सखाराम, काशिनाथ व गणेश. सखाराम हे मुरुडाहून निघून ता. खेडापैकीं सुसेरी यागांवीं राहिले. यांस पुत्र चार; कृष्ण, विष्णु, गोविंद व वामन; कृष्णाचे पुत्र गोपाळराव; विष्णूचे पुत्र शंकरराव व वामन यांचे पुत्र दत्तात्रय; हे सज्ञान आहेत; गोपाळराव हे सुसेरीसच भिक्षुकी करून आहेत; यांस पुत्र नारायण व महादेव; नारायण हे पंढरपूर येथें व महादेव आंजर्ले येथें आहेत. शंकर हे ठाण्यास आहेत व दत्तात्रय हे उरणास असतात. सखाराम यांचे बंधू गणेश हे मुरुडाहून निघून विद्याभ्यासाकरितां पुण्यास आले; पुण्यांतील मोरोपंत तात्या सहस्रबुद्धे यांचेआश्रयानें विद्याभ्यास करून नोकर झाले; जज्जकोर्टांत दप्तरदार होते; हे पेन्शनर होते. गणपतरावजींस सहस्रबुद्धे यांनीं रहाण्यास घर बक्षिस दिलें. हल्लीं त्याच घरांत गणपतरावजींचे पुत्र रामचंद्र व विनायक रहात आहेत. हें घर सदाशिवपेठेंत आहे; रामचंद्रपंत हे लोकलफंड ओव्हरसियर आहेत. विनायकराव हे बी. ए. असून हल्लीं, 'नूतन मराठी विद्यालयाचे' लाईफ मेंबर व सुपरिंटेंडेंट आहेत. नूतन मराठी विद्यालयाची भरभराट होण्याकरितां मुख्यतः विनायकराव फारच मेहनत करीत आहेत. विनयाकरावांनीं आपला देह सदरहु विद्यालयास पूर्ण विकला आहे असें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं; यांना पुत्र तीन, सखाराम, मल्हार व गजानन; सखारामपंत हे एम्. ए. झाले असून हल्लीं नोकर आहेत. यांना पांडुरंग नांवाचा लहान मुलगा आहे. मल्हार व गजानन हे विद्यार्थी आहेत. हरीचे चवथे पुत्र आबा; यांस पुत्र बाळा व हरी; यांस पुत्र रामचंद्र व रामचंद्रास पुत्र हरी हे हल्लीं शाळामास्तर मुंबईस आहेत. हरीभाऊस पुत्र शांताराम व रघुनाथ.

जनार्दनभटाचे दुसरे पुत्र बाळाजी ऊर्फ बल्लाळ हे देशावर आले. बल्लाळ यांस पुत्र चार; महादेव, लक्ष्मण, अंताजी व सदाशिव. पैकीं अंताजीचा वंश चालू आहे. अनंत यांस पुत्र चार; नारायण, त्रिंबक, बाजीराव व गणेश. नारायणाचे पुत्र पांच; बळवंत, सदाशिव, पुरुषोत्तम, त्रिंबक व अनंत; बळवंत यास पुत्र वासुदेव, व रघुनाथ. वासुदेवराव यांस पुत्र सावळाराम हा लहान आहे. रघुनाथही लहान आहे. सदाशिव यांस मुलगा विष्णु. विष्णुपंत हे भंडारा (सी. पी.) येथें व्यापार करीत आहेत. यांना काशीनाथ नांवाचा मुलगा आहे. पुरुषोत्तम यांस पुत्र त्रिंबक ऊर्फ तात्या आहेत. हे नोकर आहेत. यांना पुत्र दोन; शिवराम व सिताराम. शिवराम हे बी. ए. असून नोकर आहेत. सिताराम हा विद्यार्थी आहे. त्रिंबक पुरुषोत्तम यांचें खास घर पुणें येथें शनवार पेठेंत आहे, अनंतराव हे हल्लीं आहेत; यांचें वय सुमारें ७५ वर्षांचे पुढें

असावें; यांना पुत्र दत्तात्रय व विश्वनाथ; दत्तोपंत हे नोकर आहेत; यांनीं कवितारूपानें बरेंच काव्य राचिलें आहे; कवितेची रचना सोपी, असून चांगली मार्मिक आहे; यांना मोरेश्वर व गोपाळ असें पुत्र असून ते विद्यार्थी आहेत; विश्वनाथराव हे नोकर आहेत. दत्तोपंत यांनीं " अनंततनय " या सहिनें बऱ्याच कविता प्रसिद्ध केल्या आहेत; पैकीं कांहीं कविता येथें देतो.

---

# बरं ! मग माझ्यावर प्रीति आहे ना ?

## राधाकृष्ण प्रणय.

### पद.

( चाल.—गा गा विहगा गीतें )

**राधा—** प्रीति असेना मजवरती ।
मनापासुनी कृष्णा ती ॥
आण गळ्याची वहा गडे ।
सांग मला का गूढ पडे ॥
तोंवरि सखया ।
निर्मल हृदया ।
हृदयनीहित या ।
नुचली मी मम शिराप्रती ॥ प्रीति० ॥ १ ॥
ललिता नलिनी निजकोणी ।
बांधुनी ठेवी मधुपाशीं ॥
सोडी त्यातें जशी न ती ।
विनवी जरि तो मधुगीतीं ॥
या हृदयाशीं ।
हृदयापाशीं ।
बाहूपाशीं ।
धरुनि ठेवितें नच भीति ॥ प्रीति० ॥ २ ॥
हळूच तो शिर दयितेचें ।
उचली करि हृदयावरिचें ॥
अपांगिं बघतां मान वळे ।
तोंचि मुखा मुख सहज जुळे ॥

कलिका फुलली ।
मृदुल कपोलीं ।
लाली चढली ।
प्रेमरसाला ये भरती ॥ प्रीति० ॥ ३ ॥

**कृष्ण**— विचार करुनी पहा मनीं ।
वेड न का हें तव रमणी ॥
शपथेवरि का सांग बरें ।
खऱ्या प्रीतिचें मोल ठरे ॥
नभिं घनमाला ।
विलसे विमला ॥
केकि हर्षला ।
डोलत नाचे मधुर किती ॥ प्रीति० ॥ ४ ॥

प्रभा प्रियतमा जशि रविला ।
चारु चंद्रिका चंद्राला ॥
शंपा प्रियकर मेघाला ।
कीं सरिता तटिनीपतिला ॥
परि वद रमणी ।
मजलागोनी ॥
यांतुनि कोणी ।
शपथ वाहिली कीं प्रीति ।
करूं परस्पर आह्मी अति ॥ प्रीति० ॥ ५ ॥

कस्तूरीचा आमोद ।
सुखवी भुलवी दे मोद ॥
जगांत परि हें कळवाया ।
शपथ न लागे कधीं घ्याया ॥
अतितर मधुरा ।
असे शर्करा ॥
याची इतरा ।
शपथेविण ये अनुभूति ॥ प्रीति० ॥ ६ ॥

८६
व ४४८

स्वयंभूत गे प्रीति असे ।
जडांत संभव तिचा नसे ॥
मंगलमय जो जगत्पति ।
मूर्तिमंत कीं तो प्रीति ॥
भक्तीसाठीं ।
तो जगजेठी ।
भक्तापाठीं ।
शपथेविण ही असे सती ॥ प्रीति० ॥ ७ ॥
विरंचितनयें सखि मातें ।
पुसतां कथिलें मीं त्यातें ।
वैकुंठीं मी वसत नसे ।
योग्यांच्याही हृदिं न तसें ॥
निर्मलचित्त ।
भक्त्यासक्त ।
माझे भक्त ।
जिथें राहुनी मज गाती ।
तीच खरोखर मम वसती ॥ प्रीति० ॥ ८ ॥
प्रीतीचेंही हेंचि पहा ।
हृदयवल्लभे ! तत्व महा ॥
चिन्मयरूपी प्रीति सखे ।
भक्तासन्निध रमे सुखें ॥
नसतां चित्तीं ।
लवही प्रीति ।
वदलों बहु तीं ।
असे तुजवरी परि अंतीं ।
काय जरि न ये अनुभूति प्रीति० ॥ ९ ॥

**अनंततनय.**

## सुहृद्दर्शन !

( पद चाल— फुलें वेलीचीं भूषणें. )

अद्भुत घडलें ॥ मन निरुपाधिक हें झालें ! ॥ धृ० ॥
दर्शनालाहो प्रिय सुहृदाचा,
घडे अकल्पित पूर्ण सुखाचा,
प्रमुदित झालों हृययीं साचा,
चित्तीं धालों । प्रेमामृति रंगुनि गेलों ! ॥ १ ॥
षड्रसभोजन मज का मिळलें,
कीं, षड्दर्शनदर्शन घडलें,
षट्शास्त्राचें अथवा झालें,
षट्ऋतुमूर्ति येऊनि का करि सुखपूर्ति ! ॥ २ ॥
चिंतामय हृन्नीलनभीं या,
कृष्णनीलघन येतां उदया,
नीलकंठमन नृत्य थयथया,
करी आनंदें । हृदय किती हरिरवें कोंदे ! ॥ ३ ॥
केकिविरावें घन तो द्रवला,
थुइ थुइ वर्षे प्रेमजलाला,
प्राशुनि मोदें मयूर धाला,
शून्य जग झालें । मेघरूप केवळ उरलें ! ॥ ४ ॥
प्रसन्न सोज्वल हृदयाकाशीं,
कृष्ण शरच्छशि तेजोराशि,
पूर्णकलानिधि ये उदयासी,
सुधामय झालें । मनः कुमुद अभिनव फुललें ॥ ५ ॥
शुद्धभाव कलहंस निनादित,
हृदयसरोवर पूर्ण विराजित,
वृत्तीशाळी झाल्या परिणत,
मोदें न्हालें । जग शरल्लीन हें झालें ॥ ६ ॥
कृष्णरूपि वा हेमन्तर्तु,
आला धांवत सुखैक हेतु,
सौहार्दाचा विशाल केतु,
हृदयीं फडके । भयवश हा रिपुगण वाके ॥ ७ ॥

कामक्रोधा थंडी भरली,
उसळी त्यांची त्यांत जिराली,
भेदवृत्ति ही करपुनि गेली,
बुद्धिविलासी । आत्म्यासी रंगे कैसी ? ॥ ८ ॥
शिशिर वदूं कां अथवा याला,
आला मोदें रिझवायाला,
दुःखहोलिका करावयाला,
निष्प्रभ झाली । वैकल्पिक कुमुदें गळलीं ! ॥ ९ ॥
प्रेमरसाचा इक्षूदंड,
कीं काव्याचा मोहक खंड,
रम्यगुणांचा रत्नकरंड,
मोडे गंड । गर्वाचा, मन हो थंड ! ॥ १० ॥
संदेहाची धूली उडवित,
ये अथवा हा ग्रीष्मचि धांवत,
तप्तकरांनीं विकल्प जाळित,
झाला धूर । दुष्टाशा चकनाचूर ! ॥ ११ ॥
सर्व किल्मिषें जळुनी गेलीं,
मलिन मनोभू पवित्र झाली,
ज्ञान बीज तें समुचित कालीं,
पेरायातें । प्रेमजलें आर्द्र करी ते ! ॥ १२ ॥
मी मधु मज वा भेटायाला,
कृष्णरूपि हा माधव आला,
सुमनें उधळित दिशादिशांला,
हरपे भान । गमला मज जणुं कीं मदन ! ॥ १३ ॥
वृत्तिमल्लिका पुष्पित झालीं,
हास्य गुलाबा पुष्पें फुटलीं,
दंतकुंदनवमुकुलें फुललीं,
लज्जा वेली । विनयाची स्मित करि गालीं ! ॥ १४ ॥
सारल्याचा सुरु तरु सुंदर,
नवदलयुत हा नयन मनोहर,

संदेहाचीं अभ्रें घनतर,
फोडी प्रबल । गजयूथा मृगपति बाल ! ॥ १५ ॥
पौरुषचंपकतरु दरवळला,
पावित्र्याच्या कल्पतरूला,
मधुर सुमांचा बहर लोटला,
मांगल्याचा । मंदानिल सुखवी साचा ! ॥ १६ ॥
अभिमानाचा पलाशवृक्ष,
फुलला गळलीं सुमनें लक्ष,
राग सुरंजित झालें वक्ष,
गर्व निमाला । तद्रुधिरपूर हा आला ! ॥ १७ ॥
सौजन्याच्या सहकारावरि,
प्रीतिकोकिला पंचमरव करि,
हसवी, रिझवी, डुलवी अंतरि,
आला बहर । करि गुंजा चेतोभ्रमर ! ॥ १८ ॥
वसंतकालीं बहुविध तरुवर,
सुरभिसुमें हीं अभिनव सुंदर,
जमवुनि एक्या ठायीं चतुर,
प्रदर्शन मोठें । उघडी जणुं मजला वाटे ! ॥ १९ ॥
अनुपम रम्या शरन्नभश्री,
अथवा वदुं कां ललित सरश्री,
कीं ही मानूं रुचिर वनश्री,
एक्या कालीं ! त्रिस्थलिंची यात्रा घडली ! ॥ २० ॥
एवं मन्मन झालें क्षणभर,
निरुपाधिक तें जरिही स्वैर,
क्षुत्तृष्णेचा पडला विसर,
उद्यमभार । तरि कुठोनि मग सुचणार ! ॥ २१ ॥
षडर्तु ऐसे ठायीं एका,
जमले गमलें मजला देखा,
अनुभव याचा सहृदय रसिकां,
इतरांना हें । शब्दजाल दुसरें नोहे ! ॥ २२ ॥

नित्य भवीं या मन्मनसया,
निरुपाधिक तूं ऐसा सखया,
होउनि ध्याई कमलानिलया,
जरी हें घडलें । सफल सुहृद्दर्शन झालें ॥ २३ ॥

**अनंततनय.**

---

## क्षयी चंद्रास !

काय चंद्रा ! अधिकार तुला श्रेष्ठ ॥ दिला देवें तो गाजवी यथेष्ट ! ॥
तुझें वैभव नव दिपवि लोचनांतें ॥ कसा हेवा वाटे न मानवांतें ? ॥ १ ॥
निळा मंदिल बांधुनी उत्तमांगीं ॥ रत्नभूषा घालुनी योग्य जागीं ॥
तारकांचा शिरपेंच खोंविलास ॥ साच शोभे हा तुजसि सद्विलास ॥ २ ॥
धवल मेघांच्या थोर रथालागीं ॥ पवन हरिणा जुंपुनी लागवेगीं ॥
यदा निघसी संचार करायाला ॥ नभीं; वाटे प्रत्यक्ष ईश आला ॥ ३ ॥
वसन भांडारें चारुचंद्रिकेचीं ॥ मुक्त हस्तें वाटोनि भूलतांची ॥
हौस करिसी परिपूर्ण अहा इंदो ॥ सार्थ गमतें अभिधान सुधासिंधो ॥ ४ ॥
परीचंद्रा ! मम मलिन मानसांत ॥ उदित शंका ती करी भस्म सात् ॥
तुला साक्षाद्वा तुझ्या कुटुंबीया ॥ काय सौख्यें लाधलीं सांग राया ॥ ५ ॥
प्रिये संगें हितगूज करायासी ॥ कधीं मिळतो एकांत काय तुजसी ॥
कधीं आनंदें शुद्ध मनें सांग ॥ गुह्यचर्चा केलीस तिशीं सांग ? ॥ ६ ॥
वस्त्र पात्रीं भूषणीं उणें नाहीं ॥ रोहिणी तें अत्यल्प जरी कांहीं ॥
दयित वदनीचें प्रेम मधुर शब्द ॥ मिळति ऐकायाति जन अब्द अब्द ॥ ७ ॥
" अतां स्वारी येईल मंदिरातें ॥ त्यास कांहीं लागेल फराळातें ॥
वदुनि परमावडिं करुनि मधुपदार्थ ॥ तिनें ठेवावें सिद्धकीं त्वदर्थ " ॥ ८ ॥
" आज वर्षाचा प्रथम दिवस बाई ! ॥ उद्यां आली अक्षय्य तृतीया ही ॥
पुजूं सावित्री आज जोडप्यानें ॥ परम मोदें; घेतिलें मन्मनानें " ॥ ९ ॥
" नारळांचीं नारळीपूर्णिमतें ॥ करूं पक्वान्नें असें मनीं येतें ॥
परी बाई ! तिकडील मानसातें ॥ काय रुचतें कळणार कसें मातें ? " ॥ १० ॥

" तसें येत्या श्रावणी सोमवारीं ॥ मुदावंद्रायां शिवदर्शंभुगौरी ॥
गमें जावें कैलासिं उभयतांही ॥ परी इतुकी मी भाग्यवती नाहीं " ॥ ११ ॥
" निकट ठेली हेरंब चतुर्थी ही ॥ परी देहाची होत लाहि लाही ॥
किती जनताही दुष्ट अभमबाई॥ " वदन " बोले तिकडील बघूं नाहीं " ॥१२॥
" जणूं आम्हीं कापिले काय त्यांचे ॥ बाग मोठाले केळि नारळींचे ॥
परी त्याचें वाटे न इथें कांहीं ॥ सेव्य सेवक सारिखे नवल नाहीं ! " ॥१३॥
" गोष्ट नवलाची गमे परी मोठी ॥ जनीं बाहेरीं कुलुप पडे ओठीं ॥
गृहीं येतां अवतार नृसिंहाचा ॥ सर्व बाजूंनीं भोगमात्र अमुचा " ॥ १४ ॥
" असे पुरुषांच्या सर्व सणामाजीं ॥ श्रेष्ठ, दसरा, जुंपुनी रथा वाजी ॥
स्वारि सीमोल्लंघना जावयातें ॥ अतां येइल घेवोनि सुवर्णातें " ॥ १५ ॥
" बुद्धि नीरांजन भक्ति भाजनांत ॥ भाव कर्पुर पावित्र्यपूगि त्यांत ॥
ज्ञानदीपा लावोनि आरतीतें ॥ शेसभरण्यातें झणीं सिद्ध होतें " ॥ १६ ॥
" भाउबीजेला वन्सनाच येथें ॥ अणा ऐसा येतांच हट्ट घेतें ॥
बरें ह्मणजे होईल जरा बाई ! ॥ हात सोडवणुक दिवस मला कांहीं ! " १७ ॥
" सूर्य भावोजी मकरिं जावयाचें ॥ कोंद ह्मणुनी मी तीळ साखरेचे ॥
करुनि आतां ठेवितें झणी साचें ॥ गृहीं येतां होईल मागण्याचें " ॥ १८ ॥
असें बोलोनी प्रत्यहींच कांहीं ॥ करी मधुरान्नें सतत रोहिणीही ॥
परी त्याचें सुख दुःख तुला इंदो ॥ कांहीं नाहीं ना हाय ! दीनबंधो ॥१९॥
गृहा सोडावें भल्या सुप्रभातीं ॥ परी परतावें सदा प्रदोषांतीं ॥
चार चावावे चबर चबर घास ॥ वेळ नाहीं चत्र तुला पहायास ! ॥ २० ॥
जणूं खाणावळ गृहीं घातलीसे ॥ तसें वर्तन तव होत मला भासे ॥
दोन वेळां तूं मात्र भोजनातें ॥ गृहीं येसीं हेंच ना गृह्यनातें ! ॥ २१ ॥
पूर्व सोडोनी पश्चिमेस जावें ॥ पुन्हा प्राचितें परत तूर्ण यावें ॥
जशी 'खो खो' बालकें खेळतांना ॥ स्पर्श करिती खुंटास धावताना ! ॥२२॥
तेलि याचा वृष एक मार्ग जैसा ॥ मात्र जाणे, नान्यथा कांहीं सहसा ! ॥
रवि अथवा रथवाह धांवताना ॥ पुढिल मार्गाविण अन्य कीं बघेना ! ॥ २३ ॥
तेवि चंद्रा ! तूं जरी वियद्देशीं ॥ नित्य फिरसी पथ एक जाणतोसी ॥
गमे रसिका ! रमणीय नभःश्रीही ॥ कदाकाळीं त्वां पाहिलीस नाहीं ! ॥ २४ ॥
काय मौजेची दिसे वियद्गंगा ! ॥ केंवि तेथें त्या अप्सराशुभांगा ॥
विमल चित्तें करितात जलक्रीडा ॥ सर्व सोडोनी विनयमनोव्रीडा ! ॥ २५ ॥

नसति तारे हे परी भूषणें हीं ॥ जलक्रीडेस्तव देवयोषितां हीं ॥
स्वीय देहीचीं उतरोनि ठेवियेलीं ॥ गमे कोणा पाहतां अशा कालीं ॥ २६ ॥
परीचंद्रा ! तुज हेंहि पाहुनीया ॥ काळतळमळ होई न मानसी या ॥
काय केला उपदेश शुक्राचार्यें ॥ काय अथवा बोधिलें भीष्मरायें ! ॥ २७ ॥
कधीं चंद्रा ! घेवोनि अपत्यांशीं ॥ कडीं खांदीं खेळसी काय त्यांशीं ॥
कधीं त्यांना खेळणीं आवडीचीं ॥ दिलीं केली का हौस पूर्ण त्यांची ? ॥२८॥
कधीं अपुल्या लाडक्या बुधालागीं ॥ बहुप्रेमें घेवोनि अंक भागीं ॥
कधीं घेसीका मधुर चुंबनातें ॥ मृदुल हस्तें चिवडोनि कपोलातें ॥ २९ ॥
कसा त्यांचा लागेल लळा सांग ॥ जरी वर्तन तव नसे सानुराग ।
कसें त्यांनीं तुज जवळ बोल यावें ॥ कसें तुजलागीं 'तात' ओळखावें ? ॥३०॥
मधुर शब्दीं जो कोणि बालकांशीं ॥ नित्य वागे बा ! तोच आप्त त्यांशीं ॥
जनक तेणें जरि लवहि जनक कर्म ॥ कसा पत्रें पाळिजे पुत्र धर्म ! ॥ ३१ ॥
भला चंद्रा ! तूं एकनिष्ठ दास ! ॥ स्वामिकार्या निजदेह वाहिलास ॥
निदानीचा क्षयरोग तुला झाला ॥ तरी घेसीं क्षणही न विसाव्याला ॥ ३२ ॥
भला स्वामी ही तुला लाधलासे ॥ दया माया लवही न तया भासे ॥
सेवकांना आपल्या राबवावें ॥ कसें त्याला हें दिसे पूर्ण ठावें ॥ ३३ ॥
बरें वाईट जरि होय तुला कांहीं ॥ तया त्याचें शुभ अशुभ मुळीं नाहीं ॥
दुजा कोणी येईल तुझ्या जागीं ॥ भार वाहक तुजसारिखा अभागी ॥ ३४ ॥
दयित दायितेतें तेंवि अपत्यातें ॥ मात्र मुकशिल तूं फार मना खातें ॥
कार्य कोणाचें कधिंच कुणासाठीं ॥ साच राहेना ऐशि ही रहाटी ! ॥ ३५ ॥
कठिण सेवा ही विधो ! जयासाठीं ॥ करुनि करितोसीं नित्य पायपीटी ॥
कुटुंबीया त्या सुख न जरी लाधे ॥ साध्यचंद्रा ! कोणतें सांगसाधे ॥ ३६ ॥
उदर भरणास्तव जरी अशी सेवा ॥ करिसिं मानूं तूं अगा चंद्रदेवा ॥
परी पोटाला पोटभरी खाया ॥ वेळ लाधेना तुला इंदुराया ॥ ३७ ॥
तुला सेवेची संवय जाहलीसे ॥ तुझ्या चित्ता सर्वस्व तेंच भासे ॥
जेंवि कूपस्थित नीच मंडुकांस ॥ कूप अपुला भासतो सुखनिवास ॥ ३८ ॥
भला सेवेचा घालुनिया पाठ ॥ दिला आर्यां; जाहला पूर्ण पाठ ॥
कधीं त्याचें विस्मरण पडे नाकीं ॥ तुझी उपकृति ही कोण कशी झांकी ? ॥३९॥
अशी सेवेची रीत महाबाहो ! ॥ तुझी तुजला लखलाभ शशे ! राहो ! ॥
दास्य करण्याची हौस पूर्ण आतां ! ॥ गुरो ! झाली ठेवितों पदीं माथा ! ॥४०॥

**अनंततनय.**

---

18 APR 1990

बाजीराव अनंत आपटे हे कोतवाल होते. बाजीराव यांचे आजे बल्लाळ हे जुन्नर येथें आले होते; बाजीराव हे शिवनेरी किल्यावरून शत्रूशीं लढले होते. ह्या बाजीराव आपट्यांचा जुन्नर येथें पेशवाईचे अमदानींत मोठा दरारा होता. हल्लीं जुन्नर येथें असलेल्या यांच्या वाड्याची मालकी यांचे वंशजाकडे आहे. गणेश यांस पुत्र रामचंद्र. यांस पुत्र चिंतामणि व गणेश. चिंतामणीस पुत्र दोन. पैकीं एक महादेव याचा पुत्र विश्वनाथ हा लहान आहे. गणेश यांस पुत्र चार. शंकर राजाराम, सदाशिव व पांडुरंग. पैकीं शंकरराव हे मिलिटरी डिपार्टमेंट मध्यें नोकर आहेत. व बाकीचे विद्यार्थी आहेत.

जनार्दनभटाचे तिसरे पुत्र कृष्णंभट; यांस पुत्र बल्लाळ व भास्कर; बल्लाळ यांस पुत्र दोन; रघुनाथ व कृष्ण; रघुनाथास पुत्र तीन; विनायक, चिंतामण व सदाशिव. पैकीं चिंतामणास पुत्र कृष्ण व कृष्ण यास पुत्र गणेश; कृष्णराव हे शिंद्यांचे लष्करांत होते. ते कांहीं वर्षे शिंद्यांचे खासगी कारभारी होते. शिंदे व इंग्रज यांचा जेव्हां तह झाला तेव्हां शिंद्यांचा बराच मुलूख इंग्रजाकडे गेला होता; त्यांपैकीं अदमासें दहा लक्ष उत्पन्नाचा मुलूख शिंद्यांचे तर्फे वकील होऊन कृष्णाजीपंत आपटे यांनीं जुन्या कागदपत्राचे पुराव्यावरून इंग्रजाकडून शिंद्यास परत मिळवून दिला. कृष्णाजीपंत लेखणीचे बाके असून विलक्षण दीर्घोद्योगी होते; यांना शिंद्याचे पदरीं चांगला मान होता.

कृष्णाजीपंतास पुष्कळ वर्षांनीं आपत्य झालें. ते चतुर्थीचे दिवशीं झाल्यामुळें मुलाचें नांव गणेश असें ठेविलें; गणेश हे शिरगांवीं शके १७७४ माघ शु० चतुर्थीस, इ. स. १८५३ ता. १ फेब्रुवारी रोजीं जन्मलें; हें दीड वर्षाचें असतांनाच यांच्या मातोश्री वारल्या; पुढें गणेश यांचें संगोपन आजीनें केलें. गणेश यांचा अभ्यास मराठी व इंग्रजी रत्नागिरी येथें झाला; पुढें ते पुणें येथें डेक्कन कॉलेजांत गेले. गणपतराव वयाचे एकविसावे वर्षी इ. स. १८७४ त बी. ए. झाले; पुढें इ. स. १८७९ त एल्. सी. ई. झाले; हे सर्व परिक्षेंत फर्स्ट आल्यामुळें सर्व विद्याभ्यास स्कॉलरशिप वरतीच केला म्हणण्यास हरकत नाहीं; यांना जेम्स बर्कले गोल्ड मेडल अँड प्राईज मिळालें होतें; हे युनिव्हर्सिटीचे ऑ० फेलो होते; संस्कृत, गणित व सायन्स या विषयांत गणपतरावजीनीं प्रविण्य संपादिलें होतें; हे एल. सी. ई. फर्स्टक्लास आल्यानें, यांना सरकारांनीं, दरमहा २५९ रुपये पगारावर असिस्टंट इंजिनीयर नेमिलें होते; पुढें सेंकडग्रेड एक्झिक्युटिव्ह इंजिनियर होऊन पगार ८५० रुपये झाला. यांनीं १९०३ इसवींत पेन्शन घेतली. पेन्शन घेतल्यावर कोंकणांतील आपले मूळगांवीं म्हणजे

शिरगांवीं जाऊन राहिले. इ. स. १९१२ चे नवंबर मध्यें शिरगांवींच हे कैलासवासी झाले. गणेश कृष्ण ऊर्फ दादासाहेब आपटे यांच्यासारखे स्वयंज्योति रत्न नाहींसें झाल्यानें यांच्या कुटुंबाचेंच काय परंतु समाजाचें व देशाचें झालेलें नुकसान पुन्हां भरून येणें शक्यच नाहीं.

यांनीं नोकरीवर असतांना नाशिक येथील **श्रीगोदेचा पूल**, धुळें येथील **गरुडहायस्कूल व ट्रेनिंगस्कूल**, ठाणें येथील मोठें प्रसिद्ध असलेलें **वेड्याचें हॉस्पिटल**, कुलाबा येथील **ऑबझरव्हेटरी** व डेडरगांवचा तलाव वगैरे बरींच कामें यांच्याच देखरेखी खालीं झाली आहेत. यांना ' आपटे साहेब ' असेंच ह्मणत. आपटे साहेब हे मोठे निस्पृही होते. यांना **सर्वविद्यापारंगत** असें ह्मटल्यास अतिशयोक्ति कधींच होणार नाहीं. आपटे साहेब, सर्व परिक्षेंत फर्स्ट आले होते हें सांगितलेंच आहे, शिवाय त्यांना विशेष आवडते विषय गणित व ज्योतिष यांत तर ते प्रोफेसरच होते. त्यांनीं वर्तवलेलें भविष्य कधींही चुकलें नाहीं. स्वतःचे मृत्यूबद्दल भविष्य यांनीं मृत्यूपूर्वी दोन दिवस केलें होतें कीं, अमूक दिवशीं मी खास कैलासी जाणार. आपटे साहेबांनीं पेन्शन घेऊन घरीं आल्यावर, रत्नागिरी शहरापासून आपल्या घरापर्यंत गाडीसडक केली. शाळेकरितां आपल्या खर्चानें इमारत बांधून सरकारचे स्वाधीन केली आणि गांवचे देवळाचा जिर्णोद्धार केला. यांत फक्त गाडीसडकेबद्दल गांवांतील कांहीं अदूरदर्शी विक्षिप्तांनीं सरकारांत गाडीसडकेविरुद्ध खटपट केली होती. परंतु सरकारानें योग्य विचार करून, गाडीसडकेविरुद्ध खटपट करणाऱ्याचें बिलकूल ऐकलें नाहीं. सदरहु गाडीसडकेनें शिरगांवीं जातांना वाटेंत एक खाडी लागते; या खाडीला भरती आली ह्मणजे कांहीं तास रस्ता बंद होतो ह्मणून आपटे साहेब यांची इच्छा स्वतः निम्मा खर्च व सरकारानें निम्मा खर्च दिल्यास आपले देखरेखी खालीं खाडीवर पूल बांधावा अशी होती. आपटे साहेब आणखी कांहीं वर्षे जर जगते तर सरकारांनीं खास मदत केली असती.

आपटे साहेब यांनीं पेन्शन घेतल्यावर बडोदें संस्थानांतून चीफ इंजिनियरचे जागीं रुजूं होण्याबद्दल दोन वेळां बोलाविलें होतें. तसेंच सरकारांनींही पेन्शनीनंतर आपटे साहेबांना जळगांव जिल्ह्याच्या सर्व सरकारी इमारतींच्या कामाकरितां बोलाविलें होतें. परंतु ते कोठेंही गेलें नाहींत.

आपटे साहेबांना आपल्या पुत्रांपैकीं एकादा पुत्र पदवीधर होण्याचें चिन्ह दिसेना, तेव्हां साहेबांनीं आपल्या भाच्यास व जांवयास शिकण्याचें कामीं

मदत केली. या मदतीचें चीज साहेबांचें भाचे नारायण विनायक थत्ते यांनीं केलें. डा० नारायण विनायक थत्ते एल्० एम्० ॲंड एस्०असून यांनीं शहर कोल्हापूर येथें दवाखाना सुरुं केला आहे. जांवई रा. विनायक दामोदर साठये हे बी ए. आहेत, यांनाही साहेबांनीं इंजिनियरिंग कॉलेजांत घातलें होतें परंतु, साहेबांच्या अकस्मित मृत्यूमुळें रा. साठये यांचें नुकसान झालें. तूर्त रा. साठये यांनीं वाई येथें द्रवीडस्कूलमध्यें जरी नोकरी पतकरली आहे तरी इंजनियरिंग कोर्स पूर्ण करण्याचा त्यांचा मानस आहे.

आपटे साहेबांनीं हजारों रुपये खर्चून घर बांधिलें. त्या घराचा तळमजला जुन्या पद्धतीचा व दुसरा मजला नवीन पद्धतीचा बांधिला आहे. अतिथी व अभ्यागताचा योग्य सन्मान त्यांच्याकडून होत असल्याची त्यांची सर्वत्र ख्याती आहे. आप्तेष्टांचा वगैरे मोठा परिवार त्यांच्या भोंवतीं होता. त्यांनीं परोपकारार्थ आपल्या संपत्तीचा बराच भाग खर्च केला. त्यांनीं घरांतील भिंतीवर **मातृदेवो-भव । पितृदेवो भव** । हीं अक्षरें बाहेरून घरांत येणाऱ्यास एकदम दिसावींत अशीं लिहिलेलीं आहेत. देवघराचे भिंतीवर **आचार्यदेवोभव**, जिन्यांतील भिंतीवर **सत्यं ज्ञानमनन्तं ब्रह्म । यो वेद निहितं गुहायां परमेव्योमन् । सोऽश्नुते सर्वान्कामान्सह । ब्रह्मणा विपश्चितेती । यतो वाचो निवर्तन्ते । अप्राप्य मनसासह । आनन्दं ब्रह्मणो विद्वान । न बिभेती कदाचन** । तसेंच मार्गाचे भिंतीवर **धर्मंचर** अशी श्रुतिवाक्यें बरीच लिहिलेलीं आहेत. आपटे साहेबांची रहाणी जुन्या पद्धतीची असून शुद्ध होती; सकाळ संध्याकाळचे नित्य—नैमित्तिक करण्यास निदान ३।४ तास तरी सहज लागत असत. आपटे साहेबांचे घरांतील टोपण नांव दादासाहेब होय. दादासाहेब श्रीगणेश-भक्त होते. त्यांनीं श्रीगणेशाचा धावा व श्रीसूर्याचे नमस्कार केलेले येथें देतो.

## श्रीगणेशाचा धावा.

गणजया पथ दावी मजला इंद्रिय गणविजया ॥
गणपतिनाम स्मरणें पावे हळु हळु पूर्ण जया ॥ १ ॥
हेरंबाची कृपा साधिते सत्वर या कार्या ॥
धरणीधर प्रसादे जाती विघ्नें सर्व लया ॥ २ ॥
महागणपते तवनुति करितां इंद्रियजय होता ॥
यज्ञेश्वरसह अष्टही सिद्धी सेवकगण बनतो ॥ ३ ॥

क्षिप्र प्रसादन नाम तुझें याराखी ब्रीदाला ॥
अमोघ सिद्धि दैवत ऐसें ठाऊक सकळाला ॥ ४ ॥
त्वद्रूपाविण आनन अमृता गुरु सांगे मजसी ॥
मूलमंत्र तो सह ओंकारें कर्णी उपदेशी ॥ ५ ॥
चिंतामणीचा चित्त पंचकी सांपडला ठेवा ॥
पूर्ण कृपेचा निधी पावला ऐकूनि हा धावा ॥ ६ ॥
सुमंगला मज मंगल झालें तेणें ब्रम्हांड ॥
आत्मबीज हें चिद्धन भरलें उरलें ऊदंड ॥ ७ ॥
साक्षात्कारें आशा पूरक मम आशा पुरवी ॥
वरदहस्त मम मस्तकीं ठेऊनी संदेहा नुरवी ॥ ८ ॥
शिवाशिव शिव हें नामची गातां भ्रांति लया जावो ॥
समाधि लागुनी स्वानंदाची प्राप्ती मज होवो ॥ ९ ॥
भक्तासाठीं काश्यप नंदनसगुण रूप धरिसी ॥
अज्ञानासी ज्ञान व्हावया अनंततनु धरिशी ॥ १० ॥
वाचा सिद्धची वेदें कथिलें ज्ञानरूप असशी ॥
धुंडिविनायक सच्चिदनंता विलसें हृत्कोशी ॥ ११ ॥

---

## श्री सूर्याचे नमस्कार.

मार्गशीर्ष मासि मित्र म्हणुनी पूजिती ।
पौष रवि अल्प दिवस शीत दे अती ॥
माघमासिं सूर्य तेजि वाढ तिळभरी ।
फाल्गुनांत भानु किरण सुखदसे करी ॥
पल्लवांनीं युक्त तरू चैत्रिं खग करी ।
माधवांत पुष्प पोषि पुष त्यांवरी ॥
हिरण्यगर्भ नमवि तरु ज्येष्ठिं फलभरें ।
आषाढांत मरीचीनें मेघजल धरे ॥
श्रावणीं आदित्य स्फुरे तृण फणांबुर्जा ।
भाद्रपदीं सवितृ करीं प्रसव उद्भिजीं ॥

18 JAN 1994

पिकवी धान्य तृणें लता अर्क अश्विनी ।
कार्तिकांत भास्कर दे सुखद यामिनी ॥
तृणकण फल दिवस रात्र मास फिरुनिये ।
ऋतूवर्ष धरे सूर्य फिरवितो स्वये ॥

---

हा श्री गणेशाचा धावा संध्याकाळीं आरती झाल्याबरोबर घरांतील सर्वांनीं देवापुढें उभें राहून सुस्वरांत ह्मणण्याचा नित्य परिपाठ पूर्वींप्रमाणें हल्लीं चालू असल्याचें **लेखकानें** प्रत्यक्ष पाहिलें आहे. दादासाहेबास पुत्र चार; शंकर, विष्णु, चिंतामण व मोरेश्वर. शंकरराव हल्लीं पुण्यास आहेत. हे ' इंडिया सरव्हंट सोसायटी ' मध्यें सामिल झाले आहेत. शंकरराव यांनीं, एका विधवा ब्राह्मण स्त्रीबरोबर प्रपंच थाटिला आहे. यांच्या ह्या धर्म घातक कृतीचा तिटकारा दादासाहेबासारख्या पुण्यात्म्यास तर आलाच होता. शिवाय दादासाहेबांची प्रकृती विशेष क्षीण होण्यासही कारण वडिलपुत्राचें धर्मबाह्य वर्तन हें होय.

" सर्व हिंदुस्थानांत आपटे घराण्याचीं घरें बरींच पसरलीं आहेत. त्यांत आजपर्यंत रा. शंकररावासारखे ' **धर्मबाह्य** ' वर्तन दुसरें कोणी केल्याचें मला आढळलें नाहीं. ह्मणजे आमचे घराण्यांत हें **धाडसीकृत्य** पहिलेंच होय. "

वरील हकिकत आम्ही प्रसिद्ध करणारही नव्हतो. परंतु नाइलाजास्तव प्रसिद्ध करणें भाग पडलें. रा. शंकरराव हे कट्टे पितृभक्त असून कोमल अंत:-करणाचे आहेत. रा. शंकररावाना कांहीं तरी विलक्षण अडचणीमुळें, **उच्च समाजाविरुद्ध** वागणें भाग पडलें असावें असा माझा तर्क आहे. बाकी स्वभावानें मानी असून मोठे दिलदार आहेत.

रा. विष्णुपंत हे पितृभक्त पूर्ण असून यांचें धार्मिक वर्तन उत्तम आहे. वडिलांप्रमाणें हेही श्रीगणेशभक्त आहेत. यांना पुत्र भालचंद्र हा लहान आहे. चिंतामणी व मोरेश्वर हे विद्यार्थी आहेत. दादासाहेबांचा नोकरीवर असतांना धुळ्यास ज्यावेळीं मुक्काम होता; त्यावेळीं हा लेखक ' धर्म ' साप्ताहिकाचा एजंट ह्मणून, साहेबांना ' **धर्माचे** ' वर्गणीदार करण्याकरितां त्यांच्याकडे गेला होता. समक्ष भेटींत मी आपटे आहें असें त्यांना समजतांच, या लेखकाला तुह्मी राहतां कोठें ? कोकणांतले गांव कोणतें ? असें एका मागून एक प्रश्न सुरू झालें. सदरहु प्रश्नांचीं उत्तरें दिल्यावर माझें मनांत पुष्कळ दिवस घोळत असलेल्या कल्पनेचा उल्लेख त्यांच्याजवळ केला. तेव्हां दादासाहेबांनीं असें उत्तर दिलें कीं, " तुह्मी



कै० गणेश कृष्ण उर्फ दादासाहेब आपटे, बी. ए. एल्. सी. ई.

शिरगांव.

The Bombay Art Printing Works, Fort.



रा. रा. केशवराव काशीनाथ आपटे,
फर्स्टक्लास मेकॅनिकल इंजिनीयर,
शिरगांव.

आपटे घराण्याचा इतिहास प्रसिद्ध करा ! मी सर्व तऱ्हेची मदत जरूर करीन. "
परंतु, या लेखकास तसा सुयोग लाभून देण्याचे परमेश्वराचेच मनांत नव्हते !
असो; दादासाहेबांचे कुटुंब; सावित्रीबाई ऊर्फ माईसाहेब यांनीं या लेखकास समक्ष भेटींत तूर्त पन्नास रुपयांची मदत करण्याचें आश्वासन दिलें आहे. त्याबद्दल लेखक त्यांचा अत्यंत आभारी आहे.

कृष्ण यांस पुत्र तीन; पैकीं गणेश यांस पुत्र महादेव; महादेव यांस पुत्र अनंत; महादेव हे सातारचे महाराज यांचेकडे शेकदार ( भाग कारकून ) होते; कोइनकाठ ( कोयनेचा तीर ) ची सर्व हद्द यांचेकडे होती. पुढें इंग्रजींतही नोकरी केल्यावर वाळवें तालुका येथें असतांना पेन्शनर झाले होते; यांचे पुत्र अंताजी हे हल्लीं सातारा येथील फर्स्टक्लास कोर्टांत नोकर आहेत.

बल्लाळचे बंधु भास्कर; यांस पुत्र आठ; बाळाजी, बाबजी, दाजी, नारो, दिनकर, जनोबा, हरी व कृष्ण; बाळाजीस पुत्र तीन; हरी, मोरभट व जनार्दन; हरीस पुत्र चार; विष्णु, कृष्ण, नरसो व गणेश; विष्णु यांस पुत्र विनायक; हे विनायकराव हल्लीं मामलेदार आहेत; यांना पुत्र तीन; विष्णु, वामन व विश्वनाथ. हे विद्यार्थी आहेत. कृष्ण यांस पुत्र महादेव; महादेवराव हे बी. ए. एल्. एल्. बी. असून धुळ्यास वकिली करीत आहेत. हे आपल्या वकिलीचे धंद्यांत चांगले वाकबगार आहेत; यांचें धुळें येथें खास घर आहे; यांना पुत्र तीन; वासुदेव, पुरुषोत्तम व सदाशिव; वासुदेवराव बी. ए. एल्. एल्. बी. झाले आहेत; पुरुषोत्तम व सदाशिव हे विद्यार्थी आहेत; महादेवराव आपटे नुकतेच विलायतेस गेले आहेत. गणेश हे पोलिस अकौंटंट होते; यांस मुलगे तीन; हरी, नारायण व गोविंद; हरीभाऊ हे अल्पवयांतच वारले; हे मोठें हुशार व सार्वजनिक कामाचे चहाते होते. यांना स्वतंत्र धंदा करण्यांत मोठी हौस वाटे ! यांनीं छापखाना काढिला होता; यांना विठ्ठल या नांवाचा एक मुलगा आहे; हा मुलगा आपल्या आईजवळ अजोळी असून विद्याभ्यास करीत आहे; नारायणराव हे हल्लीं बडोद्यास आहेत. यांस पुत्र कृष्ण व गजानन हे लहान आहेत. गोविंद हा चांगला निघाला असता, परंतु फारच अल्पवयांत वारला.

बाळाजीचे दुसरे पुत्र मोरभट, यांस पुत्र विठ्ठल; विठ्ठल यांस पुत्र शंकरराव; हे मुंबईस सावकारी नोकर आहेत. यांना सदाशिव नांवाचा लहान मुलगा आहे. बाळाजीचे तिसरे पुत्र जनार्दन; यांस पुत्र गोविंद; यांस पुत्र काशिनाथ; यांना मुलगे तीन; केशव, आत्माराम व वासुदेव; केशवराव फर्स्टक्लास मेकॅनिकल इंजि-

नियर आहेत; यांनीं आजपर्यंत पुष्कळ ठिकाणीं नोकऱ्या केल्या. त्यांची साधारण माहिती देतो. धारवाड, हुबळी, गदग, मूर्तिजापूर, मुंबई, कलकत्ता वगैरे बऱ्याच ठिकाणीं नोकरी केल्याची सर्टिफिकीटें पुष्कळ आहेत; पैकीं कांहीं येथें देतोः—

## सर्टिफिकीटें.

### VICTORIA JUBILEE TECHNICAL INSTITUTE BOMBAY.

Keshava Kashinath Apte Having completed the course and passed the examinetions held during three sessians ending in 1894 in Technalagical Mechanical Engineering and the Complimentry science subjects, the board of the institute on the award of the examiners has granted to him this Full Technalagical Certificate of the Secand class.

( Sd. ) K. M. Chatfeild.
Director of public
Instruction.

( Sd. ) G. Cotton.
Chairman.

( Sd. ) Nowrojee wadia,
Hon. Secretary.

( Sd. ) J. Vhythian, principal.

व्हिक्टोरीया ज्युबिली टेक्निकल इन्स्टिटयूट मुंबई.

केशव काशिनाथ आपटे यांनीं सर्व अभ्यास संपविला असून १८९४ सालीं घेतलेल्या परीक्षेंत मेकॅनिकल इंजिनियरींग वगैरे विषयांत सेकंड क्लासांत पास झाले आहेत असें सर्टिफिकेट या इन्स्टिटयूटची कमिटी त्यांना देत आहे.

( सही ) के. एम्. चॅटफील्ड
डायरेक्टर ऑफ पाब्लिक इन्स्ट्रकशन

( सही ) जी. कॉटन चेअरमन.

( सही ) नवरोजी वाडिया
ऑ. सेक्रेटरी.

( सही ) जे. व्हिथीअन
प्रिंन्सिपाल.

# BY ORDER OF HIS EXCELLENCY THE GOVERNOR OF BOMBAY IN COUNCIL.

## CERTIFICATE OF COMPETENCY OF THE FIRST CLASS GRANTED UNDER THE BOMBAY BOILER INSPECTION. ACT. 1891.

## NO 24 OF 1898.

Keshav Kashinath Apte, aged about 26 years at present residing at Dharwar having satisfied the Board of Examiners appointed uuder the Bombay Boiler Inspection Act 1891 of his campetency to have charge of bailers attached to prime movers of any horse=power nominal is granted under section 21 of the said act, this certificate of competency of the first class.

Bombay, 13th of January, 1894.

| | | |
|---|---|---|
| A. Wood,<br>Collector & President,<br>Board of Examiners. | Board of Examiners | Fred. Or. Gadoain.<br>T. M. English.<br>J. M. Fairburn.<br>Charles Anderson. |

Duplicate of this certificate has been record in the Steam Boilor office this 13th day of January 1898.

नेक नामदार गव्हर्नर मुंबई यांचे हुकुमावरून बाँबे बॉईलर अॅक्ट १८९१ च्या प्रमाणें फर्स्ट क्लासचें सर्टिफिकेट.

१८९८ चा नंबर २४

केशव काशिनाथ आपटे वय सुमारें २६ वर्षे यांना फर्स्ट क्लासचें सर्टिफिकेट १८९१ च्या बाँबे बॉयलर इन्स्पेक्शन अॅक्ट प्रमाणें नेमलेल्या परीक्षकांनीं शिफारस केल्यावरून त्याच अॅक्टाच्या २१ कलमान्वयें कोणतेही बॉयलर वापरण्याची त्यांची लायकी आहे, असें देण्यांत येत आहे.

मुंबई १३ जानेवारी १८९४

| | | |
|---|---|---|
| ए. वूड<br>कलेक्टर आणि प्रेसिडेंट<br>परीक्षक | परीक्षकांची कमिटी | फ्रेड. ऑर. गॅडम.<br>टी. एम्. इंग्लीश.<br>जे. एम्. फेअरबर्न.<br>चार्लस अँडरसन. |

भोर

THE NARSINGGIRJEE MANUFACTURING Co, LD.

Sholapur, 19—1—1903.

The bearer, Keshav K. Apte, served in the above Mills for 3 months as acting Engineer during the time our Engineer was on leave.

I may say that during that time he gave me every satisfaction During the above time he made a tawer clock for our Mills, and for the good work done by him the Company gave him one month's extra salary.

I can recommend him to any mill agent who may be in want of a good, steady and hard-working Engineer and one who knows his work well.

( Sd, ) E. Edwards,
Manager.

याची प्रत स्टीमबायलर ऑफिसांत ठेविली आहे.
१३ ज्यानेवारी १८९८

दि. नरसिंग गिरजी मॅन्युफॅक्चरींग कंपनी लिमिटेड.

सोलापूर १९–१–१९०३

आमचा इंजिनियर रजेवर असतांना त्याचे जागीं यांनीं—केशव काशिनाथ आपटे— आमच्या गिरणींत ३ महिने काम केलें आहे. एवढ्या वेळेंत त्यांनीं मला संतुष्ट केलें आहे. याचवेळीं त्यांनीं आमच्या गिरणीकरतां एक मोठें घड्याळ (टॉवरक्लॉक) केलें आहे व त्यांनीं केलेल्या उत्तम कामाबद्दल त्यांना कंपनीनें एक महिन्याचा पगार बक्षिस केला.

एखाद्या गिरणींत जर उत्तम व सतत मेहनत करणारा इंजिनीयर हवा असला तर हा इसम योग्य आहे अशी मी शिफारस करतो.

( सही ) ई. एडवर्डस्

## FROM JAMNADAS NARSEY, MOORTIZAPORE GIN & PRESS CO.

This is to certify that Mr. K. K. Apte, has served in our Ginning and Pressing Factaries in Berar from 15th August, 1904, to 31st April, 1906. During this period our factories worked very satisfactorily. He is quite good natured and always trying to seek the satisfaction of his Masters.

(Sd.) Jamnadas Narsey & Co.

*In their tetter of 11th Jan. 1905, the proprietor says:-*

As far the Gin it is giving the fullest satisfaction. It is giving very fine production not to be seen in any other factory at Moortizapore. Every one admires far the same.

(Sd.) Khimji Coowarji.

जमनादास नरसे मूर्तिजापूर जिनप्रेस कंपनीकडून.

असें सर्टिफिकेट देण्यांत येतें कीं मि. केशव काशिनाथ आपटे यांनीं १५ आगष्ट १९०४ पासून ३१ एप्रिल १९०६ पर्यंत आमच्या वऱ्हाडांतील जीनिंग आणि प्रेसिंग फॅक्टरींत काम केलें आहे. या मुदतींत आमच्या गिरण्या उत्तम चालल्या होत्या. हे उत्तम स्वभावाचे असून धन्याला खुष ठेवण्यांत तत्पर असतात.

(सही) जमनादास नार्वे कं.

११।१।१९०५ च्या आपल्या पत्रांत प्रोप्रायटरनीं लिहिलें आहे कीं, आमच्या गिरणींतून इतकें उत्तम काम होत आहे कीं, तसें दुसऱ्या कोणत्याही येथील दुसऱ्या गिरणींत होत नाहीं अशी माझी खात्री आहे.

(सही) खिमजी कावजी
म्यानेजर.

FROM THE CHIEF ENGINEER & MANAGER,
THE NEW GREAT EASTERN
SPINNING & WEAVING CO. LTD.,
CHINGPOGLY.

Bombay, 12th April, 1906.

This is to certify that Mr. K. K. Apte, is an Engineer and well known to me. I have seen his work in several places and he is a capital workman and first class Engineer and can be trusted to look after Engines and Boilers of any power. He is a steady and honest man and I can recommend him to any Mill requiring a competent Engineer.

( Sd. ) J. Hammet, M. I. M. E.

१२–४–१९०६

दि न्यू ग्रेट ईस्टर्न स्पिनिंग आणि वीव्हिंग कंपनी लिमिटेड चिंचपोकळी यांचे मुख्य इंजिनीयर व मॅनेजरकडून.

असें सर्टिफिकेट देण्यांत येत आहे कीं, मिस्टर केशव काशिनाथ आपटे हे उत्तम इंजिनीयर असून माझ्या पूर्ण परिचयाचे आहेत. आणि मी यांचें ठिकठिकाणचें काम पाहून असें सांगतों कीं, यांचा आपल्या कामांत हातखंडा असून हे फर्स्ट-क्लास इंजिनीयर आहेत व कोणतेंही इंजिन अगर बायलर चालविण्यास यांना खुशाल सांगावें. हे स्थिर व प्रामाणिक असून आपल्या कामास लायक आहेत अशी मी गिरणीवाल्यास शिफारस करतों.

( सही ) जे. हॅमेट.
एम्. आय्. एम्. ई.

## DELHI CLOTH & GENERAL MILLS, Ltd.

Delhi 19th June 1913.

This is to certify that Mr. K. K. Apte has worked in the above Mills as Engineer from 20th December 1911 to 20th June 1913. During this time he had to act as Manager for about one year. He leaves of his own accord to better his prospects and health. I may say that he is a very clever Engineer and we are sorry for his loss to the Company. He made several alterations and improvements which were appreciated. He put one crank pin and the work was--managed very nicely and within a short time.

( Sd. ) Madan Mohan.
Secretary.

दिल्ली क्लॉथ अँन्ड जनरल मिल्स लि. दिल्ली. १९ जून १९१३.

वरील गिरणींत २०।१२।१९११ ते २० जून १९१३ पर्यंत मि. केशव काशिनाथ आपटे यांनीं इंजिनीयरचें काम केलें आहे. याचवेळीं त्यांनीं एक वर्षभर मॅनेजरचेंही काम केलें आहे. हे फार हुषार इंजिनीयर असून त्यांनीं प्रकृतिसाठीं काम सोडल्याबद्दल कंपनीला फार वाईट वाटत आहे. त्यानीं उत्तम आशा सुधारणा केल्या आहेत.

( सही ) मदन मोहन
सेक्रेटरी.

---

## EXTRACT FROM A LETTER DATED 1st APRIL 1908 FROM MESSRS. J & E WOOD, ENGINEERS & MILL WRIGHTS, BOLTON.

We have received through Mr. Thamas Millar the indicated Diagrams refered to in your letter of March 5th. The last set dated 4-3-08 are very good figures except there is insufficient compression on the

H. V. crank end if this were altered we cannot see it is possible to obtain better diagrams, they will show a great improvement on the set dated 28-11-06.

*P. Pro. John & Edward Wood,*
*Edward L. Trott.*

---

केशवराव यांनीं एक यंत्र तयार केलें आहे; त्या यंत्राबद्दल विलायतेंतीळ लिहून आलेल्या पत्राचा उतारा–

W. P. Thompson and Co.
British & foreign patent & trade mark 6 lord
street agency.
Lwerpool December 22nd 1913.

In reply refer to.

K. K. Apte. Esq.
Dharwar India.

Dear Sir :—

Your favour of the 5th inst. to hand. Quite unexpectedly the English patent office produced a fresh lot of objections to your patent but I think I have successfully fought them through and am expecting the grant any day.

I think your proposals are very reasonable, £. 300 royalty, but we usually consider with a patent that it is never worth more than a few years purchase and therefore it ought to be either £. 1200, price of patent at the very outside and £. 300 royalty or £. 2000 price of patent and £. 500 royalty. In any case these big firms will generally want it at a royalty first, with the option of purchasing the royalty any time they like for a lump sum. We will at=once offer it for £. 300 royalty the moment the patent is actually accepted and printed.

I am obliged to you for your kind words on the last page about having Confidence in us and we will try and merit them.

Yours truly
W. P. Thompson.

डब्ल्यू. पी. थामसन् आणि कंपनी
ब्रिटिश आणि फॉरिन पेटंट आणि ट्रेडमार्क
एजन्टस ६ लार्डस्ट्रीट लिव्हरपूर
यांजकडून

के. के. आपटे एस्क्वायर धारवाड हिंदुस्थान यांस—

२२ डिसेंबर १९१३

डिअर सर—

आपलें ता. ५ मीनहूचें कृपापत्र पावलें. तुमच्या पेटंटाला इंग्लिश पेटंट ऑफिस कडून अगदीं नवीन बऱ्याच हरकती काढण्यांत आल्या. त्या तशा येतील ह्याची आह्मांस कल्पनाही नव्हती. आह्मी त्या सगळ्यांस समर्पक उत्तरें देऊन निकाल लाविला आहे व पेटंट इतक्यांतच मिळेल अशी आह्मांस अशा आहे.

आमचे समजुतीनें ३०० पौंड रॉयलटी बद्दलच्या तुमच्या सूचना अगदीं योग्य आहेत. आह्मीं नेहमीं पेटंटाबद्दल चार वर्षांच्या खरेदीच्या रकमेपेक्षां जास्त त्याची किंमत आहे असें समजत नाहीं, आणि म्हणून आरंभींच पेटंटाची किंमत एकदम १२०० पौंड आणि ३०० पौंड रॉयलटी अथवा पेटंटाची किंमत २००० पौंड आणि ५०० पौंड रॉयलटी अशी असावी. कसेंही झालें तरी ह्या मोठमोठ्या कंपन्यांना बहुतेक प्रथम रॉयलटीचे पैसे देऊन व पुढें वाटल्यास केव्हांही ठोक रक्कम देऊन विकत घेण्याची मुभा ठेऊन घेण्याची इच्छा असते. पेटंट प्रत्यक्ष कबूल झालें व छापलें ह्मणजे आह्मी एकदम ३०० पौंड रॉयलटीला विकत देण्यास तयार आहोंत. तुम्ही आपलें पत्राचे शेवटचे पानांत आमच्यावर पूर्ण विश्वास असल्याबद्दलचे गौरवाचे शब्द लिहिले आहेत त्याबद्दल आह्मी आपले फार आभारी आहोंत व असाच गौरव आपणाकडून नेहमीं आह्मांस मिळेल अशी आमची आपल्याशीं वर्तणूक राहील.

आपला
डब्ल्यू. पी. थामसन्.

सदरहू पत्रांवरून सर्वांची खात्री झालीच असेल कीं, केशवराव आपटे विलक्षण कल्पक आहेत. दिल्लीची हवा न मानवल्यामुळें, ते नोकरी सोडून आले. यांचें खास घर शिरगांव येथें आहे; शिवाय धारवाड येथेंही मोठी जागा घेतली आहे. त्या जागेवर नुकतेंच घर बांधण्यास सुरवात केली आहे. मद्रासची नोकरी आल्यामुळें, हल्लीं मद्रास येथें अडिचशें रुपये पगारावर हे टेकनिकलस्कूलचे प्रोफेसरचे जागीं कायम झाले आहेत; यांची रहाणी फार साधी असून स्वभावानें गरीब आहेत; यांना पुत्र तीन; बाळाजी, दत्तात्रय व नरहरी; हे विद्यार्थी आहेत; यांचे बंधू आत्मारामपंत बी. ए. एल्. एल्. बी. असून फार हुषार होते ! हे अल्पवयांत अकालिक मृत्यूच्या जबड्यात् सांपडलें त्याला नाइलाज ! ते धारवाड येथेंच वकिली करीत होते. त्यांची कोर्टांत काम करण्याची शैली उत्तम होती; केशवराव यांचे कनिष्ट बंधू वासुदेवराव हे एल्. एम्. ॲन्ड. एस्. आहेत. हल्लीं धुळें येथें वासुदेवराव यांनीं खासगी दवाखाना काढिला असून, प्रॅक्टिस बरें चाललें आहे; यांना पुत्र कृष्ण हा लहान आहे.

नारायणभटाचे तिसरे पुत्र गोविंदभट, यांस पुत्र सहा; पैकीं बाबूभट व नारायणभट या दोघांचाच वंश चालू आहे; बाबूभटास पुत्र सात; बाळंभट, दिवाकर, भास्कर, वासुदेव, प्रभाकर, विष्णु, व जनार्दन ऊर्फ भटंभट; बाळंभटास पुत्र तीन; गोविंद, हरी व धुंडीराज; गोविंद हे देशावर आले; यांस पुत्र नारायण; नारायण हे विद्यासंपन्न झाल्यामुळें यांना नानाशास्त्री असें ह्मणत असत; नानाशास्त्री हे सब्जज्ज होते; यांचेवर सरकारची मेहेरनजर असल्यानें ‘ रावबहाद्दुर ’ चा सन्मान मिळून फर्स्टक्लास सब्जज्ज होते; या जागेवर असतांनाच, यानीं पेन्शन घेतली; यांचे शनवारांत ४०१ नंबरचें घर आहे, यांच घरांत रावबहाद्दुर नानाशास्त्री यांचे नातू माहादेव हे रहात आहेत; रावबहाद्दूर यांना पुत्र तीन; विष्णु, विनायक व चिंतामण; विष्णुपंत यांनीं ‘ धी बॉंबेब्यॉकींग कंपनी ’ काढली होती, ती ब्यॉंक विष्णुपंतांचे पश्चात् बरींच वर्षें चांगली चालली होती, परंतु, सदरहू बॅंकसंबधानें हल्लीं काय परिस्थिति झाली आहे हें सर्व लोकांना माहित आहेच. विष्णुपंतांचे बंधु विनायकराव यांनीं ‘ पुना मरकन्टाईल बॅंक ’ काढली ती अद्यापी चालूं आहे; चिंतामणराव हे बी. ए. होऊन अल्पवयांतच वारले; ह्या तिघा भावांपैकीं विनायकराव यांचे चिरंजीव महादेव आहेत; हे महादेव विद्यार्थी आहेत.

गोविंद यांचे बंधू हरी व धुंडीराज; पैकीं हरीचे पुत्र बाळकृष्ण; यांस पुत्र दोन; दामोदर व सिताराम; दामोदरपंत हे पोलिस जमादार असून एम्. एस्. एम्. रेल्वेंत कोरेगांव स्टेशनवर आहेत; सितारामशास्त्री हे नागपूरास असतात; दिवाकरभट व जनार्दन उर्फ भटंभट हे दोघे बंधू शिरगांवहून मुक्काम वर्दे पेटा कुडाळ येथें गेले; दिवाकरभटास पुत्र बाबजी; यांस पुत्र गोविंद; गोविंदचे पुत्र चिंतामण; हे चिंतामण गोविंद आपटे गणित विषयांत चांगले आहेत; हे शिक्षकाचें काम बरींच वर्षें करीत आहेत; हल्लीं पुणें येथें ‘ नूतन मराठी विद्यालयांत’ शिक्षकाचे जागेवर आहेत; यांचें घर वर्दे येथें आहे; जनार्दनभटास पुत्र विसाजी; यांस पुत्र लक्ष्मण; व लक्ष्मणाचे पुत्र पांच; बाळाजी, रावजी, विनायक, वासुदेव व दत्तात्रय; हे सर्व सज्ञान असून मुक्काम वर्दे येथेंच शेती करून असतात; पणजाची वास्तू यांनीं राखिली आहे. प्रभाकर हे शिरगांवहून देशावर श्रीक्षेत्र वाई येथें आले; प्रभाकरास पुत्र चार; रावजी, सखाराम, केसो व गणेश; रावजीचे पुत्र वामन हे शाळाखात्यांत नोकर होते; हे हल्लीं वीस रुपये पेन्शन घेऊन श्रीक्षेत्र वाई येथें गणपती आळींत आपल्या वडिलार्जित घरांत रहात आहेत. यांस पुत्र पांच; भास्कर मोरेश्वर, अनंत, दामोदर व गणेश; भास्कर शिवाय बाकीचे विद्यार्थी आहेत; हे भास्करराव आपटे पोष्टखात्यांत नोकर आहेत. यांना पुत्र काशिनाथ हा लहान आहे. सखाराम यांस पुत्र चार; पैकीं दत्तात्रयाचा पुत्र प्रभाकर; हे प्रभाकरपंत आपटे पुण्यास असतात असें समजतें; केसो यांस पुत्र सदाशिव; सदाशिव आपटे हा अर्धवट आहे; हा वाई येथें, आपले मामा ( नरहरभट जोग ) यांचे जवळ असतो. गणेश यांस पुत्र गंगाधर; यांस पुत्र तीन; पैकीं नरहरी हल्लीं आहे; हा विद्यार्थी आहे; याचे मालकीचें घर श्रीक्षेत्र वाई येथें गणपती आळींत आहे. विष्णुभटास पुत्र तीन; बळवंत, गोविंद व महादेव; बळवंतचे पुत्र भिकाजी; यांचे पणतू गोविंद रामचंद्र हे हल्लीं आहेत; गोविंदराव शिरगांव येथें आपल्या खास घरांत असतात; गोविंदभट यांस पुत्र बाळंभट; गोविंदभट किंवा बाळंभट ह्या दोघापैकीं कोणी तरी एक गुहागरास गेला; हल्लीं गुहागर येथें यांचा वंश आहे; बाळंभटास पुत्र दोन; पैकीं कृष्णंभट यांस पुत्र तीन; रामचंद्र, बापूजी व विष्णुभट; बापूजीस पुत्र दोन; सदाशिव व बाळकृष्ण; सदाशिवाचे पुत्र जनार्दन; हे जनार्दनभट हल्लीं गुहागर येथें शेती करून असतात; यांना एक वासुदेव हा वेडा मुलगा आहे; बाळकृष्ण यांस पुत्र दोन; गणेश व रामचंद्र; गणेशचे पुत्र बापूराव व विष्णुपंत; आणि रामचंद्रराव

व यांचे पुत्र महादेवराव हे सर्व गुहागरास असतात; विष्णुभट यांस पुत्र तीन; महादाजी, रामचंद्र व गोपाळ; महादाजीस पुत्र दोन; पैकीं लक्ष्मण यांस पुत्र तीन; पांडुरंग, श्रीधर व गोपाळ; पांडुरंगराव पोष्ट-खात्यांत नोकर आहेत; श्रीधरपंत हें एज्युकेशनल खात्यांत नोकर आहेत; गोपाळ विद्यार्थी आहे; रामचंद्र यांस नारायण; यांस पुत्र गणेशपंत हे नोकर असून मुंबईस असतात; यांचा मुलगा गोविंद विद्यार्थी आहे; गोपाळ यांस पुत्र काशिनाथ व शिवराम; हे विद्यार्थी आहेत. विष्णुभटाचे तिसरे पुत्र महादेव; यांस पुत्र बाबजी; यांस भास्कर; यांस पुत्र गणेश; यांस पुत्र चार; पैकीं रामचंद्र व केशव यांचा वंश चालू आहे; रामचंद्र यांस पुत्र पुरुषोत्तम व गोविंद; पुरुषोत्तमपंत हे शिरगांव येथेंच असून बँच पोष्टमास्तर आहेत; यांचे बंधु गोविंदराव घरचा व्यवहार पहातात; पुरुषोत्तम यांचीं मुलें गणेश व हरी ऊर्फ सोदेश्वर; आणि गोविंद यांचा मुलगा दत्तात्रय हे विद्यार्थी आहेत; केशव यांस पुत्र तीन; वासुदेव, दामोदर व वामन; वासुदेवराव यांस पुत्र शंकर व नारायण हे विद्यार्थी आहेत; वासुदेवराव, दामोदरपंत व वामनराव हे नोकर आहेत.

गोविंदभटांचे सहावे पुत्र नारायणभट हे देशावर श्रीक्षेत्र वाई येथें गेले; यांस पुत्र सदाशिव व महादेव ऊर्फ भिकंभट; ह्या दोघा बंधूंची मोठी गमतीची हकिकत आहे ती पुढें येईलच ! सदाशिवभटास पुत्र दोन; गोविंदभट व विष्णुभट गोविंदभटास पुत्र तीन; पैकीं गणेश यांस पुत्र चार; रामचंद्र, अनंत, महादेव व रघुनाथ; रामचंद्र यांस पुत्र तीन; गंगाधर, परशराम व दामोदर; परशरामपंत व दामोदरपंत हे टाईप राइटिंगमध्यें मुंबई येथें असतात; अनंत यांचे पुत्र नारायणराव हे कलकत्त्याकडे केंद्रपूर येथें असतात; महादेव यांचे पुत्र काशिनाथ हे पुणें अगर मुंबई येथें असतात. रघुनाथ यांना पुत्र तीन; गोविंद, येशवंत व वासुदेव; गोविंदराव हे पूर्वी नोकर होते, परंतु हल्लीं, ' नाट्यकला प्रवर्तक सं. ना. मंडळीचे म्यॅनेजर आहेत; नाटककंपनीचे म्यानेजरचें काम किती जोखमीचे असतें, हे तज्ज्ञ लोकच जाणूं शकतील; गोविंदराव आपटे हे म्यानेजरचे कामांत चांगले वाक्बगार आहेत; यांना पुत्र शंकर व गणेश; हे विद्यार्थी आहेत; येशवंतराव हे वाईसच असतात; वासुदेवराव पूर्वी एम्. एस्. एम्. रेलवेंत नोकर होते; हल्लीं वाई येथें घरींच आहेत. महादेवभट ऊर्फ भिकंभट यांस पुत्र दोन; केशव व रामचंद्र; केशवभटास पुत्र चार; पैकीं निळकंट व शिवराम. यांचा वंश चालू आहे; निळकंठ यांस पुत्र रामचंद्रपंत हे

हल्लीं लष्कर—ग्वॉलेर येथें जी. आय. पी. रेलवेंत कोचिंग क्लॉर्क आहेत; यांना पुत्र तीन; चिंतामण, त्रिंबक व येशवंत; चिंतामणराव हे मुंबईस इंप्रुव्हमेंटट्रस्ट खात्यांत सर्वेअर आहेत; त्रिंबक हेही नोकर आहेत; आणि येशवंत विद्यार्थी आहे; शिवरापंत हे रेलवेंत नोकर होते; यांनीं पुणें येथें सदाशिव पेठेंत घर बांधिलें आहे. शिवरामपंत पुणें येथील आपल्या घरांत रहातात; यांस पुत्र गोपीनाथ पंत हे नोकर आहेत; यांना पुत्र तीन. विश्वनाथ, शंकर व गंगाधर; हे विद्यार्थी आहेत; शिवरामपंताचे बंधू विश्वनाथ हे मोठे शास्त्री होते; या विश्वनाथशास्त्रींनीं गृहस्थाश्रमानंतर संन्यास घेतला. हे नर्मदाकाठीं महेश्वर येथें ३८ वर्षे होते. यांना तपोनिधी म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. तिकडे यांचा लौकीक अद्यापी विद्यमान आहे. रामचंद्रभटास पुत्र वासुदेवभट; यांस मुलगे चार; बापूभट, बाळंभट, रामभट व लक्ष्मणभट; बापूभटास पुत्र गंगाधर व अण्णा; गंगाधरभट नागपूरास असतात; व अण्णंभट हे फिरते असतात; रामभट हे पुण्यास असतात. यांनीं वेदशाळा चालविली आहे; यांचे पुत्र त्रिबंकराव हे नोकर आहेत; लक्ष्मणभटास पुत्र तीन; वासुदेव, नारायण व विनायक; वासुदेवराव हे नोकर आहेत; नारायणभट हे भिक्षुक आहेत व विनायक विद्यार्थी आहे; "मोठी गमतीची हकिकत पुढें येईलच" असें वर लिहिलेंच आहे ती हकीकत येणेप्रमाणें—"शिरगांवाहून नारायणभट श्रीक्षेत्र वाईजवळील पांडववाडी येथें आले; यांना सातारचे महाराज सरकारकडून जमीन दान मिळाली ती अद्यापी यांचे वंशाकडे आहे; नारायणभट पांडववाडी येथें स्वर्गवासी झाले, तेव्हां यांचे कुटुंबानें जुळे पुत्र सदाशिव व महादेव या दोघांस एका अश्वत्थाचे पारावर ठेऊन त्या मुलाजवळ द्रव्यानें भरलेला एक कलश ठेऊन आपण सती गेली; अद्यापी पांडववाडी येथें सतीचा पार झणून नांव विद्यमान आहे;" पुढें सदाशिवभट व महादेवभट उर्फ भिकंभट यांनीं श्रीक्षेत्र वाई येथें गंगापुरींत वास्तव्य केलें; हल्लीं दोघांचाही वंश असून निरनिराळीं घरें आहेत.

# मालपें येथील आपटे.

नारायणभटाचे चवथे पुत्र रघुनाथभट हे शिरगांवहून कनिष्ट बंधू बाळंभटासह प्रथम मालवण जवळ मालदी येथें गेले व तेथून मालप्यास आले. मालपें हा गांव सरदार बाळासाहेब पंत अमात्य संस्थान गगन–बावडा यांचा आहे. या गांवीं ब्राम्हणांची वस्ती पूर्वीं नव्हती; प्रथम रघुनाथभट आपटे यांनींच मालपें गांवीं वस्ती केली; हल्लीं मालपें येथें अदमासें दहा घरें तरी आपटे यांचीं असावींत ! वस्ती होऊन जवळ जवळ दोनशें वर्षे आज मित्तीस झालीं म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. हा गांव अगदीं डोंगरांत आहे; या गांवाजवळून खारेपाटणकडे खाडी गेली आहे; या गांवाचे स्वामीत्वाबद्दल दरसाल जो खंड देणेचा तो आपटेच देतात; बहुतेक गांवचे सर्व हक्क आपटे यांचेच आहेत; हा गांव वंशपरंपरेच्या करारानें आपटे यांचाच आहे. या गांवची हवा पाणी उत्तम आहे.

रघुनाथभटास पुत्र सहा; केशवभट, कृष्णंभट, रामाजी, नारायणभट, महादेवभट; व गोविंदभट पैकीं केशवभटाचा व गोविंदभटाचा निर्वंश; कृष्णंभटास मुलगे तीन. बाबूराव, हरभट व गोविंदभट, बाबूराव हे देशावर आल्यावर मग गोविंदभट आले; हरभटाचा वंश हल्लीं मालपें येथें आहे; हरभटास पुत्र चार; बाजी, दिनकर, रामचंद्र व धोंडो; बाजीचे पणतू सखाराम गोविंद व धोंडू विष्णु आहेत; सखारामपंत सज्ञान असून धोंडू अज्ञान आहे; दिवकराचे नातू महादेव विनायक हे नोकर आहेत; यांना भास्कर नांवाचा मुलगा आहे; रामचंद्राचे नातू गणेश व राघोपंत प्रभाकर; हे मोठे हुषार होऊन गेले; राघोपंत आपटे यांनीं नाटकव्यवसायांत पैसे मिळवून, मालपें येथें घर चांगलें बांधिलें, आणि ग्रामदेवीला जरीची पैठणी व पालखी दिली, ती अद्यापी आहे; गणपतराव आपटे यांनीं मालपें हा गांव अगदीं अलग करून घेतला. त्यावेळीं गणपतराव यांनीं फारच युक्तीनें व बाणेदारपणानें काम केलें. गणपराव यास अपत्यें तीन; गोपाळ, गोविंद, व दिवाकर; गोपाळराव कोल्हापूरास असतात; गोविंदराव वरींच असून शेतीभाती व घरव्यवहार पाहतात; व दिवाकर लहान आहे.

बाबूराव व गोविंद हे देशावर आल्यावर बाबूरावांनीं आपल्या हिम्मतीवर मोठ्या हुषारीनें वागून सातारा येथील “ मंगळाईचा किल्ला ऊर्फ अजिंक्यतारा ” किल्ल्याचे स्वामित्व कोणाकडून मिळविलें, वगैरे सर्व माहिती देतो—

## ९७

# सायगांव येथील आपटे.

सातारा शहरापासून अदमासें ९।९॥ मैलांवर सायगांव ह्मणून एक खेडें आहे. हें गांव डोंगराच्या खोऱ्यांत असून ह्या गांवापासून मैल दीड मैलावर मेरुलिंग या नांवाचें श्रीशंकराचें रम्य स्थान डोंगरावर आहे. या मेरुलिंग डोंगराचे पायथ्याशीं उत्तर खोऱ्यांत सायगांव हें गांव बाबूराव कृष्ण आपटे यांनीं कायमचे रहाण्यास पसंत केलें. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचेजवळ यांनीं चाकरी केली. पुढें श्रीमंत सवाई माधवराव यांनीं बाबूराव कृष्ण आपटे यांचे नांवें सायगांव हा गांव शके १६९६ त वंशपरंपरा इनाम करून दिला. बाबूराव कृष्ण हे श्रीमंत रावसाहेब पेशवे यांचे तर्फे सातारच्या किल्ल्याचे व महाराजांचे संरक्षणार्थ होते. अशा जोखमीचे कामावर असल्यामुळें ते सायगांवीं केव्हां तरी जात असत. या सायगांवीं जो वाडा बांधण्यास यांनीं आरंभ केला तो वाडा यांचे बंधू गोविंदराव यांनीं पूर्ण केला. बाबूराव कृष्ण यांनीं गोविंदरावांचा मुलगा बापूराव यास दत्तक घेतलें होतें. गोविंदराव आपटे यांचे पहिले चिरंजीव वामनराव. बाबूराव कृष्ण यांचे पश्चात् सातारा किल्याचे व महाराजांचे संरक्षणार्थ वामनराव आपटे यांची नेमणूक शेवटचे श्रीमंत बाजीराव यांनीं केली. वामनरावांचे पहिले पुत्र रघुनाथराव व दुसरे कृष्णराव हे श्रीमंतांचे लष्करी नोकर होते.

बाबूराव कृष्ण यांनीं आपल्या गांवापासून सुमारें तीन मैल असलेल्या श्रीकृष्णाकाठीं लहानसा घाट बांधिला आहे. तसेंच क्षेत्र माहुली येथें गांवांत फरशी करून गोडबोले यांना एक घर बांधून दिलें. बाबूराव कृष्ण यांचे मागाहून वामन गोविंद आपटे हे सातारा येथें किल्यावर राहिले.

इ. स. १८१७ त खडकी येथें सेनापती बापूंचा पराभव झाला. तेव्हां बाजीरावसाहेब पुण्याहून निघाले ते सातारचे किल्यावर येऊन राहिले. येथून आणखी दुसरीकडे कोठें तरी पळून जावें असा श्रीमंतांचा विचार झाला. हें पाहून वामनराव आपटे श्रीमंतास म्हणाले, “ असें पळून जाणें बरें नाहीं. कारण जर खास स्वारीच पळूं लागली तर इतरांना धीर कसा येणार ! आह्मीं जोंपर्यंत जिवंत आहों तोंपर्यंत आपल्या केसालाही धक्का लागणार नाहीं. तूर्त कोरेगांव येथें लढाई सुरूच आहे. तेव्हां आतांच मी माझ्या दोन्ही पुत्रांस लिहून कळवितों कीं, “ विजयी झालांत तरच माझ्या पोटीं येऊन धन्य केलेंत. ” असें म्हणून



श्री. सौ. गंगुताई ... वाचनालय
18 APR 1990

वामनराव यांनीं रघुनाथराव आपटे एकांडे ( बाराशें स्वारांचा अधिकारी ) यांचेकडे सांडणीस्वार रवाना केला. ज्या ठिकाणीं सैन्याचा तळ होता तेथें जाऊन सांडणीस्वारानें रघुनाथराव यांचेजवळ लखोटा दिला. सदरहू लखोटा वाचून त्यांनीं तोच लखोटा ताबडतोब सेनापती गोखले यांचे फौजेंत एका तुकडीचे अधिपति कृष्णराव आपटे होते त्यांचेजवळ देण्यास त्या सांडणीस्वारास सांगितलें. त्याच पाउलीं त्या स्वारानें सदरहु लखोटा कृष्णराव आपटे यांचेजवळ दिला. कृष्ण-रावांनीं त्या लखोट्यांतील मजकूर वाचला व एकदम तलवारीला हात घालून ह्मणाले, " आज संध्याकाळचे आंत मरूं किंवा मारूं ! " असें म्हणून सांडणीस्वाराजवळ निराळा लखोटा देऊन परत जाण्यास सांगितलें.

इकडे रघुनाथराव व कृष्णराव या बंधुद्वयांनीं एक विचारें शत्रूशीं निकरानें लढण्याचा निश्चय करून, दोघांनीं आपले घोडे शत्रूसैन्यावर घातले तोंच शत्रूकडील गोलंदाजानें रघुनाथराव यांचा घोडा ठार केला. तेव्हां रघुनाथराव यांनीं फार चतुराईनें शत्रूकडील गोलंदाजास ठार केलें. पुढें कृष्णराव यांनीं रघु-नाथराव यांना आपले घोड्यावर घेतलें आणि एकदम शत्रूसैन्यांत घुसले. दोघांनीं दोन्हीं हातांत पट्टे चढवून सारखी कत्तल सुरूं केली. शत्रूसैन्याची दाणादाण झाल्यामुळें ते पळूं लागले. शत्रूकडील कित्येक लोक ठार झाले व कित्येक जखमी झाले. त्या लढाईंत फत्ते झाली आणि जयप्राप्तीचें शिंगही वाजूं लागलें. इकडे कृष्णराव व रघुनाथराव यांनीं जयप्राप्तीची बातमी सातारचे किल्ल्यावर आपले वडिलांकडे ताबडतोब कळविली. ही बातमी ऐकून वामनराव यांना पराकाष्ठेचा आनंद झाला. त्याचवेळीं त्यांनीं ही बातमी श्रीमंतांचे कानावरही घातली. परंतु, पुन्हां शत्रूनें दुसरे दिवशीं निकराची लढाई सुरूं केली; ही बातमी श्रीमंताना कळतांच दुसरीकडे पळून जाण्याचा निश्चय श्रीमंतांचा कायम झाला.

श्रीमंत बाजीराव यांनीं वामनराव आपटे यांस किल्ल्याचे व महाराजांचे संरक्षणार्थ ठेवून आपण दुसरीकडे कूच केलें. पेशवा पळूं लागल्यामुळें सर्व बेबंदशाही झालेली पाहून पेशव्यांचे राज्य इ. स. १८१८ त खालसा झालें. यावेळीं सातारचे महाराज प्रतापसिंह राजे आपल्या वाड्यांत रहात होते. महारा-जांचे बंधू भाऊसाहेब भोसले यांनीं, वामनराव यांना किल्ला आमचे स्वाधीन करावा असें कळविलें. त्यावर वामनराव आपटे यांनीं असा निरोप पाठविला कीं, " श्रीमंतांनीं महाराजांचें व किल्ल्याचें संरक्षणार्थ आम्हाला येथें नेमिलें आहे. आतां खुद्द महाराजानींच जर " किल्ला आपल्या स्वाधीन करा व तशी

जा ! " असें सांगितलें तर आह्मी निघोन जाऊ. विनाकारण यादवी करणें हें बरें नव्हे. व तुह्माला हें राजकारण कर्तव्य नाहीं. " असा, निरोप ऐकून भाऊसाहेब ताबडतोब घोड्यावर स्वार झाले आणि बराचसा लवाजमा बरोबर घेऊन किल्ल्यावर चाल करून गेले. इकडे किल्ल्यावरील रखवालदार लोकांनीं वामनराव आपटे यांना, " भाऊसाहेब सशस्त्र आहेत तेव्हां आपण तयारी केली पाहिजे " असें सुचविलें. तेव्हां वामनराव म्हणाले, येऊ देत कांहीं हरकत नाहीं. पुन्हा दुसरा रखवालदार येऊन सांगूं लागला कीं, दरवाजांत गर्दी करून भाऊसाहेब अगदीं निकरावर आले आहेत. तेव्हां ताबडतोब दोन्हीं हातांत पट्टे चढवून वामनराव आपटे आपल्या सैनिकांसह भाऊसाहेबावर चाल करून गेले. किल्ल्याचे दरवाजांत दोघांची बरीच चकमक झाली. वामनराव यांचा पट्टा चौकटींत घुसला अशी संधी पाहून, भाऊसाहेबांनीं त्यांचेवर जबर वार केला. वामनराव बेशुद्ध होऊन पडले. इकडे सर्व लोक किल्ल्यांत घुसले. वामनराव घायाळ होऊन पडल्याचें त्यांचे सासरे गुजाबा अण्णा जोशी हे चिमणपुऱ्यांत रहात असत त्यांना समजलें. तेव्हां गुजाबा अण्णा जोशी हे किल्ल्यावर जाऊन वामनराव यांना डोलींत घालून घरीं घेऊन आले. त्यांच्या जखमा बांधून सर्व व्यवस्था केली. वामनराव तीन–चार महिन्यांनीं चांगले झाल्यावर एके दिवशीं घोड्यावर स्वार होऊन प्रतापसिंह महाराजांना शेवटचा मुजरा करण्यास निघाले. वाड्यांत जातांच चौकीवाल्यांनीं त्यांना अटकाव केला, तों वामनरावांनीं तलवारीस हात घातला तेव्हां पहारेवाले बाजूला झाले. वामनराव हे महाराज पुजा करीत बसले होते तेथें गेले व मुजरा करून बोलले— ज्यांनीं आह्मांला येथें ठेविलें होतें त्यांचेकडे आह्मी जातों. महाराजांनीं पुष्कळ आग्रह केला कीं, मी आहें तोंपर्यंत तरी जाऊं नये. तेव्हां वामनराव ह्मणाले आह्मीं आपले पाया-जवळच आहों ! माझ्या मुलांवर अशीच कृपा कायम ठेवावी येवढी विनंति आहे. असें म्हणून मुजरा करून ते जे निघाले ते थेट गांवीं सर्वांना भेटून ब्रम्हवर्तास श्रीमंतांकडे गेले. कांहीं दिवसांनीं वामनराव शिंदे यांना भेटण्यास गेले. तेथें शिंदे यांनीं वामनराव यांस ( सोंदे लोकांचा बंदोबस्त करण्याचा आग्रह करून) आपले जवळ राहण्याचा आग्रह केला. वामनरावांनीं त्या लोकांचा चांगला बंदोबस्त केला, हें लक्षांत आणून शिंद्यांनीं वामनरावास सरसुभ्याची जागा दिली. ते सरसुभ्याचे जागेवरच बरेच दिवस होते. या प्रांतींच यांचा अंत झाला.

इकडे पेशवाई बुडाल्यावर सातारा प्रांतीं प्रतापसिंह महाराज राज्य करीत

होते. वामनरावांचे दुसरे चिरंजीव कृष्णराव हे महाराजांना भेटले. या घराण्याचा पूर्व लौकिक व यांची तर्तरी पाहून कृष्णराव यांना महाराजांनीं मामलतीची जागा दिली. हे फार निस्पृह होते. यांनीं मामलतीचें काम फारच चतुराईनें केलें. यांचे अंगीं ' न्याय करण्याची ' दैविक्शक्ति असावी, असें सर्व ह्मणत असत. याचें कारण यांच्याकडून अन्याय कधींच झाला नाहीं. यांच्या न्यायाच्या आख्यायिका येथें देतो.— हे पंढरपूर येथें मामलतीवर असतांना, इकडे कांहीं संशयावरून प्रतापसिंह महाराजांना इ. स. १८३९ त पदच्युत केलें आणि त्यांचे बंधू शहाजी महाराज ऊर्फ अप्पासाहेब यांस गादीवर बसविलें. अदमासें याच सुमारास पंढरपूर येथील एका मोठ्या सावकारानें एकाची चार लाखांची ठेव अजिबात नाहींशी करण्याच्या हेतूनें, कांहीं साथीदारांकडून आपल्या घराची मोडतोड करून दरोडा पडला, सर्व चोरीस गेले, आतां काय करावें सबब रावसाहेब मामलेदार यांचेकडे चौकशी व्हावी ह्मणून त्यांना भेटले. रावसाहेब घरीं येऊन पहातात तों घरफोडी वगैरे झालेली पाहून ते मोठे विचारांत पडले. परंतु, रावसाहेब त्या सावकाराकडे वरचेवर नीट लक्ष देऊन पहात होते.

बराच वेळ गेल्यावर रावसाहेबांनीं चावडीवरून चार बेड्या आणवून, प्रथम त्या सावकाराचे हातांत व तेथें सावकाराचे साथीदार तिघेजण होते त्यांचे हातांत घालून सर्वांना गांवांतून नेऊन कोटडींत बंद केलें.

गांवांतील सर्व लोक रावसाहेबांना नांवें ठेवूं लागले कीं, " ज्या सावकाराची घरफोडी होते त्यालाच शिक्षा ! " एकना दोन नानतऱ्हेनें लोक नांवें ठेवूं लागले.

सावकाराचे हितचिंतकांकडून महाराजाकडे अर्ज गेले. महाराजांनाही जरा चमत्कारिक वाटलें. आणि एकदम राव० कृष्णराव मामलेदार यांना हुकूम फर्माविला कीं—आपण धरलेल्या आरोपीसह ताबडतोब इकडे हजर व्हावें.

महाराजांचा हुकूम पाहतांच, आरोपीस बरोबर घेऊन ते सातारा येथें दाखल झाले. महाराजांनीं चौकशी करण्यास सुरवात केली. परंतु, रावसाहेबांचें ह्मणणें असें पडलें कीं, मला ह्या दरोड्यासंबंधीं काय सांगावयाचें आहे तें महाराजांनीं फक्त स्वतःच ऐकून घ्यावें. तेव्हां महाराजाजवळ रावसाहेबांनीं सांगितलें कीं, " त्या सावकारानें दुसऱ्याची ठेव जिरविण्याकरितां खोटाच दरोडा पडला म्हणून उठविलें आहे. मला २ महिन्यांची मुदत द्यावी. मी सर्व मुद्देमालासह जर दरोडा पकडला नाहीं तर पुन्हां लेखणी हातांत धरणार नाहीं, याबद्दल मी पूर्ण जबाबदार आहे. आतां या बाबतींत माझ्या हातून कांहीं दगा फटका घडल्यास

त्याबद्दल मला माफी असावी. " याप्रमाणें रावसाहेबांचें सर्व ऐकून घेतलें आणि महाराजांनीं सर्वांदेखत असें सांगितलें कीं, " रावसाहेब मामलेदार यांनाच या दरोड्यासंबंधीं योग्य चौकशी फिरून करण्याचें फर्माविलें आहे. " याप्रमाणें हुकूम होतांच, रावसाहेबांनीं त्या आरोपीस बंदोबस्तानें पंढरपुरीं नेलें.

रावसाहेबांनीं बारीक चौकशी सुरू केली. तेव्हां त्यांचे लक्षांत असें आलें कीं, ज्यांना दरबारीं खुर्चीचा मान आहे अशा एका लब्धप्रतिष्ठित सावकाराचे घरीं सदरहू ठेवींपैकीं कांहीं माल आहे. तेव्हां कांहीं तरी निमित्तानें सदरहु सावकारास रावसाहेबांनीं बोलाविलें. त्यांचे आदरातिथ्य चांगलें केलें आणि इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्यावर रावसाहेबांनीं हळूंच त्यांना विचारिलें. तेव्हां सावकार म्हणाले, " छे ! छे ! ! आपणांस बिलकूल माहित नाहीं. " चांगल्या रीतीनें हें काम भागत नाहीं असें समजून रावसाहेबांनीं कोतवालास खूण केली. त्याबरोबर सावकारास चतुर्भूज करून चांगला चोप दिला. तरीही कबूल होत नाहीं असें पाहून रावसाहेबांनीं सावकाराच्या हातांतील आंगठी त्यांचे गुमस्त्याकडे पाठवून, " परवां बाजूला निराळाच ऐवज ठेविला आहे तो आंगठी घेऊन येणारे कोतवालाजवळ ताबडतोब देणें. " असा सावकाराचा निरोप व आंगठीची खूण पटतांच, सावकाराचे गुमास्त्यानें आंगठी घेऊन सदरहु ( ठेव ) ऐवज दिला.

रावसाहेबांचे हातांत तो ऐवज आल्यावर त्या सावकारास दाखविला. तो ऐवज पाहून सावकार रावसाहेबांची फार अर्जव करूं लागला. रावसाहेब म्हणाले, " मी प्रथम विचारल्याबरोबर जर तुम्ही सर्व खरी हकिकत सांगून ऐवज आणून दिला असतां तर तुम्हाला कांहीं विशेष त्रास झाला नसता ! आतां खोट्या कर्माचीं फळें भोगलींच पाहिजेत. " नंतरं रावसाहेबांनीं त्या सावकाराचें हाता-पायांत बेड्या ठोकून कोठडींत बंद केलें. आपली सर्व चोरी बाहेर पडली हें समजतांच पहिल्या ( आरोपी सावकारानें ) रावसाहेबास, माझी एकदां भेट घ्यावी अशी विनंती केली. रावसाहेब त्याच्या विनंतीप्रमाणें, त्यास भेटले. भेटींत रावसाहेबांस त्या सावकारानें म्हटलें, " चार लाखाची ठेव जिरविण्याकरितां मी सर्व खोटें केलें, हें मी कबूल करितों. मी भयंकर अपराधी आहें. परंतु, मी आपणांस एक लाख रुपये देतों, कृपाकरून मला सोडावें. " हें त्या आरोपीचें भाषण ऐकून घेऊन रावसाहेब म्हणाले, " अपराध्यास सोडणें अगर शिक्षा करणें तें माहाराजांकडे आहे. माझ्याकडे कांहीं नाहीं ! "

रावसाहेबांनीं पहिल्या सर्व आरोपीस आणि ज्या सावकारानें ठेव ठेवून घेतली होती त्यांस, असें सर्वांना बंदोबस्तानें सातान्यास रवाना केलें आणि त्यांचे मागोमाग आपणही साताऱ्यास हजर झाले. श्रीमंत माहाराज सरकारपुढें त्या आरोपीस उभें केलें आणि मुद्देमाल समोर ठेविला आणि सर्व हकीकत रावसाहेबांनीं महाराजांस सांगितली. महाराजांनीं आरोपीस विचारलें. त्यांनीं गुन्हा कबूल केला. त्यावेळीं ताबडतोब महाराजांनीं, रावसाहेबासच सदरहु खटल्याचा निकाल देणेस सांगितलें. हुकूम होतांच रावसाहेबांनीं दोन्ही सावकार आरोपीस जबर शिक्षा दिली आणि तिघां आरोपीस जरा सौम्य शिक्षा देऊन खटल्याचा निकाल करून ठेव ज्याची त्यास परत केली.

रावसाहेबांनीं मुदतीचे आंत सर्व चौकशी करून मोठ्या चातुर्यानें आरोपी पकडून आणिले, आरोपीस शिक्षाही योग्य दिल्या हें सर्व लक्षांत आणून महाराजांनीं दहा हजार १०००० रुपये रावसाहेबांस बक्षिस दिले. यांच्या मामलतदारीचे कामांतील महत्वाच्या गोष्टी पुष्कळ घडल्या; परंतु स्थलसंकोचास्तव विशेष न देतां एक गोष्ट वाळवें येथें घडली ती येथें देतों. सातारचे राज्य खालसा झाल्यावरही इंग्रजी अमदानींत कृष्णराव हे कन्हाडास मामलेदार होते. तेथें त्यावेळीं अशी एक चमत्कारिक गोष्ट झाली कीं, वाळवें येथील एक परीट नदीवर कपडे धूत होता. त्या परटाची बायको भाकरी वगैरे आणून आपल्या नवऱ्यास भाकरी खा, असें म्हणाली; तेव्हां तो बायकोस म्हणाला, " ठेव तिथं; एवढें हातांतील काम आटपून मग खातों. तूं घरीं जा. "

नवऱ्याच्या सांगण्याप्रमाणें तिनें भाकरी तेथें नीट ठेऊन ती घरीं गेली. काम आटोपल्यावर त्या परटानें ती भाकरी खाल्ली. संध्याकाळीं त्याची बायको कपडे नेण्याकरितां ह्मणून जों येते तों तिनें नवरा तेथें मरून पडलेला पाहिला. ही हकीकत गांवांत सर्वांमुखीं झाली. तेव्हां पोलिसानें त्या परिटीणीला सर्व हकीकत विचारली. तिनें मला कांहीं माहित नाहीं असें सांगितलें. तेव्हां तिनेंच नवऱ्यास मारलें असें गृहीत धरून, तिला पकडून, न्यायदेवतेपुढें उभी केली. पोलिस-पुराव्यानें ती दोषी ठरली. परंतु, न्यायाधिशांनीं तिला विचारलें तुझें ह्मणणें काय आहे. तिनें सांगितलें, " मी अपराधी नाहीं. हेच खरें; आतां सरकारांनीं कृपा करून माझ्या आरोपाची चौकशी गांवचे मामलेदार कृष्णराव रावसाहेब देवमाणूस आहेत त्याच्याकडून करवावी ! " हे त्या अपराधी बाईचें बोलणें ऐकून घेऊन, न्यायाधिशांनीं ताबडतोब कमिशनरकडे लिहिलें. त्याप्रमाणें हे

चौकशीचें काम पुन्हां रावसाहेबांकडे आलें. तेव्हां रावसाहेब मोठ्या विचारांत पडले. रावसाहेब प्रथम त्या परटीणीकडे जाऊन तिचा नवरा कोणत्या ठिकाणीं धूत होता ती जागा विचारून, आणखी कांहीं चौकशी करून घरीं आले. नंतर दुसरे दिवशीं ज्या ठिकाणीं परीट धूत असे तेथें भाकरी ठेवून ती भाकरी राखण्याकरितां पहारा ठेविला. नंतर पुन्हां दुसरें दिवशीं रावसाहेब तेथें गेले आणि भाकरीकडे पहातात तों ती सर्व मुंग्यानीं भरली होती. ती भाकरी झाडून एका कुत्र्याला घातली; तों तें कुत्रें कांहीं वेळानें मेलें. तेव्हां रावसाहेबांनीं त्या मुंग्या कोठें रहातात ती जागा पाहिली; तों लहानसें वारुळांत त्या मुंग्या जात–येत होत्या. तें वारूळ रावसाहेबांनीं उकरवून पाहिलें, तों त्यांत एक मोठा सर्प मृत झालेला असून मुंग्यांनीं त्याला पोखरून टाकिलें होतें. ही सर्व हकीकत लक्षांत घेऊन रावसाहेबांनीं वरील सर्व हकीकत कमिशनर साहेबांस लिहून त्यांत त्यांनीं असें लिहिलें कीं, परटीण अगदीं निरपराधी आहे. तेव्हां ती परटीण निरपराधी ठरून सरकारांनीं सोडून दिली.

रावसाहेबांनीं मेढें, पंढरपूर, वाळवें व कऱ्हाड इतक्या ठिकाणीं मामलतदारी केली. मामलतीवर असतांना रावसाहेबांनीं बऱ्याच ठिकाणीं धर्मशाळा व टाकीं बांधिलीं. त्याचप्रमाणें अनेक देवळांचे जिर्णोद्धार केले. आपल्या इनाम गांवीं, म्हणजे सायगांवीं श्रीकृष्णेश्वराचें देवालय बांधिलें. आणि नैवेद्य नंदादीपाकरितां कुडाळकर शिवदे यांचेकडून श्रीकृष्णेश्वराचें नांवें पन्नास रुपये उत्पन्नाची जमीन इनाम देवविली. हल्लीं ती जमीन यांचेच वंशजाकडे आहे. शिवाय रावसाहेबांनींही श्रीकृष्णेश्वरास एक–बिघा जमीन इनाम दिली आहे. रावसाहेबांनीं वाळवें येथें श्रीकृष्णेच्या काठीं आपल्या मातोश्रींचे नांवानें श्रीआनंदेश्वर या नांवाचें देवालय बांधून वाळवें येथील थोरांत यांचेकडून जमीन मिळवून, ती जमीन तेथील मेहेंदळे यांचेकडे देवाचे पुजानैवेद्याकरितां दिली. पंढरपूर येथें महाराज सरकारचे वाड्यांत, आपल्या वडिलांच्या नांवाचें ‘ श्रीवामनेश्वर ’ या नांवाचें देऊळ लहानसेंच बांधिलें आहे. मेढें येथील श्रीसिद्धेश्वर देवालयाचा जिर्णोद्धार करून, अदमासें पस्तीस रुपये उत्पन्नाची जमीन घेऊन ती जमीन जंगमाकडे पुजा–सांजवातीकरितां दिली. यांचे वडील बंधु रघुनाथराव आपटे यांनीं सायगांवापासून जवळच खर्शी येथें ओढ्याचें काठीं श्रीसिद्धेश्वराचें देवालय आहे त्याचा जीर्णोद्धार केला.

कऱ्हाड येथें इंग्रजी अमदानींत रावसाहेब मामलतीवर होते हें वर सांगि-

तलेंच आहे. तेथूनच रावसाहेब काशीयात्रेकरितां गेले. त्यावेळीं रघुनाथराव यांचे चिरंजीव गंगाधरराव हे बरोबर होते. काशी करून परत येतेवेळीं, ग्वाले-रीस शिंदे यांना भेटण्याकरितां गेले. शिंद्यांनी त्यांचा इकडील लौकीक ऐकून वडिलांची जागा पतकरण्याचा आग्रह केला. तेव्हां कृष्णरावांनीं सरसुभ्याची नोकरी स्वीकारली. हुजूरपागेंत घोड्यांची अवश्यकता असल्यामुळें कृष्ण-रावांनीं आपले पुतणे गंगाधरराव यांना भिमथडीकडील घोडी खरेदी करण्या-करितां पाठविलें. गंगाधरराव आपल्या गांवीं ( सायगांवीं ) सर्वांना भेटण्याकरितां आले. कांहीं दिवसांनीं पंढरपुराजवळ विरडी म्हणून एक गांव आहे तेथें डोंगरे म्हणून कोणी कृष्णरावांचे स्नेही होते. त्यांचेकडे कांहीं कामानिमित्त ते गेले. गंगा-धरराव विरडी येथें आल्याचे, यांचे सासरे मंगळवेढचे पटवर्धन यांना समजलें. आपल्या जांवयास घरीं नेण्याकरितां मंगळवेढेकर पटवर्धन विरडी येथें आले. कांहीं दिवस सासुरवाडीस राहून, परत सायगांवीं आले. घरीं येऊन कांहीं दिवस होतात न होतात तों १८५७ सालच्या बंडांत हे सामील असल्याचे संशयावरून यांना व यांचे सासरे पटवर्धन यांनाही धरून नेलें. ही बातमी कृष्णराव यांना समजतांच, तिकडील रेसिडेंट साहेबांकडून, दक्षिणप्रांतीचे इंग्रज ऑफिसरास लिहविलें. इकडे यांची चौकशी सुरू होतीच; अशावेळीं तिकडील साहेबांचे लिहून आलें तें पाहतांच इकडील ऑफिसरांनीं, गंगाधरराव व यांचे सासरे पटवर्धन यांना सोडून दिलें.

वरील संकटांतून सुटून आल्यावर वडिलांच्या परवानगीनें गंगाधरराव यांनीं सायगांव येथील श्रीमारुतीचे देवळाचा व मेढें येथील श्रीसिद्धेश्वराचे देवळाचा जीर्णोद्धार केला. शिवाय मेढें येथील वेण्णानदीस घाट बांधिला.

लिंब गांवचे पश्चिमेस मयुरेश्वर म्हणून एक रम्य स्थान आहे. या मयुरेश्वर स्थानास हल्लीं मढें असें म्हणूं लागले आहेत. या मढ्याच्या पश्चिमेस ब्रम्हेंद्र स्वा-मींचा घाट आहे. याला लागूनच यांचे पूर्वज बाबूराव कृष्ण आपटे यांनीं घाट बांधिला आहे. या घाटाला जोडूनच गंगाधरराव यांचे चुलत बंधू विठ्ठलराव आपटे यांनीं टहानसा घाट बांधिला आहे. कृष्णराव यांनीं, वडील बंधूस गंगा-धरराव एकटेंच असल्यामुळें, धाकटे बंधू रामचंद्र यांचे पुत्र विठलराव यांना दत्तक घेतलें. कृष्णराव यांचे चुलते बापूराव हे बाबूराव कृष्ण यांना दत्तक दिले होते. वामनराव व बापूराव यांचेमध्यें शके १७४४ त वाटण्या झाल्या होत्या.

वाचनालय




कै० गंगाधरराव रघुनाथ आपटे,
इनामदार, सायगांव.

The Bombay Art Printing Works, Fort.



कै० नागेश महादाजी आपटे, वकील, खेड.



रा. रा. शंकर विठ्ठल आपटे, मुंबई.



रा. रा. गणपतराव रामचंद्र आपटे,
सुपरिंटेंडेंट ऑफ पोलिस, इ. सांगली.

गंगाधरराव आपटे यांचे कुटुंबानें भुईंजेस १५।२० खणांची धर्मशाळा बांधिली असून, सातारा–महाबळेश्वर रस्त्यावर करंजेनजीक एक टाकें बांधिलें आहे. गंगाधररावांनीं भुईंज व सायगांव येथें अन्नछत्रें ठेविलीं होतीं. मेढ्यास सदावर्त होतें. गंगाधररावांनीं अन्नदान फार केलें. गंगाधररावांचे पुत्र कृष्णराव हे हल्लीं घरांतील कर्ते असून यांनींही शके १८२५।२६ मध्यें आपल्या गांवच्या श्रीमारुतीचे देऊळास पांच हजार रुपये खर्च करून सभामंडप वगैरें फार चांगला बांधिला आहे. मेढें येथील श्रीसिद्धेश्वराचा जुना मंडप पडल्यामुळें त्याचे जिर्णोद्धाराकरितां दोनशें रुपये दिले. शिवाय देवळास लागून असलेली गच्चीं फार गळत होती, त्या गच्चीवर पत्रे घातले; या कामीं पन्नास रुपये खर्च केले. डोंगरावर मेरूलिंग येथें पत्र्याची धर्मशाळा बांधण्यास शंभर रुपये मदत केली. आला–गेला ब्राह्मण, पै पाहुणा, गरीब, भिकारी वगैरे लोकांचा यांच्या इतका परामर्ष या गांवीं दुसरें कोणीही घेत नाहींत. यांनाही बहुतेक रावसाहेब असेंच ह्मणतात. हे कट्टे मारुतीभक्त असून यांनीं शरीर-संपदाही ‘ मारुतीभक्त ’ या नांवाला शोभेल अशीच ठेविली आहे. हे स्नानसंध्येशील असून, कर्मनिष्ठ आहेत. परंपरा चालत आलेल्या वर्णाश्रमाप्रमाणें पुढें आपल्या मुलांनींही वागावें ह्मणून मुलांकडून स्नान–संध्या, नमस्कार व देवदर्शन वगैरे नित्य करवून घेत असतात.

हल्लीं सायगांव येथें आपटे यांचे मुख्य वाडे चार आहेत. बाबूराव कृष्ण हे मूळ संपादक; यांचे निपणतु रा. विष्णुपंत आपटे हे हल्लीं मुंबईस श्री० लक्ष्मीबाई साहेब गायकवाड यांचे दिवाण आहेत. बाबूराव यांचे पुतणे वामनराव; यांचे पणतू कृष्णराव ऊर्फ रावसाहेब हे आपलें गांवींच असतात. यांना गंगाधर, विश्वनाथ व गजानन असे तीन मुलगे आहेत. ज्या कृष्णारावांनीं मामलत केली त्यांचे नातू दिंगबर हे लहान आहेत. कृष्णरावांचे बंधू रामचंद्र यांचे नातू सिताराम कर्ते असून यांना येशवंत या नांवाचा मुलगा आहे. वामनरावांचे बंधू सदाशिव; यांचे नातू भिकाजीपंत हे कर्ते असून यांना सिताराम, विनायक, रामचंद्र, नरहरी, पुरुषोत्तम व अनंत; असे सहा मुलगे आहेत. सदाशिवरावांचे पणतू माधव बळंवत हे ‘ नाट्यकला प्र. सं. ना. मं. ’ असतात. व निपणतू धोंडू भास्कर हे पेंटरचा व्यवसाय करितात. शिवाय दुसरे भालचंद्र चिंतामण व वामन चिंतामण असे दोन पणतू आहेत. पैकीं वामनराव यांनीं पुण्यास फराळाचें दुकान काढिलें आहे. आतां सदाशिवांचे धाकटे बंधू काशिनाथ यांचे नातू गणपतराव हे कर्ते आहेत. हे सरकारी नोकर आहेत. यांना काशिनाथ ह्मणून मुलगा आहे.

## वर्यें येथील आपटे.

रामाजीचे पुत्र गणेश; यांस पुत्र तीन; त्रिंबक, बाजी व वासुदेव; त्रिंबक हे बाबूराव कृष्ण यांचे चुलत पुतणे होतात. सातारा शहरापासून सुमारें साडे तीन मैलांवर वेण्णानदीचे काठीं वर्यें ह्मणून एक खेडेगांव आहे. हा गांव श्रीशिवाजी महाराज यांनीं ' हणमंते ' आडनांवाचे देशस्थ ब्राह्मणास इनाम दिला होता. या गांवचे मालक पुरुष कोणी नसल्यामुळें बाईकडे मालकपणा आला. या बाईचें नांव गोपीकाबाई भ्रतार व्यंकटराव गंगाधरराव हणमंते. या बाईनें सातारचे महाराज यांस विनंती केली कीं, मला एक हुषार कारकून सर्व गांवची व्यवस्था करण्याकरितां पाहिजे. त्यावेळीं बाबूराव कृष्ण यांनीं आपले चुलतपुतणे त्रिंबक यांनाच नेमणे विषयीं महाराजास विनंती केली. ती विनंती मान्य करून त्रिंबक गणेश आपटे यांना माहाराजांनीं पत्र देऊन बाईकडे पाठविलें. गोपीकाबाई हणमंते यांनीं त्यांना ठेवून घेतलें व यांनीं पुष्कळ वर्षें ती नोकरी केली. त्रिंबकराव यांना पुत्र दोन; कृष्णाजी व गणेश; या दोघांच्या मुंजी बाईनींच केल्या ह्मणण्यास हरकत नाहीं. पुढें त्रिंबकराव फार थकल्यामुळें ते अथरूणावर पडून असत. एके दिवशीं प्रकृती फार बिघडल्यामुळें ते घाबरे झाले. गोपीकाबाई जवळ होत्याच ! बाईना उद्देशून त्रिंबकराव ह्मणाले, " मी तर आतां एक घटकेचा सोबती आहें परंतु येवढीच इच्छा आहे कीं, जशी माझ्यावर कृपा आहे तशीच मुलावर असावी ! ! " " आपण कांहीं काळजी करूं नका, आपल्या मनाप्रमाणें सर्व होईल. " हे बाईच्या तोंडचे शब्द ऐकतांच त्रिंबकरावजीनीं स्वर्गलोकीं गमन केलें.

पुढें कांहीं दिवसांनीं गोपिकाबाई हणमंते इनामदार यांनीं आपले कोणी वारस नसल्यामुळें, ज्यानें मरेतोंपर्यंत आपल्याजवळ इमानानें नोकरी केली, त्याचे कुटंबाचें कल्याण करण्याचे हेतूनें त्रिंबकराव यांचे थोरले चिरंजीव कृष्णाजी याचें नांवें वर्यें गांव देऊन सनद करून देण्याबद्दल खटपट चालविली, त्याप्रमाणें शके १७४५ त कृष्णाजी त्रिंबक आपटे यांचे नांवें वर्यें गांवची सनद झाली. तेव्हांपासून वर्यें चे इनामदार आपटे झाले. " धन्य आहे त्या बाईची ! कीं, उपकाराची फेड ह्मणून त्रिंबकरावाच्या कुटुंबाचें जन्माचें कल्याण केलें. " अशीं माणसें या कलियुगांत दृष्टीस पडणें फारच विरळा !

कृष्णाजी त्रिंबक यांचें नांवें वर्ये गांव इनाम मिळाला, परंतु, हे विरक्त असल्यामुळें " प्रपंच साधुनी परमार्थ साधावा " या म्हणीप्रमाणें या घराण्यांत हे सत्पुरुष होते म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं; गांवची व घरखर्चाची वगैरे सर्व भिस्त बंधू गणेश याजवर सोंपवून आपण गायत्रीपुरश्चरण व जपजाप्य करून ईश्वरचरणीं लीन झाले. गणेश मोठे हुषार व मुत्सद्दी होते. वर्ये गांवांत कोंकणस्थाचें एकच घर; शिवाय, गोपिकाबाईनीं इतर कोणाला थोडें सुद्धां उत्पन्न न देतां सर्व गांव आपणासच इनाम दिला. तेव्हां शेजाऱ्याचे पोटांत सहजी दुखणारच ! परंतु गणेशपंत फार हुषार त्यांनीं शेजारचे अनगळ, थिटे, ढेकणे, तांबे, मोघे व निबंधे; यांचे नांवें कमी जास्ती मिळून एकंदर नऊशें रुपयांचें इनाम देऊन आपले नांवें खासगत तीनशें रुपयांचे ठेविलें; बाकी राहिले १४०० रुपयांचे उत्पन्न इनामजहागीर म्हणून ठेविलें. आतां, सरकार हल्लीं पाटिलकुलकर्णी खर्च व जुडी मिळून एकंदर ९२६ रुपये घेतात. राहिले ४७४ रुपये उत्पन्न ! ! असो, कृष्णाजीस पुत्र दोन; विष्णु व रावजी. विष्णुस पुत्र दोन गोविंद व गोपाळ; गोविंदराव हे खासगी नोकर सातारा येथें बापूसाहेब कान्हेरे यांचे वाड्यांत असतात; यांना हणवंत व सिताराम अशीं दोन मुलें असून तीं विद्यार्थी आहेत; गोपाळराव हे सज्ञान आहेत. यांना पुत्र चार; भास्कर, शंकर, अच्युत व बाळकृष्ण हे सर्व विद्यार्थी आहेत; रावजी यांस पुत्र तीन; मारुती, चिंतामण व अनंत; मारुतीचे पुत्र विनायकराव हे विरक्त आहेत; यांनीं योगासनाचा अभ्यास उत्तम केला आहे; हे बाहेरगांवींच असतात; चिंतामणराव व अनंतराव वर्ये येथेंच असतात; चिंतामणराव यांचा मुलगा बाळकृष्ण व अनंतराव यांचे पुत्र चिंगू व शांताराम; हे लहान आहेत. गणेशाचे पुत्र भिकाजी व भिकाजीचे पुत्र रामचंद्र; यांस पुत्र गणेश व काशिनाथ हे विद्यार्थी आहेत. रामचंद्रपंत सातारा येथील एका वकिलाचे कारकून आहेत;

त्रिंबकचे बंधू बाजी. यांस पुत्र परशराम; परशराम यांस पुत्र विनायकराव हे सरदार हिमतबहाद्दर कोल्हापूर यांचेकडे कारकून आहेत; यांस पुत्र तीन; बाजी, श्रीकृष्ण व वासुदेव; हे विद्यार्थी आहेत. त्रिंबकचे तिसरे बंधू वासुदेव यांस पुत्र चार; पैकीं नारायण यांस पुत्र त्रिंबक; त्रिंबकराव हे रत्नागिरी जिल्ह्यांत जनरल ड्यूटी इन्स्पेक्टर आहेत; यांना पुत्र तीन; वासुदेव, दत्तात्रय व सदाशिव हे विद्यार्थी आहेत.

रघुनाथभटाचे तिसरे पुत्र नारायणभट यास पुत्र पांच; अनंत, गोपाळ,

बच्याजी, अप्पाजी व विष्णु; गोपाळ यांस पुत्र चार; दिनकर, रघुनाथ शिवराम व बाळकृष्ण; दिनकर यांस पुत्र तीन; हरी गोपाळ व गोविंद. हरी यांस पुत्र दत्तोपंत हे गांवीं असतात. गोपाळ हे दत्तक गेले. गोविंद यांस पुत्र तीन; लक्ष्मण, महादेव व सदाशिव; पैकीं महादेवराव ह्यांचे मालप्यास घर वगैरे आहे. हे मुंबई येथें व्यापार करीत असतात. यांना पुत्र गोपाळ व शंकर हे विद्यार्थी आहेत; रघुनाथ यांस पुत्र येशवंत व नारायण; येशवंत हे रतलाम संस्थानांत गेले; येशवंतराव ज्युडिशल खात्यांत नोकर होते; येशवंतराव यांचे चुलतबंधु गोपाळ व गणेश बाळकृष्ण हे रतलाम येथें गेले; येशवंतराव यांचे पुत्र गंगाधर, त्रिंबक, महादेव, केशव व कृष्ण; गंगाधर हे स्वामी झाले आहेत; त्रिंबक हे मयत असून यांचे पुत्र नारायण व हरी; नारायणराव व हरीभाऊ हे रतलाम येथें नोकर आहेत; महादेवराव हे नोकर असून यांना विनायक मुलगा आहे; केशवराव हेही नोकर असून यांचे पुत्र रामचंद्रपंत ही नोकर आहेत; रतलाम येथें येशवंत रघुनाथ यानीं घर केलें; येशवंतरावाचे-पुत्र वडिलार्जीत घरांतच असतात. गोपाळराव यांस पुत्र दोन; महादेव व भास्कर. भास्कर हे गणपतरावास दत्तक गेले आहेत. गणपतराव हे अकौंटंट होते. भास्करराव यांनी स्वतः निराळें घर केलें आहे. भास्करराव हे रतलाम शहर म्यु. नि. पा. टीचे सेक्रेटरी आहेत; यांना पुत्र दोन; सदाशीव व अनंत हे विद्यार्थी आहेत. बच्याजी यांस पुत्र नारायण व रामचंद्र ऊर्फ बापू; रामचंद्र ऊर्फ बापू यांचे दत्तक पुत्र गोपाळ; यांस पुत्र तीन; कृष्ण, बाळ व रघुनाथ. कृष्ण यांचे पुत्र दिनकरराव हे हल्लीं बडोद्यास असतात; हे रेसिडेन्सींत नोकर आहेत. यांना पुत्र रामचंद्र व सदाशिव हे विद्यार्थी आहेत; रघुनाथराव हे बडोद्यास ज्युडिशियलमध्यें शिरस्तेदार आहेत; यांना पुत्र शंकर व दत्तात्रय; हे विद्यार्थी आहेत. अप्पाजीचे पुत्र रामचंद्र व रामचंद्राचे पुत्र श्रीधर, यांस पुत्र लक्ष्मण व नारायण; लक्ष्मणराव हे मालपें येथेंच असतात. मालपें गांवांत हल्लीं लक्ष्मणराव बऱ्यापैकीं सुखवस्तु आहेत. यांना रामचंद्र नांवाचा लहान मुलगा आहे. नारायणराव हे इंदोर येथें किंग एडवर्ड हॉस्पिटलमध्यें सब असिस्टंट सर्जनचे जागेवर आहेत.

विष्णु यांस पुत्र चार; अनंत, महादाजी, मोरू व विनायक. पैकीं महादाजी व मोरू यांचा वंश चालू आहे. महादाजी हे देशावर पुणें जिल्ह्यांतील खेड या गांवीं गेले. महादाजी हे चाकण येथें वकिली करीत होते; पूर्वी चाकण येथेंच कोर्ट होतें; चाकण येथें घर व जमीन जुमला आहे; महादाजीचे पुत्र नागोपंत यांनींही खेड येथें

वकिलीचाच धंदा केला; यांना नागूभाऊ आपटे असें ह्मणत असत; नागूभाऊ वकिलीचे धंद्यावर चांगले संपन्न झाले; यांना एकंदर पुत्र आठ आहेत. नागूभाऊनीं खेड येथें घर बांधिलें. यांनीं कोल्हारवाडी येथील इनाम मिळवून जमीनजुमला बराच केला; नागूभाऊचे पश्चात् हल्लीं त्यांचे पुत्र आठही आहेत; काशीनाथ, भगीरथ, रामचंद्र, वामन, विष्णु, सदाशिव, दाजी व महादेव; काशीनाथ हे चाकण येथें शेती करून असतात. यांना पुत्र श्रीराम व श्रीकृष्ण आहेत. भगिरथ हे कांहीं खासगी धंदा करितात. रामचंद्र हे खेडास वकिली करीत आहेत. भागिरथाचे पुत्र परशराम व भास्कर आहेत. रामचंद्र यांचे पुत्र लक्ष्मण, अनंत व विनायक; लक्ष्मण पुणें येथें फर्ग्यूसन कॉलेजांत बी. ए.च्या क्लासांत आहेत. वामनराव हे पोष्टांत नोकर आहेत; यांना पुत्र नारायण, रघुनाथ व मोहनीराज; हे विद्यार्थी आहेत. विष्णू हे घरींच असतात; यांना विश्वनाथ मुलगा आहे. सदाशिव हे येवलें येथें म्यु. सि. स्कुलांत ड्राईंग मास्तर आहेत. दाजी हे बी. ए. एल्. एल्. बी असून हल्लीं बडोद्यास वकिली करीत आहेत. ह्या दाजीसाहेबांनीं ज्योतिषविषयावर बरेच लेख लिहिले असून या विषयांत चांगलेंच प्राविण्य संपादिलें आहे. माहादेव हा विद्यार्थी आहे. या आठ भावंडांनीं वडिलार्जीत इस्टेटीची वाटणी केली आहे; महादाजीचे बंधू मोरु; यांस पुत्र धोंडू; धोंडु यांनीं पर–गोत्रांतला बाळकृष्ण हा दत्तक घेतला आहे; बाळकृष्ण यांस पुत्र विठल व वासुदेव; धोंडो व बाळकृष्ण हे मुलांसह मालपें येथेंच असतात.

रघुनाथभटाचे पांचवे पुत्र महादेवभट; यांस पुत्र दोन; भास्कर व लक्ष्मण; भास्कर यांस पुत्र बळवंत व बळवंतचा मुलगा सखाराम; बळवंत हे देशावर आले; बळवंतराव दप्तरदार होते; यांचे पुत्र सखारामपंत हे हल्लीं पेन्शनर आहेत; यांनीं होळकरशाईत नोकरी केली. हल्लीं शिंदेशाईत कमाविसदार आहेत. इंदोर येथें घर केलें आहे; यांना पुत्र दोन भास्कर व कमळाकर; भास्कर हे बी. ए. असून पुढें अभ्यास करीत आहेत. यांना शंकर नांवाचा मुलगा आहे. कमळाकर हा विद्यार्थी आहे. लक्ष्मणाचे पुत्र तीन; महादाजी, वामन व गंगाधर. महादाजीस पुत्र सदाशिव व गोविंद. सदाशिवाचे पुत्र रघुनाथ हल्लीं आहे. यांना पुत्र पांच; महादेव, हरी, गोपाळ, गोविंद व शंकर; रघुनाथ मुलांसह मालपें येथेंच असतात; महादेव व हरी हे सज्ञान असून, बाकीचे तिघे लहान आहेत. वामन यांस पुत्र बाळशास्त्री; यास पुत्र दोन रामचंद्र व लक्ष्मण.

रामचंद्र हे मालवें येथेंच आहेत. लक्ष्मण हे गंगाधरास दत्तक गेले- लक्ष्मण यांस पुत्र नारायण, विष्णु व दत्तू. लक्ष्मण हे मुलांसह गांवींच असतात.

रघुनाथभटाचे बंधू बाळंभट; यांस पुत्र विठोबा; यांस पुत्र शंकर उर्फ तातोबा हे श्रीमंत सवाई माधवरावांचे कारकीर्दींत देशावर आले. हे श्रीमंतांचे पदरीं होते असें समजतें. यांचे पुत्र रामचंद्र, गणेश, वामन व गोविंद; पैकीं वामन हे सातारा येथें घर करून व व्यापार वगैरे करीत असत. यांचे पुत्र दत्तात्रय व श्रीपाद; दत्तात्रय हे शेती व सावकारी करीत आहेत; यांना पुत्र रामदास, कृष्ण व हरी; हे विद्यार्थी आहेत; श्रीपाद हे वकिली करीत असून सावकारी वगैरे करितात. दत्तात्रय व श्रीपाद यांचीं घरें एकासएक लागूनच आहेत. श्रीपाद यांना पुत्र चार; दिगंबर, रंगनाथ एकनाथ व मारुती; हे विद्यार्थी आहेत. गोविंद यांनीं माटे पैकीं दत्तक घेतला. हे दत्तक नरहर गोविंद नाशिक येथें असतात.

श्रीकुलस्वामी वाडेश्वर प्रसन्न.

श्रीगुरुदेव दत्तप्रसन्न.

# आपटे घराण्याचा इतिहास.

## वंशवृक्ष नंबर ४ यामधील माहिती.

### गोळप येथील शेवडे आपटे.

गोळप हा गांव रत्नागिरी शहरापासून सहा मैलांवर आहे. या गांवीं गोटर्णे देवाचें येथील 'शेवटे ऊर्फ शेवडे आपटे' यापैकीं नारायणभट हा पुरुष आला. नारायणभटाचे पुत्र तीन; हरभट, गणभट व गुणभट; हरभटास पुत्र दोन; पैकीं रामभट यांस पुत्र चार; या चार पुत्रांपैकीं बचंभट यांचा वंश हल्लीं आहे. बचंभटाचा पुत्र निळंभट यांस पुत्र पांच; विष्णु, रामचंद्र, लक्ष्मण, गणेश व नारायण; विष्णुभटास पुत्र तीन; श्रीधर, विनायक व अनंत. श्रीधर यांस पुत्र महादेवभट हे हल्लीं इंदोर येथें असून भिक्षुक आहेत. विनायकाचा मुलगा भालचंद्र हा लहान आहे. अनंत हे नोकर असून इंदोर येथें वडिलार्जीत घरांत रहात आहेत; यांना पुत्र दिनकर हा लहान आहे. रामचंद्र यांस पुत्र दामोदरपंत ऊर्फ भय्यासाहेब हे हल्लीं आहेत. रामचंद्रपंताचे सासुरवाडचे राममंदिराची सर्व व्यवस्था रामचंद्रपंताकडेच आली. ती व्यवस्था हल्लीं दामोदरपंताकडे आहे. सदरहु राममंदिरास 'होळकरसरकारकडून' सालीना साठ रुपयांचें

उत्पन्न आहे. दामोदरपंत ऊर्फ भय्यासाहेब हे इंदोर येथें त्या राममंदिरांतच रहात आहेत यांना निळकंठ या नांवाचा मुलगा आहे. गणेश निळकंट व नारायण हे दोघे बंधू इंदोर येथेंच गणेश यांनीं बांधिलेल्या घरांत असतात. गणेशपंत यांनीं देवास व इंदोर संस्थानांत नोकरी केली. पायदुखीमुळें हल्लीं नोकरी सोडिली आहे. नारायणभट हे भिक्षुकी करतात. नारायणभटास पुत्र दोन; वैजनाथ व विश्वनाथ; हे लहान आहेत. नारायणभटांचे वडील निळंभट हे अग्निहोत्री होते. श्रीमंत शेवटचे बाजीरावसाहेब पेशवे यांचे आश्रयानें निळंभट ब्रह्मवर्तास पुष्कळ वर्षें होते; ते श्रीमंतांचे पश्चात् इंदोर येथें जाऊन राहिले. निळंभट उत्तमपैकीं वैदिक होते; हे ९३ वर्षांचे होऊन इंदोर येथेंच स्वर्गवासी झाले.

गणेशभटांचे पुत्र दोन; हरी व बाजी; हरीचे नातू रामचंद्र गोविंद हे झांशी-जवळ गुर्लसराय येथें असल्याचें समजतें. तसेच बाजीचे पणतू मोरो भिकाजी हे कोठें आहेत ते माहित नाहीं. गुणबाचे पुत्र तीन; नरसिंह, नारो व सदाशिव. पैकीं फक्त नरसिंहभटाचा वंश चालू आहे. नरसिंहभटास पुत्र तीन; रामभट, गणेशभट व विनायकभट; रामभटास पुत्र तीन; महादेव, सदाशिव व गोविंद. महादेवभटांची बायको सती गेली. यांस पुत्र विष्णु; पुढें निर्वंश. सदाशिवभटास पुत्र तीन; विनायक, जिवाजी व विश्वनाथ. जिवाजीस पुत्र दोन; अंताजी व गोविंद. अंताजीपंत हे हल्लीं आहेत. सदाशिवभट व गोविंदभट हे बंधू देशावर आले. गोविंदभट हे दशग्रंथी होते. यांनींच श्रीमंतांकडून इनाम संपादिलें. तें हल्लीं यांचे वंशजाकडे चालू आहे. सं. जमखंडीपासून ९ मैलावर कुल्हळ्ळी येथें घरदार व जमीन-जुमला आहे. सदाशिवभटाचे नातू अंताजी जिवाजी हे जमखंडी येथें खास घरांत राहतात. यांनीं जमखंडी संस्थानांत कारकुनापासून ते वरिष्ठ दर्ज्याचे अधिकाऱ्याच्या जागीं काम केलें. दप्तरदारीचे कामावरून पुढें हुजुर चिटणीस झाले. हल्लीं पेन्शनर आहेत. यांना पुत्र पांच; कृष्ण, शंकर, जिवाजी, पुरुषोत्तम व गणेश. कृष्ण हे नोकर आहेत. यांना पुत्र प्रद्युम्न हा लहान आहे. शंकर हे फर्ग्यूसन कालेजांत होते. हे नुकतेच बी. ए. झाले. बाकीचे मुलगे विद्यार्थी आहेत. अंताजीपंतांचे बंधु गोविंद यांस पुत्र तीन; व्यंकटेश, राम-चंद्र व लक्ष्मण. व्यंकटेश वाई कोर्टांत नोकर आहेत. रामचंद्र व लक्ष्मण विद्यार्थी आहेत. विश्वनाथ यांस पुत्र सदाशिव; सदाशिवास विष्णु; विष्णूस पुत्र तीन; मोरेश्वर, श्रीधर व नागेश हे विद्यार्थी आहेत.

गोविंदभटास पुत्र चार; कृष्णंभट, पांडुरंगभट, गोपाळभट व गंगाधरशास्त्री. कृष्णंभटास पुत्र दोन; वासुदेव व रघुनाथ. वासुदेवास पुत्र तीन; नारायण, विनायक व महादेव. नारायण व महादेव शेती वगैरे करून असतात. विनायक हे नोकर आहेत; यांना पुत्र चिदांबर व पांडुरंग हे विद्यार्थी आहेत. महादेव यांस पुत्र दामोदर हा लहान आहे. रघुनाथ यांस पुत्र तीन; भीमराव, शंकर व वामन. भीमराव व शंकर हे नोकर आहेत. वामन हा विद्यार्थी आहे. भीमराव यांस पुत्र श्रीपाद हा लहान आहे. बापूजी पांडुरंग हे नोकर आहेत. भास्करगंगाधर हे शेती करितात. यांना पुत्र दोन; कृष्णा व पांडु हे विद्यार्थी आहेत.

गणबाचे तिसरे पुत्र बाळाजी ह्मणून होते. यांचेंच टोपण नांव अप्पाभट असावें असें वाटतें ! पक्की माहिती न मिळाल्यामुळें नकाशांत दुसरें बाजूस गणेशभट यांस अप्पाभट व अप्पाभटास चिमणशास्त्री, यांस पुत्र कृष्णशास्त्री व गोविंदशास्त्री. कृष्णशास्त्रीस पुत्र तीन, पैकीं विष्णूस पुत्र महादेव. हे महादेव विष्णु पोलिस ऑफिसांत नोकर आहेत. गोविंदशास्त्रीचे पुत्र चार; वामन, सदाशीव, गोपाळ व कृष्ण. कृष्ण लहान आहे व बाकीचे तिघेही बडोद्यास फराळाचे दुकानाचा धंदा करून आहेत. वामन यांस पुत्र विष्णु; व सदाशिव यांस पुत्र तीन; शंकर, गजानन व दिगंबर; हे विद्यार्थी आहेत.

## गोटणें-देवाचें येथील आपटे.

बल्लाळ याचे पुत्र गोविंद व विष्णु. गोविंद व विष्णु हे देशावर आले. गोविंद हे जमखंडी येथें व विष्णु सांगली नजीक समडोळी येथें येऊन राहिले. गोविंद यांस पुत्र चार; विठ्ठल, गोपाळ, गणेश व रामचंद्र. विठ्ठल याचा दत्तक पुत्र वामन यास पुत्र दोन; विठ्ठल व त्रिंबक. विठ्ठल याचे पुत्र मल्हार ऊर्फ बापू. हे बापूराव हल्लीं आहेत. बापूराव हे लहानपणीं लष्कर-ग्वालेर येथील सरदार भय्यासाहेब आपटे यांचे जवळ होते. हल्लीं बापूराव जमखंडीस असतात. हल्लींचे जमखंडी संस्थानाधिपती श्रीमंत भाऊसाहेब पटवर्धन यांची मेहरनजर बापूराव यांचेवर आहे. बापूराव यांनीं अलीकडे आपले देखरेखीखालीं नवा वाडा बांधिला असून, त्याला ' सिस्टर लॉज ' हे नांव दिलें आहे. हे श्रीमंत जमखंडीकर यांचे बरोबर विलायतेला गेले होते.

लष्कर-ग्वालेर येथील सरदार बाबासाहेब आपटे यांना हॅमिल्टन साहेबांनीं बाराशे रुपये किंमतीचे घड्याळ स्मरणार्थ दिलें होतें. तें घड्याळ हल्लीं बापूरावांचे मातोश्रींजवळ आहे.



दाखल नं ......
भोर

बापूराव शेती व व्यापार करितात. यांना पुत्र दिगंबर हा लहान आहे. त्रिंबक वामन हे आपले जुन्या वाड्यांत असतात. त्रिंबकराव यांनीं संस्थानांत बरींच वर्षें नोकरी केली. हल्लीं त्रिंबकराव मुलांचे शिक्षणाकरितां पुण्यास रहात आहेत. यांना पुत्र चार; वामन, जगन्नाथ, येशवंत व रघुनाथ हे विद्यार्थी आहेत. त्रिंबकराव शेती व व्यापार करीत आहेत. गोपाळ याचे दत्तक पुत्र काशिनाथ; हे काशिनाथपंत हल्लीं हिप्परगी येथें आहेत. यांचें वय सत्तर वर्षांचें आहे. गणेश यांस पुत्र दोन; बळवंत व वामन. वामन हे विठ्ठल यास दत्तक गेले. बळवंत यांस पुत्र तीन; पांडुरंग, विनायक व शंकर. हे सर्व तासगांव येथें असतात. पांडुरंगपंत हे शेती व व्यापार करितात. विनायक हे नुकतेंच वारले. यांना पुत्र तीन; वामन, गोविंद व बाळ; हीं मुलें विद्यार्थी आहेत. शंकरराव हे शेती व व्यापार करून असतात. यांना पुत्र रामचंद्र हा विद्यार्थी आहे.

विष्णुपंत हे सांगलीनजीक समडोळी येथें राहिले. यांचे पुत्र नारायण यांस पुत्र सहा; कृष्ण, गोविंद, केशव, हरी, वासुदेव व व्यंकटेश. कृष्ण यांस पुत्र श्रीधर व शंकर. श्रीधरपंत व शंकरराव हे समडोळी येथेंच शेती करून आहेत. गोविंद यांस पुत्र दत्तात्रय व रामचंद्र. दत्तोपंत हे संस्थान मिरज येथें नोकर आहेत. यांना पुत्र चार; त्रिंबक, सदाशिव, कृष्ण व गोविंद हे विद्यार्थी आहेत. रामचंद्रपंत समडोळीस असतात. केशव हे नामांकित हरिदास होऊन गेले. हरी यांस पुत्र गणेश व नारायण. गणपतराव हे कोर्टांत नोकर आहेत. यांना पुत्र लक्ष्मण हा लहान आहे. नारायणराव हे सातारा येथें असतात. यांनीं अजिंक्य तारा या नांवाची ऐतिहासिक कादंबरी प्रसिद्ध केली आहे. वासुदेव यांस पुत्र महादेव. महादेवराव हल्लीं सांगली संस्थानांत मामलेदार कचेरीत नोकर आहेत. व्यंकटेश यांस पुत्र तीन; दामू, वामन व नागू; हे विद्यार्थी आहेत.

## मालवण नजीक वाडी मोगरणी येथील आपटे.

हरीचा पुत्र बाबदेव. बाबदेवास पुत्र पांच; विठ्ठल ऊर्फ दिवाकर, विष्णु, रघुनाथ, लक्ष्मण व नारायण. विठ्ठल ऊर्फ दिवाकर यांस पुत्र दोन; गंगाधर व भिकाजी. गंगाधरास पुत्र दोन; गणेश व विष्णु. गणेशचा पुत्र कृष्णा हा विद्यार्थी आहे. विष्णुपंत हे सांगली संस्थानांत नोकर आहेत. यांचा मुलगा गंगाधर हा विद्यार्थी आहे. भिकाजीचे पुत्र विठ्ठल हे कोंकणांत आहेत. रघुनाथ यांस पुत्र शंकर, पुरुशोत्तम व दादोबा. शंकरराव कोंकणांत आहेत. पुरुषोत्तमपंत हे



रा. रा. मल्हार विठ्ठल उर्फ बापूराव आपटे, जामखंडी.

The Bombay Art Printing Works, Fort.



कै. डॉ. विष्णु गोपाळ आपटे,
एल्. एम्. अँड एस्.



कै० प्रो० वामन शिवराम आपटे,
एम्. ए.

आपल्या मुलांसह कोंकणांत आहेत. यांना पुत्र चार; विष्णु, भिकू, नारायण व गोविंद हे सर्व सज्ञान आहेत. विष्णूस पुत्र बाळकृष्ण, लक्ष्मण व रामचंद्र हे विद्यार्थी आहेत. दादोबा हे संस्थान सांगली पैकीं ता. शहापूर येथें मामलेदार कचेरीत नोकर आहेत. यांना पुत्र वासुदेव व सिताराम, हे विद्यार्थी आहेत. लक्ष्मण यांस पुत्र वामन, हे वामनराव फोंडाघाटांत असतात.

## गोटणें-देवाचें येथील आपटे.

गोविंद हे विजयदुर्ग व देवगड ह्या किल्ल्यावर पेशवाईत कांहीं हुद्यावर होते. यांचे चिरंजीव गणेश हे वडिलांचे हुद्यावरच होते. गणेश यांचे पुत्र निळकंठ हे मुखत्यारीचा धंदा करीत होते. यास पुत्र तीन; गोविंद, विनायक व गणेश. गोविंद हे मालवण येथें सब्रजिष्टर होते. विनायक हे वेंगुर्लें कोर्टांत कारकून होते. गोविंद यांचे दत्तक पुत्र रामचंद्र; हे हल्लीं धुळें येथील ट्रेनिंग कॉलेजचे हेडमास्तर आहेत. रामचंद्रपंत हे बी. ए. आहेत. यांना पुत्र वामन व शंकर असून ते विद्यार्थी आहेत. रामचंद्र यांना पगार ३०० रुपये आहे. विनायक यांस पुत्र दोन; रामचंद्र व सदाशिव. रामचंद्र हे दत्तक गेले. सदाशिवराव हे बी. ए. आहेत. हे मुंबई येथें सेक्रेटरीएटमध्यें ३०० शे रुपये पगारावर नोकर आहेत. हे स्वभावानें गरीब असून धार्मिक आहेत. यांना पुत्र तीन; कृष्ण, महादेव व गोविंद. कृष्णराव मेडिकल कॉलेजांत आहेत आणि महादेव व गोविंद हे हायस्कुलांत आहेत. गणेश यांचे पुत्र नरहरी हे कोंकणांत ( गोटणें ) येथेंच असतात. यांस पुत्र दत्तात्रय आहे. सदाशिवराव, रामचंद्रपंत व नरहरराव हे एक विचारें आहेत. वडिलार्जित गोटणें येथील घराची चांगली व्यवस्था ठेविली आहे. हे खोत आपटे होत. यांचा मोठ्या वंशवृक्षांत संबंध बरोबर जमत नाहीं. याचें कारण गोविंदचे वडिलांचें नांव समजलें नाहीं हें होय ! याच खोत आपट्यांपैकीं महादेवभट आपटे श्रीक्षेत्र वांईप्रांतीं आले. यांचे पुत्र गणेश, नातू रामचंद्र व पणतू महादेव. हे महादेव रामचंद्र हल्लीं बहुतेक आळंदी येथें असतात. ह्यांना फिडल वाजविण्याचा नाद बराच आहे.

**महादेवभटास पुत्र** तीन; भिकाजी, वामन व विनायक. भिकाजीस पुत्र महादेव यांस पुत्र गजानन, दत्तात्रय, अबा व लक्ष्मण. गजानन व आबा हे पुणें येथें म्युनिसिपालिटींत नोकर आहेत. आबा यांस पुत्र यशवंत हा लहान आहे. दत्तात्रय हे व्यापारी आहेत. यांनीं पुणें येथेंच दुकान काढिलें आहे. लक्ष्मण ऊर्फ तात्या हे नटाचें कामांत कुशल आहेत. यांनीं सामाजिक नाटक-

18 APR 1990

मंडळींत दुय्यम नाईकेची भूमिका संपादिली होती. हल्लींही नाटक कंपनींतच आहेत. वामन यास पुत्र दोन; विष्णु व सदाशिव. हे विष्णु व सदाशिव इचलकरंजी येथें आहेत. " या आपट्यांनीं गोटणेंचें म्हणून सांगितलें; परंतु हे गोटणेचें नसून दुसऱ्या कोणत्यातरी गांवचे असावेत. "

## गोटणें-देवाचें येथील आपटे.

वासुदेव यास—बल्लाळ यास पुत्र रामचंद्र व लक्ष्मण. रामचंद्राचा पुत्र बाळकृष्ण; यांस पुत्र विष्णु व काशिनाथ हे सज्ञान आहेत. विष्णु यास पुत्र गोविंद हा लहान आहे. लक्ष्मणास पुत्र वासुदेव व विश्वनाथ. विश्वनाथ हे नोकर आहेत. यास पुत्र तीन; गजानन, विनायक व दिगंबर. गजानन हे नोकर आहेत. विनायक सज्ञान असून दिगंबर हा लहान आहे. यांचे मूळ गांव गोटणें. नंतर मिडगवणें व हल्लीं जिल्हा पुणें पैकीं वडगांव.

## उज्जैन पैकी खाचरोद येथील आपटे.

बल्लाळ यांस पुत्र महादेव व गोविंद. महादेव यांस पुत्र गोपाळ, लक्ष्मण व नारायण. नारायणास पुत्र पांच; पैकीं बळवंत व काशिनाथ आहेत. बळवंत ऊर्फ बाळूभय्या यांस पुत्र महादेव, गोपाळ व कृष्ण. बाळूभय्या व काशिनाथ हे सावकारी व शेतीं करितात. काशिनाथ यांचे चिरंजीव गजानन विद्यार्थी आहे. बाळूभय्यांचे पहिले पुत्र महादेव हे नोकर आहेत. यांना पुत्र विनायक हा लहान आहे. गोपाळ हे घर-धंदाच करितात. कृष्ण हे रेलवेत नोकर आहेत. बाळूभय्या यांनीं समक्ष दिलेली माहिती — " खाचरोद येथील घर बल्लाळ यानें संपादन केलें व ७५ बिघे जमीन शिंद्यांच्या कडून इनाम मिळविली. हल्लीं देव—घेवीचा व्यापार असून शिवाय बेराखडी गांवची जमेदारी आहे. आणि १५०० बिघे पडत जमीन आबाद करण्याकरितां घेतली आहे. ही लाख रुपयांची असामी आहे. " " मूळ गांव गोटणें—देवाचे असे यांचे ह्मणणे आहे "

## श्री त्रिंबकेश्वर येथील आपटे.

परशराम यांस दादंभट, दादंभटास—बाळकृष्ण, यास पुत्र धोंडभट ऊर्फ विश्वनाथ यास पुत्र गणेशभट व लक्ष्मणभट. गणेशभटास पुत्र चिंतामणभट व रामचंद्रभट. रामचंद्रभटास पुत्र गोविंद व गोपाळ. गोपाळ यांस पुत्र वासुदेवभट, यांस पुत्र विनायकभट, यांस पुत्र वासुदेव ऊर्फ आबा यांस पुत्र विनायक व काशीनाथ; हे दोघे बंधू फक्त आहेत. श्री त्रिंबकेश्वर येथें घर असून येथेंच नोकरी वगैरे करून असतात.

## धालवली येथील आपटे.

बाळंभट यांचे पुत्र नारायण ऊर्फ निळकंट हे नामांकित वैदिक होते. नारायणभट हे देशावर सांगली येथें आले. हे मोठे कर्ममार्गी असून निस्पृह होते. यांची वृत्ती नेहमीं आनंदी असे. यांचे योगक्षेमार्थ सरदार परशरामभाऊ पटवर्धन यांनीं तासगांवपैकीं पांच बिघे व भिलवडीपैकीं तीन बिघे जमीन इनाम दिली. तासगांव येथील इनामाच्या अस्सल सनदेंतील सारांश– " नारायणभट बिन बाळंभट आपटे धालवलीकर प्रांत राजापूर यांना पांच बिघे जमीन दिली. सुरसन सबा सबैन मया व अलफ. " नारायण भटाचे पुत्र सदाशिव, यांस बल्लाळ; व बल्लाळ यांस पुत्र निळकंठ हे हल्लीं सांगली येथें म्यु. कमेटींत नोकर आहेत. सांगली येथें यांचें खास घर आहे. निळकंठराव मोठे स्नान संध्येशीळ आहेत. यांना पुत्र गोपाळ व विश्वनाथ हे विद्यार्थी आहेत. तासगांव व भिलवडी येथील इनाम यांचेकडे चालू आहे.

गोविंदभट व रामभट हे दोघे बंधू. रामभटास पुत्र चार; नारो, शिवाजी, शामजी व मोरो. शिवाजीस पुत्र रामभट; शामजीस पुत्र गणेश हे इचलकरंजी येथें आले. यांना पुत्र गोपाळ व गोविंद. गोपाळ यांस पुत्र गणेश ऊर्फ बळवंत व कृष्णाजी. गणेश ऊर्फ बळवंतचे पुत्र अनंत हे हल्लीं असून कोल्हापूर येथें लायब्रीक्लार्क आहेत. यांना पुत्र दत्तात्रय हा लहान आहे. कृष्णाजीपंत यांनीं कोल्हापूर येथें खास घर केलें आहे. कृष्णाजीपंतांनीं टुथपावडर तयार करण्याचें एक यंत्र तयार केलें आसून या यत्रांतून हजारों पुडे भरून तयार होत आहेत. कृष्णाजीपंत विलक्षण कल्पक आहेत. यांत बिलकूल शंका नाहीं. हे वैद्यकीचा धंदा करीत आहेत. वाज्याच्या पेट्याही दुरुस्त करितात. ह्यांना द्रव्याचें सहाय्य मिळाल्यास या कलेंत चांगले पुढें येतील. यांना पुत्र गोविंद व गोपाळ हे लहान आहेत. कृष्णाजीपंतांचे सख्खे चुलत बंधू दत्तात्रय गोविंद हे हुबळी येथें रेल्वेंत लोको-ऑफिसांत नोकर आहेत. "या धालवलीकर आपट्यांचें म्हणणें-मूळगांव गोटणें आहे."

## नागोटणें येथील आपटे.

महादेव याचा पुत्र हरी; हरीस पुत्र बाळाजी व नारायण. बाळाजीस पुत्र निळकंठ ऊर्फ नथोबा. नारायणास पुत्र चार; पुरुषोत्तम, विनायक, काशिनाथ, व त्रिंबक. पुरुषोत्तम, विनायक व काशीनाथ हे नोकर आहेत. हे बहुतेक सर्व ठाणें येथें असतात. त्रिंबक हा विद्यार्थी आहे. पुरुषोत्तम यांस पुत्र नारायण हा लहान आहे.

18 JAN 1994

## भिडबाव येथील आपटे.

नारायण यांस पुत्र सखाराम ऊर्फ निळकंठ; यांस पुत्र केशव. केशव यांस पुत्र गोविंद. गोविंदराव यांनीं कोल्हापुरास फौजदाराची नोकरी केली होती. अलीकडे पन्हाळा येथें अव्वल कारकून होते. त्यांची व माझी कोल्हापुरास भेट झाली होती. गोविंदराव नुकतेच वारले असें समजतें ! यांना पुत्र प्रभाकर व नारायण, हे विद्यार्थी आहेत.

## धुळें व कोल्हापूर येथील आपटे.

बाबजीचे पुत्र सदाशिव; यांस पुत्र हरी व नारायण. हरिपंत बी. ए. एल्. एल्. बी. असून धुळें येथें वकिली करीत आहेत. धुळें येथें हरीपंतांनीं घर बांधिलें असून, द्रव्य संचयही बराच केला आहे. यांचे बंधू नारायणराव हे कोल्हापूर येथें वकिली करीत आहेत. यांना पुत्र शंकर हा विद्यार्थी आहे.

## आकशी-नागांव येथील आपटे.

जनार्दनभट यांस पुत्र शंकरभट; यांस पुत्र त्रिंबक व विश्वनाथ. त्रिंबक यांस पुत्र सात; अप्पा, महादेव, बाळकृष्ण, बाबूराव, रामचंद्र, सदाशिव व पांडुरंग; पैकीं बाबूराव, रामचंद्र व सदाशिव यांचा वंश चालू आहे. बाबूराव यांस पुत्र दाजीबा, अण्णा, बापू व दिनकर. दाजीबास विष्णु व विष्णूस नारायण, यांस पुत्र केशव व गोविंद. केशव हे आकशी येथें असतात. रामचंद्र यांस मोरभट. यांस पुत्र दोन; गंगाधर व बाळंभट. गंगाधरास पुत्र काशीनाथ व जगन्नाथ. काशीनाथ हे हल्लीं आकशी येथें आपल्या खास घरांत आहेत. यांस पुत्र रामचंद्र हे अलिबाग येथें सरकारी दवाखान्यांत कांपाउंडरचे जागेवर आहेत. यांना पुत्र गंगाधर हा लहान आहे. जगन्नाथचे पुत्र चिंतामणी. चिंतामण हे मुंबई येथें जनरल पोष्टांत नोकर आहेत. बाळंभट मोरभट यांचें कुटुंब गंगुबाई हल्लीं आहेत. बाळंभटास संस्थान जमखंडी सरकारकडून साठ रुपयांची नेमणूक होती. ती नेमणूक गंगूबाई आपटे यांचे नांवें हल्लीं मिळत आहे. सदाशिव यांस पुत्र तीन; चिंतामण, गोपाळ व हरी. चिंतामणीस पुत्र तीन; सदाशिव, लक्ष्मण व महादेव. सदाशिवास पुत्र चिंतामण व केशव. चिंतामण हे केहीम येथें असतात. यांना पुत्र सदाशिव हा लहान आहे. केशव हे नागांव येथें शेती करून असतात. यांना पुत्र येशवंत व सिताराम हे विद्यार्थी आहेत. लक्ष्मण याचा दत्तक पुत्र हरी. हरी हे सज्ञान आहेत. महादेव यांस पुत्र पांच; नारायण, वामन, गोविंद, हरी व त्रिंबक. महादेव चिंतामण हे बडोद्यास वकील

होते. संस्थान बडोदें येथें महादेवराव आपटे यांचा लौकिक सर्वश्रुत आहेच ! हे वकीलीच्या कामांत फार नेकीचे होते. विद्यमान असलेल्या जुन्या वकीलांचे तोंडून महादेवराव आपटे यांचें गुणवर्णन अद्यापी ऐकण्यांस मिळतें. महादेवराव यांनीं चार–पांच हजार रुपये खर्चून अलिबाग नजीक नागांव येथें समुद्राचे काठीं जमीन खरेदी केली होती. महादेवराव यांचे पांचही पुत्र हल्लीं आहेत. सर्वांत वडील नारायण हे नाटककंपनी काढण्याच्या व्यसनीं पडून यांनीं वडिलार्जित इस्टेट बहुतक संपुष्टांत आणिली ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. नाटकाचा नाद द्रव्याभावामुळें सुटून तूर्त कीर्तन वगैरे करितात असें समजतें. वामन हे मुंबई येथें प्रिन्सेस डॉकमध्यें नोकर आहेत. गोविंद हे नागांव येथेंच असतात. हरी हे दत्तक गेले आहेत. त्रिंबक हे बडोदें संस्थानांत नवसरी येथें नोकर आहेत असें समजतें. महादेवराव यांनीं लौकिक व द्रव्य संपादिलें, तों त्यांचे पश्चात् त्यांच्या मुलांनीं लौकिक संपादणें तर फारच कठीण ! परंतु, त्यांनीं संपादिलेली इस्टेट जरी नीट संभाळली असती तरी बरेंच कर्तव्यास जागले असें ह्मणणें भाग पडलें असतें. गोपाळ यांस पुत्र तीन; पैकीं लक्ष्मण हे बडोदें येथे एका वकिलाचे कारकून आहेत; यांना पुत्र विनायक हा लहान आहे. पांडुरंग दत्तक गेला. विश्वनाथाचा दत्तक पुत्र पांडुरंग; यांस पुत्र बाळाजी; यांस पुत्र पांच; सखाराम, धोंडदेव, नागो, राघो व भास्कर. सखाराम यांस पुत्र पांडुरंग. धोंडदेव यांस पुत्र विष्णु व विश्वनाथ. राघो यांस पुत्र बाळाजी. बाळाजी पांडुरंग यांचे पांच पुत्रांचा वंश हल्लीं चालू असल्याचें माहित नाहीं.

अनंत यांस पुत्र रामचंद्र; यांस नारायण. नारायणास पुत्र गोविंद यांचा कीर्तन करण्याचा पिढिजाद धंदा असून हल्लीं गोविंदबुवांचे पुत्रही कीर्तनच करितात. नागांव येथें शेती आहे. नागांव येथें बाजारआळींत रस्त्याला लागून गोविंदबुवांनीं श्रीराममंदिर बांधिलें आहे. सदरहू राममंदिर अलीकडे विष्णुबोवांनीं मोठें केले आहे. विष्णु, अनंत व लक्ष्मण असे तीन मुलगे गोविंदबुवांचे हल्लीं आहेत. अनंत यांस मुलगे त्रिंबक व विनायक हे विद्यार्थी आहेत. लक्ष्मण यांस मुलगा गणेश हा लहान आहे. हे आपटे वरील आपट्यांचे तीन दिवसांचे संबंधी आहेत.

## वडखोळ येथील आपटे.

हरी यांस मुलगा गोपाळभट, यांस मुलगे सहा; विठ्ठलभट, रामचंद्र, पांडुरंग, शंभू, चिंतो ऊर्फ चिटकोबा व बाबूराव. विठ्ठलभटास मुलगा बाबूभट, यांस मुलगे

चार; विष्णू दामोदर, नरसो व गणेश. दामोदरभटास मुलगे तीन; बाळकृष्ण, गोपाळ व गोविंद. बाळकृष्ण यांस मुलगे नारायण व सदाशिव. नारायणास मुलगे विठल व राबो. विठल यांस मुलगे पांच; पैकीं पुरुषोत्तम याचा वंश चालू. पुरुषोत्तमास मुलगा पांडुरंग हे पेन्शनर आहेत. पांडुरंग यांस मुलगे चार; विठल, विनायक, महादेव व नारायण. विठल हे बी. ए. असून हल्लीं पुणें येथें कलेक्टर आफिसांत नोकर आहेत. विनायक कॉलेजांत आहे. महादेव व नारायण विद्यार्थी आहेत. गोपाळ दत्तक गेला. नरसो यांस श्रीधर; यांस पुत्र व्यंकटेश यांस पुत्र तीन; रघुनाथ, नरहर व बाळकृष्ण; " या तिघा बंधूंचा वंश हल्लीं कर्नाटकांत शिरहट्टी नजीक कडकोळ येथें आहे; माहितीकरितां पत्रें लिहिलीं परंतु उत्तर पाठवीत नाहींत. " गणेश याचा दत्तक पुत्र गोपाळ; गोपाळ यांस पुत्र तीन; नारायण, वासुदेव व विष्णु; वासुदेवास पुत्र सात; महादेव, दत्तात्रय, हरी, गोपाळ, श्रीनिवास व नारायण. महादेव हे कडकोळास आहेत; यांस पुत्र कृष्णा व गणू हे विद्यार्थी आहेत. दत्तात्रय हे संस्थान सांगली पैकी ता. शहापूर येथें मामलेदार कचेरीत कारकून आहेत. यांना पुत्र चार; रामचंद्र, लक्ष्मण, केशव व जगन्नाथ, हे विद्यार्थी आहेत. हरी हे सज्ञान आहेत. यांस पुत्र काशिनाथ. गोपाळ हे शाळामास्तर आहेत; यांस पुत्र गुरु व मुकुंदा. श्रीनिवास हे पोलिसांत आहेत; यांस पुत्र गंगाधर व वासुदेव. नारायण हे घरींच असतात. विष्णु हे एल. एम् ॲंड. एस; परिक्षेत उत्तीर्ण झाले होते. यांचें चरित्र पुढें देत आहे. यांना मुलगे वामन व परशराम. वामन यांस मुलगा गोविंद हा विद्यार्थी आहे. परशराम हे हल्लीं कोल्हापूर येथें कांहीं व्यापार धंदा करून आहेत.

---

## प्रसिद्ध डॉ. विष्णु गोपाळ आपटे यांचें चरित्र.

राजधानी शहर सातारा येथें श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांचे कारकीर्दींत कोंकणप्रांतांतील कोंकणस्थ लोक देशावर येऊन आपल्या बुद्धिकौशल्यानें नांवारूपास येऊं लागले. कै. डॉ. आपटे यांचे आजे वे. रा. गणेशभट बाबूभट आपटे हे वेंगुर्ल्यापासून चारमैल असलेल्या मौजें वडखोळ गांवचे रहाणार होत. ते भिक्षुक असल्यामुळें संस्थान सांगली येथें भिक्षुकीकरितां आले. पूर्वींचे संस्था-

चीक गरीब भिक्षुकांचा परामर्ष चांगला घेत असत; त्यामुळें वैदिक, शास्त्री व अन्य गरीब लोकही संस्थानिकाकडून आश्रय मिळेल ह्मणून वरचेवर येत असत. त्याचप्रमाणें वे. रा. गणेशभट यांनीं त्या वेळचे सांगली संस्थानचे अधिपति चिंतामणराव पांडुरंग ऊर्फ अप्पासाहेब सांगलीकर यांचेजवळ आश्रय मिळावा अशी विनंति केली. तेव्हां सांगलीकर यांनीं गणेशभटजीस शिरहट्टी येथें राव. केशव बाळकृष्ण लागू यांचेकडे जाण्यास सांगितलें.

रावसाहेब लागू हे त्यावेळीं शिरहट्टीचे अधिकारी होते. त्यांनीं गणेशभटजीस येरबुद्दीहाळ नांवाचे खेडेगांवीं आपल्या खासगत जमिनीवर देखरेख करण्यास पाठविलें. भटजीनीं इमानेंइतबारें काम केल्याचें पाहून लागू फार संतुष्ट झाले व लागलीच भटजींना सरकारी कोठीवर नेमिलें. पुढ शिरहट्टी तालुक्यापैकीं कड-कोळ व कुसलापूर या दोन गांवचे मामलतीवर नेमणूक केली. भटजीनीं अगदीं वृद्धापकाळ होईपर्यंत सरकारी कोठीचें काम संभाळून या दोन्ही खेडेगांवचें मामलतीचें काम चांगल्या प्रकारें बजाविलें. आपण आतां फार थकलों आहों करितां आमचे चिरंजीव गोपाळ यास आपले कामावर नेमण्याबद्दल भटजीनीं राव. लागू यांस विनंति केली. त्यावरून राव. लागू यांनीं गोपाळराव यांस कोठीवर व मामलतीवर कायम केलें. भटजी कडकोळ येथेंच घर व शेती करून राहिले.

पुढें गोपाळराव यांनीं वडिलोपार्जित काम मोठ्या हुशारीनें चालविलें. नंतर राव. लागू यांनीं आपल्या खासगीकडील फार अव्यवस्था झाल्यामुळें त्यांना खासगीकडे नेमिलें. हें काम त्यांनीं आपल्या हयातीपर्यंत केलें. यांना एकंदर मुलगे तीन; गणेश, वासुदेव व विष्णु; पैकीं विष्णु हे चरित्रनायक होत. इ. स. १८६० चे सुमारास चोहोंकडे संस्थानांतून सुद्धां इंग्रजी अंमल सुरू होऊन सर्व व्यवस्थेंत फरक पडल्यामुळें गोपाळराव यांना नोकरीबद्दल जी जमीन होती ती जाऊन त्यांना दरमहा पगार ठरला. तेवढ्या पगारांत खर्च भागेना तेव्हां वडील मुलास मोजणीखात्यांत शिकण्याकरितां ठेविलें. पुढें वासुदेव यांची म्हैसूर सर्वेकडे नेमणूक झाली. वासुदेव यांनीं आपले धाकटे बंधूस (विष्णूस) धारवाड येथें विद्याभ्यासाकरितां ठेविलें; हेच चरित्रनायक होत.

रा. विष्णुपंत यांचा जन्म शके १७७३ विरोधीनामसंवत्सरे भाद्रपद वद्य अष्टमी ता. १८ सप्टेंबर सन १८५१ इसवी सालीं झाला. यांची मुंज पांचवे वर्षीं झाली. नवव्या वर्षापर्यंत हे कडकोळ येथेंच होते; पुढें हावनूर येथें यांचे चुलते गोविंदभट आपटे रहात होते. त्यांच्याजवळ विष्णुपंतानीं ब्रह्मकर्मापैकीं

रुद्र व मंत्र–संहिता पाठ केली. नंतर बारावे वर्षी धारवाड येथें शाळेंत जाऊं लागले. धारवाड येथें मराठी अभ्यास पूर्ण झाल्यावर यांची हुषारी पाहून तेथील मास्तर बाळकृष्णपंत गडबोले यांनीं विष्णुपंतास ट्रेनिंगकॉलेजांत घातलें. “ गडबोले मास्तरांचे मनांत ट्रेनिंगमध्यें मास्तर तयार झाल्यावर आपल्या जागीं यांना नेमवावें व आपली मुलगी यांना द्यावी. ” अशा हेतूनें वरील तजवीज गडबोले मास्तरांनीं केली. परंतु त्यावेळीं नारायण भिकाजी फडके मुंबईस इंजिनियर खात्यांत अकौंटंट होते, त्यांनीं विष्णुपंतास इंग्रजी शाळेंत घातलें.

विष्णुपंतांचे लग्न सोळावें वर्षी झालें. इ. स. १८७२ चे सुमारास सांगली सरकारचे अम्मलदारांनीं गोपाळपंतास तुम्ही आतां फार थकले आहांत करितां मुलास कामावर ठेवावें; असा तगादा केला. त्यावेळीं विष्णुपंत कोल्हापूर येथें इंग्रजी शिकत होते. “ आपले मनांत जास्त शिकण्याचें आहे करितां इतक्यां-तच माझी नोकरी करण्याची इच्छा नाहीं. ” असें विष्णुपंतानीं वडिलास व बंधूस कळविलें. तेव्हां वडिल बंधूनीं नोकरी सोडून वडिलार्जित नोकरी धरली.

विष्णुपंत हे इ. स. १८७३ सालीं म्यॅट्रिक झाले. हे पुढें मेडिकल कॉले-जांत गेल्यामुळें यांना कोल्हापूर येथील **आलफ्रेड स्कॉलरशिप** दरमहा रुपये पंचवीस प्रमाणें पांच वर्षे मिळाली. त्यांनीं चांगला आभ्यास करून इतर बक्षिसें व स्कॉलर्शिपा मिळविल्या होत्या; हे इ.स.१८७८त एल्. एम्.ऍंड् एस्. या परिक्षेंत पहिल्या वर्गांत आले. त्याच सुमारास धारवाड येथें महामारीचा उपद्रव फार झाला होता त्यावेळीं डॉ. विष्णुपंत यांनीं धारवाड येथें पुष्कळ लोकांना सदरहू उप-द्रवापासून बचाविलें. अशा कळकळीनें काम केल्यामुळें धारवाड येथील लोकच काय ! परंतु जिल्हाअधिकारी मे. कलेक्टर साहेब फार खुष झाले; आणि त्यांनीं त्यांची शिफारस केली. पुढें धारवाड जिल्ह्यापैकीं हावेरी येथें नवा दवाखाना झाल्याबरोबर डॉ. विष्णुपंत यांचीच शिफारस होऊन त्या दवाखान्यावर दोनशें रुपयावर नेमणूक झाली. हावेरीस व आसपासचे गांवींही आपल्या धंद्यांत यांनीं लोकप्रियता संपादली होती. इ. स. १८८३ त कोल्हा-पूरचा कारभार आबासाहेब रिंजंट करीत असत व याच सुमारास इस्पितळाकरितां बांधलेली हल्लींची इमारत पूर्ण झाली. दवाखानाखातें करवीर सरकारनें आपले ताब्यांत घ्यावे असें इंग्रज सरकारच्या मंजूरीनें ठरलें. दवाखा-न्यावर एक एल्.एम्. ॲंड एस्. नेमावयाचा असे नियमांत आलें. त्यावेळीं तिघांचे

अर्ज आले. त्यांत डॉ. विष्णुपंत यांचाही अर्ज होता. डॉ. विष्णुपंत आपटे हायस्कुलांत होते त्यावेळीं श्रीमंत आबासाहेब रिजंटही हायस्कुलांत होते; व तेव्हांपासून डॉ. आपटे यांचा स्वभाव त्यांस माहित होता. तसेच कोल्हापूर हायस्कुलांतून जाऊन पहिलेच, एल. एम्. ॲंड एस्. झालेले, सुस्वभावी डॉ. आपटे यांचा, डॉ. सिंक्लेर यांस अभिमान वाटे! तेव्हां त्यांनीं व रिजंटचे सेक्रेटरी रा. ब. कृष्णाजीपंत मोखले यांनींही डॉ. आपटे यांचीच शिफारस केली. तेव्हां डॉ. आपटे यांचीच रिजंट यांनीं त्यांच्या कांहीं अटीवर नेमणूक केली. त्या अटी—" आपणांस खालसाप्रमाणें पेनशन मिळावें आणि बढती दर पांच वर्षांनीं पन्नास रुपये प्रमाणें व शेवटीं शंभर मिळावी. " याप्रमाणें स. १८८३ चे मे महिन्यांत डॉ. विष्णुपंत आपटे कोल्हापुरास कायम झालें.

असो, दवाखान्यावर कायम झाल्यावर डॉ. आपटे यांच्याकडे दवाखान्याशिवाय दुसरी कोणतीही कामें ठेविलीं नव्हतीं. फक्त ऑफिसचें मराठी काम मात्र ठेविलें होतें. बाकी सर्व मुख्य डॉक्टर करीत. यामुळें डॉ. आपटे आल्यावर सर्व मान फिरलें. डॉ. आपटे सकाळीं उठून साडेसात वाजेपर्यंत दवाखान्यांतील सर्व रोग्यांस पाहून त्यांच्या औषधपाण्याची तजवीज लावीत. नंतर लागलीच बाहेरच्या रोग्यास पाहून औषधें देण्याकरितां येऊन बसत. ते १० वाजेपर्यंत मोठ्या शांतपणानें यथास्थित काम करीत; रोगी लहान असो, मोठा असो, श्रीमान् असो अगर गरीब असो, व कोणत्याही जातीचा असो, सर्वांस रोगाच्या महत्वाप्रमाणें रोगाचीं लक्षणें जाणून त्यावर योग्य खाणें पिणें सांगून औषध लिहून देत असत. विशेष कांहीं जास्त असल्यास पुन्हां परीक्षा करण्याकरितां बाजूस बसवीत व नंतर पहात असत. हे काम करीत असतांना रोग्यावर रागावत नसत, तोंड टाकीत नसत, व रोग्यास पाहतांना चिळस करीत नसून हेळसांड कधींही करीत नसत. डॉ. आपटे यांना इंग्रजी, मराठी, कानडी व हिंदुस्थानी या चारी भाषा येत असल्यानें रोग्याशीं त्याच्या भाषेंत बोलून, त्याचें ह्मणणें ऐकून घेत. यानंतर शस्त्रक्रिया करीत. आणि गांवांत कोठें रोगी पहाण्यास कोणी बोलाविल्यास जात असत. परंतु सकाळीं दवाखान्यांतील काम करण्याचे वेळीं बाहेर जात नसत. यामुळें डॉ. आपटे यांनाच प्रकृती दाखवावयाची असली तर ते सकाळीं १० वाजेपर्यंत हटकून दवाखान्यांत भेटावयाचे असा नियम असे. मधल्या वेळीं कोणी रोगी घरीं आल्यास त्याला झिडकारीत नसत. आपलें घरचें काम बाजूस ठेवून, प्रथम त्या रोग्याची सर्व

ग्रंथसंग्रहालय डॉ. म. व. ... (stamp)



व्यवस्था करीत असत. दोन प्रहरीं कोणी बोलाविल्यास ४ वाजण्याचे पूर्वी जात असत. नेहमीं ४ वाजल्यावर दवाखान्यांतील रोगी पहात असत. पांच वाजल्यानंतर कोठें बाहेर जाणें असल्यास जात. याप्रमाणें डॉ. आपटे यांनीं सतत सोळा वर्षें क्रम चालविला.

स्त्रीरोग्यांची शुश्रुषा करण्याकरितां स्त्रियाच असाव्यांत ह्मणून डॉ. आपटे यांनीं नर्सचें व सुईणीचें काम शिकविण्याचा वर्ग सुरू केला. हा वर्ग दोन तीन वर्षें चालला व यांत बऱ्याच स्त्रिया तयार झाल्या. हा वर्ग शिकवितांनाच डॉ. आपटे यांनीं ' **प्रसूत चिकित्सा** ' या नांवाचें पुस्तक लिहिलें.

डॉ. आपटे यांनीं असिस्टंट दरबार सर्जनची नोकरी धरल्यानंतर ते केवळ ' फक्त सरकारी कामाकरितां ' या शिक्यास अनुरूपच वागले नाहींत. लहानपणापासून त्यांचें लक्ष देशोत्कर्षाच्या अनेकविध गोष्टींकडे लागलें होतें. यांचें अध्ययनव्यासंग सारखे सुरूच होते, शिवाय त्यांनीं आर्यवैद्यकांचे ग्रंथ वे. शा. सं. शंकरशास्त्री गोखले विद्याविलासकर्ते यांच्या समागमें वाचले; दोन्ही कडील माहिती असावी, असें डॉ. आपटे ह्मणत असत. यांनीं ' **ग्रामवैद्य** ' नांवाचा ग्रंथ लिहिला. दुसरे कांहीं लहान मोठे लेख व निबंध पूर्ण—अपूर्ण त्यांचे घरीं पडून आहेत. मध्यंतरी **डोमेस्टिक एकॉनमी** नामक ग्रंथ इंग्रजसरकारांनीं तयार करविला, त्याचें भाषांतर प्रो. बाळाजी प्रभाकर मोडक यांनीं केलें. त्यामध्यें डॉ. आपटे यांचेंही बरेंच सहाय्य होतें. पुढें १८९४ पासून **ग्रंथमालेंत न्यायवैद्यक** हा ग्रंथ डॉ. आपटे यांच्याच लेखणींतून उतरला आहे. डॉ. आपटे यांनीं पथ्य, मोकळी हवा व व्यायाम, आमच्या लोकांचे दौर्बल्य आणि उष्ण व शीत या विषयांवर व्याख्यानें दिलीं होतीं. शिवाय ' हल्लींच्या अभ्यासापासून विद्यार्थ्यांच्या दृष्टीवर परिणाम ' हें व्याख्यानही फारच सुरेख दिलें होतें. कोल्हापूर येथील नेटिव्ह जनरल लायब्ररी या संस्थेचे डॉ. आपटे अध्यक्ष उपाध्यक्ष होते. इ. स. १८८७ पासून यांनीं आपलें मन वेदांत विषयाकडे पुर्ण वळविलें. विशेषें करून डॉ. आपटे यांनीं कोल्हापूर येथील **वेदशास्त्राभ्याभिनंदिनी** सभेची सेवा फार उत्तम केली. डॉ. आपटे यांना गायनविषय चांगला अवगत होता. कॉलेजांत **गायन समाज** रा. काशीनाथपंत केळकर यांच्या मेहनतीनें स्थापन झाला खरा; परंतु हा **गायन समाज** डॉ. आपटे यांनींच विशेष रंगारूपास आणिला. हे स. १८८७ पासून या संस्थेचे सेक्रेटरी आमरण होते.

डॉ. आपटे यांची प्रकृति आम्लपित्ताचे विकारानें दिवसेंदिवस क्षीण होत

चालली होती. एकाद्या निरुपद्रवी प्राण्यावर ज्याप्रमाणें हिंस्त्र पशू झडप घालतो ! त्याप्रमाण डॉ. आपटे यांची स्थिति झाली. ती अशी:—दवाखान्यांत एक रोगी आला होता, त्याचे मांडीचे हाड मोडलें होतें; तें हाड कापून रोग्यास रोग—मुक्त तर केलेंच; परंतु, त्या हाडाचा दंश डॉ. आपटे साहेब यांच्या बोटास झाल्यामुळें, त्या विषाचा परिणाम भयंकर होऊन प्रकृती अत्यावस्थ झाली. तशा स्थितींतच मृत्युपत्र वगैरे सर्व करून ईश्वरनामसंकीर्तनांत निमग्न असतां यांनीं ता. २९ सन १८९९ रोज शनवार सकाळीं स्वर्गलोकीं गमन केलें. सदरहु बातमी शहरांत हां! हां! ह्मणतां पसरली. गरिबांचे कनवाळु डॉ. आपटे आपणांस सोडून गेले, असे डॉक्टर आतां पुढें होणार नाहींत; असें सर्वतोमुखीं निघूं लागलें. श्री० महाराज सरकारचे हुकुमानें शाळा व कचेऱ्या सर्व बंद ठेविल्या.

मे. खानबहाद्दुर मिरजीभाई कुवरजी यांचे, डॉ. सिंक्लेर यांस पत्र आलें होतें; त्यांत त्यांनीं " डॉ. आपटे यांच्या सारखा कामांत निस्पृह व परोपकारी मनुष्य पुन्हां दरबारास मिळणें शक्य नाहीं. अशा सद्‌गृहस्थाचें स्मारक करून ठवावें. "

डॉ. सिंक्लेर ह्मणतात, " डॉ. आपटे यांचा स्वभाव फार प्रेमळ, मन-मिळाऊ, त्याचें अंगचें नैसर्गिक चातुर्य, न्यायबुद्धी व सरळ वर्तन हे गुण अवर्णनीय होते. आपल्या धंद्याचें कामांत त्यांचें कौशल्य फारच वाखाणण्या-सारखें होतें. तरी त्यांचें अद्वितीय गुण सर्वांपुढें सदैव स्मरणीय आहेत. आणि सरकारचा एक इमानी नोकर नाहींसा झाला. "

डॉ. आपटे मोठे धार्मिक असून **चिम्मड पंथी** होते. असो, डॉ. आपटे यांचें समग्र विस्तीर्ण चरित्र कोल्हापूर येथील प्रसिद्ध मासिक पुस्तक **ग्रंथमाला** वर्ष६ अंक ५वा यांत आलेंच आहे. त्यावरूनच मी हें अल्प चरित्र लिहिलें आहे. **ग्रंथमाला** कर्ते यांनीं डॉ. आपटे यांचें समग्र चरित्र प्रसिद्ध केल्यामुळें मला बिलकूल श्रम पडले नाहींत, याबद्दल मी " ग्रंथ मालाकर्त्यांचा " फार आभारी आहे.

रामचंद्रभट यांस पुत्र दोन; हरी व गणेश. हरी यांस पुत्र रावजी व विष्णु. रावजीस पुत्र बाळकृष्ण हे सांगली येथें असतात. हे शेती व व्यापार करितात. यांचें टोपण नांव बंडो असें आहे.

बाबूराव यांस पुत्र तीन; दिनकर, लक्ष्मण व मोरो. हे तिघेही पुण्यास होते. दिनकर अविवाहित होते. लक्ष्मण यांस पुत्र महादेव; यांना पुत्र पांच; गणेश,

वामन, दिनकर, कृष्ण व पुरुषोत्तम. महादेव नागपूर रेल्वेंत नोकर होते. गणेश हे मिलटरी अकौंट ऑफिसांत नोकर होते. यांचे पुत्र शंकर व श्रीधर आहेत. वामनराव बंगाल रेल्वेंत नोकर आहेत. कृष्णराव रेल्वेंत नोकर आहेत. मोरो हे वैदिक व वैद्य होते. मोरोशास्त्री या नांवानें यांना संबोधित असत. मोरेश्वरशास्त्री हे चिंचवड येथें शाळामास्तर होते. हे शाळामास्तराचें काम करून इतर वेळांत वैद्यकीचाही व्यवसाय करीत असत. मोरशास्त्री यांस शेवटचे बाजीरावसाहेब यांच्याकडून वर्षासन होतें. मोरशास्त्री यांना शाळाखात्याचे वरिष्ठांनीं ४० रुपये पगारावर नागपूर येथील मुलींचे शाळेवर हेडमास्तर नेमिलें. मोरशास्त्री चिंचवड येथील लोकांस किती प्रिय झाले होते हें त्यांच्या अभ्रूपत्रावरून सिद्ध होत आहे.

## वे. शा. सं मोरशास्त्री यांस दिलेलें अभ्रूपत्र.

श्री.

श्रीमोरया.

यादी श्री देवसंस्थान चिंचवड व समस्त रयत लोक चिंचवड वगैरे देहानिहाय यांजकडून वे. शा. सं. रा. रा. मोरो बाबूराव आपटे यांस सुरु सन१२६६ फसली कारणें अभ्रूपत्र देण्यांत येतें कीं, मौजे चिंचवड येथें सरकारी शाळा सन १८४४ इसवी सालांत येऊन ह्या कामावर पंतोजी कसबे चाकण येथील आला होता. त्याची बदली सन १८४५ इसवी सालांत होऊन या कामावर तुमची नेमणूक झाली. तुम्हीं मुलांस विद्याभ्यास होण्याविषयीं बहुत मेहनत घेऊन आजपर्यंत मुलें सुमारें ७५ होऊन त्यापैकीं सरकारी रिवाजाप्रमाणें कांहीं मुलांस सर्टिफिकीटें इन्स्पेक्टर यांची मिळालीं व कांहीं मुलांस नोकऱ्याही मिळाल्या आहेत. दुसरें तुम्ही आल्या दिवसांपासून सरकारी काम नेमलें वेळेंखेरीज रिकामें वेळेंत पूर्वीं पाठशाळेंत वैद्यशास्त्राचा अभ्यास करून तुम्हांस वैद्यशास्त्राबद्दल दरसाल दक्षिणाही मिळत आहे. त्या शास्त्राचे अनुमतानें येथें आजपर्यंत महत् रोगासुद्धां बहुतेकांच्या व्याधी औषधी देऊन बऱ्या झाल्या आहेत. याशिवाय फावल्या वेळेंत तुम्ही उपयुक्त गोष्टी सांगून लोकांचीं मनें सज्ञान केलीं आहेत. आजपर्यंत अकरा वर्षें सतत मेहनत घेऊन लोकांच्या कल्याणासाठीं झटला आहां. आजपर्यंत टपका न

येतां चालवर्तणूक वगैरे उत्तम तऱ्हेची आहे याबद्दल तुह्मांस अन्नपत्र दिलें आहे. मित्ती कार्तिक शुद्ध प्रतिपदा शके १७७८ नलनाम संवत्सरे.

पंचकमेटी.

**मल्हार विठ्ठल गपचुप, नारो बल्लाळ खोले, विनायक बाजी चाफेकर.**

सदरहु अन्नपत्राचें खालीं गांवच्या लोकांच्या पाऊणशें अधिक सह्या आहेत आणि नंतर पंचकमेटीच्या सह्या आहेत. मोरशास्त्री यांस पुत्र तीन; चिंतामण नारायण व रामचंद्र. चिंतामण हे ७ रुपये पगारावर शिपायाचे जागीं नोकर होते. या जागेवर नोकर असतांना यांचें झालेलें शिक्षण व हुषारी पाहून सरकारानें यांना ४० रुपये पगारावर सॅनिटरी कमिशनरचें दुय्यम क्लार्क नेमिलें. दोन अडीच वर्षांनंतर चिंतामणराव यांना रजिस्ट्रेशन हेडक्लार्कचे जागीं ७५ रुपये पगारावर नेमिलें. कांहीं वर्षांनंतर पुढें रजिस्ट्रेशन खात्याचे इन्स्पे-क्टरचे जागीं कायम झालें. यांना लेखन—वाचनाचा व्यासंग असल्यामुळें, यांनीं फावल्या वेळांत कांहीं निबंध व पुस्तकें लिहिलीं आहेत त्यांचीं नांवें— **उत्तम शेतकरी, सुमित्र नाटक, पुतळाबाई** ( श्रीछत्रपती शिवाजीमहाराज यांची कारकीर्द ) नांवाची ऐतिहासिक कादंबरी, **सत्यासत्य विचार** व **शामभट** येणेप्रमाणें पुस्तकें प्रसिद्ध आहेत. यांना पुत्र दोन; बाळकृष्ण व विष्णु. बाळकृष्ण व विष्णुपंत हे हल्लीं उमरावती येथें खास घरीं आहेत. विष्णुपंत यांस पुत्र भालचंद्र हा विद्यार्थी आहे. नारायणराव हे पोलिस सुपरिंटेंडंटचे हेड्क्लार्क ७५ रुपये पगारावर होते. यांना पुत्र तीन; दिनकर, निळकंठ व भिकाजी. दिनकर यांना पुत्र गणपती व मोरेश्वर. दिनकरराव यांचीं मुलें; व निळकंठ यांचीं मुलें, अनंत व गोविंद; आणि भिकाजी हे सर्व हयात आहेत. रामचंद्र यांस पुत्र विनायक, वासुदेव व रघुनाथ. विनायकराव, वासुदेवराव व विद्यार्थी रघुनाथ हे अंजनगांव सुर्जी येथें शेती करून आहेत. विनायकराव यांस पुत्र दत्तात्रय हा विद्यार्थी आहे. विनायकराव यांचे आजे मोरो बाबूराव हेच वडखोळहून देशावर आले असावेत असें वाटतें.

वडखोळ येथील आपटेपैकीं कोणता पुरुष देशावर आला हे जरी नक्की सांगतां येत नाहीं तरी प्रसिद्ध डॉ. आपटे यांचे आजे गणेश, यांनींच प्रथम शिरहट्टी-कडकोळ येथें वस्ती केली असें वरील माहितीवरून स्पष्ट होत आहे. त्याचप्रमाणें हल्लीं उमरावती येथें राहणारे विष्णु चिंतामण व अंजनगांव सुर्जी येथें राहणारे विनायक रामचंद्र यांचे आजे मोरो बाबूराव हेच देशावर आले.

शिरहट्टी—कडकोळ येथील आपट्यापैकींच रामचंद्रपंत आपटे, जमखंडी संस्थानापैकीं तालुका कुंदगोळ येथील पाळंदे ( फडणीस ) यांचे घरांत दत्तक गेले. पाळंदे यांनीं रामचंद्रपंत आपटे यांस दत्तक घेतल्यावर पाळंद्यांचा वंश चालू झाला. हल्लीं रामचंद्रपंतांचे चार पुत्रांपैकीं एक पुत्र गणेश ऊर्फ तात्या, सात नातू व दहा पणतू आहेत. नातवांपैकीं पहिल्या पुत्राचे चिरंजीव शिवराम व कृष्ण हेच प्रपंचचालकांत मुख्य आहेत. शिवरामपंत पाळंदे हे वडिलार्जित फडणीशीचे जागेवर असून त्याना सेकंड क्लास मॅजिस्ट्रेटचा अधिकार आहे. वरील कुटुंब एकत्र आहे व हें एकत्र असण्याचें मुख्य कारण प्रपंचधुरीणत्वाचें कामांत शिवरामपंत कुशल असून त्यांचे सर्व बंधु व्यवहार चतुर आहेत. " असें ह्मणण्यास मला फार कौतुक वाटत आहे. " कृष्णाजीपंत तंतूवाद्याचें शोकी आहेत. पाळंद्याचें मूळ उपनांव **गद्रे** होय.

कृष्णंभटाचे पुत्र बाबूभट; यांस पुत्र बाजी व हरी. बाजीस पुत्र चार; बाळकृष्ण, रामचंद्र, विनायक व विष्णु. बाळकृष्ण यांस पुत्र दोन; वासुदेव हा मुका आहे व वामनराव संस्थान मिरज—मळा पैकीं बुदगांव येथें शाळामास्तर आहेत. रामचंद्र यांस पुत्र महादेव. महादेव हे संस्थान सांगली येथें नोकर आहेत. विनायक याचा नातू. पांडुरंग गणेश हा विद्यार्थी आहे. विष्णुपंत हे सांगली येथें शेती व व्यापार करून आहेत. यांस पुत्र गोपाळ हे सज्ञान आहेत.

---

## असोलीपाल येथील आपटे

बाबजीभटास पुत्र गोपाळभट; यांस पुत्र सात; पैकीं, अनंतभट व बाळंभट या दोघांचा वंश चालू आहे. अनंतभटास पुत्र चार; पैकीं, सदाशिव व नारायण यांचा वंश चालूं आहे. सदाशिवभटास मुलगे दोन; जनार्दन व बाबजी. जनार्दनास मुलगे दोन; सदाशिव व शिवराम. सदाशिवास मुलगे जनार्दन व रामचंद्र हे दोघेही असोलीपाल येथें असल्याचें समजतें. शिवराम दत्तक गेले. बाबजीचे दत्तक मुलगे शिवराम यांस मुलगे चार; बाळकृष्ण, महादेव, गणेश व वामन. पैकीं महादेव व वामन यांची माहिती देतों.

# कै. वामन शिवराम आपटे यांचें चरित्र.

रा. वामनराव यांचें चरित्र विद्यमान् असलेले विनायक कोंडदेव ओक यांनीं आपल्या ‘ बालबोध ’ मासिक पुस्तकांत थोडक्यांत प्रसिद्ध केलें आहे. ते ह्मणतात—

॥ ज्ञाना वींण जे जे कळा, तेचि जाणावे अवकळा ॥
॥ ऐसा भगवंत बोलिला, चित्त द्यावें त्याचे बोला ॥

ही कवीची उक्ती कै० वामनरावजींच्या बहुमोल विद्वत्तेला शोभेल अशीच आहे. असो; वामनरावांचा जन्म इ. स. १८५८ सालीं सावंतवाडी संस्थानांतील असोलीपाल येथें झाला. हे चार वर्षांचे असतांच यांचे वडील निवर्तले तेव्हां यांच्या मातोश्री ह्यांना बरोबर घेऊन कोल्हापुरास आल्यानंतर चार वर्षांनीं त्या वारल्या त्यावेळीं वामनराव यांचा विद्याभ्यास चालला होता. घरची अतीशय गरीबी असल्यामुळें हे माधुकरी मागून निर्वाह करीत होते. हे फार बुद्धीमान् असल्यामुळें ह्यांचेवर मुख्य गुरु महादेव मोरेश्वर कुंटे यांची फार मर्जी असे. इ. स. १८७३ ह्यावर्षी ह्यांची म्यॅट्रीक्युलेशनची परिक्षा उतरली. ह्यांना जगन्नाथ शंकरशेटची २५ रुपयांची संस्कृत स्कालरशिप मिळाली, नंतर डेक्कन कॉलेजमध्यें ते अभ्यासास गेले. इ. स. १८७५ सालीं त्यांची एफ. ए. ची परीक्षा उतरली आणि इ. स. १८७९ ह्या वर्षीं ते एम्. ए. झाले. ह्यांनीं कॉलेजांतल्या स्कालरशिपा व सर्व बक्षिसें मिळवून युनिव्हर्सिटींतून भाऊ दाजीचे २०० रुपये आणि भगवानदासाचे ४०० रुपये अशीं बक्षीसें मिळविलीं. हे डेक्कनमध्यें फेलो होते. हे परिक्षेस जाऊन नापास असे कधींच झाले नाहींत. हे उत्तम पैकीं शिक्षक असल्याची ख्याती आहे. इ. स. १८८० ह्यावर्षी न्यू. इंग्लिशस्कुलांत हे शिक्षक झाले. पुढें इ. स. १८८१ पासून ‘ केसरी ’ आणि ‘ मराठा ’ हीं पत्रें चालूं झालीं. तीं पत्रें आणि ‘ न्यू इंग्लिशस्कूल ’ चालविण्याचे कामीं कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर, बळवंतराव टिळक, वामनराव आपटे, गोपाळराव आगरकर आणि महादेवराव नामजोशी हे पंचक एकचित्तानें झटूं लागले. फर्ग्युसन कॉलेजासंबंधीं जास्त यशाचा वाटा वामनरावजी आपटे यांचेकडे आहे. वामनराव संस्कृतांत मोठे पंडीत होते. ‘ स्टूडंट्स गाईड, स्टूडंट्स प्रोग्रेसिव्ह

एक्झरसाईझीस, इंग्लिश संस्कृत कोश, संस्कृत- इंग्लिश कोश आणि कुसुम-माला' हीं पुस्तकें ह्यांनीं केलीं आहेत. हीं विद्वानांस मान्य असून विद्यार्थ्यांस उपयोगी आहेत. हे विषम होऊन इ. स. १८९२ च्या आगष्ट महिन्याच्या ९ व्या तारखेस प्रातःकालीं दहा वाजतां पुणें शहरीं मरण पावले. कै. वामनराव यांचे वडील बंधू रा. महादेव शिवराम आपटे हेही ग्रॅज्युएट असून शिक्षकाचे कामांत प्राविण्य संपादून नुक्तेच पेन्शनर झाले. हे धुळें येथें ट्रेनिंग कॉलेजचे हेडमास्तर होते. नंतर सातारा हायस्कूलचे हेडमास्तर होते, याच जागीं ४०० रुपये पगारावर यांनीं पेन्शन घेतली. यांना २०० रुपये पेन्शन झालें आहे. यांचा स्वभाव गरीब असून फार मनमिळाऊ आहे. यांना भिकाजी, विनायक व पुरुषोत्तम असे तीन मुलगे आहेत. पैकीं—विनायक हे गेल्या म्यॅट्रिकचे परिक्षेंत पहिले आले यामुळें 'डोसाभाई फ्रामजी कामा' यांची स्कालरशिपही मिळाली आहे.

नारायणास पुत्र तीन; पैकीं अनंत यांस पुत्र चार; पैकीं दिवाकर व मोरभट यांचा वंश चालू आहे. दिवाकराचा पुत्र काशिनाथ ऊर्फ नाना यांस मुलगा बळवंत; यांस पुत्र लक्ष्मण. लक्ष्मण यांस पुत्र तीन; नारायण, दत्तात्रय व कृष्ण. कृष्ण विद्यार्थी असून नारायण व दत्तात्रय हे असोलीपाल येथेंच असतात. मोरभटास पुत्र चार; कृष्ण, सदाशिव, रामचंद्र व अनंत. कृष्ण हे इंदुप्रकाश छापखान्यांत बरींच वर्षें नोकर होते; यांना पुत्र येशवंत व गोविंद हे विद्यार्थी आहेत. सदाशिव हे मिरज संस्थानांत नोकर आहेत; यांना पुत्र चार. विनायक, नारायण, गोपाळ व विष्णु; हे सर्व विद्यार्थी आहेत. नारायणास टकले घराण्यांत दत्तक दिलें आहे.

अनंतभटाचे बंधू बाळंभट; यांस पुत्र रघुनाथ व काशिनाथ; रघुनाथाचा दत्तक पुत्र गोपाळ हे असोलीपाल येथें आहेत. काशिनाथ यांस पुत्र गणेश व बाळकृष्ण. गणेश यास पुत्र पांच; नारायण, गोपाळ, येशवंत, गोविंद व विठल; पैकीं गोपाळ व विठल दत्तक गेले. नारायण व गोविंद हे असोलीपाल येथें असतात. नारायणास पुत्र काशिनाथ, शिवराम व मोरेश्वर; हे विद्यार्थी आहेत. शिवरामास येशवंतानें दत्तक घेतलें. विठल हे बाळकृष्णाचे दत्तक पुत्र; हे मुंबई येथें नोकर आहेत; यास पुत्र बाळकृष्ण हा विद्यार्थी आहे. वडखोळ, असोलीपाल व मिरखोल हीं गांवें अगदीं एकमेकांजवळ आहेत. आपटे घराण्याचें मूळगांव **आजगांव** व वरील तिन्हीं गांवें वेंगुर्लें तालुक्यांत जवळ जवळ आहेत.

एकवर्षभर सारखें देशपर्यटन करून जी माहिती मिळविली ती माहिती क-दिलीच आहे. कोंकणांत आमची निरनिराळीं गांवें पुष्कळ आहेत. परंतु सर्व गांवापेक्षां आतांपर्यंत मिळविलेल्या माहितीवरून **आजगांव** हेंच मूळगांव होय. आजगांवाहून—त्रिंबक. त्रिंबकहून—कासारवेल, शिरगांव व गोटणें—देवाचें. शिरगांवहून—मालपें. गोटणें—देवाचेहून—राजापूर, आडिवरें व गोळप. येणेंप्रमाणें निरनिराळीं गांवें कोंकणांतील झाली. नंतर कोंकणांतील निरनिराळ्या गांवचे पुरुषांनीं देशावर येऊन निरनिराळ्या गांवीं वस्ती केली. आपल्यांतील बरेंच लोकांना आपला कुलस्वामी व कुलस्वामीनी माहितच नाहीं. कित्येक ग्रामदेवालाच कुलस्वामी समजतात. म्हणून प्रत्येक वंशवृक्षांत कुलस्वामी, कुलदेवी व ग्रामदेवता यांचीं नांवें नमूद केली आहेत. श्रीकुलस्वामी वाडेश्वर हें देवस्थान कोंकणांत गुहागर येथें आहे. श्रीवाडेश्वराचे देवालयासभोंवतीं चिरेबंदी मजबूत तट आहे. देवालय सर्व पाषाणाचें असून भव्य आहे. श्रीवाडेश्वरासमोर नंदादीप बरेच तेवत आहेत. या गुहागर येथें ( उपनाम ) **खरे** यांचीं घरें बरींच आहेत. **खरे** यांचाही कुलस्वामी श्रीवाडेश्वरच आहे. म्हणून **खरे** यांनीं श्रीपुढें नंदादीप ठेविले आहेत. या लेखकास लिहिण्यास अतीशय खेद वाटतो कीं, ज्या कुलस्वामी श्रीवाडेश्वराचे कृपाछत्राखालीं आपल्या घराण्याचा विस्तार विस्तृत होत असून आपण श्रीचिंतनांत काल क्रमीत आहों त्या श्रीवाडेश्वरापुढें आह्मां आपटयापैकीं एकाचाही नंदादीप चालू नसणें हे सर्व आपटे यांना लांच्छनास्पद आहे. म्हणून हा लेखक सर्व आपटे ( कुलबंधु ) यास सविनय विनंति करितो कीं, ज्यांना श्रीवाडेश्वरानें नंदादीप चालू ठेवण्याचे सामर्थ्य दिले असेल त्यांनीं अवश्य नंदादीप श्रीपुढें चालू करावा अशी पुन्हां विनंती करितो.

वंशवृक्ष छापून झाल्यावर पुस्तक छापण्याचें काम चालू असतांना रा. नरहर वासुदेव शेवडे आपटे यांचें कानपुराहून पत्र आलें आहे. सदरहु पत्रांत रा. नरहरराव यांनीं आपला वंशवृक्ष लिहून कोंकणांत राजापूर नजीक विल्हे अथवा विलये हा गांव अलीकडे ४।५ पिढींतला असून मूळगांव गोटणें-देवाचें आहे असें कळवितात. असो; " रा. नरहरराव यांचे सख्खे चुलत बंधू महादेव सदाशिव आपटे मुक्काम विल्हें यांचें नांवावर माहिती मिळण्याकरितां पत्र पाठविल्याची लेखकाजवळ नोंद आहे. "

वरील प्रमाणेंच पथरिया येथील रा. विश्वनाथराव नारायण आपटे यांनीं आपली माहिती पत्रांतून नुकतीच कळविली आहे. यांचें कोंकणांतील गांव राजापूर व देशा-

वरील गांव पथरिया. पथरिया गांवीं हलीं रा. विश्वनाथराव हे आहेत. “ आपल्या घराण्याचा दुसरा भाग प्रसिद्ध करण्याचा सुयोग श्रीकुलस्वामी बाडेश्वराचे कृपेनें या लेखकास लाभल्यास विल्हें, पथरिया व आणखी कांहीं चुकून राहिलेल्या गांवचे आपटे यांचा शोध करून त्यांची माहिती दुसऱ्या भागांत प्रसिद्ध करण्याची या गरीब व अज्ञ लेखकाची फार इच्छा आहे परंतु ती पूर्ण करणें परमेश्वराधीन आहे. ”

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥



# आगाऊ आश्रयदात्यांची नोंद.

वामन नारायण आपटे अकौंटंट रु. २५. महादेव शिवराम आपटे पेन्शनर रु. ३०. कृष्णाजी गंगाधर आपटे इनामदार रु. २०. विष्णु श्रीधर आपटे रु. ५ शिवाय एक प्रत. शंकर विठ्ठल आपटे रु. ५. सदाशिव विनायक आपटे रु. १५. गोविंद रघुनाथ आपटे रु. २ शिवाय एक प्रत. माधव बळवंत आपटे रु. १ शिवाय एक प्रत. विष्णु गोविंद आपटे रु. १ शिवाय प्रत एक. रामचंद्र काशीनाथ आपटे रु. ५. महादेव लक्ष्मण आपटे रु. ५. महादेव गोविंद आपटे रु. ५. विठ्ठल बाळकृष्ण आपटे रु. १ शिवाय प्रत. पांडुरंग शिवराम आपटे रु. ५. वामन श्रीधर आपटे रु. ५. गंगाधर कृष्ण आपटे रु. ५. वामन महादेव आपटे रु. ५. शिवराम गोविंद आपटे रु. १ शिवाय प्रत. कृष्णाजी लक्ष्मण आपटे रु. १. रामचंद्र गणेश आपटे रु. १०. विष्णु कृष्ण दीक्षित आपटे रु. १ शिवाय प्रत. लक्ष्मण जनार्दन आपटे रु. २०. शंकर रामचंद्र आपटे रु. ५. वामन चिंतामण आपटे रु. ३. विष्णु वामन आपटे रु. १ शिवाय प्रत. जनार्दन पांडुरंग आपटे रु. १ शिवाय प्रत. हरी नारायण आपटे रु. ४. माधव विनायक आपटे रु. १०. त्रिंबक रामचंद्र आपटे रु. १ शिवाय प्रत. नारायण विठ्ठल आपटे रु. ११. शिवराम केशव आपटे रु. १ शिवाय प्रत. रघुनाथ बळवंत आपटे रु. १. रामचंद्र त्रिंबक आपटे रु. १ शिवाय प्रत. लक्ष्मण रघुनाथ आपटे रु. १. केशव गणेश आपटे रु. २ शिवाय प्रत. रघुनाथ गोपाळ आपटे रु. १०. दाजी नागेश आपटे रु. ५. गणपतराव श्रीधर आपटे रु. ३०. वामन गंगाधर आपटे रु. ३ शिवाय प्रती दोन. हरी बळवंत आपटे रु. २ शिवाय प्रत. सदाशिव त्रिंबक ऊर्फ बाबासाहेब आपटे रु. ५०. वामन गोविंद दी० आपटे रु. १ शिवाय प्रती २. भास्कर सखाराम आपटे रु. १. नारायण श्रीधर आपटे रु. २. अनंत विष्णु आपटे रु. १. शिवाय प्रत. दामोदर रामचंद्र आपटे रु. २ शिवाय प्रत. केशव नारायण आपटे रु. १. शिवाय प्रत. वैजनाथ रंगदीक्षित आपटे रु. २. बळवंत नारायण आपटे रु. १०. भास्कर गणेश आपटे रु. १. गोविंद सदाशिव आपटे रु. १५. येशवंत गोविंद आपटे रु. ३५. रामचंद्र निळकंठ आपटे रु. १ शिवाय प्रत. सरदार श्रीधर गोपाळ ऊर्फ दाजी साहेब आपटे रु. ५०. माधव

भोर

राव कृष्ण आपटे रु. १५. रामचंद्र गोविंद आपटे रु. ४. गणेश केशव आपटे रु. ५. दामोदर सिताराम आपटे रु. ३. चिंतामण केशव आपटे रु. १ शिवाय प्रत. यज्ञेश्वर चिंतामण आपटे रु. १. वामन केशव आपटे रु. ४. पुरुषोम रामचंद्र आपटे रु. ५. कृष्णाजी त्रिंबक आपटे रु. ५. गणेश श्रीधर आपटे रु. ५. दत्तात्रय भिकाजी आपटे रु. १ शिवाय प्रत. गोविंद सदाशिव आपटे रु. २ शिवाय प्रत. सिताराम बाळकृष्ण आपटे रु. १ शिवाय प्रत. नारायण वासुदेव आपटे रु. १ शिवाय प्रत. चिंतामण गणेश आपटे रु. ५०. गणेश रामचंद्र ऊर्फ तात्या पाळंदे ( फडणवीस ) रु. ५ शिवाय प्रत. केशव काशिनाथ आपटे रु. २०. कृष्णाजी महादेव आपटे रु. ५. मल्हार विठ्ठल ऊर्फ बापूराव आपटे रु. ५१. अंताजी जिवाजी आपटे रु. १०. धोंडो गोपाळा आपटे रु. ५. चिंतो गोपाळ आपटे रु. २. भीमराव विनायक आपटे रु. १० विनायक सदाशिव आपटे रु. २. दत्तात्रय पांडुरंग आपटे रु. १ शिवाय प्रत. दत्तात्रय वासुदेव आपटे रु. १ शिवाय प्रत. व्यंकटराव विठ्ठल आपटे रु. १ शिवाय प्रत. कृष्णाजी गोपाळ आपटे रु. १ शिवाय प्रत. परशराम विष्णु आपटे रु. ५ शिवाय प्रत. विष्णुबळवंत आपटे रु. ५. गणेश श्रीधर आपटे रु. ७. बाळकृष्ण रावजी आपटे रु. १०. प्रो. रघुनाथ नारायण आपटे रु. ३५. अनंत बाळाजी आपटे फक्त प्रत. विनायक परशराम आपटे रु. १ शिवाय प्रत. गोविंद केशव आपटे रु. २ शिवाय प्रत. रामचंद्र मोरेश्वर आपटे रु. २५. विठ्ठल भिकाजी आपटे रु. १ शिवाय प्रत. दत्तात्रय गोविंद आपटे रु. १ शिवाय प्रत. गोपाळराव आपटे वैद्य रु. ४. गणपतराव रामचंद्र आपटे रु. २५. विष्णु बाजी आपटे रु. २ शिवाय प्रत. सदाशिव मोरेश्वर आपटे रु. ४. गोविंद रामचंद्र आपटे फक्त प्रत. विष्णु गंगाधर आपटे रु. १ शिवाय प्रत. महादेव वासुदेव आपटे रु. १ शिवाय प्रत. कृष्णाजी वामन आपटे रु. २ शिवाय प्रत. विष्णु कृष्ण आपटे रु. २ शिवाय प्रत. नारायण शिवराम आपटे रु. ४. माहादेव रामचंद्र आपटे रु. ३. महादेव चिंतामण आपटे रु. १ शिवाय प्रत. वामन बाळकृष्ण आपटे रु. १ शिवाय प्रत. शंकर गोपाळ आपटे रु. १ शिवाय प्रत. कृष्णाजी विनायक ऊर्फ काका आपटे रु. २५. अप्पाराव आपटे रु. २ शिवाय प्रत. बापूराव आपटे रु. १ शिवाय प्रत. कृष्णाजी विष्णु आपटे रु. ५ शिवाय प्रत. नारायण गंगाधर आपटे रु. २ शिवाय प्रत. शंकर रावजी आपटे रु. १०. विष्णु रामचंद्र आपटे रु. २ शिवाय प्रत. विष्णु चिंतामण आपटे रु. २ शिवाय प्रत. पांडुरंग पुरुषोत्तम

आपटे रु. ३. आबाजी महादेव आपटे रु. १ शिवाय प्रत. त्रिंबक वामन आपटे रु. २ शिवाय प्रत. लक्ष्मण चिंतामण आपटे रु. ७. विश्वनाथ आत्माराम आपटे रु. ५. शंकर गणेश आपटे रु. २. शंकर बळवंत आपटे रु. ४ श्रीरंग जिवाजी आपटे रु. ५. विश्वनाथराव नारायण आपटे रु. ५. शिवाय प्रत.

**पुस्तक तयार झाल्यावर व्ही० पीनें मागविणारांची नोंदः—**

विनायक विष्णु आपटे मामलेदार रु. १०. अनंत महादेव आपटे रु. २. रामचंद्र भिकाजी आपटे रु. ५ शिवाय दोन प्रती. चिंतामण महादेव आपटे रु. ५ शिवाय प्रत एक. नरहरराव विश्वासराव आपटे रु. २० ( शिवाय फोटो खर्च ) केशव सदाशिव आपटे रु. २. विष्णु गणेश आपटे रु. ५ शिवाय प्रत. हरी रामचंद्र आपटे रु. २. शिवराम त्रिंबक आपटे रु. ५. दत्तात्रय अनंत आपटे रु. ३. नारायण हरी आपटे रु. ५ शिवाय प्रत. दामोदर बाळकृष्ण आपटे रु. ३. रामचंद्र त्रिंबक आपटे फक्त प्रत. हरी गणेश ऊर्फ नानासाहेब आपटे रु. १४०. हरी सदाशिव आपटे रु. ३. वासुदेव काशिनाथ आपटे रु. ३. लक्ष्मण विनायक आपटे फक्त प्रत. वासुदेव विठ्ठल आपटे फक्त प्रत. गोविंद गणेश आपटे फक्त प्रत. रघुनाथ लक्ष्मण आपटे रु. ५. दत्तात्रय विष्णु आपटे रु. १०. दत्तात्रय केशव आपटे फक्त प्रत. बळवंत नारायण आपटे फक्त प्रत. वासुदेव गणेश दी० आपटे फक्त प्रत. निळकंठ बल्लाळ आपटे रु. २. आत्माराम बाळकृष्ण आपटे फक्त प्रत. भिकाजी लक्ष्मण आपटे रु. १०. विनायक रामचंद्र आपटे फक्त प्रत. नरहर वासुदेव आपटे प्रत एक.

घराण्यांची माहिती मिळविण्याकरितां मला प्रवास करावा लागला. या प्रवासामुळें शारीरिक व मानसीक श्रम मला फारच झाले. परंतु या श्रमरूपीं वृक्षाला जीं सुंदर फळें आलीं त्याचें सर्व श्रेय **आगाऊ आश्रयदाते** यांचेकडे आहे. आगाऊ आश्रयदात्यांनीं जर पुस्तक तयार झाल्यावर घेण्याचें व मदत करण्याचें कोरडें आश्वासन दिलें असतें तर माहिती मिळविणें शक्यच नव्हतें ! ! मग पुस्तक तयार होणें तर सर्वथैव अशक्य झालें असतें. परंतु **श्रीकुलस्वामी वाडेश्वराचे** कृपेनें व आगाऊ आश्रयदात्यांच्या मदतीनें हें पुस्तक तयार झालें ह्मणण्यास कांहींच हरकत नाहीं.

18 APR 1990